शास्त्रीबुवांच्या समग्र वाङ्मयाचें सार-संकलन

# चिपळूणकर दर्शन

. ग्रं. सं. ठाणें
य निबंध
नं. ९२२६

REFBK-0010856

मॉडर्न बुकडेपो प्रकाशन

# चिपळूणकर–दर्शन

[ कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या समग्र वाङ्मयांतील वेंचक विचारांचें यथार्थ दर्शन घडविणारा लेखसंग्रह ]

संपादक

डॉ. अ. ना. देशपांडे

. डी., नागपूर

REFBK-0010856

मॉडर्न बुकडेपो प्रकाशन

किंमत तीन रुपये

☆

आवृत्ति पहिली
१७ मार्च १९६०

☆

सर्व हक्क स्वाधीन

मुद्रक
दामोदर त्र्यंबक जोशी,
बी. ए. ( टिळक ),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

प्रकाशक :
श्री. कमलाबाई भिडे,
मालक, मॉडर्न बुकडेपो,
बाजीराव रस्ता, पुणें २

# चिपळूणकर–दर्शन

## विषयानुक्रमणिका


प्रकाशकांचें निवेदन १
प्रास्ताविक [ डॉ. अ. ना. देशपांडे ]
वि. कृ. चिपळोणकर चरित्र २१
कै. विष्णुशास्त्री २९

१ प्रवास १
२ कविता ३
३ समुद्र ५
४ कालिदासाच्या कांहीं कृतींचें रसग्रहण ११
५ परभाषेंतील शब्दांची योजना २१
६ नाटकें करावीं कीं करूं नयेत ? २४
७ शकुन ३७
८ गर्व ४७
९ टीकाकार कसा असावा ? ५७
१० संस्कृत विद्येची उपयुक्तता ६५
११ संपत्तीचा उपभोग ७२
१२ मोरोपंतांचें कवित्व ८२
१३ महाराष्ट्र देशाचा इतिहास ९३
१४ इतिहासाचा उपयोग ९९
१५ मराठी भाषेची सांप्रतची स्थिति १२३
१६ आमच्या देशाची स्थिति १२८
१७ आमची दैन्यावस्था व तिच्यावर उपाय १३६
१८ वेदांचें प्राचीनत्व १४२
१९ डॉ. जॉन्सन्च्या चरित्रापासून घ्यावयाचा बोध १४५
२० वक्तृत्वाची उपपत्ति १५२
२१ आमच्या देशाचे आक्षेपक १५८
२२ शास्त्रीबुवांचें आत्मकथन १६५
संदर्भ आणि टीपा

# प्रकाशकांचें निवेदन

सुमारें चार वर्षांपूर्वी कै. प्रि. गोपाळ गणेश आगरकर यांच्या जन्म-शताब्दीच्या निमित्तानें ता. १४ जुलै १९५६ रोजीं आम्ही प्रि. आगर-करांच्या निवडक लेखांचा संग्रह ' आगरकर–दर्शन ' या नांवानें प्रसिद्ध केला होता. त्याच धर्तीचा हा ' चिपळूणकर–दर्शन ' ग्रंथ कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या ७८ व्या पुण्यातिथीस आम्ही प्रसिद्ध करीत आहों. या ग्रंथांत 'मालाकार' विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची 'निबंधमाला', 'संस्कृत कविपंचक' व शास्त्रीबुवांच्या किरकोळ लेखांच्या संग्रहाचे दोन भाग या तीन पुस्तकांतील २२ निवडक लेखांचा संग्रह केला आहे. तो शास्त्रीबुवांच्या समग्र विचारांचें यथार्थ दर्शन घडवील यांत शंका नाहीं. शास्त्रीबुवांची निबंधमालाच एवढी प्रचंड आहे कीं, तिच्या महोदधींत निमज्जन करून हव्या त्या रत्नांची संप्राप्ति करून घेणें दुर्घट आहे. कारण केव्हांहि व कुठेंहि बुचकळी मारली असतां सहजासहजीं ओंजळभर रत्नें हातांत येतात. अशा परिस्थितींत विद्यार्थीवर्गाला व सर्वसामान्य वाचकवर्गाला पेलतील, त्यांना आकृष्ट करतील व त्यांना शास्त्रीबुवांची यथार्थ ओळख पटेल अशा लेख-रत्नांची निवड करणें किती कष्टप्रद होतें याची कल्पना येईल. हा लेखसंग्रह संपादन करण्याचें कार्य हातीं घेण्यास नागपूरचे सुप्रसिद्ध प्राध्यापक व विद्वद्वर्य डॉ. अ. ना. देशपांडे यांनीं संमति दिली याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहों. तसेंच या संग्रहाच्या कामीं निरनिराळ्या प्रकारें सहाय्य केल्याबद्दल ' मराठी ग्रंथसूचि ' कर्ते श्री. शं. ग. दाते, श्री. पां. रा. ढमढेरे. श्री. दि. वि. देव व श्री. रा. प्र. कानिटकर यांचे आम्ही विशेष आभारी आहों. सुबुद्ध मराठी वाचक, विद्यापीठें व ग्रंथालयें यांना हा ग्रंथ पुरस्काराई वाटेल अशी आशा आहे.

पुणें, ता. १७·३·१९६० — प्रकाशक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २६५८७ वि: निबंध
क्रमांक ९२२६ नों: दि: २५।३।६०

# प्रास्ताविक

विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या व्यक्तित्वाची मूर्ति डोळ्यांपुढें आणली कीं तिची अंगकांति अनेक महनीय गुणविशेषांच्या तेजानें झळाळत आहे असें विलोभनीय दृश्य दृष्टीपुढें तरळूं लागतें. स्फूर्तिप्रद ठरलेली त्यांची देशभक्ति, आदरणीय स्वरूपाची त्यांची सत्यप्रीति, वाचकांस प्रसन्नविणारी त्यांची प्रांजळ वृत्ति, रसज्ञांस डोलवणारी त्यांची अभिजात रसिकता, मर्मज्ञांस खुलविणारी त्यांची कोटिक्रमकुशलता, अनुपम कोटीची त्यांची कार्यसंभारयोजकता, सुसंस्कारांना उत्तेजित करणारी त्यांची प्रबळ भावनाशीलता, मातृभाषेवरील त्यांच्या प्रेमाची उत्कटता या त्यांच्या सगळ्या भरघोंस गुणमालिकेचें स्मरण झालें कीं, मन कसें उद्दीपित आणि प्रफुल्लित होतें ! त्यांपैकीं प्रत्येक गुणविशेष प्रस्तुत प्रस्तावनाकारांचें चित्त आपल्याकडे आकृष्ट करून घेऊन आपलें गौरवगान करण्यास त्याच्या लेखणीस प्रस्फुरित करीत आहे, पण त्यानें मात्र या प्रस्तावनेंत त्यांपैकीं फक्त एकाच गुणविशेषावर आपलें लक्ष केंद्रित करण्याचें योजिलें आहे. सत्यनिष्ठा हा तो गुण आहे. प्रथमपासून सत्यनिष्ठेचें व्रत स्वीकारूनच मालाकारांची लेखणी कार्यप्रवृत्त झाली आहे. त्यांचें जीवितकार्य मुख्यतः निबंधमालेच्या रूपानें साकार झालेलें आहे. त्या मालेला प्रारंभ करतांना, तिच्या पहिल्याच अंकांत त्यांनीं या व्रताचा अगदीं निःसंदिग्धपणें स्पष्ट उच्चार केलेला आहे. सत्यनिरूपणाची आपली ही भूमिका मालेच्या जानेवारी १८७४ च्या पहिल्याच अंकांत अगदीं स्वच्छ शब्दांत त्यांनीं खालीलप्रमाणें मांडलेली आहे :

" यांतील मजकुराच्या तर्फेनेंहि येथें कांहीं विनंती करणें अवश्य वाटतें. ती इतकीच कीं कोणाच्या द्वेषबुद्धीनें आम्हीं कधींहि लिहिणार नाहीं. जर त्यांत कोणास कांहीं गैर दिसून, आम्हांस कळविण्यांत येईल तर आमची चुकी आम्ही मोठ्या संतोषानें पदरांत घेऊं. तसेंच त्यांत जें जें कांहीं अहंकारोक्तीसारखें कोणास दिसेल, त्यांत सत्यनिरूपणाखेरीज

दुसरा उद्देश कधींहि असणार नाहीं हेंहि आम्हीं एकवार खात्रीनें सांगून ठेवतों. ”

‘निबंधमाले’तून, निबंधमालेच्याहि आधीं ‘शालापत्रकां’तून आणि निबंधमालेनंतर ‘केसरीं’तून लेखन करितांना चिपळूणकरांनीं सत्यनिष्ठेची ही प्रतिज्ञा सदैव पाळलेली आहे, आणि या बाणेदार प्रतिज्ञेचा त्यांनीं एकदां नव्हे अनेकदां घवघवीत उच्चार केलेला आहे. ‘निबंधमाले’च्या दुसऱ्याच अंकांत त्यांनीं पुन्हा लिहिलें आहे :

“ आम्हीं दुसऱ्यास वाजवी रीतीनें नांवें ठेवण्यास ज्याप्रमाणें मागेंपुढें पाहणार नाहीं, त्याचप्रमाणें दुसऱ्यांनीं आमच्या लेखाविरुद्ध मतें प्रदर्शित केल्यास त्यांत आम्हांसहि अगदीं वाईट वाटणार नाहीं. आपणांस जें खरें वाटतें तें स्पष्टपणें लिहिण्यास जो भितो किंवा तसें आपणाविरुद्ध कोणी लिहिलेलें ज्यास आवडत नाहीं तो खरा सत्यनिष्ठ नव्हे, असें आम्ही समजतों. ”

‘निबंधमाले’च्या तिसऱ्या वर्षाच्या अखेरीस आपल्या टीकाकारांचा खरपूस समाचार घेतांना मोठ्या युयुत्सु आवेशानें त्यांनीं आपली सत्यनिष्ठ भूमिका खालील शब्दांत मांडलेली आहे :

“ सारें सत्य काय तें एका बुकांत सांठविलें आहे व सारे मनुष्यजातीचे गुण जगन्नियंत्यानें एका शब्दांत कोंडून भरले आहेत, हें मत आम्हांस बिलकुल पसंत नसून त्यासारखें मूर्खपणाचें व अधमपणाचें मत कोणतेंहि नाहीं अशी आमची पक्की समजूत आहे व ती आम्हीं यथाशक्ति व यथावकाश गेल्या तीन वर्षांच्या अंकांत प्रगट केली आहे. हें आमच्या सत्यवादी व राजनिष्ठ बंधूसारख्यांस मुळींच न आवडून ते आम्हांस ‘ जुन्या शाळेचे ’, ‘ धर्मभोळे ’, ‘ इंग्रेजी राज्याचे अहितचिंतक ’ वगैरे अमोलिक विशेषणें देतील हें उघड आहे. पण अशांच्या दांतओठ खाण्याची व अंतःस्थ खटपटींची आम्ही बिलकुल पर्वा करीत नाहीं. ”

सत्यनिष्ठा ही नेहमीं निर्भय असते; त्यामुळेंच सत्यनिष्ठ चिपळूणकरांच्या लिखाणांत पदोपदीं निर्भय वृत्तीची प्रतीति येते. त्यांच्या या निर्भयतेचीं निदर्शक

अशीं कैक वाक्यें त्यांची 'निबंधमाला' वाचतां वाचतां ठायीं ठायीं आढळून येण्यासारखीं आहेत. वर नुकत्याच उद्धृत केलेल्या उताऱ्यांत या गुणाची स्पष्ट चमक आहेच. या गुणाचें वाचक असें आणखी एखादें वाक्य येथें उद्धृत केलें तरी पुरेसें आहे. आपल्या ख्रिस्ती भटमंडळीचा उदरनिर्वाह यथास्थित चालावा म्हणून त्यावेळचें इंग्रज सरकार जो खर्च करीत असे त्यावर टीकेची झोड उठवितांना चिपळूणकरांनीं लिहिलें आहे :

" येथें अद्याप येवढी मेहेरबानी झाली आहे कीं, ' ऐरिश चर्च ' प्रमाणें येथें एक ' इंडियन चर्च ' स्थापित केलें नाहीं, म्हणजे इतर शेंकडों संबंधानें गोऱ्या मंडळीस जसें येथें यथेच्छ चरायाला सांपडतें त्याप्रमाणेंच तिकडची भिक्षुक मंडळीची झुंडहि इकडे सोडून देतां येईल. तरी येथेंहि आर्चबिशप, बिशप, चॅपालिन वगैरे शेंकडों मंडळींचा तनखा चालू आहेच; नाहींसा नाहीं. कित्येक चॅपलिनांस तर मुळींच कामहि नाहीं तरी त्यांचा पुरवा आपला चालूच आहे ! "

परकी राज्यकर्त्यांविषयींची निर्भयता चिपळूणकरांनीं 'निबंधमाले'च्या जवळजवळ प्रारंभापासून प्रकट केलेली आहे. 'निबंधमाले'च्या पहिल्या वर्षाचा समारोप करतांना लिहिलेलें—

' प्रस्तुत सरकारच्या राज्यरीतींतील दोष आम्हीं दाखवून दिले असतां तें रागावेल याची शंकाच नको. '

हें त्यांचें वाक्य त्यांच्या या वृत्तीचें स्पष्ट सूचक आहे.

सत्यनिष्ठेशीं सहिष्णुतेचें साहचर्य असणें अपरिहार्य आहे. कारण असें पहा कीं, ज्ञानाच्या कोणत्याहि क्षेत्रांतलें का होईना, पण अंतिम सत्य कधीं कोणाला गवसलें आहे ? ज्याची त्याची सत्यप्रतीति ही अर्थातच ज्याच्या त्याच्या ज्ञानाच्या मर्यादेवर अवलंबून राहणार आहे. पुन्हां सत्य-शोधकाची मनोवृत्ति, त्याची जीवनदृष्टि त्याच्या भोंवतालची परिस्थिति याहि गोष्टींचा त्याला होणाऱ्या सत्यदर्शनाच्या स्वरूपावर निश्चित परिणाम होणार आहे. सर्वस्वीं निर्विकार वृत्ति आणि सर्वस्वीं वस्तुनिष्ठ सत्यप्रतीति या वस्तु अति दुर्मिळ आहेत. त्यामुळें जो खरा सत्यप्रेमी असतो तो माझेंच म्हणणें तेवढें खरें असा अविवेकी आग्रह कधीं धरीत नसतो; तो दुसऱ्याचें म्हणणें आपल्या मनाशीं पूर्णपणें प्रतिकूल असलें तरी ऐकून

घेतो आणि एवढेंच नव्हे तर वादांत आपलें म्हणणें खोटें ठरून दुसऱ्याचें खरें ठरलें तरी दुःखी न होतां उलट 'सत्याचा लाभ झाला' यास्तव तो आनंदितच होतो. सत्यनिर्णयाबाबत चिपळूणकरांना नेमकी हीच भूमिका मान्य असून तिचा त्यांनीं आत्मीयतेनें व मोठ्या आवेशानें पुरस्कार केलेला आहे. 'निबंधमाले'च्या पहिल्या वर्षाचा समारोप करतांना त्यांनीं लिहिलें आहे :

"जगाची रीत ज्यानें यत्किंचितहि पाहिली असेल त्यास अर्थातच कळून येणारें आहे कीं मनुष्यामनुष्यांत रूप, स्वर, बोलण्याचालण्याची ढब वगैरे गोष्टींत जसा फरक नेहमीं दृष्टीस पडतोच त्याचप्रमाणें स्वभाव, रुचि, समजूत यांतहि नेहमीं तो असायाचाच. यास्तव एका मनुष्यास जी गोष्ट चांगली वाटते तीच दुसऱ्यास त्याच्या विपरीत वाटल्यास कांहीं नवल नाहीं. याप्रमाणेंच सगळ्यांचें ज्ञानहि वस्तुगत्याच सारखें नसल्यामुळें लोकांच्या समजुतींतहि परस्पर फेर पडल्यास मोठी विलक्षण गोष्ट झाली असें म्हणतां येत नाहीं. हा प्रकार जोंपर्यंत मनुष्याचें मन सध्यां आहे असेंच राहील तोंपर्यंत अर्थातच चालणारा आहे. यास्तव सुज्ञ जे असतात त्यांस दुसऱ्यांच्या मतविरोधाचें कधीं आश्चर्य वाटत नाहीं व रागहि येत नाहीं, कां कीं मानवी स्वभावाचा हा धर्मच होय असें समजून ते आपला ज्या विषयांवर मतभेद पडत असेल त्याची वाटाघाट करण्याकरितां एकत्र जमतात आणि सत्यैकनिष्ठ बुद्धीनें व शांत मनानें खरें खोटें निवडतात. जेथें असा साफ निर्णय झाला तेथें जो हटतो तो आपल्या पराभवाचें किमपि दुःख न मानतां सत्याचा लाभ झाला यावरच नजर देऊन आपणांस जिंकणाराचीहि प्रशंसाच करतो. असो. तर शहाण्या व सालस लोकांची चाल अशी आहे."

चिपळूणकरांनीं अशा रीतीनें सत्यभक्तीचें मर्म आणि महत्त्व नेमकें हेरलें असल्यामुळें आपल्या विरोधकांच्या मतप्रदर्शनाला त्यांनीं आपल्या निबंधमालेंतून मनसोक्त वाव दिलेला आहे. त्यांचा 'वक्तृत्व' हा निबंध सुरू असतांना कोणा एका 'निबंधमालाहितेच्छू' नें त्यांच्यावर जो टीका-प्रहार केला आहे तोच उदाहरण म्हणून पाहा ना : 'तुमचा एकंदर विषय प्रतिपादन करण्याचा प्रकार पाहिला तर वृथा डौल घालण्याविषयीं जो दोष तुम्ही इतर सुधारणा करूं इच्छिणारास लावतां तोच तुमच्यावरहि

येऊं पाहतो ' असा अगदीं मर्मभेदक टोला त्यानें चिपळूणकरांवर हाणलेला आहे. चिपळूणकर ' पुष्कळ वेळां विद्यमान व्यक्ति व स्थिति याविषयीं अविचारानें ' लिहितात असाहि त्याचा चिपळूणकरांवर स्पष्ट आक्षेप आहे. त्या ' हितेच्छू ' आक्षेपकाचें लांबलचक टीकात्मक पत्र 'निबंधमालेंत' प्रसिद्ध करून त्याला त्यांनीं मोठें समर्पक आणि सडेतोड उत्तर दिलेलें आहे; पण त्या उत्तराच्या प्रारंभभागीं, त्या टीकाकाराच्या मनांत आपल्याबद्दल यत्किंचितहि द्वेषभाव नसून उलट तो आमचा हितचिंतक आहे. याबद्दल त्याचे उपकार मानून त्याच्या औदार्याची त्यांनीं तारीफ केलेली आहे. आणि पुढें लिहिलें आहे—

" आमच्या लेखावर आपले विचार त्यानें इतके उघड बोलून दाखविल्याबद्दलहि आम्ही त्याचे आभारी आहों. असले अभिप्राय कितीहि कडक रीतीनें लिहिले असले तरी गुळमुळीत शिफारशीपेक्षां व व्यर्थ स्तुतीपेक्षां त्यांची योग्यता आम्ही फार समजतों. "

विरोधकाच्या प्रतिकूल टीकेचेंहि मनःपूर्वक न्याय्य स्वागत करण्याची ही चिपळूणकरांची वृत्ति त्यांच्या सत्यनिष्ठ भूमिकेशीं सर्वस्वीं सुसंगतच आहे.

चिपळूणकरांची सत्यनिष्ठा ही त्यांच्या ठिकाणीं उत्कटत्वानें वास करीत असलेल्या राष्ट्रनिष्ठेशीं संलग्न झालेली आहे. सत्यभक्ति आणि देशभक्ति या जणूं चिपळूणकरांच्या मनःसागरांतून उदयास आलेल्या अत्यंत आदरणीय व रमणीय अशा जुळ्या भावलक्ष्मी आहेत! त्यांचें पुढील वाक्यच पाहा ना :

" आमचा पुस्तककर्त्यांच्या नात्यानें जगाशीं जो शत्रुमित्रसंबंध आहे तो केवळ सत्य व स्वदेशप्रीति या दोहोंच्या संबंधानेंच काय तो आहे; म्हणजे आपल्या जन्मभूमीचा योग्य अभिमान असून ज्यांस सत्य आवडतें ते आमचे मित्र व स्वदेशाची टवाळी करण्यांत ज्यांस भूषण वाटतें व जे असत्यास जाणूनबुजून भजतात किंवा त्याच्या निरसनाविषयीं अनास्था प्रकट करतात ते आमचे द्वेष्य. याखेरीज इतर संबंध आम्ही कोणतेहि ओळखीत नाहीं. "

ही वाक्यपंक्ति त्यांच्या अंतःकरणांतील उपरोक्त दोन उदात्त भावविशेषांच्या एकत्र वास्तव्याची स्पष्ट निदर्शक आहे.

सत्यप्रेमी व्यक्तीच्या अंगीं आणखीहि एक गुणविशेष असतो. मीच तेवढा सर्वज्ञ आहे, ज्ञानभांडाराचा कोणताहि खण उघडा, त्याची किल्ली मजजवळ आहेच अशा बेजबाबदार अहंकारापासून तो सदा अलिप्त असतो. खऱ्या सत्यभक्ताजवळ असा हेकेखोरपणा कधींच नसतो. आपल्या ज्ञानाच्या मर्यादा तो स्पष्टपणें जाणतो. चिपळूणकरांच्या व्यक्तित्वाच्या वाङ्मयरूप आविष्कारांत प्रामाणिक सत्योपासकाच्या अंगीं शोभणारी ही विनम्र मर्याद-शील वृत्तीहि कांहीं ठिकाणीं व्यक्त झालेली आहे. ही मर्यादशील वृत्ति त्यांच्या अंगीं नसती तर 'संस्कृत कविपंचका'चा समारोप करतांना, सुबंधु आणि दंडी या दोन कवींचें आमचें आधीं चांगलेसें अध्ययन झालेलें नव्हतें. त्यांच्याविषयींच्या आमच्या समजुतींत आतां पुष्कळ फेर पडलेला आहे, अशी प्रांजळ कबुली त्यांनीं कशी बरें दिली असती?

चिपळूणकर हे सत्याचे प्रांजळ व विवेकशील उपासक होते हें अशा रीतीनें त्यांच्या वाङ्मयावरून निखालस शाबीत होत असतांना सुद्धां, कांहीं विमर्शकांनीं, चिपळूणकर हे विचारानें एकांगी होते असें नसतेंच दूषण त्यांच्या माथीं लावलें आहे. ही खरोखरच मोठी आश्चर्याची व खेदाची गोष्ट आहे! एखाद्या उदारधी माणसाला उगीचच कृपण म्हणून निखंदण्यासारखा हा प्रकार आहे. सुवर्णत्वाची स्पष्ट प्रतीति येत असतांना सुद्धां, सोन्याच्या तुकड्याचा 'पितळ पितळ' म्हणून पिच्छा पुरविणें हें केवळ अरसिकतेचेंच नव्हे तर एक प्रकारें दुष्टपणाचेंहि लक्षण नाहीं काय? प्रत्येक तान् न तान् सुरेलपणाची स्वच्छ ग्वाही देत असतांनाहि गाणारा बदसूर गात आहे अशी त्याची बदनामी करणें हें न्यायास धरून आहे काय?

चिपळूणकर विचारानें एकांगीं होते अशी त्यांची नसती नालस्ती करण्याचे जे प्रयत्न झाले आहेत त्या सगळयांचा येथें परामर्ष घेणें स्थलाभावीं अशक्य आहे. त्यांपैकीं दोन तीन प्रयत्नांचा येथें ओझरता उल्लेख करून त्यांचा थोडक्यांतच समाचार घ्यावयाचा आहे.

इंदूरचे कै. बाळकृष्ण नारायण देव हे चिपळूणकरांचे सुप्रसिद्ध निंदक. त्यांचा चिपळूणकरांवरील पहिला टीकालेख १९०० सालीं लक्ष्मणराव चिपळूणकरांनीं लिहिलेल्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या चरित्राचें परीक्षण करण्याच्या निमित्तानें व दुसरा टीकालेख १९१७ मध्यें निबंधमालेची

चित्रशाळा आवृत्ति बाहेर पडल्यानंतर प्रसिद्ध झालेला आहे. या टीका-लेखांतील कांहीं वाक्यें पाहा :—

" त्यांचा ( चिपळूणकरांचा ) कोटिक्रम बेमालूम, दिखाऊ...अढळ व अपरिच्छेद्य असा आहे; परंतु अनेक वेळां फारच एकतर्फी, वकिली बाण्याचा ...असा आहे...या टीकालेखांस अद्वितीय तेज व बळ चढलीं आहेत. "

" कांहीं दोष जरी ( चिपळूणकरांनीं केलेल्या ) अतिशयोक्तीनें भरलेले होते तरी ते निर्मूल किंवा केवळ अयथार्थ होते असें सिद्ध करतां येत नाहीं; त्यामुळें हा कोटिक्रम अभेद्य व अढळ झाला आहे...परंतु अशी लोकप्रियतेवर दृष्टि ठेवून टीका करणें...अपायकारक आहे. "

" त्यांत ( मालेंतील टीकालेखांत ) जो भाग आला आहे तो बहुतेक जरी सत्य असला तरी त्यांत संपूर्ण सत्य स्वरूप दिलें नाहीं. "

" मालाकारांची टीका जरी एकतर्फी असली तरी पुष्कळ अंशीं मार्मिक, अनुलक्षणीय आाणि केव्हां केव्हां विचारणीय होती. "

वरील वाक्यांवरून हें स्पष्ट दिसून येतें कीं, देवांना चिपळूणकरांच्या लेखांतील सत्यनिष्ठा व कोटिक्रमकुशलता या गुणांची मनोमन खात्री पटलेली आहे; पण त्यांच्या पदरीं मुद्दामच कमीपणा बांधण्यासाठीं, त्यांच्यावर एकांगीपणाचा खोटाच आरोप करण्यासाठीं त्यांना उपरोक्त वाक्यांत ' परंतु रामायण ' रचावें लागलें आहे. पण हें 'रामायण' रचीत असतांना आपण आपल्या पायांवर विसंगतीच्या दोषाचा भला मोठा दगड पाडून घेत आहोंत याचें भान ठेवणें मात्र त्यांना कठीण गेलें आहे !

देवांचा चिपळूणकरांवरचा पहिला टीकालेख सन १९०० मध्यें प्रसिद्ध झालेला आहे. त्यानंतर अर्धा शतकाहून अधिक काळ लोटून गेला तरी चिपळूणकरांबद्दलचा आकस आजहि कांहीं समीक्षकांच्या मनांत कायम आहे. याचें अगदीं अलीकडील उदाहरण सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांचें. त्यांनीं आपल्या ' मराठी कादंबरीचें पहिलें शतक ' या ग्रंथाच्या पहिल्या भागांत हरि नारायण आपटे यांच्याविषयीं विवेचन करतांना लिहिलें आहे :

" हरि नारायण लहानपणीं विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या तालमींत

वाढले. जें जें भारतीय, जें जें प्राचीन, त्याविषयीं अभिमान बाळगण्याचा त्यांचा बाणा त्यांच्या शिष्यामध्येंहि उतरला होता. ह्या वृत्तीची दुसरी बाजू म्हणजे जें जें परकीय त्याकडे दोषैक दृष्टीनें पाहणें. चिपळूणकरांच्या राष्ट्रीयतेचा हा एक उन्मेष होता."

आम्हांस मोठ्या खेदानें असें सांगावें लागतें कीं, कुसुमावतीबाईंचें उपरोक्त विधान हा त्यांच्या चिपळूणकरविषयक अज्ञानाचा एक उन्मेष आहे ! चिपळूणकरांचा 'अनुकरण' नांवाचा एकच निबंध कुसुमावतीबाईंनीं वाचला असता तर आपल्या चिपळूणकरविषयक अज्ञानाची त्यांची त्यांनाच खंत वाटली असती !

प्रभाकर पाध्ये व श्री. रा. टिकेकर यांचा 'आजकालचा महाराष्ट्र' हि चिपळूणकरांबाबत अत्यंत अनुदार आणि खोडसाळ आहे. चिपळूणकरांवरील निबंधांत या लेखकद्वयाची 'चावरी वृत्ति' पदोपदीं प्रकट झालेली आहे. चिपळूणकरांच्या कामगिरीचें एकंदर स्वरूप एकांगी कसें होतें हें शाबीत करण्याकरितां या लेखकांनीं आपली लेखणी राबविली आहे. कुचेष्टेशिवाय प्रतिष्ठा वाढत नाहीं हें ज्याचें ब्रीदवाक्य आहे अशा पंथाचें बीज पेरल्याबद्दल या दोघां लेखकांनीं मालाकारांना ठपका दिला आहे; पण त्यांनीं स्वतः मात्र चिपळूणकरांची भरपूर कुचेष्टा केलेली आहे ! 'जुन्या परंपरेचें परिणामकारक समर्थन करून सुधारणावाद्यांची टर उडविणारा मराठी भाषेचा शिवाजी' असें चिपळूणकरांचें वर्णन करण्यांतला हेतु स्पष्टपणें कुचेष्टेचाच आहे. 'आपल्या जोरकस शैलीनें त्यांनीं महाराष्ट्रांत देशाभिमानाचें वारें पसरविलें' हें या लेखकांना मान्य आहे; पण 'त्यांच्या देशाभिमानाला समाजसुधारणेची जोड नसल्यामुळें तो एकांगीच ठरला' अशी त्यांची तक्रार आहे. पण तक्रार करतां करतांच या लेखकांनीं आपल्या याच निबंधांत चिपळूणकरांच्या 'सुधारकी बुद्धी'ची साक्ष पटविणारीं कांहीं उदाहरणें दिलीं आहेत. जातिभेदाविषयींच्या आणि विधवांच्या प्रश्नाविषयींच्या चिपळूणकरांच्या पुरोगामी विचारांची या लेखकांना स्पष्ट जाणीव आहे. 'संपत्तीचा उपभोग', 'लोकभ्रम' वगैरे निबंधांतून "चिपळूणकरांनीं लोकांच्या वेडगळ समजुतीवर सणसणीत कोरडे तर ओढलेच, परंतु सनातन्यांचें डोकें उठवील असेहि विचार प्रकट केले"

हेंहि त्यांनीं कबूल केलें आहे. चिपळूणकरांच्या व्यक्तित्वांतील ह्या प्रगमनशीलतेच्या खुणा पाहिल्यानंतर त्यांच्यावर पूर्णपणें एकांगीपणाचा आरोप सिद्ध करणें कठीण आहे असें या लेखकद्वयांस आढळून आल्यावर आपण पडलों हें कबूल न करतां चिपळूणकरच कसे घसरले आहेत हें सांगण्यासाठीं त्यांनीं "शास्त्रीबोवांच्या विचारसरणींत प्रगतिपर आणि प्रतिगामी तत्त्वांचें मोठें विचित्र मिश्रण होतें" असें विधान केलेलें आहे! 'चिपळूणकर विचारानें आत्यंतिक व एकांगी नव्हते; नव्याजुन्यांतलें जें चांगलें असेल तें घ्यावें व त्याज्य असेल तें टाकावें असें त्यांचें मत होतें' असें वस्तुतः पाध्ये–टिकेकरांना म्हणावयाचें होतें; पण चिपळूणकरांविषयींची त्यांची वृत्ति सहृदयतेची व सहानुभूतीची नसल्यामुळें या लेखकांना त्यांचें न्याय्य मूल्यमापन करणें अशक्य झालें आहे! आपण चुकलों हें प्रांजळपणें कबूल करण्याची 'शहाण्या व सालस लोकांची चाल' सर्वांनाच साधते असें थोडेंच आहे?

याच लेखकांनीं आपल्या उपरोक्त निबंधांत चिपळूणकरांच्या निर्भय सत्यनिष्ठेचा गौरव केलेला आहे; नव्हे, तसा गौरव करणें त्यांना भाग पडलें आहे. या गुणाच्या बाबतींत चिपळूणकर न्यायमूर्ति रानड्यांपेक्षांहि श्रेष्ठ होते अशी त्यांना कबुली द्यावी लागली आहे. परतंत्र राष्ट्राच्या बाबतींत पारतंत्र्य हें एक अत्यंत घृणास्पद आणि तापदायक असें असत्य आहे आणि स्वातंत्र्य हें अत्यंत कल्याणकारी व सुखदायक असें सत्य आहे. परतंत्र राष्ट्रांतल्या माणसाला त्या असत्याचा तळमळून धिःकार करावयाला आणि त्या सत्याचा उल्लसून जयघोष करावयाला हिंमत लागते. ही निर्भय सत्यनिष्ठेंतून प्रस्फुरित होणारी हिंमत रानड्याजवळ नव्हती. चिपळूणकरांच्या आधीं होऊन गेलेल्या वा त्यांच्या समकालीन अशा कोणत्याच महाराष्ट्रीय व्यक्तींत नव्हती, ती फक्त एकट्या चिपळूणकरांतच होती असा याच पाध्ये-टिकेकरांनीं निष्कर्ष काढलेला आहे! त्यांनीं लिहिलें आहे :

"इंग्रजांच्या परमन्यायीपणाचे देव्हारे माजूं लागले व इंग्रज करतील तेंच न्याय्य असें मानण्याची प्रवृत्ति बोकाळली, तेव्हां चिपळूणकरांनीं सरकारी नोकरीत राहूनहि राज्यकर्ते चुकले, तेव्हां त्यांचे दोष स्पष्टपणें

दाखविले. असा धीटपणा चिपळूणकरांपूर्वी—फार काय त्यांचे काळीं सुद्धां—इतर कोणी दाखविला नाहीं. ”

चिपळूणकरांची वृत्ति ही अशी सत्यनिष्ठ असल्यामुळें त्यांच्या लिखाणांत साहजिकच सारासारविवेकाची बूज राखण्यांत आली आहे. त्यांच्या या विवेकशीलतेचीं निदर्शक अशीं कांहीं उदाहरणें त्यांच्या निबंधमालेंतून देण्यासारखीं आहेत. पहिलें उदाहरण इंग्रजी भाषेविषयींच्या त्यांच्या धोरणाचें. या धोरणाचें समंजस स्वरूप समजण्याच्या दृष्टीनें त्यांचीं खालील तीन वाक्यें पाहा :

“ चोहोंकडे इंग्रजी माजल्यानें आमची भाषा आम्हांस येईनाशी झाली, देशाभिमान सहजच विगलित झाला. ”

“ इंग्लिश भाषेचा आम्ही द्वेष करीत नाहीं, पण आपल्या मराठीच्या उत्कर्षास ती मोठेंच साधन होईल अशी आमची खात्री आहे. ”

“ संस्कृत व विशेषतः इंग्रजी भाषेंत जें अगाध ज्ञान भरलें आहे त्यांचा पाट फोडून जर आपल्या भाषेकडे वळवितां येईल तर केवढी मजा होईल ! ”

येथें हें लक्षांत घ्यावयाचें आहे कीं, खरी प्रतिष्ठा इंग्रजींतून लिहिण्यांत आणि इंग्रजींतून बोलण्यांत आहे, मराठी बोलणें वा लिहिणें यांत शुद्ध गांवढळपणा आहे असें समजणाऱ्या तत्कालीन आंग्लशिक्षित विद्वानांवर चिपळूणकरांनीं सणसणीत कोरडे ओढले आहेत; पण त्याचबरोबर इंग्रजीच्या साहाय्याशिवाय मराठीचा विकास होणें शक्य नाहीं हीहि आपल्या हिताची गोष्ट त्यांनीं अचूक ओळखली आहे ! चिपळूणकरांनीं या प्रकरणीं दाखविलेली ही तारतम्यबुद्धि प्रशंसनीय नाहीं काय ?

चिपळूणकरांच्या विवेकशीलतेची घवघवीत ग्वाही देणारें दुसरें उदाहरण मालेच्या पहिल्या वर्षाच्या त्यांनीं केलेल्या समारोपाचें. या समारोपांत आपल्या निबंधमालेची भूमिका सारांशरूपानें मांडतांना त्यांनीं लिहिलें आहे :

“ इंग्रज सरकारनें आमचें किती हित केलें आहे; त्या लोकांची विद्वत्ता, नीति, थोरपणा, सौजन्य हें केवढें आहे; मेकॉलेसारख्या महाविख्यात ग्रंथकाराचे एकंदर जगावर व विशेषतः आमच्या देशावर केवढे उपकार आहेत;

वगैरे सर्व आम्हीं पूर्णपणें जाणत आहों; फार तर काय, पण ख्रिस्ती धर्मांत, तद्धर्मी लोकांत व त्यांच्या पुस्तकांत ज्या कित्येक चांगल्या गोष्टी आहेत त्यांसहि आम्ही मनापासून मान देतों व अशाविषयींचे उल्लेख आमच्या पुस्तकांत जागोजाग सांपडतील. पण इंग्रज सरकार शहाणें म्हणून पूर्वींचे सर्व प्रकारें वेडगळ, इंग्रज लोक विद्वान, शूर, सुशील म्हणून आमचे लोक मूर्ख, भित्रे व दुःशील, इंग्रेजांची कविता, शास्त्रें, कला वगैरे उत्कृष्ट, म्हणून आमची सर्व अर्थात्च त्याच्या उलट, ख्रिस्ती धर्मांत कांहीं चांगल्या गोष्टी आहेत म्हणून आमचा धर्म अत्यंत नीच; हल्लींच्या सरकारनें पुष्कळ चांगल्या गोष्टी केल्या आहेत म्हणून तें जें जें करील तें वंद्यच; मेकॉले वगैरे ग्रंथकारांची विद्वत्ता मोठी, म्हणून त्यांचे ग्रंथ सर्वथा निर्दोष;असें मात्र आम्ही कधीं कबूल करणार नाहीं. या जगांत पूर्णावस्थेस पावलेले कांहींच नाहीं, सर्वांत कांहीं ना कांहीं तरी दोष आहेतच. यास्तव केवळ स्तुति किंवा केवळ निंदा हीं कशासच शोभत नाहींत. इंग्रज जसे देव नव्हेत, तसेंच आम्हीहि पशु किंवा राक्षस नाहीं; दोघांतहि गुणदोष आहेतच आहेत आणि त्याविषयीं वाटाघाट करण्याचा अधिकार इंग्रज ग्रंथकारांस जसा आहे तसाच तो आम्हांसहि पण आहे." सत्यनिष्ठ विवेक म्हणून ज्याला गौरवपूर्वक संबोधितां येईल तो वरील उताऱ्यांत व्यक्त झालेल्या मनोवृत्तीहून वेगळा आहे असा जो कोणी आग्रह धरील त्याची मुद्दामच वेड पांघरून पेडगांवला जाणाऱ्यांत गणना करणें आम्हांस काय किंवा इतर कोणासहि काय भाग पडणार आहे !

मराठी भाषा हा तर चिपळूणकरांच्या अभिमानाचा स्फुल्लिंग अगदीं धगधगीत स्वरूपांत चेतविणारा असा एक खास विषय; पण त्या बाबतींतहि चिपळूणकरांची वृत्ति समतोल राहिलेली आहे. त्यामुळेंच तर "जी भाषा बोलणाऱ्यांनीं दिल्ली–अटकेपर्यंत आपले झेंडे नेऊन लावले, जींत तुकाराम–रामदासासारख्या भगवंतपरायण साधूंनीं आपले श्रुतिवंद्य अर्थ ग्रथित केले, जीस मुक्तेश्वर, वामनपंडित, मोरोपंत इत्यादि कवींनीं आपल्या रसाळ व प्रासादिक वाणीनें संस्कृत भाषेचीच प्रौढी आणली, त्या भाषेस आवेश, गांभीर्य व सरसता या गुणांकरितां कोणत्याहि अन्य भाषेच्या तोंडाकडे बघण्याची खास गरज नाहीं अशी आमची खात्री आहे !" अशी

आपल्या मायभाषेची त्यांनीं फुशारकी मारलेली असली तरी तिचें अर्थव्यक्तीकरणाचें सामर्थ्य अजूनहि मर्यादितच आहे याचीहि पण आपल्याला असलेली जाणीव त्यांनीं निःसंकोचपणें व्यक्त केलेली आहे. "आमची भाषा इतक्यांतच पूर्णतेच्या शिखरास पोंचली आहे किंवा कोणत्याहि भाषेंतील कोणताहि अर्थ मराठी भाषेंत चांगला हवा तसा नियमानें व्यक्त करतां येईलच, असा व्यर्थ अभिमान तिजबद्दल आम्ही वाहात नाहीं," हें त्यांचें वाक्य त्यांच्या या जाणिवेचें स्पष्ट द्योतक आहे.

अशा या विवेकशीलतेच्या प्रसन्न सुषमेनें चिपळूणकरांचें नुसतें लेखनच नव्हे तर त्यांचें समग्र जीवनहि सुशोभित झालेलें आहे. त्यामुळें तर आत्यंतिकतेला वा अतिरेकाला त्यांच्या वर्तनांत थारा मिळाल्याचें सहसा आढळून यावयाचें नाहीं. या दृष्टीनें येथें त्यांच्या जीवनपटाच्या कांहीं विशेषांचें थोडक्यांत धांवतें विहंगमावलोकन करणें उपकारच ठरणार आहे. त्यांचा जन्म १८५० मधला. वडील कृष्णशास्त्री चिपळूणकर हे प्रौढ वयांतहि इंग्रजी शिकायला प्रारंभ करून तींत प्रावीण्य संपादणारे त्या काळचे एक व्यासंगिक व प्रतिभाशील पंडित; जणूं दुसरे 'बृहस्पतिच' पट्टीचे रसिक, तसेंच लोकप्रवादाची कदर न करतां विलासांत रमण्याइतके रंगेल. चिपळूणकरांनीं वडिलांच्या वाङ्मयप्रीतीचा, रसिकतेचा वारसा अधिक व्यापक व अधिक उदात्त स्वरूपांत पुढें चालूं ठेवला, पण आपल्या रसिकतेची सुसंस्कृत सोज्वळ बैठक मात्र त्यांनीं कधींच ढळूं दिली नाहीं ! चिपळूणकरांच्या विवेकशीलतेचें प्रत्यंतर म्हणून ही बाब उद्‌बोधक ठरण्यासारखी नाहीं काय? चिपळूणकरांना लेखनाची दीक्षा त्यांच्या वडिलांपासूनच मिळाली. कृष्णशास्त्र्यांच्या संपादकत्वाखालीं निघणाऱ्या 'शालापत्रकां'तून त्यांनीं १८६८ पासून विद्यार्थीदशेंत असतांना लिहावयाला सुरुवात केली. पुढें १८७२ पासून 'पत्रक' ते एकटेच चालवूं लागले. 'पत्रकां'तून इंग्रजी विद्वानांविषयीं आपले जहाल विचार जेव्हां ते हळूहळूं मांडूं लागले तेव्हां एक दिवस हें पत्रक सरकार नक्की बंद करणार हें त्यांनीं बरोबर हेरलें. नेमकें तसेंच घडलें. १८७५ मध्यें 'पत्रक' बंद करण्यांत आलें. पण 'पत्रक' बंद होण्याच्या एक वर्ष आधींच म्हणजे १८७४ मध्यें त्यांच्या 'निबंधमाले'चें तारू मोठ्या डौलांत आणि वेगांत,

लोकप्रियतेच्या चंद्रिकेच्या शीतल प्रकाशांत, आधींच सुरूहि झालें होतें! आपले विचार व्यक्त करण्याचें साधन आपल्यापासून हिरावून घेतलें जाणार हें नीट ताडून त्यासाठीं लागणाऱ्या साधनाची आधींच तरतूद करून ठेवण्यांत त्यांनीं जी समयज्ञ योजकता दाखविली तिचा विवेकराजाची दुहिता म्हणून गौरव केल्यास तो यथार्थच ठरणार नाहीं काय ?

चिपळूणकरांच्या व्यक्तित्वाच्या, विविध घटकांच्या बनावाचा विचार केला असतां असें दिसून येतें कीं, त्यांच्या ठिकाणची वाङ्मयानंदसेवनाची प्रवृत्ति ही पितृपरंपरेनें आलेली होती. मतभिन्नतेचाहि तट फोडून वाहणारा त्यांचा सुहृदस्नेह, सहकाऱ्याच्या हितसंबंधास जपण्यांतली त्यांची निरपेक्ष कळकळ, त्यांच्या सार्वजनिक उद्योगाबद्दल आस्था व सहानुभूति न दाखविणाऱ्या आप्तस्वकीयांबद्दलहि त्यांना वाटणारा जातिवंत जिव्हाळा, त्यांची पत्नीनिष्ठा—हे त्यांच्या अंगच्या सुजनशीलतेचे विविधरम्य उन्मेष. ही सुजनशीलता त्यांच्या अंगीं बाणण्यास लहानपणीं त्यांच्या मनावर त्यांच्या चारित्र्यसंपन्न व सत्त्वशील आजाआजींचे संस्कार कारणीभूत झाले होते. बचंभट मामा नांवाचे एक वृद्ध, विरक्त भिक्षुक व पूना हायस्कुलांतील एक शिक्षक कृष्णशास्त्री विजापूरकर यांच्यामुळें त्यांना अनुक्रमें संस्कृत विद्येची माहिती झाली व संस्कृत कवितेची गोडी लागली. पन्हाळकर गोसाव्यांचिया रसाळ कीर्तनांनीं त्यांच्या प्राचीन मराठी कवितेविषयींच्या प्रेमाचें उत्कृष्ट पोषण केलें. इंग्रजी आणि संस्कृत वाङ्मयाबद्दलची त्यांची प्रीति संवर्धित होण्यास कॉलेजांतले त्यांचे गुरु प्रि. वर्डस्वर्थ, अनंतशास्त्री पेंढरकर व डॉ. कीलहॉर्न यांचें अध्यापन उपकारक ठरलें. त्यांच्या जीवनदृष्टीवर आणि लेखनशैलीवर ॲडिसन, जॉन्सन व मेकॉले या तीन कुशल व प्रभावशाली निबंधलेखकांचा पुष्कळ परिणाम झाला. निबंधमालेंतील 'विद्वत्व आणि कवित्व', 'संपत्तीचा उपभोग', 'इतिहास', 'लेखनशुद्धि', 'वाचन', 'लोकभ्रम', 'गर्व', 'ग्रंथांवर टीका' इत्यादि प्रारंभींच्या निबंधांतील विवेचन मोठें विनोदसुंदर आणि सरस उतरलें आहे. यांतील विवेचनशैलीवर पडलेली ॲसिडची छाप स्पष्ट आहे. वरील निबंधांत बोचक उपरोध आहे. विकारविचारांत व प्रतिपादनांत जहाल आवेश आहे. हा उघड उघड जॉन्सन् व मेकॉले यांच्या वाङ्मयाच्या

अभ्यासाचा परिणाम आहे. इंग्रजी विद्या ही त्यांच्या जीवनावर विलक्षण प्रभाव पाडणारी प्रमुख शक्ति. 'वाघिणीचें दूध' या शब्दांत त्यांनीं तिचें जें वर्णन केलेलें आहे त्यांत त्यांना त्या विद्येचें पटलेलें महत्त्व व सामर्थ्य उत्तम रीतीनें अभिव्यक्त झालेलें आहे. रसिकता, भाषाभिमान व देशभक्ति या गुणांचा जो विलोभनीय विकास त्यांच्या व्यक्तित्वांत झालेला दिसून येतो त्याचें श्रेय त्यांच्या या इंग्रजी विद्येच्या सामर्थ्यावरील श्रद्धेस व तिच्या श्रद्धापूर्वक केलेल्या अनुनयास आहे !

चिपळूणकरांच्या व्यक्तित्वाच्या या विविध घटकांकडे जरा सूक्ष्म दृष्टीनें पाहूं जातां असें दिसून येतें कीं त्यांतसुद्धां योजकतेचें एक सूत्र अनुस्यूत आहे. ग्रंथ-लेखन, अध्ययन व अध्यापन याच कामीं आपलें आयुष्य व्यतीत करावयाचें असा संकल्प त्यांनीं विद्यार्थीदशेंतच मनाशीं पक्का केला असावा, हें त्यांच्या एकंदर जीवितक्रमाचें स्वरूप पाहतां सहज लक्षांत येण्यासारखें आहे. आपल्या मुलानें वकील किंवा मुन्सफ व्हावें अशी कृष्णशास्त्र्यांची इच्छा. चिपळूणकरांना ती न पटण्याला उपरोक्त संकल्पाचा प्रभाव कारणीभूत झाला असणें शक्य आहे. आयुष्यक्रमाचा आणि कर्तृत्वाचा रोख अशा रीतीनें विद्यार्थिदशेंतच निश्चित केल्यानंतर स्वीकृत संकल्पाच्या सफलतेला पोषक ठरतील अशींच पावलें त्यांनीं त्यानंतर टाकिलीं. वडिलांबरोबर 'शालापत्रका'चें काम पाहात असतांना काय किंवा कॉलेजांत शिकत असतांना काय, त्यांनीं इंग्रजी, संस्कृत व मराठी या भाषांतील वाङ्मयाची माहिती, परिश्रमपूर्वक वाचन, पठन व अनुवादरूपानें लेखन करून आणि श्रद्धापूर्वक श्रवणभक्ति करून, भरपूर संपादन केली. त्यांच्या परिश्रमशील भाषाध्ययनाची साक्ष म्हणून, "महाविद्यालयांतील वसतिगृहांत राहात असतांना त्यांचा असा परिपाठ होता कीं दर शनिवारीं घरीं आल्यावर दुसऱ्या दिवशीं सकाळीं मराठी क्रमिक पुस्तकांतील पांच ओळींचें भाषांतर संस्कृतांत करून त्या दिवसाची तारीख त्याखालीं लिहून ठेवावयाची. हा क्रम सतत तीन वर्षें चालला होता," ही गोष्ट येथें नमूद करण्यासारखी आहे. 'जुनाट राहणी, असंतुष्ट वृत्ति आणि शिकविण्याची टाळाटाळ' यामुळें अनंतशास्त्री पेंढरकर हे विद्यार्थ्यांत अप्रिय असत; कधीं कधीं या मुखदुर्बळ विद्वानांच्या 'मुग्ध रसवंतीला बहर यावयाचा व मग संस्कृत

कवींच्या चमत्कृतिजनक आख्यायिका, चटकदार सुभाषितें इत्यादि ठेवणींतल्या चिजा त्यांच्या स्वैर कथालापांतून बाहेर पडावयाच्या ', इतर विद्यार्थ्यांना या प्रकारांत रस वाटत नसे; पण चिपळूणकर मात्र त्यांचे असले सगळे विश्रब्धालाप साक्षेपानें स्मृतिगत करीत असत ' ही गोष्ट त्यांच्या श्रवणभक्तीची द्योतक म्हणून उल्लेखिण्यासारखी आहे.

चिपळूणकरांनीं अशा रीतीनें भक्तिभावपूर्वक, रसिकतापूर्वक व साक्षेपपूर्वक जें वाङ्मयाध्ययन केलें तें त्यांनीं लोकशिक्षणाच्या व राष्ट्रनिर्मितीच्या कार्यांत योजकतापूर्वक उपयोगांत आणलें ही गोष्ट त्यांच्या आयुष्याचें महत्त्वमापन करण्याच्या दृष्टीनें लक्षांत घेणें फार आवश्यक आहे. लोकांना आपल्या भाषेच्या, आपल्या देशाच्या व आपल्या संस्कृतीच्या महात्मतेची खात्री पटवून देणें व त्यांच्यांत आत्मश्रद्धा उत्पन्न करणें ही त्या वेळची राष्ट्रीय गरज होती. पाश्चात्य संस्कृतीच्या झगझगाटामुळें स्तिमित झालेली त्या वेळची सुशिक्षित जनता सुद्धां जबरदस्त स्वरूपाच्या न्यूनगंडानें पछाडली गेली होती. त्यावेळच्या परिस्थितीचें हें सत्य निदान होतें. हें सत्य चिपळूणकरांनीं बरोबर ओळखलें आणि म्हणूनच त्यांनीं राष्ट्रनिर्मितीला आवश्यक असलेली सत्त्वजागृति घडून आणण्यासाठीं, लोकशिक्षणाचे निरनिराळे उपक्रम सुरू केले. ' निबंधमाला ', ' न्यू इंग्लिश स्कूल ', ' किताबखाना, ' ' काव्येतिहाससंग्रह, ' केसरी ', ' चित्रशाळा ' हे जे त्यांनीं संचालित केलेले लोकशिक्षणाचे विविध उपक्रम, त्यांतल्या कांहींतून त्यांची ज्ञानप्रसाराबद्दलची व ज्ञानाभिवृद्धीबद्दलची तळमळ व्यक्त झालेली आहे, तर कांहींतून त्यांची इतिहासाध्ययनाबद्दलची जिवंत आस्था व त्यांचें कलाप्रेम प्रकट झालेलें आहे. हे उपक्रम सुरू करण्यांतल्या चिपळूणकरांच्या योजकतेचे जितके पवाडे गावे तितके थोडेच आहेत. कारण यांतले सगळे प्रमुख उपक्रम अत्यंत यशदायी ठरलेले आहेत. ' केसरी ' व ' न्यू इंग्लिश स्कूल ' यांनीं फार मोठ्या प्रमाणावर केलेलें लोकशिक्षणाचें, जनताजागृतीचें व शिक्षणप्रसाराचें कार्य सर्वविश्रुतच आहे—नव्हे आजहि त्यांच्या यशस्वितेची स्पष्ट प्रतीति येत आहे. ' निबंधमाला ' ही त्यांची ' सप्तवर्षकन्यका ' त्यांचा जणु बहिश्चर प्राणच ! विरोधकांना निष्प्रभ करणारें तिचें यश त्यांनीं ' याच देहीं, याच डोळा ' पाहिलें व अनुभविलें—तिच्या यशाची त्यांनींच

स्वतः ग्वाही दिली ! ' माला ' ज्या हेतूनें काढण्यांत आली तो सफल झालेला पाहण्याचा सुखद अनुभव त्यांनीं 'माले'च्या सहाव्या वर्षाच्या अंकांत ग्रथित केला आहे. त्यांनीं लिहिलें आहे : " सहा वर्षांपूर्वी आम्ही आपल्या पुस्तकास जेव्हां सुरुवात केली, तेव्हां आमच्या देशाची स्थिति व भाषेची स्थिति फार निराळी होती. पूर्वीपासून अबाधितपणें चालत आलेल्या मतांचा प्रचार तेव्हां जारीनें सुरू होता. आपल्या देशांत जें जें दृष्टीस पडतें तें तें प्रायः अप्रयोजक व निंद्य, व आपली देशभाषा म्हणजे अडाणी व कोती, हीं दोन मुख्य तत्त्वें विद्वज्जनांस संमत असल्यामुळें व त्यांनीं त्यांचें नेहमीं प्रणयन केल्यामुळें तीं लोकांच्या मनांस बळकट खिळून राहिलीं होतीं. वरील दोन ग्रह आमच्या लेखांच्या योगानें शेंकडों लोकांचे शिथिलित झाले असतील असें म्हणण्यास मोठीशी हरकत दिसत नाहीं.

विशिष्ट हेतूच्या सफलतेचें लक्ष नजरेसमोर ठेवून प्रेरित झालेली दूरदर्शी व विवेकशील योजकता चिपळूणकरांच्या सर्वत्र लहान–मोठ्या उद्योगांत साकार झालेली आहे. ' माले ' चें संचालन व स्वतंत्र शाळेची स्थापना या दोनच गोष्टी पहा ना. मालेचें संचालन त्यांनीं एकाएकीं एखाद्या लटकेच्या झटक्यासरशी हातीं घेतलेलें नव्हतें. ' शालापत्रका ' चें काम करीत असतांना त्यांनीं मासिकाच्या संचालनाचा अनुभव घेतला, आपल्या लेखणीची ताकद अजमाविली आणि मग पुरेशा आत्मविश्वासाचें बळ अंगीं आल्यानंतर त्यांनीं मालेची नीव घातली ! मालेच्या प्रत्येक अंकांतील मजकूर सजवून खुलवून, आकर्षक स्वरूपांत मांडण्यांत त्यांनीं जी परिश्रम-शील योजकता दाखविली ती तर उपमानभूत ठरण्यासारखीच आहे. जो विषय वेळेवर सुचेल त्यावर झोकांत एखादा लेख खरडून टाकला, असा प्रकार 'माले' च्या मजकुराबाबत कधींच घडलेला नाहीं. सरकारी नोकरीचा राजीनामा देण्यांत व आपली स्वतंत्र शाळा काढण्यांतहि त्यांनीं आततताई-पणा दाखविला नाहीं. स्वतंत्र शाळा काढण्याचा विचार सरकारी शाळेंत नोकरी करीत असतांनाच त्यांनीं आपल्या मनांत कायम केला होता हें त्यांनीं रत्नागिरी हायस्कुलांतील त्यांचे एक सहकारी शिक्षक श्री. गांगल यांना राजीनामा दिल्यानंतर पाठविलेल्या पत्रांतील ' I have said. I believe enough to assure you that it was in no momentary break that. I resolved to bear the chain no longer. '

या वाक्यावरून सहज स्पष्ट होण्यासारखें आहे. या बाबतींत वडिलांचा शब्द मोडून, त्यांना दुखवून, बंडखोरी करण्याचा आव त्यांनीं आणला नाहीं.

आपल्या कार्यविशेषांत आणि कार्यपद्धतींत चिपळूणकरांनीं ही जी योजकता दाखविली तिच्यांत एक उदात्त स्वरूपाची सहेतुकता होती. आपल्याला जें सत्य मनःपूर्वक पटलें त्याचें समर्थन, त्याचा पुरस्कार, त्याचा प्रचार करावयाचा, हा त्यांनीं हातीं घेतलेल्या सर्व उद्योगांमागचा प्रधान हेतु होता. आपल्या लोकांच्या ठिकाणीं असलेला न्यूनगंड नाहींसा झाला पाहिजे आणि पाश्चात्यांचे योग्य ते गुण त्यांनीं आत्मसात् केले पाहिजेत, हें लोकांना परोपरीनें शिकविण्यावर त्यांचा भर होता. "आजपर्यंत आमच्या देशाच्या हरएक गोष्टीविषयीं—आमच्या विद्येविषयीं, स्वभावाविषयीं, आचारांविषयीं, धर्माविषयीं, भाषेविषयीं, कवितेविषयीं वगैरे ज्या लोकांच्या समजुती ठरून गेल्या होत्या. त्यांपैकीं कित्येक निःशंकपणें खोडून टाकून खोट्या ठरविणें आणि आमच्या बुद्धीनें जें जें आम्हांस खरें भासलें व ज्याच्या सत्यत्वाविषयीं आम्हांस स्वतः संशय उरला नाहीं तें तें कितीहि लोकमताविरुद्ध असलें तरी आमच्या सुज्ञ व निःपक्षपाती वाचकांस प्रमाणासहित सादर करणें" हा त्यांचा बाणा होता. हा बाणा त्यांनीं मोठ्या धैर्यानें आणि ध्येयवादी वृत्तीनें पाळला. त्यांना आयुर्मर्यादा अवघी ३२ वर्षांचीच लाभली. त्यांतहि पुन्हा त्यांच्या कर्तृत्वाचा जणुं गाभाच असलेली अशी त्यांची 'निबंधमाला' १८७४ मध्यें सुरू झाली हें लक्षांत घेतलें म्हणजे असें म्हणावें लागतें कीं त्यांना आपलें कर्तृत्व गाजवायला फक्त आठच वर्षें मिळालीं ! एवढ्या अल्प कालमर्यादेंत त्यांनीं राष्ट्रहिताचीं अनेक कार्यें हातीं घेतलीं आणि तीं अशा रीतीनें संचालित केलीं कीं तीं पुढें भरघोस यशानें मंडित झालीं ! प्रतीत झालेल्या सत्यावरील भक्कम निष्ठा आणि त्यांच्या प्रचारांत व पुरस्कारांत त्यांनीं दाखविलेली आत्मविश्वासपूर्ण व परिश्रमशील स्वरूपाची कुशल योजकता या गुणांमुळेंच त्यांना अंगीकृत कार्यविशेषांत घवघवीत यशाची व सफलतेची प्राप्ति झाली !

हां, एवढें मात्र खरें आहे कीं, चिपळूणकरांनीं आपल्या विचारांचा प्रचार करतांना विरोधी विचारांचा आणि विरोधकांचा, संधि सांपडेल तेथें मोठा मर्मभेदक आणि खरपूस उपहास केला आहे. मराठींतले बरेचसे

वाङ्मयसमालोचक चिपळूणकरांवर त्यांच्या या उपहासप्रवृत्तीमुळेंच नाराज आहेत. आपण विशिष्ट व्यक्तींच्या व विचारांच्या उपहासाला कां प्रवृत्त झालों यासंबंधीं चिपळूणकरांनीं 'निबंधमालें'त जी कारणमीमांसा प्रसंगोपात्त, अनेक स्थळीं मांडलेली आहे ती जर आपण पाहिली तर त्यांनीं केलेला उपहास हा नुसता क्षम्यच नव्हे तर समर्थनीय आहे हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. चिपळूणकरांच्या उपहासपरतेवर त्यांचा समकालीन टीकाकार ' हितेच्छु ' हाहि नाराज झालेला आहे. त्याला उत्तर देण्याच्या निमित्तानेंच त्यांनीं आपल्या उपहासपरतेच्या समर्थनार्थ कांहीं मुद्दे मांडले आहेत ते असे :

१. " जें सर्वथा किंवा बहुतेक अंशीं एखाद्यास अप्रयोजक वाटतें व ज्या गोष्टीविषयीं त्याची विशेष पूज्यबुद्धि नसून इतरांची तरी कां असावी हें त्यांस कळत नाहीं त्यावर नुसतीं कोरडीं दूषणें देण्यापेक्षां आपल्या श्रोत्यांस किंवा वाचकांस हंसवण्याचीहि जर त्यास संधि सांपडली, " तर ती त्यानें व्यर्थ कां घालवावी ?

२. विरोधकांचा उपहास करण्याचा " हा प्रकार अगदीं प्राचीन काळापासून चालत आलेला आहे व त्यांत आमच्या बुद्धीस कांहीं गैरहि दिसत नाहीं; " म्हणजे उपहासप्रवृत्ति ही परंपरामान्य आहे आणि न्याय्यहि आहे.

३. ज्यांचा आम्ही कित्ता गिरवावा तेहि जर उपहासाचें अस्त्र यथास्थित वापरतात तर मग आम्हां बापड्यांसच तें वापरण्याची बंदी कां असावी ? "मेकॉले, मिलसारख्या महापंडितांनीं बिचाऱ्यांनीं क्षणमात्रहि विचार न करतां आमच्या देशभर आपली चटोरपणाची व कडकपणाची लेखणी जर खुशाल फिरविली आहे व तिच्या शाईनें आपल्या कीर्तीच्या मुखास काळिमा लावून आमच्या हृदयांत चिरकाल भिनून राहीसें विष तिच्या मुखांतून जर ओकवलें आहे; तेंच व्रत पुढें जगत्तारकाच्या प्रेषितांनीं व त्यांच्या भुलथापीस भुलून आकाशाच्या राज्याचा तुकडा ज्यांनीं आपापलासा करून घेतला अशा ख्रिस्ते मंडळीनें जर आज तीसचाळीस वर्षें कायावाचामनेंकरून निर्बाध चालविलें आहे; फार तर काय, पण आमचे देशबंधु व आमच्या हिताची अतोनात कळकळ बाळगणारे असे जे महाविद्वान् व महावक्ते बाबू प्रतापचंद व

साक्षात् जगद्गुरु दयानंदजी यांसहि हास्यरस यथास्थित पिकविल्याखेरीज आपलें व्याख्यान रंगलेसें वाटत नाहीं तर तोच श्लाघ्यक्रम पुढें चालविण्यास आमच्या ' निबंधमाले 'स कां आडकाठी असावी ? "

४. ' लोकां सांगे ब्रह्मज्ञान, आपण भोगीं रममाण ' अशा वृत्तिच्या लोकांवर उपहासाचे कितीहि जास्त आणि केवढेहि तीव्र कोरडे ओढले तर ते क्षम्यच ठरण्यासारखे आहेत. चिपळूणकरांना त्यांच्या काळच्या बोलघेवड्या सुधारकांच्या आचारविचारांत हास्यरसास स्वभावतःच उत्तेजन देणारी अशी विसंगति भरपूर प्रमाणांत सांपडलेली आहे. चिपळूणकरांनीं या विसंगतीचीं जीं अनेक उदाहरणें दिलीं आहेत त्यांतील एकदोनच उदाहरणें पहा :

" बालविधवांचा दुःखाक्रोश कानांनीं ऐकवत नाहीं म्हणून शास्त्रकर्त्यांच्या व भटांच्या नांवानें नेहमीं खडे फोडून ते दुष्ट, पक्षपाती, कोत्या समजुतीचे व आपमतलबी म्हणून हाका मारायच्या व देशकार्यरूप नौकेचें सुकाणूं आपण स्वतः हातीं धरायचें; पण पुढें लवकरच आपला कपटकोप, लोककल्याणाविषयीं कळकळ, बालविधवांस दिलेलें आश्वासन, आपला, आपल्या मंडळींचा व एकंदर देशाचा लौकिक वगैरे चट सारें एका क्षणांत एकीकडे गुंडाळून ठेवून केवळ विषयलंपटतेस वश होऊन आपल्या एकट्याच्याच नियतकालिक सुखाकरतां सगळें जहाजचें जहाज समुद्राच्या तळीं नेऊन बसवितांना तिळमात्रहि मनांत शंका आणायची नाहीं ! "

" दुसऱ्यांच्या पुनर्विवाहोत्सवाला वऱ्हाडी, पण घरचें कार्य निघालें कीं, कपाळ दुखायला लागून हवा पालटल्याखेरीज चालायाचेंच नाहीं ! "

" सकाळीं संध्याकाळीं ईश्वराचे गुणानुवाद मोठ्या प्रेमानें गाऊन आत्म्यास अक्षय सुखांत ठेवण्याविषयीं त्याजपाशीं प्रार्थना करावयाची आणि रात्रीच्या समयीं ईश्वराच्या दृष्टीस न पडतां त्याचें जगद्व्यापकत्व गुंडाळून ठेवून शरीरसुखसाधनाच्या ठिकाणीं गुप्त प्रवेश करायाचा ! "

—असली घृणास्पद विसंगति ज्यांच्या जीवनांत आहे त्यांना उपहासाचे अणकुचीदार खडे मारून मारून जेरीस आणावयाचें, कीं बोलायचें एक आणि वागायचें भलतेंच अशी बहादुरी केल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करायचें ? तेव्हां त्यांच्या वेळच्या नव्या मंडळींतील सर्वांस ढळढळीत

दिसणारीं शेंकडों कुलंगडीं छपवून ठेवावयास सत्यपक्षपाती व न्यायी वृत्तीचे चिपळूणकर तयार झाले नाहींत हें त्यांनीं योग्यच केलें म्हणायचें !

५. पुन्हां चिळूणकरांनीं सुचविल्याप्रमाणें ही उपहासाची वृत्ति एकंदरीनें परिणामीं उपकारकच ठरण्यासारखी आहे. या उपहासाच्या भीतीमुळें सार्वजनिक जीवनांत शिरणाऱ्यांच्या आचारविचारांत सुसंगति उत्पन्न होण्यास पुष्कळच मदत होण्यासारखी आहे.

६. शेवटीं, चिपळूणकरांनीं म्हटल्याप्रमाणें “ ज्या त्या काळच्या स्थितीविशेषावर व त्यांतून ज्याच्या त्याच्या प्रकृतीवर कोणाच्याहि लिहिण्याचें मान असतें ” हें खरें आहेच !

तात्पर्य काय कीं, तथाकथित प्रतिष्ठितांच्या आचारविचारांत दिसून येणाऱ्या विसंगतीला वेशीवर टांगण्यासाठीं आणि विरोधकांच्या उपहासाला सवाई उपाहाराचा अहेर अर्पण करण्यासाठीं चिपळूणकरांनीं आपल्या उपहासवृत्तीचा उपयोग केलेला आहे असें दिसून येतें. त्यामुळें त्यांची उपहासप्रवृत्ति नुसती क्षम्यच नव्हे तर समर्थनीयहि ठरते. खरा चिकित्सक आणि सारलोलुप वाचक चिपळूणकरांच्या या उपहासप्रवृत्तीचा तिचें खरें मर्म लक्षांत आल्यामुळें, उगाच बाऊ करणार नाहीं. चिपळूणकरांच्या वाङ्मयांत आणि जीवनांत जी विवेकशील सत्यनिष्ठा इतर अनेक महनीय गुणविशेषांसह साकार झालेली आहे, तिची महत्ता नीट जाणून त्यांच्या एकूण कर्तृत्वाचा न्याय्य गौरव करण्यास तो उत्सुक आणि उत्साहित झाल्यावांचून रहाणार नाहीं !

चिपळूणकरांच्या अंगच्या विवेकशील सत्यनिष्ठेचें व सुसंस्कृत रसिकतेचें प्राधान्यानें ज्यांतून दर्शन होईल अशाच त्यांच्या कांहीं निवडक लेखांचा व निबंधांचा या संग्रहांत समावेश केलेला आहे. वाचकांना तें दर्शन उत्कट स्वरूपांत घडावें व चिपळूणकर हे विचारानें संकुचित व एकांगी होते या गैरसमजाचें वैय्यर्थ पटावें अशी हा संग्रह तयार करणाराची मनीषा आहे. ती तृप्त व्हावी अशी अपेक्षा आहे.

अ. ना. दे.

# विष्णु कृष्ण चिपळोणकर

देह त्यागितां कीर्ति मागें उरावी।
मना सज्जना हेंचि क्रीया धरावी॥

— श्री रामदास

गेल्या शुक्रवारीं सकाळीं ७।८ वाजण्याच्या सुमारास डोलकर आळींत एकच गर्दी झाली. शाळांतील लहान मोठीं मुलें व त्याचप्रमाणें गांवांतील तरुण आणि वृद्ध लोक यांचीं तोंडें म्लान होऊन त्यांवर विपरीत कळा आली. इतक्यांत चिपळोणकरांच्या वाड्यांतून स्त्रियांचा दीर्घ रुदनस्वर बाहेर आला ! त्याबरोबर घात झाला अशी खात्री होऊन सर्वजण तोंडाला पदर लावून रडूं लागले. या वेळीं शाळेंतील मुलांनीं रडून जो कल्लोळ केला तो सांगतां पुरवत नाहीं. विष्णुशास्त्री एखाद्या रोगानें ४।६ महिने खितपत पडले होते असें नाहीं. १५ दिवसांपूर्वी कँपमध्यें फोटोग्राफ घेण्यासाठीं टेबलावर उभे राहिले असतां एकाएकीं पित्तप्रकोप होऊन जी चक्कर आली त्यासरशीं ते धाडकन् जमिनीवर बेशुद्ध पडले. कांहीं वेळानें शुद्धीवर आल्या-वर त्यांस घरीं आणिलें. नंतर थोडासा ज्वर भरला. पण तो अशा थराला जाईल असें कोणाच्या स्वप्नांत देखील आलें नाहीं. त्या ज्वरामुळें त्यांस क्षीणता आली होती हें खरें, पण तो अशा तीव्र वेगानें उलटून, बोलतां बोलतां पुण्यांतील मोहरा रातोरात घेऊन जाईल असें कोणासहि वाटलें नाहीं. परंतु दैवाची परम विचित्र गति ! ! शास्त्रीबोवांस कलिंगडें खाऊन थंड पाणी पिण्याची बुद्धि झाली; त्यासरशीं कुपथ्य झाल्याचें निमित्त होऊन तात्काळ सन्निपात झाला तो त्यांना घेऊनच गेला. शास्त्रीबोवांच्या अकालीं मृत्यूनें "केसरी"चा एक पाय लंगडा झाला यांत कांहींच नाहीं; आज महाराष्ट्रवाणीचा पति परलोकवासी झाल्यानें ती गतभर्तृका झाली व

महाराष्ट्रीयांनीं अद्वितीय रत्न गमाविलें अशी आमची समजूत आहे. " मरणं प्रकृतिः शरीरिणाम् " अशी कविकुलगुरुक्ति आहे ती आम्हांस अक्षरशः मान्य आहे. परंतु हा अबाधित सृष्टीनियम शास्त्रीबोवा वयातीत झाल्यानंतर त्यांना लागू पडता म्हणजे आम्हांस इतका खेद करण्यास जागा उरती ना; परंतु ज्याप्रमाणें एकादा प्रचंड वृक्ष फळास येतो आहे नाहीं तों विद्युत्पात होऊन तो जमीनदोस्त व्हावा, त्याप्रमाणें आतां कोठें शास्त्रीबोवांच्या बुद्धीचीं परिपक्वफळें हवीं तशीं लोकांस मिळूं लागलीं होतीं तों त्यांस करुणाविमुख मृत्यूनें हरून नेलें हा केवढा दुःखाचा प्रसंग ! ! गेल्या वर्षींच आम्ही एकत्र होऊन एकदिलानें प्रस्तुत उद्योग आरंभिला तेव्हांची वीरश्री कोणीकडे, आणि 'केसरी' राजाच्या नैसर्गिक उद्धतवृत्तीला अननुरूप--अशी सांप्रतची खिन्नावस्था कोणीकडे ? असो. धैर्य धरून आला दिवस कसा तरी घालविलाच पाहिजे. गतवर्षी बाळाजी बापूजी साने व चिंतामण सखाराम चिटणीस यांची मृत्युवार्ता कळविण्याचें दुःखाचें काम केलें; आज आम्हांपैकींच एकाच्या संबंधानें मृत्युलेख लिहिण्याचें आमच्या कपाळीं आलें आहे, त्या कामासाठीं शोक क्षणभर एकीकडे ठेवून धैर्याचें अवलंबन करतों.

विष्णुशास्त्री हे प्रसिद्ध कृष्णशास्त्री यांचे चिरंजीव. यांचा जन्म १८५०त झाला. यांना लहानपणापासून वाचण्याचा जबरदस्त नाद असे. ज्याप्रमाणें डॉ. जॉनसन् बापाच्या दुकानावर बसून फावल्या वेळीं अनेक विषयांवरील व्हालमेंच्या व्हालमें फडशा करी, त्याप्रमाणें ' दक्षिणा प्रैज कमिटी ' किंवा ' नेटिव प्रेसचे रिपोर्टर ' या नात्यानें कृष्णशास्त्र्यांकडे जीं पुस्तकें येत तीं हे भावी शास्त्री वाचून टाकीत. या रीतीनें मॅट्रिक्युलेशन होण्यापूर्वींच विष्णुपंतांच्या नजरेखालून अनेक ग्रंथ जाऊन मराठी भाषेवर त्यांचें प्रेम जडलें व तें उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेलें. १८६५ त पहिली परीक्षा होऊन ते कॉलेजांत गेले. त्यांना गणिताचा मोठा कंटाळा असे. मेकॉलेप्रमाणें आपला सारा वेळ ऐतिहासिक ग्रंथ वाचण्यांत घालवीत. १८७२ त ते

बी. ए. ची परीक्षा पास झाले. १८७३ त कांहीं महिने बाबा गोखले यांच्या शाळेंत शिक्षकाचें काम केल्यानंतर येथील सरकारी हायस्कुलांत नव्वदाची जागा मिळाली व पुढें नव्वदाचे शंभर झाले. 'निबंधमाले'चा पहिला अंक १८७४ त बाहेर आला. 'निबंधमाला' जों जों मोठी होऊं लागली तों तों शास्त्रीबोवांचीं मतें बाहेर पडून स्वातंत्र्यशत्रु आणि स्तुतिप्रिय अशा अधिकाऱ्यांशीं त्यांचे तेढे पडूं लागले. आपल्या कर्तव्यांत निरंतर तत्पर असल्यामुळें शास्त्रीबोवा कधीं कोणाची पर्वा ठेवीत नसत. याचा परिणाम असा झाला कीं, जात्या परप्रातिष्ठा–असहिष्णु असे आमचे डायरेक्टर चाट-फील्डसाहेब यांच्या तापट प्रकृतीवर कित्येक निंदकांनीं तैलवृष्टि केल्यामुळें तिनें जो पेट घेतला त्यासरशीं त्यांनीं शास्त्रीबोवांची 'परशुरामक्षेत्रीं' गठडी वळली. कोंकणवास विष्णुशास्त्र्यांना पराकाष्ठेचा दुःसह होऊन राज-सेवा–शृंखलांतून आपला पाय काढून घेण्याविषयीं त्यांचा निश्चय झाला. १८७८ त कृष्णशास्त्री वारले. १८७९ च्या एप्रिलांत विष्णुशास्त्री चाकरी सोडण्याच्या बेतानें आपलें चंबुगबाळें आटोपून पुण्यास आले. चार-पांच महिने काय करावें, कोणता धंदा काढावा, अशा विचारांत गेले. या सुमारास डेक्कन कॉलेजांतील दोनतीन गृहस्थांचा सरकारी नोकरी न करता स्वतंत्रपणें लोकोपयोगी एखादें काम करण्याचा निश्चय झाला. नोकरी सोडून गांवांत शास्त्रीबोवा येऊन बसले आहेत असें कळल्याबरोबर सदरहू मंडळी त्यांस जाऊन भेटली व उभयतांचें विचारें एक शाळा काढण्याचा विचार झाला. त्याप्रमाणें १८८० च्या जानेवारी महिन्यांत 'न्यू इंग्लिश स्कूल' या नांवानें मोरोबा दादा फडणीस यांच्या वाड्यांत शाळा घातली. ती आतां कोणत्या स्थितींत आहे हें सांगावयाला पाहिजे असें नाहीं. शाळेस पुरें वर्ष झालें न झालें तों तिला आणखी एक दोन गृहस्थ येऊन मिळाले. पांच मंडळी एका हेतूनें व एका मतानें वागत असल्यामुळें शाळेचें काम आटोपून आणखीहि कांहीं करतां येईल असें वाटल्यावरून शुद्ध इंग्रजी आणि शुद्ध मराठी अशीं दोन वर्तमानपत्रें काढण्याचा विचार झाला आणि त्याप्रमाणें

८१ च्या जानेवारींत 'मराठा' व 'केसरी' हे बाहेर आले. या दोघांनीं मिळून एका वर्षांत महाराष्ट्र देशांत केवढी चळवळ करून सोडली आहे याचा वाचकांनींच विचार करावा. याखेरीज शास्त्रीबोवांचे खाजगी धंदे जोरानें चालले होते. निबंधमाला, किताबखाना, चित्रशाळा वगैरे गोष्टी नेटानें चालल्याच होत्या. येणेंप्रमाणें शास्त्रीबोवा ज्या उद्योगांत व्यग्र असत त्यांची थोडीशी हकीकत झाली. शास्त्रीबोवांचे बहुतेक विचार त्यांच्या मालेंतून आणि 'केसरीं'तून प्रसिद्ध आहेत, तेव्हां त्यासंबंधानें विशेष लिहावयाचें आहे असें नाहीं. पण ज्या गोष्टी अतिशय भिडस्त स्वभावामुळें शास्त्रीबोवा जिवलग मित्रांबाहेर कधींहि काढीत नसत त्यासंबंधानें येथें दोन शब्द लिहिण्याचा हेतु आहे.

आपल्या देशाचें पारतंत्र्य व दारिद्य हीं शास्त्रीबोवांच्या अंतःकरणाला जशीं खात तसें दुसरें कांहीं खात नसे. आपल्या लोकांची दैन्यावस्था पाहून त्यांचा जीव तिळतिळ तुटे. पारतंत्र्याला आणि दारिद्याला उद्योग हींच वस्ताद औषधें असें ते नेहमीं म्हणत. लोकांना खरें ऐहिक सुख होण्याला त्यांची राज्यव्यवस्था कशी पाहिजे याचा विचार त्यांच्या मनांत नेहमीं घोळत असे. लोकांत विद्याप्रचार होऊन त्यांना राजकारणांतील तत्त्वें कळावीं व तदनुसार त्यांनीं वर्तन ठेवून ह्या हतभाग्य भरतखंडास त्यांनीं एकदां तरी सुदिन आणावा ही त्यांची बळकट इच्छा असे. परकीय लोक राज्य करीत असल्यामुळें आमचे लोक सत्त्वहीन होत जाऊन अप्पलपोटे, भेकड, हांजीहांजीखोर, मठ्ठ, निर्लज्ज, अभिमानशून्य असे झालेले पाहून त्यांच्या अंगाचा तिळपापड होई. परकीय या नात्यानें इंग्रजांचा त्यांना अत्यंत कंटाळा असे; पण त्यांची करामत, दृढता, कौशल्य आणि उद्योग हीं पाहून त्यांस त्यांचें पराकाष्ठेचें आश्चर्य वाटत असे. हिंदु लोकांचा, हिंदु धर्माचा, हिंदु रिवाजांचा, सारांश, ज्याला ज्याला हिंदु हें विशेषण लावितां येईल त्याचा त्यांना मोठा अभिमान असे. सर्वांपेक्षां मराठी भाषेवर त्यांचें

जें प्रेम असे तें कांहीं पुसूंच नये. एकसारखीं सात वर्षें तिची उपासना करून त्यांनीं तिला अगदीं भारून टाकल्यासारखें केलें होतें. ज्याप्रमाणें प्रख्यात फ्रेंच ग्रंथकर्ता व्होल्टेर यानें एकदां कोरडा उचलला म्हणजे स्टॉकहोम व रोम आणि पीतर्सबर्ग व लिस्बन यांच्या दरम्यान चटसारी मंडळी चळचळ कांपत असे; त्याप्रमाणें शास्त्रीबोवांनीं लेखणी उचलली कीं, रावसाहेब, रावबहादुरे, रेवरंडे, सरस्वती यांची पांचावर धारण बसे. आपल्यामागें आपलें नांव चालविण्यास त्यांनीं एक 'सप्तसंवत्सरा निबंधमाला' कन्येखेरीज दुसरें कांहीं ठेवलें नाहीं. त्याच्या त्या गद्य कृतीला " स्फुरत्कलालाप विलास कोमला " हें बाण कवीचें वर्णन हुबेहूब लागतें. कोणी एकदां— शास्त्रीबोवांना असा प्रश्न केला होता कीं, असे कडक लेख लिहिण्यास कसें धजतां ? त्यावर त्यांनीं असें उत्तर केलें कीं, अगोदर तुरुंगांत एक पाय ठेवून मग आम्ही देशोन्नतीसाठीं आपली लेखणी हातीं घेतली. एखाद्या वेळेस त्यांचा कल्पनाविहंग पूर्ण पंख पसरून भराऱ्या मारूं लागला म्हणजे त्याला हिंदुस्थान देश स्वतंत्र होऊन प्रजासत्ताक राज्याखालीं सुखानें नांदत आहे असें दिसे. पुनर्विवाह, बालविवाह, स्त्री-शिक्षण, स्त्री-स्वातंत्र्य, धर्मसंस्थापना, जातिभेद यासंबंधानें त्यांचे विचार जुन्या मताचे दिसत. परंतु ते वास्तविक रीतीनें अगदीं पुढें सरसावलेल्या सुधारकाप्रमाणें होते. फार कशाला, गेल्या 'केसरीं'तील " देशोन्नति " या सदराखालचा निबंध जो कोणी लक्ष लावून वाचील त्याला शास्त्रीबोवांचे जातिभेदासंबंधानें काय विचार होते हें सहज लक्षांत येईल. इतकें खरें आहे कीं, ते या विषयाच्या संबंधानें फारसें कधीं लिहीत नसत, पण लिहूं लागल्यास वृद्ध पिढीचा रोष होईल म्हणून आपलीं खरीं मतें पुढें करण्यास ते कधींहि भीत नसत. सारांश, हिंदुस्थानचें पारतंत्र्य नष्ट होऊन तो स्वराज्याखालीं येण्याचें कोणतेंहि साधन असल्यास त्याला ते अडथळा घेणारे नव्हते. अस्तु. बर्वे प्रकरण चालूं असतां त्यांचा एकाएकीं अंत झाला हें पाहून कोणी अधमांनीं अशी कंडी उठविली कीं, कारभाऱ्याला भिऊन जाऊन त्यांनीं आत्महत्या

केली; असले नीच नरपुंगव कोणी असतील ते असोत. शास्त्रीबोवांना तर आपल्या लेखणीच्या सामर्थ्याविषयीं अशी धमक होती कीं, प्रसंग पडल्यास तुरुंगांतल्या तुरुंगांत "असल्या शें-पन्नास राजशत्रूंना सर्व महाराष्ट्राकडून मी छीः-थू करून सोडीन."

येथवर शास्त्रीबोवांचीं ठळक ठळक राजकीय सामाजिक मतें सांगण्यांत आलीं. हिंदुस्थानच्या दारिद्र्याच्यासंबंधानें त्यांची अशी खात्री झाली होती कीं, येथें व्यापारबुद्धि झाल्याविना आमच्या देशाचें डोकें वर निघणार नाहीं. याच उद्देशानें त्यांनीं सरकारी दास्याची रुपेरी बेडी तोडून येऊन पुणें येथें स्वतंत्रपणानें वास्तव्य करण्याचा विचार केला व एकीकडे अध्ययन, अध्यापन आणि ग्रंथरचना यांत आपला कालक्रम करण्याचा निश्चय करून दुसरीकडे आपल्या नजरेखालीं छापखाना, चित्रशाळा, किताबखाना वगैरे कारखाने काढले. लवकरच कांहीं खटपट करून कागदाचें यंत्रहि आणविण्याचा त्यांचा विचार होता. हे धंदे त्यांनीं द्रव्यसंपादनेच्छेनें काढिले असें नाहीं; कारण द्रव्यसंबंधानें शास्त्रीबोवा जितके निरपेक्ष होते तितका दुसरा पुरुष सांपडणें कठीण. त्यांचा हेतु असा असे कीं, देशांत कारखाने निघून लोकांस काम मिळावें व त्यांस भाकरीची वाण पडूं नये. शास्त्रीबोवांनीं वर जे कारखाने काढिले त्यांत तरी त्यांचा एवढाच हेतु होता. त्यापासून स्वतःचा फायदा करून घेण्याची इच्छा त्यांनीं कधींच धरली नाहीं. त्यांचें असें म्हणणें असें कीं, बुद्धिवान आणि चतुर लोकांनीं मोठमोठे धंदे अंगावर चालू करावे आणि मग ते साधारण लोकांच्या हातांत देऊन आपण त्यापासून अलग राहावें. आम्हांस तर असें वाटतें कीं, शास्त्रीबोवांसारखा हिंमतवान, प्रशांत, गंभीर आणि निरपेक्ष मनुष्य अत्यंत विरळा असेल. कोणी हितचिंतक मित्र विनोदानें आपल्या गट्टीस ग्राज्वेट पंचायतन, ग्राज्वेट पांडव असें म्हणत. निष्ठुर मृत्यूनें आम्हांपैकीं आमचा भ्राता धर्मराज आज यमसदनास पाठविला, व आमच्या बंधाचा

ग्रंथमणी हिरावला ही गोष्ट खरी; तथापि आमची अशी उमेद आहे कीं, आम्ही एकवार मनाचा निश्चय करून देशोन्नतीसाठीं झटण्याचा केलेला संकल्प होतां होईल तों टळूं देणार नाहीं. प्रथम लोकांना आम्हांविषयीं अशी भीति होती कीं, द्रव्यासंबंधानें आमच्यांत आपसांत कलागती लागत. आमची जूट फुटेल. पुढें ब्वें प्रकरण येऊन धडकलें तेव्हां तर कित्येकांना असें वाटलें कीं, या ग्रॅज्युएटांची फटफजिती होते!आणि आतां तर आम्हां-पैकीं एकानें परलोकास प्रयाण केलें; तेव्हां आम्हांविषयीं लोकांच्या मनांत नाना तऱ्हेचे तरंग येऊं लागले आहेत यांत नवल नाहीं. पण सर्वांनीं एक गोष्ट लक्षांत धरावी ती ही कीं आम्ही जो उद्योग आरंभिला तो लोकांनीं घोड्यावर बसविलेल्या रडतरावाची मनोवृत्ति धारण करून आरंभिला नाहीं. हें काम आम्ही आपल्या आपखुषीनें आणि आपसमजुतीनें आमचें आम्ही आपल्या अंगावर घेतलें.तें तडीला लावण्यासाठीं आमच्याकडून होईल तितका प्रयत्न करण्यास आम्ही कधींहि सोडणार नाहीं. देवाच्या किंवा दैवाच्या इच्छेपुढें इलाज नाहीं. अशा रीतीनें मनाची खोटी समजूत घालून अशा लोकहिताच्या कामांत प्रतिपक्षाची क्षमा मागण्याचें काम आमच्या हातून होणार नाहीं. अधिकार, धन, वजन यांपुढें टिकाव धरणें दुस्तर आहे हें आम्हीं कबूल करतों. परंतु सत्याचा कैवार घेऊन शुद्ध अंतःकरणानें लोक-हितासाठीं भांडणारांना कोणत्याहि प्रकारची धास्ती बाळगण्याचें कारण आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आणि असें असूनहि प्रसंग येऊन बेतलाच तर तो साहण्यास आम्ही कचरूं अशी कोणीहि शंका घेऊं नये. आमचें धैर्य आणि कार्यनिष्ठा ही कसास लावण्याची संधि आली आहे असें आम्ही समजतों. शास्त्रीबोवांचीच कथा काय, पण आम्हांपैकीं एक जरी तळावर असला तरी तो आम्ही सर्वांनीं आरंभिलेले उद्योग अविच्छिन्न चालविण्यास होईल तितकी खटपट करील. “ निबंधमाला ” मात्र पुढें चालविण्याचा आमचा विचार नाहीं. कारण शास्त्रीबोवांनींच ८४ व्या अंकांत तिची समाप्ति करून तिच्या जागीं “ ग्रंथमाला ” प्रसिद्ध करण्याची इच्छा

प्रदर्शित केली आहे. तो अंक कारणांसह लोकांपुढें लौकरच येईल. देशोन्नति, देशकल्याण वगैरे गोष्टी थोडीबहुत अंगांस झीज लावून घेतल्याखेरीज फुकाच्या पोकळ गप्पा मारून होत नाहीं, हें आम्ही पक्कें समजत आहों. ती लावून घेण्यास आम्ही तयार आहों. प्रयत्न करणें आमचें काम आहे, यश येणें न येणें बाह्योपाधींवर अवलंबून आहे. त्याचा आम्हीं विचार करीत नाहीं. येवढें सांगून व त्या महात्म्याला परलोकीं सर्वोत्कृष्टी शांति आणि कल्याण चिंतून हा लेख आटोपतों.

—गोपाळ गणेश आगरकर

[ ' केसरी ' ]

● ●

# कै. विष्णुशास्त्री

"This worthy Indian citizen, who died on the 17th March last, at the early age of thirty-two, displayed an enterprise and energy in the pursuit of benevolent aims which is nowhere too common, and is especially valuable in India where the people are rather wont to lean upon the Government for any improvement......

......He did not live to reap the fruits of his labours, but he nevertheless deserves a hearty recognition as one of those pioneers of progress who if they become numerous enough, will some day make India a self-governing Community."

—**The Graphic, London**
(16 th May 1882).

आमच्या या महाराष्ट्र देशांत इंग्रजी विद्येचा प्रसार होऊं लागल्यापासून जे पुष्कळ विद्वान पुरुष होऊन गेले त्यांमध्यें विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यापेक्षां चरित्र लिहिण्यास अधिक योग्य असा पुरुष क्वचितच निपजला असेल. जेथें जेथें म्हणून मराठी भाषा बोलतात, तेथें तेथें या थोर पुरुषाचें नांव माहीत नाहीं असा मनुष्य सांपडणें कठिण. यांच्या हातून अल्पवयांतच जीं अनेक महत्त्वाचीं कृत्यें घडून आलीं, तशीं गेल्या पन्नास साठ वर्षांत कोणाच्याहि हातून घडून आलीं नसतील. सुमारें दहा बारा वर्षांतच यांनीं आपल्या अलौकिक ग्रंथरचनेनें महाराष्ट्र भाषेस अगदीं वेगळें स्वरूप दिलें; लोकमताचा प्रवाह जो आपल्या देशाच्या खऱ्या हिताविरुद्ध जबरदस्त असा वहात चालला होता त्यास अगदीं उलटी दिशा दिली. आपल्या देशबांधवांमध्यें स्वदेशाविषयीं, स्वभाषांविषयीं, स्वजातींविषयीं अभिमान जागृत केला व नवीन छापखाने, नवीन किताबखाने हातीं घेऊन सरकारच्या नोकरीवरच भिस्त न ठेवितां खाजगी उद्योगानें आपल्या विद्वान लोकांस स्वतंत्रपणानें व अब्रूनें कसें राहतां येईल, हें प्रत्यक्ष स्वतःच्या उदाहरणानें दाखवून दिलें.

विष्णुशास्त्री यांच्या हातून हीं वर सांगितलेलीं कृत्यें घडून येण्यास त्यांच्या अंगचे सद्गुण व दुर्गुण हे दोन्हीहि कारणीभूत झाले, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांच्या अंगचे मोठे गुण म्हटले म्हणजे बुद्धि-प्रागल्भ्य, सतत उद्योगाविषयीं हौस, अलौकिक धैर्य, सद्वर्तनप्रीति, साधा व गरीब स्वभाव व देशाविषयीं खरा व पूर्ण अभिमान हे होत. या सद्गुणांतच मिसळून व बहुतेक त्यांच्याशीं एकवट होऊन राहिलेले असे कांहीं दोष—स्वतःच्या योग्यतेविषयीं व स्वतःच्या ग्रंथाविषयीं असावा त्यापेक्षां जास्त अभिमान, हेकेखोरपणा, व्यावहारिक शहाणपणाची एक प्रकारची कमतरता, दुसऱ्याच्या दोषाकडे बारीक व कडक नजर —हे विष्णुशास्त्री यांच्या ठिकाणीं होते. या दोन्ही गुणावगुणांचा मिलाफ चरित्रनायकांच्या ठिकाणीं नसून फक्त सद्गुणच असते, तर त्यांच्या हातून जी महत् देशसेवा आजला झाली आहे ती होण्याचा संभव नसून, त्यांच्या हातून माजी बाळ गंगाधर-शास्त्री जांभेकर किंवा कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्यासारखी ग्रंथरचनेनेंच केवळ एका तऱ्हेची देशसेवा झाली असती. परंतु वरील दोन्ही विद्वान गृहस्थांच्या कर्तबगारीपेक्षां पुष्कळच अधिक योग्यतेची जी—कीं नवीन खाजगी शाळा घालून कमी खर्चानें व सरकारी शाळांपेक्षां निराळ्या तऱ्हेनें इंग्रजी विद्येचा प्रसार करणें, होतकरू विद्वान मंडळींमध्यें प्राचीन विद्या, प्राचीन कला, प्राचीन आचारविचार यांविषयीं प्रीति उत्पन्न करून त्यांस त्यांचें पुनरुज्जीवन करण्याच्या यत्नास लावणें व सरकारचे केवळ मिंधे होऊन न बसतां स्वतंत्र धंदे काढून त्यांवर अब्रूनें चरितार्थ कसा चालवितां येईल इत्यादि फार महत्त्वाच्या गोष्टी त्यांस शिकवणें—ही कर्तबगारी विष्णुशास्त्री यांच्या हातून घडून येण्यास त्यांच्या अंगच्या गुणांप्रमाणें दोषहि कारणीभूत झाले. हा प्रकार कसा घडला हें त्यांच्या चरित्रावरून दिसून येईल......

......मराठी भाषेची अत्यंत शोचनीय व आमच्या डिग्रीवाल्या मंडळीस लाज आणणारी स्थिति असतां विष्णु कृष्ण चिपळूणकर, बी. ए. या पदवीसह नांवाखालीं ‘ निबंधमाले ’चा उदय झाला. ज्याप्रमाणें पवित्र शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें ईश्वरानें प्रचंड आकाश उत्पन्न केल्यानंतर सृष्टि निर्माणाच्या चौथ्या दिवशीं संध्याकाळीं लहान लहान अगण्य ताऱ्यांच्या

समुदायांत प्रथमच द्वितीयेच्या अत्यंत लहान परंतु रमणीय चंद्रकलेला एकाएकीं उत्पन्न केलें त्या वेळीं तो प्रसंग जसा अति रम्य व आनंदमय वाटला असेल त्याचप्रमाणें आपला देश, आपला धर्म, आपला इतिहास, आपल्या जुन्या विद्या, आपलें कलाकौशल्य वगैरे गोष्टींविषयीं ज्या अनेक भ्रांतिमूलक व अहितकारक अशा कल्पना आपल्या लोकांत पसरल्या होत्या त्यांचें निरसन करण्याकरितां 'निबंधमाले'चा नूतन उदय झालेला पाहून तो मराठी रसज्ञ वाचकांस अत्यंत रमणीय व आल्हादकारक वाटला असेल यांत नवल नाहीं ! कृष्णशास्त्री यांनीं आपली लेखणी सुमारें पंचवीस वर्षे चालवून ती आपल्या चिरंजीवांच्या हातीं या सुमारास दिलेली पाहून वरील मंडळीस आनंद झाल्यावांचून राहिला नसेल. शिवाय कृष्णशास्त्री यांच्या लेखांत जे स्वतंत्र व निर्भीड विचार कधीं आले नव्हते ते चिरंजीवांच्या उदात्त लेखांत येऊं लागल्यामुळें लोकांचें मन मालेकडे विशेषेंकरून लागलें. यापूर्वी इंग्रजी राज्य, इंग्रजी विद्या, इंग्रजी कला, हरएक इंग्रजी गोष्ट यांच्या नवीन विद्वान लोकांच्या ग्रंथांतून, वर्तमानपत्रांतून, वक्त्यांच्या भाषणांतून जयघोषाचा नाद चोहोंकडे दुमदुमून राहिला होता; आणि उलटपक्षीं पेशवाईतील शहाणे लोक, भटपांड्ये यांचें कावेत्व, प्राचीन विद्या, प्राचीन कला, प्राचीन धर्म इत्यादि विषयांवरील शतपत्रें, घाशीराम कोतवाल, जोतीबांची गुलामगिरी, पुण्याचें वर्णन वगैरे पुस्तकांतून एकसारखी विटंबना व फजिती ही चालू होती. सरतेशेवटीं इतकी मजल येऊन पोंचली कीं, प्रत्यक्ष जगद्गुरूंस साक्षीकरितां कोर्टांत ओढून नेऊन हिंदुधर्माचा जुन्या समजुतीप्रमाणें अपमान केला असतांहि त्याबद्दल वर्तमानपत्रांतून जयजयकारच ! ! अशी नवीन पक्षाची त्यांत कोणी जज्ज, कोणी प्रोफेसर, कोणी वकील व पुष्कळ डिग्रीवाले हे असल्यामुळें त्यांची सरशी व जुन्या पक्षास कोणी वजनदार पाठबळ देणारा नसल्यामुळें त्यांचा पाडावा होऊन तो हतवीर्य होऊन राहिला असतां मालाकाराची प्रथम हळू परंतु स्पष्ट ऐकूं येणारी व जुन्या पक्षास उमेद आणणारी गर्जना एकाएकीं कानांवर पडल्यानें व शेवटीं मालाकाराच्या तीव्र आघातांनीं नवीन पक्षांतील प्रमुख प्रमुख वीर घायाळ होऊन त्या पक्षाचा पाडाव झालेला पाहून बहुतेक मराठी वाचकांस जो आश्चर्यानंद झाला असेल त्यावरून

आमच्या मर्मज्ञ इंग्रजी वाचकांस स्कॉटच्या आयव्हयानो कादंबरींतील राजपुत्र जॉन यानें आशबी येथें भरविलेल्या टूर्नमेंटच्या प्रसंगाची—कीं जेथें नार्मन वीरांची प्रथम उत्तम रीतीनें सरशी होऊन स्याक्सन पक्ष फजीत होऊन बसला असतां दुरून एका स्याक्सन वीराच्या तुतारीची गंभीर गर्जना ऐकून व पुढें लवकरच त्यानें घमेंडीस चढलेल्या नार्मन वीरांस समरांगणांत चीत केलेलें पाहून जुन्या स्याक्सन पक्षास जें आनंदाश्चर्य वाटलें—त्याची आठवण झाल्यावांचून रहाणार नाहीं !.......

...विष्णुशास्त्री त्यांनीं केवळ निरपेक्ष बुद्धीनें स्वतःचें कर्तव्य आहे असें समजून महाराष्ट्र भाषेची सेवा येवढ्या कळकळीनें, इतक्या अल्प काळांत व येवढ्या योग्य तेची केली यावरून त्यांनीं आपल्या कृतीविषयीं योग्य अभिमानानें जें म्हटलें आहे कीं—" गेल्या आठ वर्षांत सदरील पुस्तकाचा जो आम्हीं अव्याहत उद्योग केला त्याला आमच्याच देशांत काय, पण पाश्चात्य देशांतहि तोड सांपडणार नाहीं असें म्हटलें असतां गर्वोक्ति केल्याचा दोष माथीं येईल असें आम्हांस वाटत नाहीं. मासिक किंवा त्रैमासिक पुस्तकांची कोठेंहि स्थिति पाहिली तरी येवढा डोलारा कोणी एकट्यानेंच शिरीं बाळगला आहे असें आम्हांस तर अद्याप कोठें आढळलें नाहीं "—त्यास प्रत्येक निःपक्षपाती मनुष्यास मान डोलवावी लागेल ! सारांश, इंग्लिश भाषा चांगल्या स्थितीस येण्यास ज्याप्रमाणें आडिसन, जॉनसन वगैरे ग्रंथकार कारणीभूत झाले त्याचप्रमाणें आमच्या महाराष्ट्र भाषेच्या संबंधानें विष्णुशास्त्री झाले म्हणण्यास हरकत नाहीं. ते जर वरील ग्रंथकारांप्रमाणें दीर्घकाळ वांचते तर त्यांस अधिक पोक्त विचार येऊन त्यांच्या पूर्ववयामुळें त्यांच्या ग्रंथांत हल्लीं जे कांहीं प्रमाद घडले आहेत ते नाहींसे होऊन त्यांच्या हातून अनेक उपयुक्त ग्रंथ व स्वतंत्र उद्योग निघून त्यांपासून आपल्या देशाचें पुष्कळ हित झालें असतें असें कोणीहि मनुष्य कबूल करील !

—लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर

( कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे चरित्र १८९४ )

* * *



'मालाकार' विष्णु कृष्ण चिपळूणकर

जन्म : २० मे १८५० ] [ मृत्यु : १७ मार्च १८८२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २६५८७ वि: ....
क्रमांक ९२२६ नों: दि: २८/३/८०
९०६४६

# चिपळूणकर-दर्शन

## १. प्रवास

कोऽतिभारः समर्थानां किं दूरं व्यवसायिनाम् ।
को विदेशः सविद्यानां कः परः प्रियवादिनाम् ॥

सांप्रत या पृथ्वीवर मानवजातीस जें एवढें वैभव प्राप्त झालें आहे तें प्रवासाच्या योगानें झालें आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. जर प्रत्येक राष्ट्र आपआपली सीमा न उल्लंघितां आपल्याच ठायीं स्वस्थ बसतें, व दुसऱ्यास आपल्या मुलखांत येऊं न देतें, तर जगाच्या आद्यस्थितींत आणि सांप्रतच्या स्थितींत फारसा फेर पडताना. प्रायः सर्व राष्ट्रांची मूळची समजूत अशीच असे, कीं जें काय आपलें आहे तें आपणांसच असावें, त्यांत परका मनुष्य भागीदार नसावा. हाच हेतु मनांत धरून प्राचीन स्पार्टन लोकांचा लैकर्गस म्हणून राज्यव्यवस्थापक होऊन गेला त्यानें तद्देशीय लोकांस परस्थ लोकांशीं व्यापार करण्याची अगदीं बंदी करून टाकिली होती, व तोच प्रकार अजूनपर्यंतहि पुष्कळ अंशीं चीन, जपान वगैरे राज्यांत दृष्टीस पडतो. पण हें मनुष्यानें केलेले अटकाव कोठपर्यंत चालणार? अर्वाचीन तत्त्वज्ञानी लोकांनीं असा सिद्धान्त केला आहे कीं, जगाच्या राहाटीचा एकंदर रोख सुधारणुकीकडे आहे; त्या रोखाप्रमाणें, इतके दिवसपर्यंत सर्व राष्ट्रांत जे जे कोणी प्रतिबंध करून ठेविले ते ते एकामागून एकेक सर्व मोडत जाऊन, हल्लीं तर त्यांचा प्रायः लयच झाल्यासारखा झाला आहे. असा या प्रतिबंधांचा लय होण्यास अनेक गोष्टी कारणीभूत होतात. त्यांतील मुख्य अशा पाहूं गेलें असतां, जिज्ञासा व लोभ या दोन होत. सर्व लोक आपआपल्या मुलखांत ज्या ज्या गोष्टी पाहतात तेवढ्यांनीं त्यांची तृप्तता न होऊन इतर राष्ट्रांत काय चाललें आहे, तेथील लोक कसे काय आहेत वगैरे पाहण्याची साहजिक जिज्ञासा त्यांच्या मनांत उत्पन्न होते. मग ती जिज्ञासा तृप्त करण्याकरितां ते लोक परराष्ट्रांत

जातात हें एक झालें. दुसरें असें कीं, कोणी प्रतापशाली राजा आपल्या देशावर सार्वभौमत्व पावून इतर देशहि आपल्या सत्तेखालीं आणावे अशी महत्त्वाकांक्षा मनांत धरतो व इतर राष्ट्रांशीं बळेंच वैर साधून त्यांजवर स्वाऱ्या करतो. या दोहों कारणांच्या—विशेषतः दुसऱ्याच कारणाच्या योगानें जे देश एकमेकांपासून हजारों कोसांच्या अंतरावर असतात व ज्या देशांचें दळणवळण होण्याची कांहीं सालापूर्वीं कोणाच्या मनांत कल्पनाहि आली नसेल, त्यांचा परस्पर निकट संबंध होऊन राहिला आहे.

प्रवासास आवश्यक गोष्ट म्हटली म्हणजे धारिष्ट होय. ज्या लोकांस धारिष्ट नाहीं, ज्यांचे विचार आपलें कुटुंब व आपला देश यांहून पलीकडे कधीं धजावतच नाहींत, त्यांच्या मनांत इतर देशीं प्रवास करण्याची बुद्धि येईल कोठून ? जगाच्या इतिहासांत पाहिलें असतां असें आढळतें, कीं ज्या लोकांत धारिष्ट विशेष तेच संपत्तिमान व ज्ञानसंपन्न असे झाले. इसवी शकाच्या पूर्वीं सुमारें हजार वर्षांमागें एशियामैनर देशांत फिनिशियन म्हणून मोठे धारिष्टवान लोक होते; त्या लोकांनीं, त्या वेळेस जेवढा जगाचा भाग माहीत होता, तेवढ्याशीं व्यापार ठेविला होता. त्या वेळेस नाविक कला फार अपूर्ण दशेंत असतांहि, ते लोक, सर्व भूमध्यसमुद्र धुंडाळून, ज्या अटलांटिक महासागरास त्या वेळेस लोक पृथ्वीची सीमा समजून त्यांत फार लांबपर्यंत जाण्यास भीत असत, त्या महासागरांत देखील संचार करूं लागले. त्यांनीं ब्रिटिश बेटें – जीं त्या वेळच्या लोकांस फारशीं ठाऊक देखील नव्हतीं व आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरचीं बेटें, यांशीं बराच व्यापार चालविला होता. सारांश, ते लोक धारिष्टवान असल्यामुळें त्या वेळीं सर्व राष्ट्र धनाढ्य व विद्यासंपन्न म्हणून गाजत होतें. त्यांनींच कार्थेज, टायर इत्यादि नामांकित शहरें वसविलीं. त्यांच्या मागें कार्थेजच्या लोकांनींहि त्यांच्या धारिष्टाचा कित्ता बराच उचलला होता. पण पुढें ते लोक राज्याचे चुरशीस लागल्यामुळें त्यांचें पहिलें तेज कमी होऊन, शेवटीं त्यांचा अगदीं मोड झाला. त्याहि पुढें जीं ग्रीसचीं अनेक संस्थानें एकामागून एक अशीं वैभवास चढलीं व पुढें रोमन लोकांचें सर्व जगावर जें स्वामित्व झालें त्या सर्वांचें तरी बीज धारिष्ट होय. एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे—

अव्यवसायिनमलसं दैवपरं साहसाच्च परिहीनम् ।
प्रमदेव न वृद्धपतिं वांच्छत्युपगूहितुं लक्ष्मीः ॥

हें अगदीं यथार्थ आहे. साहस, उद्योग वगैरे गुणांचा जसजसा लोकांत ऱ्हास होऊं लागतो तसतशी त्या लोकांची बुडती कळा आलीशी समजावी. असो; हल्लींहि इंग्रज लोकांच्या उत्कर्षास हेंच साहस मुख्य कारण झालें आहे. सन १४९२ या वर्षीं कोलंबसानें मोठ्या अडचणी सोसून अमेरिका खंडाचा शोध लावला. तेव्हांपासून युरोपमध्यें साहसाचा आवेश सर्व लोकांचे मनांत भरला. पुढें लौकरच पोर्तुगीज लोकांनीं हिंदुस्थानाशीं व्यापार करण्यास व तेथील मुलूख काबीज करण्यास आरंभ केला. त्यांच्या मागोमागच डच, इंग्रज, फ्रेंच वगैरेहि लोक आले. पुढें दैववशात् इंग्रज लोकांसच फार आयास न पडतां येथचें सार्वभौमत्व प्राप्त झालें. याप्रमाणें युरोपांतील लोकांचा उत्कर्ष, त्यांचें प्रवास करण्याचें जें साहस, त्यामुळें झाला; व अजूनहि किती होईल हें सांगवत नाहीं. कां कीं, त्यांचे नवे नवे शोध प्रतिवर्षीं चाललेच आहेत. या वर्षीं कोणीं जहाजें घेऊन आर्टिक महासागरांत ध्रुवाजवळचे प्रदेश पहावयास गेला, पुढल्या वर्षीं कोणी मंगोपार्कासारखा धैर्यवान पुरुष निर्जन व भयाण अशा आफ्रिकेच्या मध्यभागच्या प्रदेशांत गेला, कोणी नवीं बेटें शोधून काढण्याकरितां अफाट अशा पासिफिक महासागरांत गेला, अशा गोष्टी दर वर्षास प्रत्यक्ष होत आहेत. तेव्हां अशा साहसी पुरुषांचें ठिकाण जें युरोपखंड तें हल्लीं संपत्तीचें व विद्येचें भांडार झालें आहे यांत नवल काय ?

वरील गोष्टी मोठमोठ्या राष्ट्रांची स्थिति एकंदरींत पाहतां झाल्या. पण नुसत्या मनुष्याविषयीं पाहिलें तरी प्रवासापासून केवढे नफे होतात ! सर्वांस अनुभवावरून हें तर ठाऊकच आहे कीं पुष्कळ फिरलेला मनुष्य प्रवासामुळें मोठा हुशार होतो. त्यानें अनेक प्रकारचे प्रसंग काढलेले असतात. व तशांत पुष्कळ गोष्टी ऐकिलेल्याहि असतात, यामुळें तो मनुष्य हरएक कामांत वाकबगार होतो. हे तर केवळ व्यावहारिक नफे झाले, पण जो तत्त्ववेत्ता आहे, किंवा तशा प्रकारची केवळ स्फूर्ति म्हणून ज्याला आहे, सहृदय कवि—कीं ज्यास सर्व सृष्टि चमत्कारमय व आनंदमय भासते,—त्यांस तर देशाटनापासून मोठे अमूल्य लाभ आहेत. प्राचीन ग्रीक लोकांतील पुष्कळ मोठमोठ्या विद्वानांनीं

पुष्कळ देश हिंडले होते. त्यांचा पहिला जो इतिहासकार हिराडोटस तो एशियामैनर, मिसरदेश वगैरे मोठमोठे देश हिंडला होता; व त्या योगानें त्यानें जें ज्ञान संपादलें त्याच्यामुळें तो येवढा विख्यात ग्रंथकार झाला. त्याप्रमाणेंच सोलन, लैकर्गस म्हणून जे राज्यव्यवस्थापक झाले त्यांनीं देखील आपलें ज्ञानाचें कोठार प्रवासांतच सांठविलें. लैकर्गस तर हिंदुस्थानापर्यंत देखील आला होता, असें कितीएक इतिहासकार म्हणतात. त्याप्रमाणेंच आमच्या हिंदु लोकांतहि जे मोठमोठे विद्वान होऊन गेले तेहि फार प्रवास केलेले असावे यांत संशय नाहीं. सर्व कवींचा मुकुटमणि जो कालिदास तोहि मोठा प्रवासी होता असें म्हणतात; व या गोष्टीस हें एक मोठें प्रमाण आहे कीं ज्या वेळीं आतांप्रमाणें नकाशे वगैरे साधनें नव्हतीं, त्या वेळेस त्यानें आपल्या मेघदूत नामक अति सुंदर काव्यांत मेघास जो मार्ग रामगिरी पासून तों थेट अलकापुरी म्हणजे हिमालयपर्वताचें कैलास शिखर तेथपर्यंत सांगितला आहे. तो अगदीं बेचूक आहे. शिवाय या काव्यामधील पर्वतांचें, नद्यांचें वगैरे जें सर्व वर्णन दिलें आहे, तें तरी तीं स्थलें कवीनें स्वतः पाहिल्यावांचून इतकें उत्कृष्ट लिहिलें असेल, हें म्हणणें नीट दिसत नाहीं. अर्वाचीन काळांत जर्मनी देशांत एक हंबोल्ट म्हणून महापंडित होऊन गेला, हा तर पृथ्वींतील चारी खंडें हिंडला, व ज्या हिमालयपर्वताच्या शिखरांची आम्हांस येथल्या येथें देखील पुरती माहिती नाहीं, त्यावर स्वतः जाऊन त्यानें तेथील सृष्टिचमत्कार आपल्या " कासमस " नांवाच्या प्रख्यात ग्रंथांत लिहून ठेवले आहेत. यावरून त्या पंडिताची जिज्ञासा व प्रवासाविषयींचें साहस हीं स्पष्ट दिसून येतात.

हे गुण प्राचीन हिंदु लोकांत मुळींच नव्हते असें जरी म्हणतां येत नाहीं, तरी कालांतरीं त्यांचा लोप झाला हें स्पष्ट आहे. भर्तृहरीनें आपल्या एका शतकांत म्हटलें आहे कीं, " किं सुखमप्रवासगमनं " सुख काय ?– तर प्रवासास न जाणें; आणि हाच अर्वाचीन हिंदु लोकांच्या एकंदर मनाचा रोख दिसतो. यापासून देशाचें किती अहित झालें आहे हें सर्वांस माहीतच आहे. त्यावर विस्तार करावा असें नाहीं. हल्लीं तर प्रवासाचे श्रम म्हटलें म्हणजे नाहींसेच झाल्यासारखे झाले आहेत. तरी प्रवासापासून मनावर होणारे जे सद्विकार ते तरी निदान होण्यास कांहीं प्रतिबंध नाहीं. सध्यां

हिंदुस्थानभर व सर्व पृथ्वीवर हवें तिकडे जाण्यास लोखंडी सडका व आगगाड्या झाल्या आहेत. तर अशी प्रवास करण्याची अत्युत्कृष्ट संधि तरी न गमावतां जे आमचे लोक यापासून आपला नफा करून घेऊं पाहतील त्यांस तो पुष्कळ होण्यासारखा आहे.

• • •

# २. कविता

वदंतु कतिचिद्धठात्खफछठेति वर्णच्छटान्
घटः पट इतीतरे पटु रटंतु वाक्पाटवान् ।
वयं बकुलमंजरीगलदलीनमाध्वीझरी–
धुरीणगणरीतिभिर्भणातिभिः प्रमोदामहे ॥

कवि म्हणतो, " जे कोणी खफछठ इत्यादि सूत्रपाठांची उरस्फोड करून घोष घेणार असतील ते घेवोत; व तसेंच घटः पटः इत्यादि वाक्यांत निपुण होऊन ज्यांस आपलें पांडित्य मिरवायचें असेल, ते तसेंहि करोत; पण आम्ही तर बकुल पुष्पांपासून गळणाऱ्या दाट मधुधारेप्रमाणें ज्यांची रसभरित रचना आहे अशा कवितांचें सेवन करून आनंद पावतों. " हा कवीचा अभिप्राय जरी अंमल एकपक्षी आहे तरी त्यांत तथ्य पुष्कळ आहे; कारण कवितेचा रसानुभव जसा सर्वांनीं सहज घेण्याजोगा असतो तसा, व्याकरण, न्याय इत्यादि शास्त्रांचा नसतो. एक तर कविता प्रायः छंदोबद्ध असते; त्यामुळें वाचणाराचें किंवा ऐकणाराचें मन तत्क्षणीं मोहून जाऊन तल्लीन होतें. हा गुण कवितेंत इतका असतो कीं, तिजपासून मनोरंजन होण्यास अर्थ समजण्याची देखील कधीं कधीं गरज लागत नाहीं; केवळ वर्णरचनाच कानास गोड लागून मनास आल्हादप्रद होते. शिवाय, कवितेचा विषयहि मनांत भरण्यासारखा व अगदीं सुबोध असतो; कारण संसारांत प्रत्यक्ष अनुभविलेल्या गोष्टी व त्यांचे मनावर कसकसे व्यापार

घडतात. हाच तो विषय बहुधा असतो. परंतु शास्त्राची गोष्ट तशी मुळींच नसते. तें नेहेमीं गद्यरूपानेंच लिहिलें असतें व त्यांतील विषय तर अत्यंत दुर्बोध असतो. तो असा कीं, तो समजून घेण्यास देखील शिक्षकाची गरज लागते. मग त्यांत सर्वत्र गति होऊन त्याचा रसानुभव घेणें या गोष्टी तर दूरच राहिल्या. त्या सिद्ध होण्यास फार काळ लागतो व बुद्धीहि सूक्ष्म असावी लागते. शास्त्रीय विषय यथास्थित समजण्यास व त्यांची गोडी लावण्यास बुद्धि म्हणजे सत्यासत्यविवेचक शक्ति हीच मुख्यतः लागते. पण ही मनुष्यांत फार विरळा असते. व त्यामुळें तसले विषय सामान्य मनुष्यांस गहन वाटून त्यांपासून त्यांचें मन फिरतें. परंतु कविता समजयास मुख्यतः कल्पकपणाच काय तो लागतो. आतां हाहि गुण सर्वांत जरी पूर्णपणें नसतो तरी कांहींना कांहीं तरी असतोच व अल्पवयांत तर तो सर्वांस असतो. तेव्हां अर्थातच कवितेची गोडी सर्वांस असते, व विशेषतः तरुण वयांत पुष्कळांस तिचाच छंद असतो. आतां हें खरें आहे कीं, वर जी व्याकरण व न्याय या शास्त्रांविषयीं गोष्ट सांगितली ती सर्व शास्त्रांस सारखी लागू पडत नाहीं. उदाहरणार्थ, ज्योतिष घ्या : यांत जरी गणित करावें लागतें, वेध घ्यावे लागतात व तशाच दुसऱ्या पुष्कळ गोष्टी समजण्यास जरी कठीण असतात, तरी त्यांत मौज वाटण्यासारखें पुष्कळ आहे. ग्रहमालेची चत्कारिक रचना, ग्रहांची मनास थक्क करणारी गति, त्यांचीं परस्परांपासून विलक्षण अंतरें व पृथ्वीवर घडणाऱ्या अनेक अपूर्व चमत्कारांचें यथास्थित ज्ञान, इत्यादि गोष्टी अत्यंत मनोवेधक असल्यामुळें त्या शास्त्राचा अभ्यास करण्यास सर्वांस मोठी उमेद येते व हौस वाटते. तसेंच गायनशास्त्र, रसायनशास्त्र इत्यादिकांचें आहे. त्याचें तरी कारण हेंच कीं त्यांत बुद्धीचें काम तर आहेच. पण मनास चमत्कार वाटण्यासारख्या गोष्टीहि आहेत. मग कवितेची तर गोष्ट काय सांगावी ! ती आधींच रसमय. रस म्हणजे तिचें केवळ तत्त्वच याशिवाय अनेक तऱ्हेच्या अलंकारांचें व मुख्यतः स्वरसंयोगाचेंहि तिला साहित्य असतें. तेव्हां वरील श्लोकांत कवीनें तिचें जें वर्चस्व वर्णिलें आहे तें यथार्थ नाहीं असें कोण म्हणेल ?

कोणत्याहि राष्ट्रांत पाहूं गेलें असतां असें आढळतें कीं, तें राष्ट्र सज्ञान दशेस येऊं लागलें म्हणजे त्याचे विचार कवितारूपानें पहिल्यानें बाहेर

निघूं लागतात. ती कविता पहिल्यानें लावण्यासारख्या वृत्तांत असते. कारण तशा काळच्या उद्दाम कवितोद्गारांस तशींच वृत्तें अत्यंत अनुकूल असतात. त्यांत बहुतकरून वीरांचीं अद्भुत कृत्यें, व त्यांचीं चारित्रें हींच वर्णिलेलीं असतात. ग्रीक लोकांचा जो जुनाट व अतिप्रसिद्ध होमर कवि त्याचें काव्य सर्व वीररसमय आहे. त्याप्रमाणेंच इंग्लंड व स्कॉटलंड या देशांतहि अगदीं मूळची कविता म्हटली म्हणजे अशाच प्रकारची आहे. तीस ते 'ब्यालडस' म्हणतात. आपल्या देशांत तरी पेशव्यांच्या कारकीर्दींत होऊन गेलेल्या विख्यांत पुरुषांवर केलेल्या ज्या लावण्या किंवा पवाडे आपण ऐकतों तेंच वास्तविक पाहतां मराठी भाषेची आद्यकविता होत. कारण वामन पंडित, मोरोपंत वगैरे कवींनीं जरी मराठी भाषेंत आपली कविता लिहिली, तरी ती संस्कृत भाषेच्याच केवळ धाटणीवर असल्यामुळें तीस मराठी कविता म्हणण्यापेक्षां संस्कृत कवितेचें रूपांतर म्हणणें हें वाजवी आहे. असो; याप्रमाणें कवितेचें आद्यस्वरूप उद्दाम असतें. पुढें हळूहळू येणारे जे मार्दवादि गुण ते तिचे ठायीं पहिल्यानें नसतात हें खरें; पण त्या वेळेस तिचें वास्तविक स्वरूप जसें उदयास आलें असतें तसें पुढें कधींहि दृष्टीस पडत नाहीं. याचीं कारणें अनेक आहेत; पण त्यांतील मुख्य हें कीं, सृष्टींतील सुंदर किंवा भव्य पदार्थांचा व संसारांतील नाना प्रकारच्या प्रसंगीं हृदयास जे विकार होतात, त्यांचा आधींच्या कवींवर जितका ठसा उठलेला असतो तितका पुढच्या कवींवर नसतो, व त्यामुळें पहिल्यास त्या त्या गोष्टींचें जसें हुबेहूब वर्णन करतां येतें तसें पुढल्यास येत नाहीं, व याप्रमाणेंच पाहतां असें प्रत्ययास येतें, कीं सर्व राष्ट्रांतील अगदीं जुनाट कवीच सर्वोत्कृष्ट असतात. पुढल्या कवींच्या कवितेंत इतर अनेक गुण असतात खरे; पण पहिल्यांनीं मनोविकारांचें उद्भावन वगैरे जसें अगदीं सहज रीत्या केलें असतें तसें पुढल्यास कोणत्याहि प्रकारें करूं जातां साधत नाहीं. भर्तृहरीनें अशा जगद्वंद्य कवींचें फार सुंदर वर्णन केलें आहे. तो म्हणतो—

जयंति ते सुकृतिनो रससिद्धाः कवीश्वराः !
नास्ति येषां यशःकाये जरामरणजं भयम् ॥

" रसिकतेचें केवळ आगरच किंवा जन्मतःच ज्यांच्या पुढें रसिकता केवळ हात जोडून उभीच राहिली अशा कवीश्वरांचें भाग्य काय वर्णावें ?

कां कीं, ज्यांस जरेची किंवा मरणाची वार्ता देखील पोंचायाची नाहीं अशा कीर्तिरूप देहांचें धारण करून ते या पृथ्वीवर अक्षयी राहणारे आहेत. ” हें सर्व वर्णन पहिल्या कवींचें झालें. आतां त्यापुढें जे कवि होऊं लागतात त्यांची स्थिति पहिल्यापेक्षां बरीच निराळी होते. ती अशी कीं, एक तर त्यांत निराळे विषय पुनः वर्णिल्यास वाचणाऱ्यांच्या किंवा ऐकणारांच्या मनास कंटाळा येऊं लागतो. दुसरें असें असतें कीं, पहिल्या कवींस त्यांच्या बुद्धीशिवाय दुसरें कांहींच साधन नसल्यामुळें त्यांचे सर्व विचार केवळ मनः-प्रेरितच असतात. तसें या दुसऱ्यांचें असत नाहीं. त्यांस पहिल्यांनीं केलेल्या काव्यांचा आधार असतो. म्हणून त्यांच्या ग्रंथांत कांहीं प्रत्यक्ष अनुभविलेल्या गोष्टी व कांहीं पहिलीं काव्यें वाचून केवळ मनानेंच अनुभविलेल्या अशांचें वर्णन असतें. यास्तव मागून झालेल्या कवींचीं काव्यें पहिल्यांच्या काव्यांपेक्षां स्वाभाविक रसांत कमी उतरलेलीं असतात; परंतु ही न्यूनता पुढील कवि वर्णमार्दव, अर्थस्वारस्य, यमकें, प्रास इत्यादिकांची योजना करून झांकूं लागतात. आतां वर सांगितलेल्या चित्रविचित्र लेण्यांनीं कविता जास्त खुलते खरी; पण तिला अंगचें सौंदर्य असलें तर यांची काय ती मौज; नाहीं तर कुरूप स्त्रीवर जडावाचे दागिने घातले असतां जसें केवळ हास्यास्पद होतें त्याप्रमाणें वाईट कवितेची दशा होते. पण कवितेची पहावें तों पुढें पुढें अशीच दशा होत जाते. आणि तिचें मूळचें स्वाभाविक सौंदर्य अगदीं नाहींसें होऊन केवळ बाह्यभूषणांचा थाटमाट व लकलकाट म्हणजेच खरी कविता अशी लोकांची समजूत होऊन जाते. चित्रकलेचें मार्मिक ज्ञान ज्यांस नसतें ते ज्याप्रमाणें त्या कामांतील बारीक खुब्या न जाणतां केवळ रंगाच्याच रेलचेलीवर तसबिरांचा उत्कृष्टपणा लेखितात, त्याचप्रमाणें सहृदय रसिकजन कवितेची पारख करण्यास नसले म्हणजे तर वर सांगितलेल्या मार्दवादि गुणांवरच कवितेस मान मिळूं लागतो. ही अशी स्थिति ज्या काळीं लोकांत दिसूं लागते त्यावेळेस खऱ्या कवितेचा ऱ्हास होऊन ती अगदीं निकृष्ट दशेस येऊन पोंचली असें समजावें.

यावरून पाहतां कवितेच्या तीन स्थिति होतात. पहिली तिची जी अत्युत्तम अवस्था तींत केवळ अंतःकरणाचे स्वाभाविक उद्गार तेच असून शब्दांचे वगैरे बाह्यालंकार मुळींच नसतात, तरी तिचें साधें शुद्ध स्वरूप

त्यावेळेस फारच रमणीय दिसतें. जेव्हां अंतःकरणस्फूर्ति असून कवितेस बाह्यालंकाराचेंहि साहित्य असतें तेव्हां ती तिची दुसरी अवस्था समजावी. परंतु जेव्हां हृदयद्रावक गुण कांहींच नसून केवळ अलंकारादिकांचा मात्र भरणा कवितेंत केला असतो तेव्हां ती तिची तिसरी अवस्था होय. या तिसऱ्या प्रकारच्या कवींस वास्तविक पाहतां कवि ही संज्ञा मुळींच शोभत नाहीं. कारण आवेशरूप वगैरे जे गुण कवीस अवश्य असावे ते यांत मुळींच दृष्टीस पडत नाहींत. या कवींचे विचार सर्व जुन्या कवींचीं काव्यें वाचून त्यांपासून घेतलेले असतात. त्यांत त्यांचें स्वतःचें कांहीं असलेंच तर फारच थोडें असतें. कधीं कधीं तर जुन्या कवींचे प्रौढ विचार त्यास चांगले न समजून त्यांचें अनुकरण करतांना किंवा जसेचें तसेंच चोरतांना ते त्यांचा मूळचा रस घालवून त्यांची माती मात्र करून टाकतात. आपल्या काव्यांत ते ज्या गोष्टी वर्णितात त्यांतून त्यांनीं प्रत्यक्ष अनुभविलेल्या अशा थोड्याच असतात. बाकीच्या सर्व केवळ मनानें कल्पूनच लिहिलेल्या असतात. यास्तव त्यांचें वर्णन जसें हुबेहूब असावें तसें मुळींच नसून अगदीं सरासरी, किंवा कधीं कधीं अगदीं अप्रयोजक देखील असतें. शिवाय अशीं वाईट काव्यें चोहोंकडे फार झालीं म्हणजे त्यापासून भाषेची मोठी हानि देखील होते. ज्याप्रमाणें सोन्या–रुप्यासारखे खोटे हुबेहूब दागिने फार झाले असतां सामान्य मनुष्यास दोहोंमध्यें निवड करण्याची मोठी पंचाईत पडते व नुसत्या झिलाईनें देखील पुष्कळ फसून जातात, त्याप्रमाणें काव्याचें खरे गुण नसतांहि नुसत्या शब्दांच्या चमत्कारिक रचनेवरूनच कित्येक ग्रंथ काव्यांत गणले जातात व त्यामुळें शब्दांची अर्थबोध करण्याची शक्ति व मूळचें स्वारस्य हीं दोन्ही कमी होतात. तेच तेच अलंकार व तीच तीच शब्दरचना वारंवार आल्यानें त्यांची मूळची गोडी नाहींशी होऊन दोन्ही शेवटीं अगदीं निरर्थक देखील होतात. असो. याप्रमाणें अशा कवींच्या पायीं भाषेची दुर्दशा होतें खरी; पण अशांचें माहात्म्य फार दिवस टिकत नाहीं, ही अंमळ समाधानाची गोष्ट होय. लोक तरी अशा प्रकारच्या निरर्थक काव्यांनीं फार वेळ फसत नाहींत. कांहीं काळानें त्यांचा वीट येऊन त्यांस तें अप्रयोजक मानूं लागतात. व जगन्मान्य जे जुने कवि त्यांची पुनः चाहा होऊं लागते.

• • •

# ३. समुद्र

हे सागरा! तुझ्या अफाट विस्ताराकडे पाहून जों जों विचार करूं लागावें तों तों नव्या नव्याच कल्पना मनांत येऊं लागून बुद्धीस अधिकाधिक चमत्कार भासतात, आणि आश्चर्यभरांत चित्त अगदीं थक्क होऊन जातें! ज्याप्रमाणें मनुष्यांच्या पिढ्यान् पिढ्या एकामागून एक जन्मास येऊन कांहीं काळानें लागलींच विलयास जातात, त्याप्रमाणें तुजवर हजारों लाटा एकावर एक येऊन भराभर बुजून नाहींशा होतात, आणि त्यांच्याप्रमाणेंच यांच्या वास्तव्याची मागें खूण देखील रहात नाहीं! तुझ्या लाटा साऱ्या पृथ्वीच्या किनाऱ्यांवर आदळत आहेत, आणि ज्यांचें निकट सान्निध्य त्यांच्या अक्षय वैरास मात्र कारणभूत होतें, अशा देशांची तोडातोड करून तूं त्यांचें कलाकौशल्य व संपत्ति हीं परस्परांस देववितोस, व येणेंकरून सर्व जगास तुझ्यामुळें सुखाचा व समृद्धीचा लाभ होत आहे.

तुझे देखावे तरी निरनिराळ्या समयीं किती विचित्र असतात! त्यांची शोभा व भव्यपणा हीं कोठवर वर्णावीं? – कधीं वाऱ्याची हालचाल अगदीं बंद होऊन तुझा सर्व विस्तार अगदीं निश्चल दिसतो – कधीं नुकताच सूर्योदय झाला असल्यामुळें क्षितिजाची कड रुप्यानें जणों काय मढविलीच आहे अशी भासते – कधीं तोच सूर्य अस्तास जाऊं लागून संध्याकाळचें आकाश त्याच्या सोनेरी किरणांनीं देदीप्यमान झालें असतें, व अशा वेळेस आरशाप्रमाणें स्थिर अशा तुझ्या पाण्यावर जेव्हां आकाशाची कमानची कमान शाबूत उठलेली असते तेव्हां ती तर काय शोभा सांगावी! – पण हीं सर्व सौम्य रूपें टाकून जेव्हां तूं आपलें उग्र स्वरूप धारण करतोस – जेव्हां काळ्या दाट ढगांनीं आकाशांत गाढ अंधार होऊन तुफानाच्या वाऱ्याच्या सोसाट्यांनीं तूं अगदीं खवळून जातोस, व तुझ्या प्रचंड लाटा उसळून मेघमंडळाशीं एकवट होऊं पाहतात – जेव्हां मृत्यु आपलें भयंकर आधिपत्य तुजवर चोहोंकडे चालवीत असतो – जेव्हां अशा तडाक्यांत सांपडलेला बिचारा खलाशी भयानें गर्भगळित होऊन त्याचे सर्व प्रयत्न निष्फळ होतात, व त्याचे इष्टमित्र त्याजकरितां जागच्या जागीं हळहळत असतात, – अशा भयंकर प्रसंगीं तुजकडे पाहण्याची कोणाची छाती आहे!

क्रमांक 7225 वि: निबंध नों दि:

हे रत्नाकरा ! इतकें झालें तरी हे सर्व खेळ केवळ तुझ्या पृष्ठभागावरचे — तुझें आंत जें विस्तीर्ण राज्य आहे त्यांत तर काय काय चमत्कार असतील याची कल्पना तरी कोणी करावी ! तेथें जे मोठमोठाले खडपे व विशाल दऱ्या असतील, त्यांत जे नाना प्रकारचे हजारों प्राणी व वनस्पती असतील त्या पाहिलेला कोण मनुष्य आहे ? व तसेंच रत्नें वगैरे ज्या कोट्यवधि सुंदर वस्तु तुझ्या तळीं लोळत असतील त्यांचा तरी कोणास पत्ता लागेल काय ?

याप्रमाणें विचार पुढें चालविले असतां बुद्धि अगदीं कुंठित होऊन जाते. पण जेव्हां तुझ्या भरती — ओहोटीविषयीं विचार करावा — कीं ज्या जगाच्या आरंभापासून आजपर्यंत कधींहि टळल्या नाहींत — तेव्हां, ज्यानें आपल्या अपार सामर्थ्यानें तुला निर्माण केलें, व तुझ्या मर्यादा अशा रेखून टाकल्या, कीं तूं येवढा उत्संखळ खरा; परंतु त्यांचें उल्लंघन तुझ्यानें होऊंच नये, त्याच्या अगाध महिम्याकडे लक्ष लागून विचारशक्ति गुंग होऊन जाते, व तिची गतीच पुढें होत नाहीं ! !

• • •

# ४. कालिदासाच्या कांहीं कृतींचें रसग्रहण

निर्गतासु न वा कस्य कालिदासस्य सूक्तिषु ।
प्रीतिर्मधुरसांद्रासु मंजरीष्विव जायते ॥ [१]

हर्षचरित—बाणभट्ट.

कालिदासाचा पहिला ग्रंथ म्हणजे ‘ ऋतुसंहार ’ होय. यांत षड्ऋतूंचें वर्णन आहे. निरनिराळ्या ऋतूंत सृष्टीचीं निरनिराळीं रूपें जीं दृष्टिगोचर होतात त्यांचें यांत संस्कृत कवींच्या रीतीनें कवीनें वर्णन केलें आहे. या काव्यांतील गुण विशेषेंकरून म्हटलें म्हणजे मधुर व कोमल पदरचना, व

१. “ कालिदासाचीं उत्तम वचनें निघालीं असतां, मधानें थबथबलेल्या नूतन मंजरी पाहून जसा आनंद होतो तसा कोणास होत नाहीं ? ”

कविसंप्रदायानुरूप सरस अर्थांचें निबंधन येवढेंच होत. यावरून पाहतां असें वाटतें कीं, आमच्या कवीनें स्वाभाविक शालीनतेस अनुसरून हा सोपासा विषय पहिल्यानें हातीं घेतला असावा, व ज्या वाग्देवीच्या सर्वस्वाचें व पूर्ण कृपेचें तो पुढें पात्र झाला तिला वरील लहानशा काव्याच्या रूपानें त्यानें प्रथम नमन केलें असावें. अलीकडील इंग्रजी कवितेच्या अध्ययनानें सृष्टि-वर्णनाच्या नव्या प्रकारांशीं जे परिचित झाले असतील त्यांस प्रस्तुत काव्यांतील वर्णन फारसें पसंत पडावयाचें नाहीं. यांत वैचित्र्य विशेष नसून सृष्टीचें पूर्ण व सूक्ष्म अवलोकन नाहीं असें दूषण ते त्यावर ठेवतील. आणि या दूषणाचें निरसन करण्यास मार्गहि नाहीं खराच. प्रकृत काव्याच्या तर्फेनें येवढें मात्र म्हणतां येईल कीं, तें केवळ त्यासच लागतें असें नाहीं. संस्कृत कवितेंतील सृष्टिवर्णनाचा प्रकार सामान्यतः पाहतां चोहोंकडे असाच आढळतो. याच कवीच्या ‘ रघुवंशा ’त वसंत व ग्रीष्म ऋतूंचें वर्णन आहे, ‘ कुमारसंभवा ’त पुनः वसंताचेंच वर्णन आहे. व तसेंच ‘ मृच्छकटिक ’ नाटकांत वर्षाकाळाचें, ‘ कादंबरींत ’त वसंत व वर्षाकाळ यांचें ‘ किराता-र्जुनीया ’त शरदृऋतूचें आणि ‘ शृंगारशतका ’त पांचहि ऋतूंचें, इत्यादि निरनिराळ्या स्थळीं संस्कृत कवींचीं ऋतुवर्णनें आहेत. परंतु येथून तेथून एकच प्रकार दृष्टीस पडतो. वसंत वर्णनांत कोकिलाचे शब्द व आंब्याचा मोहोर, ग्रीष्म वर्णनांत चांदणें व शीतल उपचार, वर्षा वर्णनांत मयूर व चातक, शरद्वर्णनांत हंस व स्वच्छ चंद्रिका, आणि हेमंत व शिशिर यांत थंडी व वाऱ्याचे सोसाटे इत्यादि अति प्रसिद्ध गोष्टींखेरीज कोठेंहि निराळें वर्णन केलेलें आढळत नाहीं. इंग्लिश कवितेंत ज्याप्रमाणें उंच उंच पर्वतांचें, त्यावरून चोहोंकडे दिसणाऱ्या भव्य व रम्य देखाव्यांचें, तुफानांत खवळ-लेल्या समुद्राचें, वगैरे वर्णन असतें, तसें संस्कृतांत फारसें आढळत नाहीं. फार काय पण समुद्रावरच्या वादळास संस्कृतांत शब्द तरी असेल कीं नाहीं याची शंकाच वाटते. ‘ वात्या ’, ‘ वातचक्र ’ वगैरे शब्द आहेत, पण ते जमिनीवरील वावटळासच लागतात. असो; इंग्लिश व संस्कृत कवितांची तुलना करूं गेलें असतां दोहोंमध्यें असे पुष्कळ विशेष सांपडतील; पण त्यांत हा फरक फार ठळक असून भाषाभिज्ञांनीं चांगला विचार करण्याजोगा आहे. सृष्टीचे चमत्कार व भव्य देखावे पाहून सामान्य विचारी मनुष्याचें

मन देखील रंगून जाऊन थक्क होतें; मग ' मेघालोके भवति सुखिनोऽप्यन्यथा-वृत्ति चेत: '[1] असे प्रत्यक्ष अनुभव ज्यांस आले आहेत अशा कवीश्वरांचें मन तर त्यांस पाहून किती तल्लीन व्हावें! पण तसा प्रकार त्यांच्या वर्णनांत पाहूं जावें तों विशेषत: दृष्टीस येत नाहीं.

' कुमारसंभव ' हें महाकाव्य कालिदासानें मध्यमवयीं लिहिलें असावें असें वाटतें. याची कथा शैवपुराणांतून घेतली आहे. आरंभीं हिमालय, जो पार्वतीचा पिता, त्याचें वर्णन असून पहिल्या सर्गांत पार्वतीचा जन्म व तिची मुग्धावस्था हीं वर्णिलीं आहेत. दुसऱ्यांत त्रिजगत्पीडक जो तारकासूर त्यानें गांजलेले इंद्रादि देव ब्रह्मदेवास शरण गेले आहेत. ब्रह्मदेवानें मदनास वश करून घे अशी युक्ति इंद्रास सांगितली आहे. तिसऱ्यांत मदन येऊन त्यानें इंद्रानें सांगितलेलें जें शिवप्रेरणेचें काम तें पत्करून आपला सहाय्य जो वसंत त्यास प्रगट होण्यास सांगितलें. मग पार्वती शिवदर्शनास आली असतां तिजविषयीं मदनानें शिवाच्या हृदयांत क्षणभर कामबुद्धि उत्पन्न केली; पण ती लागलीच आवरून शिवानें चोहोंकडे क्रोधाग्नीची दृष्टि फेकली. ती मदनावर पडतांच त्याची तत्क्षणीं राख झाली. चवथ्यांत मदन—स्त्री जी रति तिचा शोक वर्णिला आहे. शोकानें संतप्त होऊन तिनें वसंतास चिता रचावयास सांगितलें; पण इतक्यांत आकाशवाणीनें तिला पतिप्राप्तिविषयीं आश्वासन दिल्यावरून तो बेत तिनें सोडला. पांचव्यांत पार्वतीचें तप वर्णिलें आहे. शिव एकाएकीं अंतर्धान पावून तिचा जो अपमान झाला त्याबद्दल फार कष्टी होऊन तिनें हिमालयावर उग्र तपश्चर्या करण्याचा निश्चय केला. मग पुष्कळ काळ लोटल्यावर एके दिवशीं एक मुनि तिच्या आश्रमांत आला. त्याचें तिनें आगत स्वागत केल्यावर त्यानें तिला अशा थोर तपश्चर्येचें कारण काय म्हणून विचारलें. मग सखीच्या मुखानें त्या मुनीस सर्व वृत्तान्त सांगितल्यावर त्यानें मोठा विस्मय झालासा दाखविला, आणि अमंगलरूप जो शिव त्यावर तुझें इतकें प्रेम असावें हे फार अयोग्य असें सांगून त्याची निंदा करूं लागला. तें सर्व ऐकून पार्वती फार संतापली, आणि शिवाचा अगाध महिमा तुजसारख्या कुटाळास कोठून समजावा, वगैरे भाषणांनीं तिनें त्याची निर्भर्त्सना केली.

१. ' सुखिताचेही व्याकुल होतें मन पाहुनि मेघास ' —' पद्यरत्नावलि '

आणि तो पुनः तेंच बोलणार इतक्यांत ' या बटूस येथून घालवून दे ' म्हणून तिनें आपल्या सखीस सांगितलें; आणि आपण रागानें तेथून चालती झाली. इतक्यांत त्या मुनीनें आपलें खरें शिवरूप प्रगट करून तिचें निवारण केलें; व आजपासून मी तुझा दास झालों असें बोलून तिला आपल्या तपाची कृतार्थता वाटाविली. सहाव्यांत शिवांनीं सप्तर्षींचें स्मरण करतांच ते आले आहेत. मग हिमालयापाशीं जाऊन पार्वतीविषयीं मागणी घालावी अशी आज्ञा होतांच ते तिकडे गेले, आणि विवाहनिश्चय केला. शेवटल्या म्हणजे सातव्यांत त्या संस्काराचे सर्व सोहळे वर्णिले आहेत. शिव-पार्वती हीं कालिदासाचीं उपास्यदैवतें होतीं. असें त्याच्या बहुतेक ग्रंथांवरून व त्याच्या नांवावरूनहि दिसून येतें. तिन्हीं नाटकांच्या आरंभींच्या नांद्या शिव-नमस्कृतीपर आहेत. 'रघुवंशां'त आरंभीं व कोठें कोठें मधेंहि शिवास उद्देशून श्लोक आहेत, आणि ' मेघदूतां 'त तर तसे पुष्कळच आहेत. प्रस्तुत काव्यांत त्यांच्या विवाहापर्यंत सर्व गोष्टी वर्णिल्या आहेत; व ' कुमारसंभव ' म्हणजे ' कार्तिकेयाचा जन्म या नांवावरून पाहतां येथेंच काव्याचें पर्यवसान परंतु अलीकडे आणखी पुढील दहा सर्गांचा शोध लागला आहे; व त्यामुळें तेहि कालिदासानेंच केले कीं नाहीं असा नवाच वाद उत्पन्न झाला आहे. बहुतेकांचा रोख हे कालिदासकृत नव्हते असेंच मानण्याकडे दिसतो. ते म्हणतात कीं, जर कालिदासानेंच हे रचिले असते तर तो या काव्यास 'तारकावधम्' किंवा असेंच कांहीं दुसरें नांव देता; 'कुमारसंभव' असें देता ना. शिवाय कालिदासाचा प्रख्यात टीकाकार जो मल्लिनाथ त्याची टीकाहि सात सर्गांपर्यंतच सांपडते. पुढें मुळींच सापडत नाहीं; यावरून असें दिसतें कीं, हे त्याच्या वेळेस अगदीं अप्रसिद्ध होते, किंवा प्रसिद्ध असून त्यांस कालिदासकृत मानीत नसत. परंतु दुसऱ्या कोणाचें असेंहि मत आहे कीं हे साक्षात् कालिदासाचे तर नव्हेत, पण त्याच्या एखाद्या शिष्याचे वगैरे असतील. म्हणजे ज्याप्रमाणें ' कादंबरी ग्रंथाचा उत्तर भाग बाणभट्ट कवीच्या पुत्रानें रचिला तसें कांहीं याहि काव्याच्या संबंधें कदाचित् झालें असेल. ही दुसरी कल्पना करण्यास तरी आधार असा आहे कीं, या पुढील सर्गांचा पहिल्या सातांशीं अगदीं विजोडच होतो असें भासत नाहीं. पुष्कळ शब्द, शब्दसमूह व लिहिण्याची एकंदर घाटणी दोहोंतली सारखीच

दृष्टीस पडते. तरी प्रौढता, अर्थचमत्कार वगैरे गुण पहिल्याप्रमाणें पुढल्यांत उतरलेले दिसत नाहींत. अशी या ग्रंथाविषयीं पंडितांचीं भिन्न भिन्न मतें आहेत. तरी ज्याअर्थी या संशयजालाचें निरसन करून स्पष्ट निर्णय दिलेला अजून कोठेंहि आढळत नाहीं; त्याअर्थी या उत्तरसर्गांचें कर्तृत्व वादग्रस्त आहे असें समजून कोणताहि पक्ष सध्यां धरवत नाहीं.

या काव्यांत जागोजागीं सुंदर वर्णन आहे, व शृंगार आणि शोक हे रस मुख्यतः साधले आहेत. उत्तम श्लोकांचे व भाषणांचे उतारे घेऊं लागल्यास फारच विस्तार होईल हें सांगणें नको. यास्तव येवढें मात्र सांगतों कीं, आरंभींचें हिमालयवर्णन आणि पांचव्या सर्गांतील वेषधारी मुनि व पार्वती यांचा संवाद हीं फार उत्कृष्ट आहेत. पर्वतावरील अनेक सृष्टिचमत्कारांचें वर्णन मोठें चमत्कारिक व भव्य केलें आहे. तसेंच पांचव्या सर्गांत त्या कपटमुनीनें पार्वतीच्या प्रेमाची परीक्षा पाहण्याकरितां केलेलें कपटाचें भाषण, आणि त्याची पार्वतीनें जी निर्भर्त्सना केली तीहि फार मनोवेधक आहेत.

कालिदासाचे अत्युत्कृष्ट ग्रंथ ' रघुवंश ', ' मेघदूत ', ' शाकुंतल ' नाटक आणि ' विक्रमोर्वशी ' नाटक हे होत; यास्तव हे त्यानें प्रौढवयांत रचले असावे असें दिसतें. ' रघुवंशां ' त सूर्यवंशी राजांचें वर्णन आहे. दिलीप, रघु, अज, दशरथ, राम, कुश व अतिथि यांच्या दिग्विजयादि प्रतापांचें व त्यास संसारांत ज्या सुखदुःखांचा अनुभव घडला याचें वर्णन पहिल्या सतरा सर्गांत केलें आहे. अठराव्यांत अतिथि राजाचे जे पुढें पुष्कळ वंशज झाले आहेत त्यांचें संक्षिप्त वर्णन आहे आणि शेवटल्या एकोणिसाव्यांत अग्निवर्ण नामक जो रघुवंशांतील शेवटचा राजा त्याचा शृंगार व अंत वर्णिला आहे. ' रघुवंश ' हें काव्य कालिदासाच्या सर्व काव्यांत श्रेष्ठ होय. प्रौढ व मधुर वर्णरचना, वर्णन करण्याची शैली, निरानिराळ्या रसांचा आविर्भाव वगैरे त्याच्या गुणांचा यांत कळस झाला आहे. ज्या वंशाचें गुणवर्णन करतां करतां वाल्मिकादि कविश्रेष्ठांचीहि वाणी शिणली, व तीमुळें ज्या वंशाच्या कीर्तीस अमरत्व आलें,त्यावरच धाड घालून आपण लहान तोंडीं मोठाघास घेत आहों असा शालिनतेस्तव मोठाच संकोच वाटून हे कविराज म्हणतात,

मंदः कवियशः प्रार्थी गमिष्याम्युपहास्यताम् ।
प्रांशुलभ्ये फले लोभादुद्बाहुरिव वामनः ।

" ज्याप्रमाणें एखाद्या वृक्षाचें फळ उंच मनुष्याच्या मात्र हातीं येण्यासारखें असून खुज्यानें त्याचा लोभ धरून उगीच हात वर करावे, त्याप्रमाणेंच मंदमति असून मी कवियशःप्राप्तीची व्यर्थ हांव धरीत आहे, यास्तव सूज्ञ जन मला हांसतील ! " यावरून इतकें तरी निदान दिसतें कीं, हातीं घेतलेला विषय सामान्य नव्हे अशी पूर्ण खात्री होऊन कवीनें त्यावर आपलें बुद्धिसर्वस्व खर्चिलें असावें, आणि वस्तुतः पाहतां तसेंच आढळून येतें. जसा एखाद्या मोठ्या नदीचा प्रवाह जेथें जेथें पाहावा तेथें तेथें नेत्रांस रम्यच भासतो तद्वत् या काव्याचा प्रत्येक सर्ग तर काय, पण प्रत्येक श्लोकहि कवीचें अपूर्व गुण प्रकट करितो.

' मेघदूत ' हें काव्य बहुतेकांस ऐकून तरी माहिती असेलच. पुष्कळांनीं तर मूळच्या संस्कृतांतून किंवा कांहीं वर्षांमागें त्याचें जें मराठी भाषांतर झालें आहे त्यांतून याची गोडी पाहिलीच असेल. यास संस्कृतांत ' खंडकाव्य ' म्हणतात. कारण हें फार लहान आहे. तरी कवित्वाच्या कांहीं अपूर्व गुणांनीं हें इतकें रमणीय झालें आहे कीं, महाकाव्येंहि यापुढें फिक्कीं पडतात. फार तर काय, पण कालिदासाचे बाकीचे सर्व ग्रंथ बुडून हेंच लहानसें काव्य जरी मागें उरतें तरीहि कविवृंदांत तो ग्रंथ अग्रस्थानींच गणिला जातां यांत तिळमात्रहि संदेह नाहीं.

हिमालयावरील अलकापुरींतील एका यक्षास कुबेराचा शाप होऊन त्यास अत्यंत दुःसह प्रियस्त्रीविरह घडला. कोठें हिमालय व कोठें रामगिरी ! पण निरुपायास्तव तेथेंहि त्यानें विरहाचे कित्येक महिने मोठ्या दुःखानें कंठले. पुढें वर्षाकाळ येऊन ठेपला. तेव्हां दीर्घ विरहानें जी अगोदरच कृश होऊन गेली असेल. तिला येणाऱ्या वर्षाऋतूच्या मजेच्या दिवसांत तर आपण नसल्यानें फारच अवघड वाटेल, अशी त्यास मोठी चिंता लागून असा उपाय सुचला कीं, आपली क्षेमवार्ता तिला सांगून आश्वासन देईल असा तिजकडे दूत पाठवावा. पण असा दूत त्या यक्षास तेथें कोण सांपडला ? कोणी मनुष्य किंवा इतर कोणी सजीव प्राणी नव्हे;तर जगाचा संताप हरून त्यास समृद्धि देण्यानें व आपल्या मनोहर नील वर्णानें जो सर्वांच्या व विशेषतः उत्कंठितांच्या हृदयास आल्हाद देतो, त्या मेघासच त्यानें दूत करून त्याशीं बोलण्यास आरंभ केला. हा केवळ अचेतन

होय, याकडून आपलें कार्य कसें घडेल, ही कल्पनाहि त्याच्या मनांत आली नाहीं; कां कीं, स्त्रीप्रेमानें तो अगदीं वेडा होऊन गेला होता. मग तेथून म्हणजे रामगिरीपासून तों थेट अलकापुरीपर्यंत त्यानें मेघास मार्ग सांगितला; व मध्यें लागणारीं जीं अनेक नगरें, नद्या, पर्वत त्यांचेंहि वर्णन केलें. येथवर या काव्याचा पाहिला भाग झाला; यास 'पूर्वमेघ' म्हणत. 'उत्तर-मेघां'त अलकेचें वर्णन करून मग यक्षानें आपल्या मंदिराचें व स्त्रीचें वर्णन केलें आहे, व शेवटीं तीस सांगावयाचा निरोप सांगितला आहे.

एवढेंच काय तें या काव्याचें संविधानक. तरी अत्युत्कृष्ट कवीस आपली अप्रतिम कवित्वशक्ति प्रकट करण्यास याचें अनुकूलत्व किती अत्यंत आहे, हें मार्मिक वाचणारांच्या सहज लक्षांत येईल. 'उत्तरमेघां'तहि अलका-नगरीचें वर्णन सुंदर असून यक्षाच्या स्त्रीची विरहावस्था व शेवटचा निरोप हीं करुणरसभरित वर्णिली आहेत. वृत्ताचीहि योजना मोठ्या बहारीची आहे; व तीमुळें ही कविता फारच खुलते आहे. त्यामुळें हीस आलेली व अर्थगौरवास्तव जणुं काय विशेष झालेली जी मंद गति, तसेंच पदलालित्य, रूपविशदत्व इत्यादि जे तिचे दुसरे गुण, त्याहींकरून वाचकांस कवीच्या नायिकांचाच साक्षात् भास होतो; आणि कल्पनेच्या आनंदमय सृष्टींत मन अगदीं दंग होऊन जाऊन या जगाचें भानहि त्यांस कांहीं वेळ नाहींसें होतें!

कालिदास, कवींच्या मालिकेंत जसा अग्रगण्य झाला आहे तसाच नाटककारांतहि त्यास मान देतात; किंबहुना, या संबंधेंच त्याची हल्लीं विशेष ख्याति झाली आहे असें म्हटलें पाहिजे. त्याच्या 'शाकुंतल' व 'विक्र-मोर्वशी' या दोहों नाटकांची, व त्यांतूनहि पहिल्याची, या देशांत पूर्वीपासून किती प्रतिष्ठा आहे हें सांगणें नको. प्रत्येक पंडिताच्या तोंडीं त्यांतील पद्यें आणि "काव्येषु नाटकं रम्यं तत्र रम्यं शकुंतला तत्रापि च चतुर्थोऽङ्कस्तत्र श्लोकचतुष्टयम्" हा श्लोक हीं आहेतच. सांगावयाची विशेष गोष्ट ही कीं, आपल्या कवीची अजरामर कीर्ति प्रथम देशांतरास जाऊन नंतर सर्व भूमंडळावर पसरण्यास हेंच 'शाकुंतल' नाटक कारणीभूत झालें. तें असें कीं, सर विल्यम् जोन्स् नांवाचा एक विद्वान् न्यायाधीश सुमारें शंभर वर्षांपूर्वीं बंगाल्यांत असतां त्यास एका पंडिताकडून समजलें कीं, संस्कृत भाषेंत नाटकें रचिलेलीं आहेत. हें समजतांच त्यानें त्या भाषेचा

अभ्यास फार परिश्रम करून केला, आणि त्या नाटकाचें इंग्रजी भाषेंत भाषांतर करून तें युरोपांत प्रसिद्ध केलें. तें पाहून युरोपांतील कित्येक पंडितांचें मन इतकें वेधून गेलें कीं, त्यांनींहि कालिदासाची तत्क्षणीं महाकवींत गणना केली. जर्मनी देशांतील कविमाणि गेटी, प्रख्यात तत्त्ववेत्ता व मुशाफर हंबोल्ड आणि महापंडित श्लेजेल यांनीं आपल्या कवीच्या अनुपम कृतीचा केवळ भाषांतररूपानें रसास्वाद घेऊन आनंदभरांत माना डोलविल्या. या रसिकवरांनीं 'शाकुंतल' नाटकावर अंतःकरणाच्या उल्लासभरांत जे अभिप्राय दिले आहेत ते सर्वांनीं, व विशेषतः हिंदूंनीं तर, आपापल्या हृत्पट्टिकेवर खोदून ठेवण्यासारखे आहेत. ते येथें उतरून घेतले असते, पण तसें करणें प्रशस्त दिसत नाहीं. कां कीं, ते सर्वत्र प्रसिद्धच असल्यामुळें त्यांचा उल्लेख केवळ पुनरुक्त होय. असो.

"शाकुंतल" हें नाटक महाभारतांतील आदिपर्वांतल्या एका कथेचा आधार घेऊन रचिलें आहे. तेथील मूळच्या गोष्टींत असें होतें कीं, शकुंतला आश्रमांत एकटी असून तिनेंच आपल्या जन्माचा वृत्तान्त सांगितला व दोघांचा गांधर्वविवाहहि प्रत्यक्षच झाला. ह्या दोन्ही गोष्टी काव्यांत फारशा विसंगत दिसत नाहींत. पण जेथें मनाचे स्वाभाविक व्यापार रेखल्याप्रमाणें दाखवावयाचे असतात अशा नाटकांत तर त्या अगदीं अयोग्य, त्यांतूनहि नायिकेच्या सहज शालीनतेस तर यासारखें विरुद्ध कोणतेंच नाहीं. यास्तव कालिदासानें शकुंतलेच्या दोन सख्या कल्पून त्यांपैकीं एकीकडून तो वृत्तान्त वदविला आहे, व पुढील गांधर्वविवाहाची गोष्टहि त्यांच्या द्वारें ओघाओघानें आणिली आहे. तशीच आरंभीं शकुंतलेची व राजाची दृष्टादृष्ट वृक्षवनांत करून वनवासी कुमारिकांस उचित व कविजनमनास अत्यंत प्रिय अशा वृक्षसेचनादि व्यापारांत गुंतलेली तीस दाखविली आहे. दुष्यंत राजावर कपटीपणाचा दोष न यावा म्हणून दुर्वास ऋषीचा शाप व शकुंतलेस दिलेल्या आंगठीचें शक्रतीर्थांत पडणें या दोन नव्या गोष्टी कल्पिल्या आहेत. पांचव्या अंकाच्या शेवटींच मुळची गोष्ट संपली आहे; पण शकुंतलेस राजानें न ओळखून ती दुःख करीत निघून गेल्यावर तिची आई जी मेनका तिनें एकाएकीं तीस उचलून नेलें असें नवें घालून नाटकांतील शेवटचे दोन अंक अगदीं नवेंच कवीनें कल्पिले आहेत. सहाव्याच्या आरंभीं एका

कोळ्यापाशीं ती आंगठी सांपडून राजास शकुंतलेविषयींची शापहत स्मृति पुनः आली आहे व मेनकेची सखी सानुमती अप्सरा गुप्तरूपें जवळ उभी असतां शकुंतलेचा पूर्वीचा सर्व वृत्तान्त स्मरून राजा विरहदुःखानें व निराशेनें वेडा होऊन गेला आहे. पुढें इंद्राचा सारथी मातलि येऊन दैत्य-वधार्थ त्यास स्वर्गास घेऊन गेला आहे. सातव्या अंकांत मातलि दुष्यंतास भूलोकास परत आणीत असतां हेमकुटी मारीचाचें दर्शन घेण्याची राजाची इच्छा पाहून त्यानें तेथेंच रथ उतरविला. मग तेथें शकुंतला व पुत्र भरत यांची व त्याची अकल्पित भेट झाली; आणि शेवटीं मारीच व अदिति यांचें दर्शन व आशीर्वाद घेऊन दुष्यंत राजा तेथून परत आपल्या नगरास निघाला आहे. मारीच व आदिति हीं दोघें नाटकाच्या शेवटीं कां आणली याचें कारण उघडच आहे. संस्कृत नाटकांच्या संप्रदायाप्रमाणें नायक दुष्यंत व नायिका शकुंतला हीं मागील सर्व संकटांतून पार पडून त्यांचे सर्व मनोरथ सफळ झाले असतां अशींच निरंतर सुखांत असा, असा आशी-र्वाद त्यांस यांजकडून देवाविला आहे; आणखी तुला कोणता वर पाहिजे असें त्यांना विचारिल्यावरून दुष्यंतानें भरतवाक्यरूपानें सर्व श्रोत्यांस उद्देशून आशीर्वचन केलें आहे, व तें कवीच्या उपास्य देवास म्हणजे शिवास प्रार्थनापर आहे.

ही कृति रसिकजन परंपरेस पुढें चिरकाळ शिरोवंद्य होणार व इतर सर्व काव्यांपेक्षां हीवरूनच आपलें कवित्वयश दिगंतरीं फांकणार हें जणों काय अगोदरच समजून आपल्या कवीनें या नाटकांत आपल्या बुद्धिवैभवाची पराकाष्ठा दाखविली आहे. जें जें नाटकांत पहावें तें तें स्वतः परिपूर्ण असून बाकीच्या सर्वांशीं त्याचा उत्कृष्ट मेळ दृष्टीस पडतो. प्रथम संविधानक पहा. तें इतक्या चातुर्यानें रचिलें आहे कीं, त्यांत यत्किंचितहि भाग उणा किंवा अधिक सांपडावयाचा नाहीं. मूळच्या गोष्टींत कसे फेरफार केले आहेत व जास्ती काय काय घातलें आहे तें मागें सांगितलेंच आहे; पण त्याहून बारीक असे कित्येक खुबीदार प्रसंग कवीनें त्या त्या रसास पुष्टि आणण्याकरितां घातले आहेत, तेहि येथें सांगतों. पहिल्या अंकांत भ्रमराचें शकुंतलेच्या मुखास कमलभ्रांतीनें झटणें, चवथ्यांत मृगपोतकाचें तिच्या पायांत अडखळणें, पांचव्याच्या आरंभींची राजास उत्कंठित करणारी व

अन्योक्तिगर्भित अशी आकाशांतील गाण्याची लकेर, तसाच सहाव्यांत शकुंतलेची तसबीर पाहून तिच्या क्षणभर साक्षाद्दर्शनाचा घडलेला लाभ, आणि धनमित्र सावकाराचा मरणवृत्तान्त ऐकून अनपत्यतेस्तव अतिशयित विषाद वाढून राजास मूर्च्छा येणें; यांतील प्रत्येकाच्या योगानें एकंदर संविधानक किती मजेनें जुळत गेलें आहे, व तेथला रस किती सुंदर खुलतो आहे हें सांगणें नलगे. शकुनांचाहि याचप्रमाणें कवीनें उपयोग करून घेतला आहे. हें प्राचीन काळीं लोकांचा त्यांवर पूर्ण विश्वास असल्यामुळें कवीस व विशेषतः नाटककारांस संविधानक जुळतांना त्यांचा अनेकवार मोठा उपयोग झाला आहे. हाहि उपयोग दोन प्रकारांनीं होतो. एक पुढील कथेचा संदर्भ अगोदर प्रेक्षकांस किंवा वाचकांस सुचविण्यानें जसा प्रस्तुत नाटकांत पाहिल्या व शेवटल्या अंकांच्या आरंभीं राजाच्या बाहुस्फुरणानें सुचविला आहे. दुसरा, एखाद्या झालेल्या किंवा पुढें होणाऱ्या भयंकर गोष्टीची सूचना करून मनास धक्का बसविण्यानें. हा दुसरा प्रकार या नाटकाच्या चवथ्या अंकांत आहे. शकुंतला दुष्यंताच्या नगरास येण्यास निघाली असतां वाटेनें तीस एक चक्रवाकी दृष्टीस पडली, ती कमलपत्रांच्याच आड तिचा नवरा असतां तो दूर गेला या भ्रांतीनें आक्रोश करीत होती. ही गोष्ट केवळ क्षुल्लक असतांहि शकुंतला व तिच्या सख्या मनांत चरकल्या व तीच अवस्था प्रेक्षकांची व वाचकांचीहि होते. तसेंच सातव्या अंकांत शकुंतलेची अर्धीच झालेली तसबीर कोणत्या प्रकारांनीं पुरती करावी व भोंवतालचा देखावा कशा तऱ्हेचा असावा अशा विषयींचे जे श्लोक आहेत त्यांतील वर्णन इतकें चमत्कारिक आहे कीं, त्यावरून कांहीं नाहीं म्हटलें तरी चित्रकलेचें मार्मिक ज्ञान तरी कवीस खास असावें असें वाटतें.

या नाटकाचें कोणतेंहि अंग घ्या, जेथें तेथें कवीनें आपल्या करामतीची शर्थ केलेली नजरेस येते. ज्याप्रमाणें 'मृच्छकटिकां'त दरिद्री चारुदत्ताचा मित्र विदूषक हा वसंतसेनेच्या वाड्याचे चौक पाहून चकित होऊन गेला, जो जो नवा पाही तो तोच त्यास अतिरम्य वाटे, त्याप्रमाणें वाचकांस येथें होऊन जातें. जो जो अंक काढावा त्यांत नवी नवीच बहार दृष्टीस पडते आणि प्रत्येकाची निरनिराळी रचना अधिक उत्कृष्ट म्हणावी, कीं सर्वांचा एकंदर मेळ विशेष खुलतो म्हणावें, याचा त्यास निश्चय होत नाहीं!

● ● ●

# ५. परभाषेंतील शब्दांची योजना

आपली मराठी भाषा सध्यां बनत चालली आहे. वर्तमानपत्रें, सभा, मासिकपुस्तकें, ग्रंथ या सर्वांची अभिवृद्धि हीं भाषावृद्धीचीं कारणें होत; यास्तव हीं हल्लीं जारीनें चालू असल्यामुळें जसें झाड किंवा प्राण्याचें शरीर वाढतें, त्याप्रमाणें महाराष्ट्र भाषेची वाढ हल्लीं सुरू आहे. इकडे इंग्रजी विद्येचा आलीकडे फैलावा होऊं लागल्यापासून नवे नवे विचार आपल्या भाषेंतील शब्दांनीं व्यक्त करण्याचें अगत्य पडूं लागलें आहे. तेव्हां या संधीस ही एक मोठया विचाराची गोष्ट आहे कीं, परकी भाषांतील शब्द आपल्या भाषेंत घ्यावे कीं नाहींत; व जर घ्यावे, तर ते कोणत्या प्रमाणानें घेतले पाहिजेत, वगैरे.

या विषयाच्या संबंधानें कित्येकांची अशी समजूत झालेली दृष्टीस पडते कीं, परभाषांतले शब्द म्हणून मराठींत बिलकुल घेऊं नयेत. इंग्रजी, फारसी, अरबी वगैरे सर्व शब्द काढून टाकून, निवळ मराठी शब्द योजीत जावे. ही बुद्धि कशामुळें झाली आहे हें कोणासहि सहज समजेलच. आलीकडे आमच्या राष्ट्रांत देशाभिमानाची थोडीशी झुळूक सुटली आहे, यामुळें जुने आचारविचार चांगले, इंग्रजी तऱ्हा बिलकुल उपयोगी नाहीं, स्वदेशी कापडच वापरायाचें, परदेशी वस्तु घ्यावयाच्या नाहींत, वगैरे लोकांचे ग्रह जसे हळूहळू होत चालले आहेत, त्याप्रमाणेंच परभाषेंतील शब्दांवर कांहीं जणांचा मोठा कटाक्ष दृष्टीस पडतो. वस्तुतः पाहतां ही स्वभाषेविषयींची पूज्यबुद्धि सर्वथा अप्रशस्त म्हणतां येत नाहीं हें खरें; कां कीं, ही बुद्धि भाषादूषणावर अत्यंत मारक होय. ती हृदयांत न वसल्यामुळें, आजपर्यंत पुष्कळ ग्रंथकारांनीं व वक्त्यांनीं, परकी भाषेच्या पायीं आपल्या भाषेची विटंबना केली. मुंबईशाही मराठीचा प्रकार पाहिला, किंवा ‘ वेदार्थयत्नां ’ तल्या सारखा मासला पाहिला तर वरील प्रकार किती हास्यास्पद व अनर्थकारक होय, हें तेव्हांच लक्षांत येईल. ड्रायडन नामक प्रख्यात ग्रंथकारानें एके ठिकाणीं म्हटलें आहे—“ जर परकी शब्दांची देशभाषेवर फारच गर्दी करून सोडली, तर मूळभाषेस त्यांपासून साह्य व्हावें तें न होतां, त्यांचाच जसा कांहीं मूळ शब्दांवर शिरजोरपणा दिसूं लागतो. ” *

* ड्रायडनचें वरील वचन हें :—“ If too many foreign words are poured in upon us, it looks as if they were designed not to assist the natives, but to conquer them. ”

परभाषेंतून वाजवीपेक्षां फाजील शब्द घेतले, म्हणजे येथें जसा इंग्रेजांनीं प्रकार केला, तसा होऊं लागतो, हें उघड आहे. पण या प्रतिबंधास तरी कांहीं मर्यादा अवश्य ठेवली पाहिजे. ती अशी कीं, जेथें मूळ भाषेंत शब्दच नाहींत. तेथें परभाषीय शब्दांस निमंत्रण करण्यास चिंता नाहीं. उदाहरणार्थ, छापखान्याचाच कारखाना घ्या, यांतील परिभाषा, अर्थातच सारी इंग्रेजी आहे. प्रूफ, स्टीक, प्रेसमन, पायका, प्रायमर, कंपॉझिटर, करेक्टर वगैरे सर्व शब्द हे, आगगाडीच्या किंवा तारायंत्राच्या परिभाषेप्रमाणें आमच्या भाषेंत रूढ झाल्यासारखेच आहेत.

आतां भाषाभिमानी पुरुषानें उठून प्रुफच्या जागीं 'खर्डा', 'करेक्टर' च्या जागीं 'शोधक' असें जरी कांहीं शब्दांतर केलें तरी टैपांचे छप्पन्न प्रकार किंवा रेल्वे एंजिनांतील प्रत्येक भाग अथवा जहाजाच्या शंभर दोऱ्या, इतक्यांस नांवें धुंडीत बसणें म्हणजे भगीरथ प्रयत्नच आहे! शिवाय हा प्रयत्न कितपत सिद्धीस जाईल याविषयीं आम्हांस शंकाच दिसते. संस्कृतांत पाहिलें तरी त्यांतहि कित्येक शब्द परभाषेंतील येऊन मिसळलेले आहेत. विशेषतः ज्योतिष ग्रंथांतील कित्येक पारिभाषिक शब्द ग्रीक भाषेंतून किंवा प्राचीन मिसरी भाषेंतून घेतल्यासारखे दिसतात. अर्वाचीन काळीं मोठ्या योग्यतेस चढलेली जी इंग्रजी भाषा, तींत तर हजारों शब्द परभाषांतूनच आलेले आहेत. हें तर काय? पण ज्या भाषेनें वरील भाषेंत कांहीं ना कांहीं तरी साहित्य केलें नाहीं अशी बहुधा थोडकीच सांपडेल यावरून काय समजायाचें? – इतकेंच कीं परभाषांचा मिलाफ सर्व भाषांत व्हावयाचा, व तो झाला असतां त्यांत कांहीं मोठें अनिष्ट आहे असेंहि नाहीं. इतकें मात्र व्हावयाला पाहिजे कीं जेथें जरूर नाहीं तेथें वरील भेसळ होऊं देऊं नये; व परभाषेच्या पायीं मूळ पद्धतीस म्हणजे वाक्यरचनेस वगैरे धक्का लागू देऊं नये.

त्यांतून, अरबी व फारसी शब्द तर आमच्या भाषेला अगदीं खिळूनच गेले आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. लहानथोर, विद्वान्-अविद्वान्,

बायका-पुरुष, या सर्वांच्या तोंडीं जे शब्द आज पिढ्यान्‌पिढ्या घट्ट बसले आहेत ते आतां कांहीं केल्या निघायचे नाहींत. आणि ते निघून हल्लीं निर्वाहहि लागणार नाहीं तेव्हां, यासंबंधें आग्रह धरला असतां तो केवळ मूर्खपणा होणार आहे. हे शब्द व महाराष्ट्र भाषा या दोहोंचा जणों काय, एकजीवच होऊन गेला आहे. तो इतका कीं त्यांचा परकेपणा अगदीं बुजून जाऊन, ते मूळचे यवनी म्हणून ओळखण्याची सुद्धां पुष्कळ वेळां पंचाईत पडते. फार तर काय? पण येवढे सोंवळे जे महाराष्ट्र कवि, त्यांनीं सुद्धां पुष्कळ ठिकाणीं त्यांचा प्रयोग केलेला आढळण्यांत येतो. तेव्हां, आजपर्यंत जे जे अरबी व फारसी शब्द मराठी भाषेंत येऊन प्रविष्ट झाले आहेत, त्यांच्याविषयीं तर सध्यां विचारच नाहीं. विचार करावयाचाच झाला तर नवीन शब्दांविषयीं; पण यांसहि प्रसंगविशेषीं आव्हान करणें अवश्य होईल. जेथें इंग्रेजी शब्दास मराठींत किंवा संस्कृतांत प्रतिशब्द आढळणार नाहीं तेथें वरील दोन भाषांचीच प्रार्थना बहुधा करावी लागेल हें उघड आहे.

आतां इंग्रजी शब्दांविषयीं विचार केला, तर त्यांसहि वरील गोष्टी पुष्कळ अंशीं लागू पडतील. 'खुर्ची' निवळ मराठी बनली आहे, तिजहून 'टेबल' कमी बनलें आहे असें नाहीं. 'अहंमदनगर' या विशेषनामास जशी मराठी भाषेंतून सनद मिळाली आहे, त्याप्रमाणेंच 'मालकमपेठे' सही मिळाली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. हें तर काय? पण 'रांग', 'संत्री', 'पलटण', 'फरेट', 'कडाबान', 'काडतूस' वगैरे शब्द तर इतक्यांतच आमच्याशीं इतके लगट करून लागले आहेत कीं, जणों काय त्यांची व आमची आज कितीका दिवसांची गट्टी बनून गेली आहे! मोठ्या सोवळ्या आजीबाईलाहि जसा आतां 'बटाटा' परका वाटेनासा झाला आहे, व 'तंबाखू-'ची तर आलीकडे द्रोणागिरीच्यापर्यंत परंपरा लागत आली आहे, त्याप्रमाणेंच शेंकडों इंग्रजी शब्द आलीकडे आमच्या भाषेंतील शब्दांबरोबर खुशाल वावरूं लागले आहेत. देशाचा उदीम वाढण्याकरितां, ज्याप्रमाणें सर्व ठिकाणच्या व्यापाऱ्यांस व्यवहार करण्याची साऱ्या देशांत मोकळीक असते, त्याप्रमाणेंच अर्थवाहक जे शब्द, त्यांसहि तशीच सर्वत्र सदर परवानगी असली पाहिजे. ती असली म्हणजे भाषेस शब्दप्राचुर्य, वैचित्र्य इत्यादि लाभच होणारे आहेत. इतकेंच मात्र

कीं, ते शब्द भाषेवर शिरजोर होऊं देतां कामा नयेत, व त्यांच्या योगानें भाषेची शिस्त न बिघडे अशी तजवीज ठेवली पाहिजे.

• • •

## ६. नाटकें करावीं कीं करूं नयेत ?

सानुमती—उत्सवप्रियाः खलु मनुष्याः ।

—शाकुंतल, ६.

नाटकें करणें बरोबर आहे कीं नाहीं, हा जर आम्हांस कोणी प्रश्न केला, तर त्यावर आमचें उत्तर असें आहे कीं, अगदीं बरोबर आहे. तें कां? तर त्यापासून लोकरंजन होतें म्हणून. लोकरंजनाचा जो तो मार्ग असेल तो तो लोकांत अवश्य प्रवृत्त झाला पाहिजे; इतकेंच कीं, त्यापासून शरीरास किंवा मनास, साक्षात् किंवा परंपरेनें, इजा होण्यासारखी मात्र नसावी. यास्तव अशा तऱ्हेचे करमणुकीचे जेवढे म्हणून प्रकार आहेत, तेवढे सर्व प्रकार अत्यंत ग्राह्य होत.

मनुष्याच्या मनाचा असा धर्मच आहे कीं, त्यास नेहमीं कांहीं ना कांहीं तरी उद्योग लागत असतो; त्यास स्तब्धता बिलकुल आवडत नाहीं. यास्तव लोकनियमनाचें काम ज्यांनीं पत्करलें आहे व आपल्या राष्ट्रानें निरंतर सुमार्गांत चालावें असें जे इच्छितात, त्यांनीं अत्यंत उच्छृंखल जें मन, त्याच्या नियमनाची तजवीज अवश्य केली पाहिजे. या गोष्टींकडे आमच्या पूर्वजांनीं फार लक्ष्य दिलें होतें, असें त्यांनीं लावून दिलेल्या नित्यक्रमावरून दिसून येतें. ‘ भगवद्गीतें ’ त एके ठिकाणीं मनास समुद्रावरील जहाजाची उपमा घेतली आहे; व कोणीहि क्षणभर विचार केला असतां, त्यास ती सर्वथा यथार्थ वाटणारी आहे. जहाज हें जसें सर्वथा वाऱ्याच्या स्वाधीन असतें, त्याप्रमाणेंच मन हें मनुष्याच्या मनाला होणाऱ्या प्रेरणांच्या अधीन असतें.

या प्रेरणा होतील तसतसें मनुष्याच्या हातून आचरण होणार आहे. पहा कीं, रिकामपण दुराचरणाला प्रवृत्त करणारें होय, असा मनुष्यमात्राचा अनुभव आहे. सकाळपासून संध्याकाळपावेतों काबाडकष्ट करणाऱ्या मजुराचें वर्तन आणि चारी ठाव चमचमीत भोजन करून ज्यानें काळ घालवावा व ज्यास काडीचेंहि काम नाहीं, अशा खुशालचदाचें वर्तन, यांत किती फरक असतो बरें ! दुसऱ्या वर्गातील मनुष्याच्या मनावर व्यसनांचीं एकावर एक किती पुटें बसलेलीं असतात म्हणून सांगावीं ! ज्यास मुळीं कांहीं कामच नाहीं, त्यानें वेळ तरी घालवावा कसा ? मग अर्थातच, जेवढे म्हणून ढंग मनुष्यास करावेसे वाटतात, तेवढ्यांच्या स्वाधीन या राजश्रीस व्हावें लागतें. सहा पेशव्यांच्या डोईवर राज्यकारभार होता, तेव्हां त्यास ऐष-आरामास कोठून वेळ फावणार ? व फावला तरी तो किती ? पण तेच शेवटले राजबिंडे पहा; त्यांच्या वडिलोपार्जित दोस्तांनीं राज्य निष्कंटक करून, त्यांस गादीवर झोप घेण्याचें काम तेवढें ठेवल्याबरोबर, पुण्यपत्तन लागलींच कसें रंगलें ! पंतप्रधानांची स्वारी शुक्रवारच्या वाड्यांत सुग्रास भोजन करून, वामकुक्षीला बुधवारच्या वाड्याकडे निघाली, कीं पहिल्या प्रथम सलामी बावन्न खिडक्यांतून ! तेच,त्यांचे वडील राघो भरारी* याचें खोगिर दोन दोन दिवस घोड्यावरून निघत नसे, मग जेवणाची वार्ता कशाला ? पारसी-कांच्या एका राजाची गोष्ट अशी इतिहासांत प्रसिद्ध आहे कीं, जो कोणी नवीन कर्मणूक काढील त्यास त्याच्याकडून बक्षीस मिळत असे; इतकी त्याच्या मनाची अस्वस्थता होती. सारांश, मन हें मोठें चंचल आहे; यास्तव पाऱ्यास जसें स्थिर करतात, त्याप्रमाणे त्यासहि स्थिर करणें अवश्य होय. तें जर चांगल्या करमणुकीकडे गुंतवून ठेवलें नाहीं तर अर्थातच तें हवें तिकडे बहकणार. जसें सुकाणूं सुटलें कीं, जहाज कोणत्या खडकावर जाऊन आपटेल याचा नेम नाहीं. किंवा एंजिन भडकलें, कीं कोणीकडे गाडी नेऊन उलथील, हें सांगतां येत नाहीं; त्याप्रमाणें स्वभावांत जें मनु-

---

* वरील नांव रघुनाथरावास पडलें होतें. त्याची दौड अशी होती कीं, एकेक दिवशीं पन्नास पन्नास, साठ साठ कोस त्यानें निघून जावें ! यानेंच गिलच्यांस अटकेची पैलथडी दाखविली ! पण एका दुर्गुणानें या सर्व गुणांचें पुढें केवळ मातेरें झालें !

ण्यांचें 'उत्सवप्रिय' मन हें सत्कवींच्या कृतीकडे वगैरे जर वेधलें नाहीं, तर किती छक्कडींत गुंगून जाईल याचा नेम लागायाचा नाहीं !

यावरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं, मनुष्यास करमणूक तर पाहिजे, आणखी ती करमणूक चांगल्या प्रकारची पाहिजे. आम्हांस वाटतें कीं, नाटक ही अशा प्रकारची करमणूक आहे. यास्तव नाटकें जसजशीं सुधरत जातील, तसतसा त्यांत आमच्या लोकांच्या फायदाच आहे. अशी ही सुधारणा गेल्या वीस पंचवीस वर्षांत थोडी झाली असें नाहीं. पंचवीस वर्षांपूर्वी आमच्या लोकांस नाटकांचे प्रकार म्हटले म्हणजे काय ते दोन माहीत होते; एक तमाशा व दुसरें ललीत. हे दोन्ही प्रकार किती हलकटपणाचे, किती विचकट व किती गांवढळ आहेत, हें कोणासहि सांगावयास नको. स्त्रियांची गोष्ट तर राहोच; पण पुरुषांस देखील वरील दोहोंतले बीभत्स प्रकार पाहून पराकाष्ठेची शरम वाटल्यावांचून कधीं राहणार नाहीं. जो निव्वळ ग्राम्य मनुष्य, त्याच्या जाड्याभरड्या अभिरुचीस, वरील नाट्य व त्यांतलीं भाषणें हीं काय आवडतील तीं आवडोत ! इतरांस तर तीं कधींहि पसंत पडावयाचीं नाहींत; म्हणून आम्हीं असें म्हणतों कीं, हल्लींची अगदीं रासवट नाटककार कंपनी आणि दगड्या परटाचा तमाशा किंवा सख्या गोंधळयांचें ललीत, यांत कोणास कांहींच अंतर दिसत नाहीं काय? सांप्रत झाली आहे ही आम्हांस तर बरीच सुधारणा वाटते. त्यांतून अलीकडे कांहीं मंडळयांनीं बऱ्याच प्रकारची आणखीहि सुधारणा केलेली आढळते. इचलकरंजीकारांचा 'भ्रांतिकृत चमत्कार' आळतेकरांचें 'नारायणराव' आणि 'झाशीची राणी-यांचे फार्स (?) तसेंच आर्योद्धारकांचे 'आथेल्लो' आणि 'मल्हारराव' हे खेळ पाहून, मोठ्या पदकवाल्या उपपदधारींसहि तोंडाला पदर लाव ण्याचीं पाळी येईल, असें आम्हांस वाटत नाहीं !

तेव्हां राष्ट्राच्या करमणुकी सुधारणें ही जर चांगली गोष्ट असेल, तर नाटकांची प्रवृत्ति जी आज इतके दिवस पडली आहे व आणखी पडत चालली आहे, तींत आमच्या बुद्धीनें, कांहीं गैर दिसत नाहीं. उलटें असें म्हणावयाससुद्धां आम्हांस बिलकूल धास्ती वाटत नाहीं, कीं आमची विद्वान् मंडळी या कामांत परिश्रम करून, कालिदासादि संस्कृत कवि आणि शेक्स-पियरप्रभृति पाश्चात्य कवि यांच्या कृतींचा साक्षात् किंवा भाषांतरद्वारां

लोकांस जितका अधिक परिचय करून देईल, तितके ते सर्वांच्या धन्यवादास आपणांस अधिकाधिक पात्र करून घेतील. वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, ग्रंथ, व्याख्यानें इत्यादिकांचा प्रसार जसा सर्वथा इष्ट आहे, त्याप्रमाणेंच नाटकाचीहि गोष्ट होय. मिल्टन कवीची कीर्ति आडिसन् यानें आपल्या निबंधांनीं जशी परम उज्ज्वल केली, त्याप्रमाणेंच जॉन्सन्चा मित्र ग्यारिक यानें आपल्या अप्रतिम नाट्यप्रयोगांनीं साऱ्या इंग्लंडास ' शेक्सपीयर, शेक्सपीयर ' बोलावयाला लावलें. प्राचीन काळच्या व अर्वाचीन काळच्या सुधारलेला साऱ्या राष्ट्रांतून नाटकाचा संप्रदाय विद्वांमान्य होऊन राहिलेला आहे. येवढा महापंडित सॉक्रेटिस, अत्यंत विरक्त स्थितींत राहणारा असतांनाहि, त्याचा मित्र युरिपैडीज यानें रचलेल्या शोकरसप्रधान नाटकाचा प्रयोग पाहण्यास आदरपूर्वक जात असे. तेव्हां नाटकांची अभिरुचि विद्वत्तेस लांच्छनास्पद होय, अशांतला कांहीं एक प्रकार नाहीं. वर सांगितलेला प्रख्यात नट ग्यारिक यानें तर साऱ्या जन्मभर रंगभूमीवरच निर्वाह करून, श्री व कीर्ति यांचा लाभ करून घेतला. त्यांतून ज्या आमच्या विद्वज्जनांस साहेबी बूट खाण्याची व आपल्या गौरकाय प्रभूचा मिथ्यास्तव करून जिव्हा विटाळण्याची बिलकुल शरम वाटत नाहीं, त्यांस नाटकगृहांत जाण्याची, किंबहुना रंगभूमीवर येऊन आपल्या देशबंधूंस रंगविण्याची येवढी लाज कशाला वाटायाला पाहिजे, हें आम्हांस समजत नाहीं.

नाटकांचे प्रतिपक्षी म्हटलें म्हणजे तीन प्रकारचे लोक होतः— एक धार्मिक, दुसरे अरसिक व तिसरे कृपण. धार्मिक म्हणजे परमार्थपरायण लोक. परमार्थ म्हटला म्हणजे परलोकसाधनाच्या मार्गाचें अवलंबन व इंद्रियनिग्रह यांच्या योगानें साध्य व्हावयाचा. तेव्हां अर्थातच लोकव्यवहारास व ऐंद्रिय सृष्टीस जो पराङ्मुख व इहलोकीं आपणांस वाटसराप्रमाणें चार दिवस काढणें आहेत, ते कसे तरी काढले म्हणजे झालें. इतकाच ज्याचा हिशोब, त्यास प्रत्यक्ष भरत ऋषीनें इंद्रसभेपुढें रंभादि पात्रांकरवीं केलेला प्रयोगहि तुच्छ होय, हें उघड आहे. इंग्लंडांतहि एके काळीं असल्या विरक्त मंडळीची राशियत झाली होती. तेव्हां पहिल्या प्रथम साऱ्या नाटकगृहास कुलपें बसलीं. ग्रीक लोकांतला प्रख्यात तत्त्ववेत्ता प्लेटो यानेंहि आपल्या मनःकल्पित ' प्रजासत्ताक राज्यां 'तून नाटक्यांस व सोंगाड्यांस

हांकून लाविलें आहे. नटाचें मुखावलोकन न करण्याविषयीं आमच्या देशांतील धार्मिक मंडळीचाहि केवढा कटाक्ष आहे, हें सांगण्यास नकोच. तर ऐहिक मोहांत गुंतविणारे जे नाटकादि प्रकार, ते धार्मिक मंडळीच्या दृष्टीनें निषिद्ध होत, हें उघड आहे. हा पहिला प्रतिपक्षीवर्ग झाला.

दुसरा वर्ग अरसिकांचा. ही मंडळीसुद्धां जगांत थोडी आहे असें नाहीं. यांस खावें, प्यावें, ल्यावें आणि सुखांत पडलेलें असावें, याखेरीज दुसरें कांहीं दिसत नाहीं. मोठा उत्तम वनाचा देखावा असू द्या, मोठी उत्कृष्ट कादंबरी कोणी वाचीत असो, किंवा कोणच्याहि प्रकारची मोठी मौजेची एखादी गोष्ट असो; वरच्या मठ्ठ मंडळीस कसची मजा आणि कसचा चमत्कार ? हें बिलकुल भासायचेंच नाहीं. असल्या खबरदार गड्यांस अनुलक्षून एका संस्कृत कवीनें ब्रह्मदेवापाशीं प्रार्थना केली आहे, तीच बरोबर आहे. कवि म्हणतोः—

इतर पापफलानि यथेच्छया
वितरितानि सहे चतुरानन ।
अरसिकेषु कवित्वनिवेदनं
शिरसि मा लिख मा लिख मा लिख ॥

"हे चतुरानना ! माझ्या पातकाबद्दल मला आणखी काय पाहिजे तितकीं शासनें कर; पण बाबा, अरसिकाला कवित्व सांगत बसण्याची कटकट मात्र माझ्या कपाळीं नको, नको, नकोच लिहूं !" या प्रार्थनेवांचून आणखी काय म्हणावें ?

राहिलासाहिला तिसरा वर्ग, कृपण मंडळींचा. यांचें मुळीं व्रतच, कीं या लोकांचा परमसखा म्हणजे काय तो पैसा; यास्तव त्याच्या यत्किंचित् अंशाचा जरी वियोग झाला, तरी तो त्यांस प्राणहानीहूनहि दुःसह ! तेव्हां, रुपया किंवा आठ आणे गमावून, नुसता तमाशा डोळ्यांनीं पाहावयाचा, यापुरतें त्यांच्या दृष्टीनें कोणतेंहि मूर्खत्व नाहीं, हें ठीकच ! पण हें स्पष्टपणें बोलून कोणीं दाखवावें ? तेव्हां अर्थातच 'इसापनीतीं'तील आंबट द्राक्षांची हिकमत लढवणाऱ्या कोल्ह्याप्रमाणें कांहीं तरी खुसपटें काढीत बसायचीं. 'नाटकांत काय फायदा आहे ? नाटकांनीं लोकनीति बिघडते, नाटकवाले

म्हणजे दरवडेखोर होत, नाटकी लोक म्हणजे काय हलकट' इत्यादि प्रवाद ऐकूं येतात, ते अशा कृपणांच्याच तोंडून निघालेले ऐकूं येतात.

याप्रमाणें नाटकांच्या प्रतिपक्ष्यांचे तीन मुख्य वर्ग सांगून, त्यांचें सामान्य स्वरूप वर्णिलें. आतां हे प्रतिपक्षी प्रस्तुत प्रघातावर काय दूषणें आणतात, तीं पाहूं—

नाटकवाल्यांवर सर्वांत पहिला मोठा ठपका म्हटला म्हणजे हा, कीं ते लोकांचा पैसा बुचाडतात. संगीतवाल्यांवर तर हा एक मोठाच गहजब आहे. किर्लोस्कर आणि को. म्हणजे सरासरी वासुदेव बळवंत आणि को. हिच्याच तोडीची कंपनी ! वाः ! केवढें जबरदस्त दूषण हें ! संगीतवाल्यांनीं लोकांच्या हातावर गूळखोबरें ठेवून, त्यांचें पागोटें कोठें हिरावून घेतलें काय ? किंवा आमच्या कायदे कौन्सिलांत चार दाढया एके ठिकाणीं मिळाल्या, कीं लोकांपासून लक्षावधि रुपये लुंगावण्याचें हत्यार जसें ताबडतोब तयार होतें, तसा तर दुष्यंत महाराजांनीं एखादा आक्ट झोकून दिला नाहीं ना ! या विलक्षण आरोपावरून, आम्हांस आथेल्लोवर आणलेल्या आरोपाची आठवण होते. त्याच्या श्वशुरांनीं जसें त्याजवर बालंट घेतलें, कीं या दुष्टानें माझी पोर भारून टाकली आणि त्यामुळें ती याच्या नादीं भरली आहे; त्यासारखाच प्रस्तुत भरतपुत्रावर या अरसिक किंवा मत्सरी मंडळीचा हा टोला आहे. यावर समर्पक उत्तर म्हटलें म्हणजे शेक्सपीयरच्या नायकानें राजदरबारापुढें जें दिलें, तेंच होय. आमचें तर या प्रकरणीं असें ठरीव मत आहे, कीं उत्तम नाट्य ही मनोरंजनाच्या उत्तम पद्धतींपैकींच एक होय; ती अत्यंत निर्दोष असून तीस इतर कलांप्रमाणें लोकाश्रय अवश्य पाहिजे. निदान इतकें तरी खरें कीं, ज्याप्रमाणें उत्तम पेढेबर्फी तयार करून, ती बाजारांत विकण्याचा हलवायास हक्क आहे व असल्या हलवायाच्या दुकानीं गिऱ्हाइकांची दाटी झाली असतां, त्यानें लोकांस टोपी घातली, असें होत नाहीं; त्याप्रमाणेंच, ज्याच्या अंगीं गाण्याचें किंवा अभिनयाचें कसब आहे, त्यानेंहि आपल्या गुणावर द्रव्यप्राप्ति करून घेतली, तर त्यांत त्यानें कांहीं गैर केलें, असें आम्हांस वाटत नाहीं. जर आमच्या शहाण्या, सद्धर्मी व दयाळू सरकारनें बाटलाबाईचा पुरस्कार करून, तिच्या जिवावर आम्हांपासून प्रतिवर्षी लाखों रुपये काढण्याचा सपाटा

चालवला आहे, किंबहुना वेशवाटाचेंहि आधिपत्य आपणाकडे घेऊन अखंड सुवासिनीस त्यांच्या सौभाग्याबद्दल स्वदस्तूरचें सर्टिफिकेट देऊन, माघुक जनांच्या प्रीत्यर्थ, 'राजा प्रकृतिरंजनात्' या महाकविवचनास सार्थकता आणण्याचें पत्करलें आहे; तर बिचारे डोंगरे किंवा किर्लोस्कर यांनीं तरी यांत एवढें कोणतें महापातक केलें बरें ? संगीतवाल्यांच्या पदरीं व्यर्थ पैसा पडतो. म्हणून जी लोकहितेच्छु मंडळी मनापासून हळहळते, तिनें कलालांच्या दुकानीं जाणारा पैसा अगर इंग्रजी बॅन्डबाजाची जी नवी फासन ऐन बाज्याच्या वेळीं चालू केली आहे, तिच्याकडे वेंचणारा पैसा, अथवा विलायती बूटवाले, विलायती चहाकॉफीवाले वगैरे मंडळींस जो आम्ही आश्रय देत आहों, तो पैसा,–असे हजारों प्रवाह बंद करण्याचे जर प्रयत्न केले, तर फार बरें होईल, असें आम्हांस वाटतें. त्यांतून असेंहि समजा, कीं नाटक-शत्रूंच्या ओरडण्यानें संगीतें वगैरे चटसारी बंद झालीं, तर लोकांच्या खिशांत राहिलेला पैसा एखाद्या सत्कार्यालाच लागला, असें घडेल काय ? अर्थसंचयाच्या दृष्टीनें जरी पाहिलें, तरी संगीताची अभिवृद्धीच आम्ही इच्छितों. लोकांच्या कानींकपाळीं कोरड्या आरोळ्या आजपर्यंत काय थोड्यांनीं मारल्या ? पण त्यांपासून काय निष्पन्न झालें आहे ? शेंकडों सभा व मंडळ्या निघतात, आणि 'तेरड्याचा रंग तीन दिवस' या म्हणीला पुष्टीकरण आणतात ! आम्ही उद्योग आरंभतों आकाशाला कवळायाचा, आणि खजिन्यांत पुरवठा पहावा तो जितक्यास तितका ! जेथें जेथें दामाजी-पंतावांचून गति नाहीं. मग अशा स्थितींत लोकांचें मनोरंजन व हित करून, अर्थ जोडण्याचा जर कोणी एखादा उपाय काढला, तर त्यांत काय गैर आहे ?

नाटकांवर कांहीं मंडळीचा असा आणखी एक मोठा आरोप आहे कीं, त्यांच्यापासून लोकांची नीति बिघडते. आतां या आरोपांत कितपत तथ्य आहे, यांचा विचार करूं.

वस्तुतः पाहिलें असतां, वरील आरोप एका अर्थीं खरा आहे. व दुसरे अर्थीं खोटा आहे. दुसऱ्या चार्लस राजाच्या कारकीर्दीत ड्रायडन वगैरे जे बीभत्स नाटककार इंग्लंडांत होऊन गेले, त्यांच्या कृति व त्यांच्या कृतींचे प्रयोग, हे दुराचारांस कितपत उत्तेजन देण्यास कारण झाले, याची कल्पना,

त्या काळाचा इंग्लंडचा इतिहास पाहिला असतां, कोणालाहि सहज होणार आहे. हें खरेंच आहे कीं, जो मनुष्य नाच–तमाशांच्या नादीं लागला, त्याची नीति धड कशी असेल ? व ती चांगली नसेल तर कितपत सुधारणार हें उघड दिसत आहे. मनुष्याचा नैसर्गिक धर्म म्हटला म्हणजे अनुकरण करणें हा होय. मग जें आचरण त्यास प्रयोगद्वारां रंगभूमीवर मोठ्या थाटमाटानें दाखविलें जातें, त्याचाच त्याच्या मनावर खोल ठसा उमटल्यास नवल कसलें ? त्यांतून लहान वयांत मन फार कोंवळें असतें, त्यामुळें त्यावर जो संस्कार प्रथमतः होतो, तोच मग दृढतर होऊन, बहुधा चिरकाल राहतो. यास्तव जपण्याची मोठी वेळ म्हटली म्हणजे पूर्ववय होय. त्या वेळेस बुद्धीला जें वळण मिळेल, तेंच पुढें बळावत जाऊन, कायम राहील. तेव्हां या रीतीनें विचार करतां, हें स्पष्ट आहे कीं बीभत्स नाटकें व त्यांचे प्रयोग, हे दोन्ही प्रकार, सर्वांस व विशेषतः अल्पवयस्कांस, सर्वथा वर्ज्य होत. यास्तव ते जेवढे टाळवतील, तेवढे टाळण्याविषयीं अवश्य प्रयत्न केला पाहिजे. या अर्थानें पाहतां, नाटकांवर येणारा आरोप यथार्थ होय असें म्हणावें लागतें.

पण सर्वच नाटकें वर वर्णिलीं तशीं असतात, असें कोण नाटकशत्रु प्रतिपादन करूं शकेल ? संस्कृतांतलीं दहापांच नाटकें अद्याप तगून राहिलेलीं आहेत; त्यांपैकीं एकहि वरील दोषास पात्र होईल असें आम्हांस वाटत नाहीं. त्याप्रमाणेंच अलीकडचे नाटकवाले पुराणांतील ज्या कथांचे प्रयोग करून दाखवितात, त्यांतहि वरील दूषणांस कितीसें स्थळ मिळेल, कोण जाणे ? आतां महाराष्ट्रदेशीय रंगभूमीवर आलीकडे पाश्चात्यांचे महानाट्याचार्यहि चमकूं लागले आहेत; मग त्यांचे प्रयोग पाहिल्यानें लोकांची दुराचाराकडे प्रवृत्ति होते, हा आरोप त्यांच्यावर करावयाचा असल्यास नकळे ! पण असें म्हणणें केवढें धाडसाचें होय, हें तज्ज्ञांस सांगावयास नकोच. मग एतद्देशीय नाटकांविषयींच एवढी कोल्हेकुई काय म्हणून ? आतां हें खरें आहे कीं, नाटकवाल्यांची जी स्थिति हल्लीं आमच्या देशांत आढळते, ती प्रतिष्ठितपणाची नाहीं. जो जातीनें उनाड, तोच बहुधा नाटकांत शिरून, स्त्री, देव व राक्षस या पुठ्यांतून पार जातां जातां, अगदीं कुचकामाचा होऊन बाहेर पडतो. त्याप्रमाणेंच प्रयोगप्रेक्षणार्थ जी

मंडळी जमते, तीहि म्हणजे रसिकतेनें प्रेरित होत्साती येते, असाहि सामान्यतः प्रकार थोडाच. ज्यास कोठेंतरी रात्र करमावयाची असते, ज्यास काम ना धंदा, अशांनींच तंबाखूच्या फक्या मारीत व हसतखिदळत थिएटरांत प्रवेश करावा. एक बूच उडाला कीं दुसरा उडवावा किंवा ऑपरा ग्लास डोळ्यांस लावून निर्लज्जपणाचा प्रकार करावा—हीच पुष्कळ अंशीं स्थिति! हें सर्व जरी खरें असलें, तरी त्यावरून, नाटकप्रयोग करण्याची प्रवृत्तींच मुळीं वाईट असें ठरतें काय? कां कीं वरील तर्कशास्त्र एकदां लढूं लागलें म्हणजे मोठा अनर्थ होणार आहे. पहा कीं, आमच्यातील तालीमबाज मंडळी म्हटली म्हणजे अक्षरशून्य व दांडगेश्वर अशी आढळते; यावरून कोणी प्रतिगदाधर अशी कोटी करूं लागला कीं. तालीम करणें हें निंद्य होय, तर चालेल काय? त्याप्रमाणेंच इंग्रजी शिकण्याचे परिणामहि आजपर्यंत मद्यप्रीत्यादि अनेक प्रकारांनीं प्रगट झाले आहेत; यावरूनहि वरील कार्यकारणभाव कोणी जुळवला, तर तें यथान्याय होईल काय? आतां वरील जन्यजनकभाव आजमितीलाहि पुष्कळांच्या मनांत वागत असून, तालीमबाजी म्हणजे दांडगाईपेक्षां प्रतिष्ठितपणाची लुंगेशाहि असें मानणारी व इंग्रजी छचोरीपेक्षां अज्ञानावस्थेंतला साळसूदपणा पत्करणारी मंडळी आमच्या देशांत थोडी निघेल असें नाहीं. पण हा सारा स्थूल अनुमानांचा व अतात्त्विक दृष्टीचा प्रकार होय! जोडी पेलण्यांत व दांडगेपणांत कांहीं नित्यसंबंध आहे काय? ए, बी, सी प्रभृति पाश्चात्य मातृका आणि बाटलाबाई, या परस्पर बहिणी बहिणी लागतात काय? मग हीच तत्त्वदृष्टि रंगभूमीकडे फेकली असतां, कोणाच्याहि सहज लक्षांत येईल कीं, भारताचार्यप्रणीत नाट्यकलेचा आणि नीतिमत्तेचा उभा दावा आहे, अशांतला कांहीं प्रकार नाहीं. नाट्य व अनीति यांचें क्वचित् साहचर्य आढळलें, तरी तें केवळ आगंतुक होय. अग्नि व उष्णता यांचें जसें स्वभावसिद्ध सामानाधिकरण्य आहे, तसा कांहीं हा प्रकार नाहीं. जेथें सामानाधिकरण्य केवळ आगंतुक आहे, तेथें वैयाधिकरण्यहि शक्य आहे, हें सांगावयाला नकोच.

तर वरील सर्व गोष्टी मनांत आणल्या असतां, हें उघड दिसणारें आहे, कीं आलीकडे विद्वान् मंडळींचें नाट्यकलेकडे अधिकाधिक लक्ष लागत चाललें

आहे, ही गोष्ट शोचनीय नसून, सर्व प्रकारें अभिनंदनीय होय. पूर्वोक्त वैयाधिकरण्य होण्यास, म्हणजे रंगभूमि आणि अज्ञान व अनीति यांची सांगड जी लोकांच्या मनांत पडली आहे, तिची ताडातोड होण्यास विद्वान् लोकांचा जवनिकेंत प्रवेश होणें हेंच एक साधन होय. नाट्यकर्म हें लोकशिक्षणाचें केवढें साधन आहे, हें आमच्या लोकांस अद्याप कळूं लागलें नाहीं. जशा शाळा, वर्तमानपत्रें, सभा वगैरे एकेक जबर तरफा लोकशिक्षणार्थ उपयोगी आहेत, त्याप्रमाणेंच देशोन्नतीचें एक प्रचंड साधन वरील कला ही होय. आथेन्स शहरांत नाटककारांचें इतकें प्राबल्य असे, कीं मोठमोठे सरदारहि त्यांस नमून असत. प्रत्यक्ष सॉक्रेटीस याजवरहि ग्रीक नाटककार आरिस्टाफेनिज, यानें प्रहसन रचून, त्याच्या देशबांधवांची त्याजविषयींची पूज्यबुद्धि नष्ट करण्याचा यत्न केला; व त्या यत्नास कालांतरानें काय फळ आलें, हें इतिहासज्ञांस विदित आहेच. नाटककारांच्या दुष्ट प्रभावाचें हें उदाहरण झालें; पण तेंच उलटपक्षींहि लागू आहे. समजा कीं, हल्लीं जोरांत चालू असणारें जें कोल्हापूर प्रकरण, त्याचा कोणी चतुर कवीनें रंगभूमिवर प्रयोग करविला, किंवा परवां लाखों माणसांची आहुति टेंपलसाहेबांनीं दामाजीशाही लढवून करून टाकली, तिचें प्रदर्शन प्रयोगद्वारां जर लोकांस कोणी करविलें, तर केवढें काम होणारें आहे बरें! फार तर काय?–पण वक्त्यासहि नाट्याची आवश्यकता फार आहे, हें जगांतील दोनतीन अप्रतिम वक्त्यांच्या उदाहरणांवरून ढळढळीत दिसतें. एवढा प्रचंड डिमॉस्थेनीस, पण त्यास कोणी एकानें एके समयीं विचारलें कीं, "महाराज! वक्त्याच्या अंगीं कोणता गुण प्रथमतः वसत असला पाहिजे?" वरील महावक्त्यानें उत्तर दिलें, "नाट्य!" "बरें दुसरा कोणता?"—"नाट्य!" "बरें तिसरा?" "नाट्य!" इंग्लंडांतला प्रतिडिमॉस्थेनीस् जो पिट्ट ऊर्फ च्याथाम, याच्याहि भाषणांत बाह्य आविर्भाव किती असे, हें मेकालेनें सांगितलेंच आहे. तिसरी स्वारी शेरीड्यान हे तर बोलूनचालून नाटकेच होते; वडिलापासून त्यांचा तोच क्रम चालत आलेला. तेव्हां, वॉरन हेस्टिंग्स् यास रामोशासारखा सभेपुढें उभा करून बर्क आणि फॉक्स यांनीं आपापला ताशेरा त्याच्यावर झाडल्यावर आणि ते मोकळे झाल्यावर, पुढें पाळी आली या ऐलैंडवासी वक्त्याची; तेव्हा त्यानें भरतखंडाच्या माजी

अधिपतीवर असा कांहीं तडाखा उडवून दिला कीं, विजापुरची, जणो काय, मुलूखमैदान तोफच ! सारे सभाजन केवळ तटस्थ होऊन गेले. सर्व श्रोतृसमाज कावराबावरा होऊन गेला. कोणास कांहीं सुचेना. यामुळें शेवटीं पार्लमेंट सभा ताबडतोब बंद करावी लागली. यांत मुख्य गोष्ट ही कीं, बोलण्याचा भडिमार चालला असतां, शेरीड्यान यानें असा अप्रतिम आविर्भाव आणला कीं, ऐन गर्दीत तो मूर्च्छित होऊन बर्कच्या अंगावर पडला; व बर्क यानें त्यांस सांवरून धरिलें ! या सर्व देखाव्याचें व विशेषतः या शेवटल्या नाट्याचें, मेकालेनें फार मनोवेधक वर्णन केलें आहे, तें आमच्या वाचकांनीं एकवेळ वाचून पहावें, इतकेंच आम्ही म्हणतों. तें वाचलें म्हणजे नाट्याभिनयाच्या ठिकाणीं केवढा अद्भुत प्रभाव आहे, याविषयीं त्यांची पुरती खात्री होईल असें आम्हांस वाटतें.

येथपर्यंत प्रस्तुत विषयाच्या संबंधानें बराच ऊहापोह झाला. आतां चांगलीं नाटकें वाचल्यापासून व त्यांचे प्रयोग पाहिल्यापासून काय काय फायदे आहेत, तें सांगून हें प्रकरण आटपतों.

नाटक हें मानवी संसाराचें चित्र होय, म्हणजे जसा चित्रकार हा मनुष्याचा चेहरा, वनप्रदेश वगैरे आपल्या कलमानें कागदावर किंवा कपड्यावर उतरून देतो, त्याप्रमाणेंच नाटककार हा मनुष्यावर येणाऱ्या नानाविध प्रसंगांचें व तज्जन्य विविध मनोवृत्तींचें यथावत् वर्णन करतो. यास्तव उत्तम नाटकांचें वाचन किंवा प्रेक्षण हें उत्कृष्ट तसबीर पाहण्याप्रमाणेंच अत्यंत आनंददायक होय. आतां तसबिरींतहि चांगला वाईट हा प्रकार जसा आहे, त्याप्रमाणेंच नाटकांतहि तो आहेच आहे. पण कोणी चित्रकारानें बीभत्स तसबीर काढली, म्हणून सारी चित्रकलाच जशी निंद्य होत नाहीं त्याप्रमाणेंच नाटकांतहि कांहीं कवींनीं दुराचार घुसडून दिला, म्हणून मुळीं नाटक वाचणें किंवा पाहणें हें निषिद्ध आहे, असें मानणें बरोबर होणार नाहीं. या जगांत बहुतेक वस्तूंची अशीच स्थिति आहे, कीं सर्वथा निर्दोष असें कांहीं आढळणार नाहीं. गुण व दोष हे प्रायः सर्वत्र भिन्न भिन्न प्रमाणांनीं मिश्रितच आढळतात. यास्तव शेक्सपियरचीं वगैरे नाटकें वाचतांना, ही गोष्ट चांगली ध्यानांत ठेवली पाहिजे. वरील महाकवीनें स्वतःच्या अभिरुचीनें म्हणा अगर तत्कालीन लोकांच्या दांडग्या

रुचीस अनुसरून म्हणा, आपल्या नाटकांतून जागोजाग पुष्कळच पाचकळपणा आणलेला आहे. उदाहरणार्थ, आथेल्लो नाटकांतला पहिलाच प्रवेश पहा म्हणजे खात्री होईल. पण या बीभत्सत्वानें परावृत्त न होतां, वाचकानें आपला मार्ग पुढें क्रमला पाहिजे. कां कीं असें तो न करील, तर गुलाबाचे काटे हाताला लागल्यानेंच फुलाचा वास घेण्यापासून पराङ्मुख होणाऱ्या मनुष्याप्रमाणेंच त्यास सदर कवीच्या कृतीपासून होणाऱ्या आनंदास मुकावें लागेल ! पण नीरक्षीर विवेचनरूप हंसव्रत जो पत्करील, त्यास कोणत्याहि नाटकांत बराच ग्राह्य अंश सांपडेल यांत संशय नाहीं. त्यांतून, आमच्या शाकुंतलादि नाटकांची तर वरच्या प्रकारें कांहींच तरफदारी करायला नको. आमच्या महाकवींच्या, शाकुंतल, उत्तररामचरित, वेणीसंहार इत्यादि कृति पाहून, कोणी बिघडेल ही गोष्टच कशाला ? वाचणारा किंवा पाहणारा निवळ धोंडा जर नसेल, तर वरील वाग्विलास त्यास खचीत मोहून टाकतील; व त्याची मनोवृत्तीहि प्रसन्नतर झालेली त्यास आढळेल. भवभूतीनें आपल्या उत्तररामचरित नाटकांत म्हटलें आहे—

अपि ग्रावा रोदित्यपि दलति वज्रस्य हृदयम् ।

" प्रत्यक्ष पाषाणहि रडूं लागेल व वज्राचेंहि हृदय उकलेल ! "—हाच प्रभाव आमच्या कविगुरूच्या अप्रतिम बुद्धिमत्तेचें फळ, जें शाकुंतल नाटक. त्याचा आहे. येवढे मठ्ठ व तत्त्वज्ञानाभ्यासजड थोरले मिल्ल, पण त्यांसहि चवथ्या अंकांत हुंदका आवरेना, असें त्यांच्या इतिहासवाणीवरून स्पष्ट दिसतें. इतर पाश्चात्य पंडितजनांविषयीं तर विचारूंच नका. कलकत्ता येथील सुप्रीम कोर्टाचा जज, महाविद्वान् सर विल्यम जोन्स् यानें इ. स, १७८९ सालीं स्वतः संस्कृत शिकून, शाकुंतलाचें इंग्रजींत भाषांतर केलें मात्र, तों त्या नाटकानें साऱ्या युरोपांतले महापंडित हालवून सोडले ! फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांतील रसिकवर्यांची दृष्टि आमच्या कविकुलगुरूच्या नायिकेनें दिपवून टाकली. आज टेम्स, ऱ्हाइन, मिसिसिपी वगैरे नद्यांच्या तीरीं वेदघोष चालू आहे, व साऱ्या जगभर संस्कृत विद्येची महति झाली आहे. त्या सर्वांस कारण म्हटलें तर शाकुंतलाचें पूर्वोक्त भाषांतर ! तात्पर्य, म्लेंच्छांच्या मुलखांतून ज्या सरस्वतीचा येवढा प्रभाव गाजला, तिच्या मूळ जन्मभूमीचें ठिकाणीं मात्र ठणठणाट व्हावा, हें शकुंतलापुत्राचें अभिधान

धारण करणाऱ्या या देशास मोठें भूषणावह होणार आहे, असें आम्हांस वाटत नाहीं ! !

तर एतद्देशीय नाटकांच्या वाचनाचें किंवा प्रेक्षणाचें येवढें भय बाळगण्याची मुळींच जरूर नाहीं. त्यांपासून निदानपक्षीं मनोरंजन तरी होईल; आणि ज्याच्या त्याच्या रसिकतेच्या व ग्राहक शक्तीच्या मानानें त्याच्या हृदयवृत्ति उत्तम दशेला येऊन दृढतर होतील, तेव्हां हा फायदा काय, लहान आहे ? आतां हें खरें आहे, कीं वरील फळ नाट्यकला जेव्हां उत्कृष्ट अवस्थेस येऊन पोंचेल तेव्हां विशेष होणार आहे. पण कोणतीहि कला अशा स्थितीस येऊन पोंचण्यास किती प्रयत्न सारखे चालू असावे लागतात व किती काळ जादा लागत असतो, हें कोणालाहि सांगायाला पाहिजे आहे असें नाहीं. सध्यां आमच्या देशांत वरील कला केवळ बाल्यावस्थेंत आहे; तीस परिपक्वता यावयाची म्हटली म्हणजे दीर्घ काळाचीं व विद्वत्परिश्रमाची आवश्यकता आहे, हें उघडच आहे. तर या रीतीनें करतां, विद्याविशिष्ट, मंडळीचें इकडे अधिकाधिक लक्ष लागण्याचीं जीं अलीकडे चिन्हें दिसूं लागलीं आहेत, तीं दुश्चिन्हें नसून, सुचिन्हेंच होत, असा आमचा मुक्रर अभिप्राय आहे. एतद्देशीय लोकांत सदभिरुचीचा प्रसार होण्यास, स्वतःच्या प्राचीन स्थितीचें ज्ञान होण्यास, आणि भाषांची आभिवृद्धि होण्यास, उत्तम नाटकांच्या प्रयोगासारखें प्रबल साधन आम्हांस दुसरें दिसत नाहीं. यास्तव 'नाटक शत्रूं'चे जे प्रलाप पत्रोपत्रीं प्रगट होताहेत, ते केवळ अरसिकतेचे उद्गार होत असें समजावें.

•••

# ७. शकुन

ग्रहाणां चरितं स्वप्नोऽनिमित्तोत्पादकं तथा ।
फलंति काकतालीयं तेभ्यः प्राज्ञा[1] न बिभ्यति ॥

वेणीसंहार

शकुन म्हणजे पुढें घडणाऱ्या शुभाशुभ गोष्टीचें सूचक, यावरून शकुन अर्थात् दोन प्रकारचे झाले; एक शुभ आणि दुसरा अशुभ. या दोहोंविषयीं निश्चित प्रमाण म्हणून कांहींच नसल्यामुळें असें अर्थातच होत असेल, कीं जें एका देशांत शुभ त्यासच दुसऱ्यांत अशुभ मानीत असतील, व अशुभास शुभ शकुन पुष्कळ गोष्टींवरून मानतात. पक्ष्यांच्या शब्दांवरून व गतीवरून कोणत्याहि आवाजावरून, पोरांच्या साहाजिक बोलण्यावरुन, नेत्रादि स्फुरण पावल्यावरून वगैरे; तसेंच मांजर, चास पक्षी कावळा, घुबड,[2] पिंगळा, कवडा[3] इत्यादि प्राणीहि शुभाशुभसूचक मानले आहेत. ग्रहांचे योग तर चोहोंकडे शुभावह व अशुभावह मानलेले असून आमच्या देशांत तर त्यावांचून कांहींहि चालत नाहीं. स्वयंपाकघरांत चुली घालण्यापासून तों मोठ्या मोहिमेस बाहेर पडण्यापर्यंत ग्रहांचें आनुकूल्य अगोदर करून घ्यावें लागतें.

---

१ " ग्रहांचें योग, स्वप्न, आणि अपशकून यांचें फळ केवळ काकतालीय न्यायानें दृष्टोत्पत्तीस येतें ! यास्तव जाणते पुरुष त्यांचा धाक मानीत नाहींत. "

२ या पक्ष्याचें संस्कृत नाव ' कौशिक ' असें मोठें पवित्र आहे, पण हल्लींचें त्याचें मराठींतील नांव उच्चारण्यासहि लोक भितात. तसें करणें पाप मानून त्याबद्दल बोलणेंच झाल्यास ' दिवाभीत ' हा त्या शब्दाचा पर्याय योजतात. या पक्ष्याचा शब्द अपशकुनी मानून लोक याविषयीं असेंहि सांगतात कीं यास दगड मारला असतां तो तें झेलतें, आणि उगाळीत बसतें; आणि त्या उगाळण्यानें तो दगड जसजसा झिजत जातो, तसतसें तें माणूसहि झिजत जातें, आणि शेवटीं मरतें !— या पक्ष्यास

आतां आपल्या लोकांत निरनिराळे प्रकार काय आहेत ते पाहूं. पहिला सर्वांत मोठा शकुन म्हटला म्हणजे मांजराचा होय. कोणी कांहीं कार्यानिमित्त बाहेर पडला, आणि वाटेनें मांजर आडवें गेलें, कीं गेली मसलत ! ही मांजराची गंमत पुष्कळांनीं पाहिली असेल. एखादे वेळेस दोघे चौघे कोठें निघाले असतां मध्येंच एखाद्या घरांतून मांजर निघतें व माणसाच्या भयानें तें रस्ता ओलांडून समोरच्या घराकडे पळत जाऊं लागतें. त्या बिचाऱ्या ध्यानींमनींही नसतें, कीं आपल्या साहजिक जाण्यानें या गृहस्थांस आपण अपशकुन करीत आहों, व आपल्या यदृच्छेच्या गतीचा जाणाऱ्या गृहस्थाच्या कार्यावर येवढा जबरदस्त परिणाम घडणार आहे ! वास्तव तें खुशाल बिनधोक जात असतें. पण इतक्यांत हे गृहस्थ हाकाटी करून दोघे इकडे होतात. दोघे तिकडे होतात; आणि त्यास हुसकूं लागतात. मांजरास आपणांवर एकाएकीं येवढा गहजब गुजरण्याचा अर्थ कांहींच न कळून बिचारें अगदीं गांगरून जातें. आणि इकडे पळ तिकडे पळ अशी त्याची त्रेधा उडतें ! मग त्या धांदलींत बहुधा या गृहस्थांच्या इच्छेविरुद्धच त्याचें गमन होतें ! याप्रमाणें घडणाऱ्या शकुनास बळेंच माघारीं फिरविण्याचा त्यांचा यत्न निष्फळ झाला असतां हे हिरमुसले होऊन माघारीं फिरतात. किंवा

---

( मागील पानावरून )

एके ठिकाणीं मात्र मोठा मान असे; तो अशा तशा ठिकाणीं नव्हे तर अथेन्स शहरांत ! त्या लोकांची मुख्य विद्याधिदेवता जी मिनर्वा तिला हा पक्षी प्रिय असून तिच्या निशाणावर याची प्रतिमा असे. असा जगद्विलक्षण मान त्या चतुर लोकांनीं या पक्ष्यास देण्याचा आशय असा दिसतो कीं, विद्येच्या उपासकांचें आणि मिनर्वा देवीच्या आवडत्या अशा या पक्ष्याचें पुष्कळ साम्य दिसतें, तें असें— दोहोंची निशाचरवृत्ति, जगापासून अलिप्तपणा, मुद्रा गंभीर, आणि एकंदर व्यवहार शांतपणाचे !

२. हा शब्द 'कपोत' शब्दाचा अपभ्रंश दिसतो. हा पक्षी अशुभसूचक होय. हें मोरोपंतांच्या पुढील आर्येवरून दिसून येईल. विदुर शकुनीस उद्देशून म्हणतो—

'हा न भला बुडवाया शिरला या राजमंदिरीं कवडा '

— सभापर्व

त्या अपशकुनावरहि कांहीं तडजोड चालवून पुनः मार्गस्थ होतात! याप्रमाणेंच विधवेचें दर्शन, प्रेत समोरून येणें, वगैरेहि अशुभसूचक होत. हिंदुस्थानांत म्हणजे शिंद्यांच्या होळकरांच्या वगैरे मुलुखांकडे शिंकणें हेंहि अपशकुन मानतात. वाटेनें निघालें असतां कोणी शिंकतां कामा नये. गाईकवाडाच्या मुलखांत विधवेप्रमाणेंच विधुराचेंहि मुखावलोकन अशुभ धरतात. असे अपशकुनाचे अनेक प्रकार आहेत.

आतां कांहीं शुभ शकुन सांगतों. सकाळचे प्रहरीं कोल्ह्याचें तोंड दृष्टीस पडणें, डावा डोळा लवणें, उजवा बाहु स्फुरण पावणें वगैरे. तसेंच घराच्या बाहेर पडतांच सवाष्ण बायका कडेवर पाण्यानें भरलेल्या घागरी घेऊन सामोऱ्या येणें. हा शेवटचा शकुन फार उत्कृष्ट समजतात व मागील पद्धतीच्या श्रीमंत लोकांची अशी चालही सांगतात कीं, ते कांहीं एखाद्या मोठ्या कार्यास बाहेर पडले असतां दहा पांच बायका वर सांगितल्याप्रमाणें मुद्दाम तयारी करून स्वारी घराबाहेर पडते आहे तोंच त्यांस सामोऱ्या याव्या अशीं आधींच तजवीज करून ठेवायाची! तसेंच ज्या वाटेनें बडी स्वारी जायची त्या वाटेंत कोणी अपशकुनी माणूस येऊं नये म्हणून अगोदर शिपायांनीं पुढें धांवून बंदोबस्त करून ठेवायाचा! हें वाचून सर्व सुविचारी मनुष्यांस हसूं आल्याखेरीज राहणार नाहीं. एक तर शकुन अपशकुन म्हणजे सारी निवळ भ्रांति. त्यांतून त्यांस यदृच्छेनें घडूं न देतां अपशकुनास पिटून लावून चांगल्या शुभ अशा शकुनास मुद्दाम कैद करून आणून पुढें उभे करणें व तसल्या मारून मुटकून आणलेल्या शकुनाचें शुभत्व मानणें म्हणजे मूर्खत्वाची कांहीं सीमाच झाली!

एकंदर लोकांची दुसरीहि एक मोठी चूक अशी दृष्टीस पडते कीं, एखाद्या गोष्टीचा खरेपणा किंवा खोटेपणा तिच्या स्वरूपावरूनच न पाहतां ते नेहमीं बहुमताकडे धांवत असतात! म्हणजे शरीराच्या संबंधानें जसें जिकडे पुष्कळ मंडळी असतील तिकडे जाणें सुरक्षित, तसेंच मनाच्याहि संबंधानें असेलसें त्यांस वाटतें. सगळ्यांची वाट ती आपली वाट! हाच एकंदर जगाचा कल लक्षांत आणून कोणीं तत्त्वज्ञानें म्हटलें आहे—

गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः—

" एकानें केलें म्हणून दुसऱ्यानें करावें हाच प्रकार या जनांचा आहे; परमार्थ म्हणजे तत्त्व जाणणारा थोडा " तसेंच कालिदासाचें वचन आहे--

सन्त परीक्ष्यान्यतरद्भजन्ते मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः ।

" जे ज्ञाते आहेत ते दोन्ही पक्ष पाहून चांगलें आढळेल तें पसंत करतात; पण मूर्खांचा प्रकार वेगळा, त्यांचा--अभिप्राय नेहमीं दुसऱ्यांवर टेकलेला असतो. "

बरें, पण शकुनादिकांवर ज्याचा पूर्ण भरंवसा आहे, त्याला जर कोणी विचारलें कीं, तूं हें सर्व खरें मानतोस, तर याचा दाखला तूं कोणता पाहिला आहेस ? तर तो मनुष्य उगीच बसावयाचा नाहीं; तसा ठोका आल्याचीं तो पांच सात उदाहरणें सांगेल. आणि त्यावरून सिद्धान्त करील कीं, हें सर्व खरें आहे. हीच अशा लोकांची मोठी चूक असते. जेवढीं आपल्या तर्फेचीं म्हणजे शकुन पटल्याचीं उदाहरणें असतात तेवढींच ते घेतात, पण त्याच्या उलटचीं मात्र बिलकूल घेत नाहींत.

शकुनांनीं आमची जशी पाठ पुरविली आहे तशी थोड्यांचीच असेल ! आम्हांस त्याशिवाय इकडच्या इकडे बहुधा हालतांहि येत नाहीं. कोणतेंहि काम हातीं घेण्यापूर्वी तिथि, वार, नक्षत्रें वगैरे काय म्हणतात तें अवश्य समजून घ्यावें लागतें, आणि त्यांचा रुकार पडला तर सगळ्या गोष्टी. करायचें काम कितीहि निकडीचें असलें तरी वरील सल्ला अगोदर घ्यावा तेव्हां तें करायास लागावें. कधीं नव्या नवसानें सद्बुद्धि सुचून एकदां बेत आरंभण्याचें आम्ही मनांत आणणार, तों चमत्कार पाहा,— त्या दिवशीं आपला शुक्रवार ठेवलेला ! आमच्या देशांत जागोजाग ज्या सभा, मंडळ्या, समाज वगैरे खंडोगणति उत्पन्न होतात, आणि लवकरच चोहोंकडे सामसूम होतें; त्यांस वरील वाराची तर बाधा होत नसेलना !— अशा प्रकारच्या नानाविध निरर्थक निर्बंधांनीं वेळ, पैसा याचा व्यर्थ व्यय होऊन कार्यास पुष्कळ वेळां मोठाच व्यत्यय घडतो, आणि वेडेपणाचीं शुष्क भयें मनांत माजतात.

पण वरील प्रकार नुसता मूर्खपणाचाच झाला. याहूनहि उद्वेगकारक शकुनांचे आणखी परिणाम घडून येतात ते सांगायाचेच आहेत. ते असे.

जोंपर्यंत शकुन हे पशुपक्ष्यादिकांवरच असतात तोंवर मोठीशी वाईट गोष्ट झाली असें म्हणतां येत नाहीं. घुबड, पिंगळे, वगैरे पक्षी; किंवा मांजर, गाढव वगैरे जनावरें यांचा मनुष्यानें कितीहि त्रास मानला, तरी त्यांत त्यांचें कांहीं वाईट नसतें; म्हणजे त्या योगानें त्यांस मनुष्यापासून उपद्रव पोंचतो किंवा त्यांची मानहानि होते असा कांहींसा प्रकार घडत नाहीं, पण प्रत्यक्ष मनुष्याकडेच जेव्हां हें शुभाशुभत्व येतें तेव्हां बरीक मनुष्याच्या अंगभूत मूर्खत्वाचा व उद्धटपणाचा कळस होतो. म्हणजे मनुष्यजातींतच एकानें दुसऱ्यास विनाकारण भ्रष्ट, अपशकुनी, अमंगळ असें मानावें हें लज्जास्पद होय. धर्माधर्मांत व राष्ट्राराष्ट्रांत हा वेडगळ व निंद्य प्रकार किती आहे हें सर्वांस माहीत असेलच.

आमचे शेवटले बाजीराव पेशवे दहा घटका दिवस येईपर्यंत मुसलमानांचें तोंड पाहात नसत, आणि त्यांचेच बंधु माजी गायकवाड खंडेराव महाराज हे ब्राह्मणाच्या दर्शनाचा अपशकुन मानीत! या दिग्विजयी समशेर-बहादुरांनीं शेवटीं शेवटीं आपल्या* वंशाचा धर्म सोडून ते अगदीं इमाम बनले होते व साठ लक्षांची एक रत्नखचित चादर मक्केस पाठविण्याकरितां त्यांनीं तयार केली होती हीहि गोष्ट सर्वांस महशूर असेलच. त्यांच्या ब्राह्मणद्वेषाची व एकंदर स्वभावाची एक चमत्कारिक गोष्ट येथें लिहिल्या-वांचून राहवत नाहीं. एके दिवशीं सकाळीं खासा स्वारी शिकारीस निघाली होती. बरोबर त्यांचे मंत्री, मयत भाऊ शिंदे, हे होते. स्वारी शहराबाहेर पडत असतांच रस्त्यांत एक गरीब ब्राह्मण एका बाजूस उभा राहिलेला दृष्टीस पडला. खंडेराव महाराजांची सहज त्याजकडे नजर गेली

---

*वरील शब्द वाचून आमच्या ख्रिस्ती बंधूंस आमची केवळ पोरबुद्धि वाटून हंसू येईल हें आम्हीं जाणतों! पण गेल्या महिन्याच्या अंकांत त्यांच्या एका बंधूनें निबंधमालेच्या आठव्या अंकावर जी एक ताण झाडली आहे ती पाहिली असतां त्यास हंसण्यास फारशी जागा राहणार नाहीं. सदरील अंकांत त्या पुस्तककारानें आमच्यावर कृतघ्नत्वाचे वगैरे जे आरोप ठेवले ते कांहीं अपूर्व आहेत! आणि त्या सर्वांत एक तर फारच भयंकर आहे; कोणता? तर ‘ जो धर्म आपली महाराणी अंतःकरणपूर्वक पाळीत आहे त्याची मनास वाटेल तशी निंदा ’ आम्ही केली आहे! आमच्या मलि-

मात्र, तों लागलींच मागें वळून मागल्या हत्तीवर भाऊ शिंदे होते त्यांस महाराज म्हणाले, "हा दोड ब्राह्मन आमच्या म्होर कां आला ? आज चांगली शिकार सांपडली तर बरें नाहीं तर याला मारून टाकायाचा !" मग उशीर काय ? लागलींच त्या भटजीस पकडून भाऊंनीं आपल्या कांहीं लोकांबरोबर त्यांस वाड्यांत पाठवून दिलें. पण त्याबरोबर त्या लोकांस हळूंच असेंहि सांगितलें कीं आपल्या शिकारखान्यांतला एक वाघ काढून त्याला लवकर आमच्या अगोदर शिकारीच्या वाटेवर एका जाळींत दडवून ठेवा. त्याप्रमाणें त्या लोकांनीं केलें. अमळशानें महाराजांची स्वारी तेथून जाऊं लागली तों भाऊंनीं तो वाघ दाखविला. मग काय ? तात्रडतोब मर्जी सुप्रसन्न होऊन उद्‌गार निघाला, "कां भाऊ ! ब्राह्मन लई पायगुणाचा, शिकार तर अक्षी पहिल्या झपाट्यांत घावली !" नंतर भाऊंनीं सुचवलें कीं, आतां परत गेल्यावर त्या ब्राह्मणाला कडीं, कंठीं घातलीं पाहिजेत. त्यांस महाराजां-

---

( मागील पानावरून )

कामाअझमा महाराणीचें राज्यवैभव ख्रिस्ती धर्मास बळकटी आणण्यास कसें उपयोगी पडलें व आमच्या दयाळू राज्यकर्त्रीनें आपला १८५८सालचा जाहीरनामा रद्द करून मिशनरीस व बाट्यांस मात्र तोंड सोडण्यास कोणत्या आक्टानें मुभा दिली हें आम्हांस माहीत नाहीं. एकंदरींत आम्हांस यांचें फारच आश्चर्य वाटतें कीं, जे दोहो धर्मांची परस्पर तुलना करुन आपखुषीनें ख्रिस्ती झाले, ज्यांनीं गेलीं वीस वर्षें त्या धर्माच्या सत्यतेचा जातीनें अनुभव घेतला व त्याविषयीं सतत विचार केला, ज्यांनीं आमचे बिचारे शास्त्री पुराणिक यांस केव्हांच वादांत हटवून त्यांच्या धर्माची असत्यता त्यांच्या पदरांत घातली,व तेव्हांपासून आम्हां पापी लोकांच्या हृदयांत सत्याचा व ज्ञानाचा उजेड पाडणाऱ्या मंडळींत जे प्रमुख आहेत, त्यांनीं खऱ्या धर्माविषयीं चांगलीं सबळ प्रमाणें आम्हांस मुळींच न दाखवतां 'बाबावाक्यं प्रमाणम्' या महावाक्यावरच सरते शेवटीं आणून काय तें थडकवले ! एकूण जसा प्रभू बदलेल तसा त्याबरोबर धर्माचा खरेपणाही बदलतो असें आमच्या 'सत्यदीपिका' कारांचें म्हणणें झालें ! म्हणजे मोंगलांचें राज्य होतें तोंवर महंमदी धर्म खरा, पेशव्यांचें होतें तोंवर ब्राह्मण धर्म खरा, आणि आतां महाराणीचें झालें म्हणून ख्रिस्ती धर्म खरा ! वाहवारे सत्य आणि वाहवारे दीपिका ! !

चाहि रुकार पडून स्वारी माघारी आल्यावर जो ब्राह्मण अगदीं घाबरून जाऊन मरणाची वाट पाहात होता त्याची एकदम वरील संकल्पाप्रमाणें मोठी संभावना झाली ! असो; तर धर्माच्या हेकटपणानें असे विचित्र प्रकार घडूनयेतात.

आतां विशेषतः आपल्याच लोकांत चालू असणारें कांहीं प्रकार येथें सांगतो. पहिला मोठा अपशकुन विधवा स्त्रियांचा. या करुणास्पद विषयां-विषयीं क्षणभरहि विचार करतांना ज्याचें हृदय अत्यंत खेदानें व संतापानें व्याप्त होऊन जात नाहीं त्यास केवळ पाषाणहृदय व अधमाधम म्हणण्यास कांहीं हरकत नांहीं. स्त्रियांचें जिणें मुळींच पराधीन असल्यानें व संसार दुःखाचें मोठें ओझें त्यांच्यावरच नेहमीं असल्यानें त्यांची स्थिति एकंदरींत कठीणच.

हा प्रकार आमच्या देशांत अत्यंत लांछनरूप होय यांत संशय नाहीं, असो; यासंबंधीं जितकें लिहावें तितकें थोडेंच. प्रस्तुत स्थलीं इतकेंच सांगतों कीं, ज्या अपशकुनाच्या प्रकारासंबंधानें सध्यां आम्हीं लिहीत आहों तो सर्वथा व्यर्थ आहे हें तर आहेच; पण शिवाय तो मानणें हें विषद्‌ग्रस्त मानवी प्राण्याचा उपमर्द करणेंहि होय. केवळ दैवयोगानें किंवा यदृच्छेनें प्राप्त होणाऱ्या स्थितिविशेषावरून मनुष्यास मंगळ किंवा अमंगळ मानानें हा केवढा अन्याय आहे! स्त्रियांचें वैधव्य हें जर त्यांच्या अशुभत्वास कारण, तर बाप, भाऊ, बहीण वगैरे कोणी मेल्यानें त्यांच्या नातेवाईकांचें तरी कां तोंड बघावें ! पण मुळींच हा केवढा मूर्खत्वाचा प्रकार आहे? जी अत्यंत सदाचरणानें आपलें आयुष्य क्रमून आपल्या कुलास तर काय, पण सगळ्या मनुष्यजातीस भूषण आणीत आहे--कारण मनुष्याचें अंतःकरण स्वभावतःच किती अस्थिर व दुष्ट असतें हें सर्व प्रसिद्धच आहे!--त्याच साध्वीचें दर्शन पुरतें तेरा दिवसहि जाऊं न देतां जो निर्लज्ज व विषयांध पुनः नवरा मुलगा होऊन उभाच, अशा पुरुषानें अशुभ मानावें हा केवढा उलटा न्याय ! !

याप्रमाणें मुळावर आल्याचेंहि एक मोठें बंड आहे. एखादें मुलगें जन्मतांच आई किंवा बाप यांतून कोणीं मेलें, किंवा दुसरे कुटुंबांतील मनुष्य गमावलें, कीं आलें तें अपेश त्या बिचाऱ्या पोराच्या माथीं ! मग

त्या पोराला कोणी चैन पडूं द्यावयाचें नाहीं. एखाद्या वैऱ्याशीं जसें वागावें त्याप्रमाणें त्या पोराचे सारखे हाल चालायाचे. याहूनही भयंकर प्रकार सुनेचा. ती घरांत आली, आणि सासू, सासरा, नवरा व इतर आप्तसंबंधीं हीं सारीजण पुढें बरींच वर्षें निभावलीं तर ठीकच गोष्ट, नाहींतर मधेंच जर कांहीं विपरीत झालें कीं, त्या बिचाऱ्या पोरीचें नशीब उसकटलें ! नवऱ्यांची स्वारी दुर्व्यसनी निघून त्यांत जरी पुढेंमागें त्यांचा शेवट झाला, तसेंच सासूस, सासऱ्यास वगैरे अशाच स्वतःच्या मूर्खपणानें किंवा आकस्मिक रोगानें मृत्युपंथास लावलें कीं, सारें सुनबाईच्या प्रारब्धाचें फळ ! अशा प्रकारचीं उदाहरणें आमच्या सर्व वाचकांस कांहींना कांहीं तरी माहीत असतीलच, यास्तव याविषयीं आणखी विस्तार करण्याची बिलकूल गरज नाहीं व हा केवढा घोर अन्याय आहे हेंहि एखाद्या शुद्ध टोणप्याखेरीज हवें त्यांस सहज समजणारें आहे.

आतां हें शकुनाचें वेड केवळ आमच्यांतच आहेसें नाहीं, तर युरोपांतील अगदीं अगदीं अलीकडच्याही कित्येक मोठमोठ्या नामांकित पुरुषांमध्यें होतें याचा थोडासा मासला दाखवतों. लॉर्ड बायरन् म्हणून इंग्लंडांत सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं एक मोठा नामांकित कवि होऊन गेला. त्यास एके समयीं इंग्लंडाहून पत्र आलें असतां तें फोडण्याच्या अगोदर तो म्हणाला, "या पत्रांत कांहीं वाईट बातमी मला खास समजायाची आहे." असें म्हणून त्यानें पत्र फोडून वाचून पाहिलें तों खरेंच ! त्या प्रसंगीं त्यानें असा लेख लिहिला आहे--"काल रात्रींपासूनच मला कांहीं चमत्कारिकच वाटत होते, कीं माझ्या परिचयांतला कोणी मरण पावला; आणि पाहतों तों तसें खरेंच. असा ठोका आल्यावर शकुनांवर विश्वास कसा ठेवूं नये ? सर वॉल्टर स्कॉट् याचा दिव्य दृष्टीवर[1] विश्वास असे; रॉसी (फ्रेंच कवि) झाडाच्या बुंधाशीं नेम धरून त्यावरून पाही, कीं मरणोत्तर आपण अक्षय नरकांत पडणार कीं नाहीं; गेटी (जर्मन कवि) चाकूवर तोंडाचा वाफारा टाकून पाही कीं आपण हातीं घेतलेलें काम तडीस जाईल कीं नाहीं !"

---

१. दिव्य दृष्टि म्हणजे पुढें होणाऱ्या गोष्टींचें अगोदर ज्ञान होणें. ही शक्ति कोणाकोणामध्यें असते असें स्कॉटलंडांतील कित्येक लोक मानतात.

सॉक्रेटिसाचा गुप्त यक्ष होता म्हणून जें म्हणतात तें कांहीं खोटें नव्हे; मंक ल्युईस् यालाहि तशीच कोणी देवता अनुकूल होती; आणि नेपोलियनाला पुष्कळ दैवी सूचना वारंवार होत! आपल्यां लोकांत जसे घातवार मानतात तसाच वरील कवीचा प्रकार होता. तो शुक्रवारीं कोणास भेटा-वयास जात नसे. याप्रमाणें आणखीहि पुष्कळ चमत्कारिक गोष्टी सांगतां येतील. हाच बायरन् ज्या वेळेस ग्रीस देशांत मृत्यु पावला त्या वेळेस एक मोठी भयंकर वावटळ सुटली होती; व हाच प्रकार नेपोलियन व क्रॉमवेल यांच्या मरणासमयीं झाला. जुलीयस सीजर ज्या दिवशीं मारला गेला त्याच्या आदल्या रात्रीं विलक्षण उत्पात चोंहोंकडे झालेले प्लुटार्क यानें त्याच्या चरित्रांत लिहून ठेवले आहेत. त्याचें कवितारूप शानदार वर्णन शेक्सपीयरच्या प्रसिद्ध नाटकांत आहे. त्यांत सीजरच्या बायकोला कसलें स्वप्न पडलें, तिला त्याचें किती भय वाटलें,[1] व त्याला मारण्यास टपलेल्या लोकांपैकीं एकानें त्याचा लाक्षणिक अर्थ सीजरला कशा चातुर्यानें बनवून सांगितला, हें सर्व या नाटकांत आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांनीं वाचलें असेलच. असो, अशीं उदाहरणें आमच्या इकडे इतिहासांतील मुळींच देतां येत नाहींत; कारण तो लिहिलेलाच नाहीं. तरी टिपू सुलतानाचें एक उदाहरण आहे. श्रीरंगपट्टण घेतल्यावर टिपूचे कागदपत्र जे सांपडले त्यांत त्यांचीं स्वप्नें व त्यांचा अर्थ केलेला असा एक लेख सांपडला. त्यांतील एक स्वप्न मोठें चमत्कारिक आहे. मराठयांचें लष्कर आपणांवर चालून येत आहे हें त्यास माहीत असतां त्यांस एकदां असें स्वप्न पडलें कीं एक तरणा मनुष्य आपणाकडे येऊन आपणांशीं बोलतो आहे. पण बोलतां बोलतां बदलून आपणांकडे येऊन आपणांपुढें स्त्री उभी आहे असें त्यानें पाहिलें. या स्वप्नाचा सुलतान साहेबांनीं असा अर्थ केला कीं मराठे हें पहिल्यानें मोठे शूरसें दिसतील पण लढाईत केवळ बायकांप्रमाणें नामर्द ठरतील.

---

१. असाच प्रसंग 'वेणासंहार' नाटकांत आहे. भानुमतीस एक अत्यंत अशुभ स्वप्न पडून तें तिनें आपल्या नवऱ्यास सांगितलें आहे. निबंधारंभींचें पद्य दुर्योधनाचीच वरील प्रसंगींची उक्ति होय.

वरील उदाहरणांवरून कित्येकांस कदाचित् असें वाटेल कीं निबंधांत जें आम्ही प्रतिपादन केलें त्याचें वरील मोठमोठ्या उदाहरणांनींच खंडण होतें. पण असें बिलकूल नाहीं. प्रस्तुत निबंधांच्या अग्रभागीं दुर्योधन महाराज जसें म्हणताहेत तसेंच आम्हांस वाटतें कीं शकुनादिकांचा कसाहि ठोका मिळाला तरी ज्या अर्थी तो नियमानें मिळत नाहीं त्या अर्थी तसें केवळ काकतालीय न्यायानें घडतें असें म्हटलें पाहिजे. त्यावर पूर्ण भरंवसा ठेवून भिणें हें शहाण्यांचें काम नव्हे. तर मग वरील शहाण्यांनीं तरी त्यावर कसा भरंवसा ठेवला ? असें कोणीं विचारल्यास त्यावर आमचें उत्तर इतकेंच आहे कीं, त्यांचा तरी त्यावर पक्का विश्वासच होता असें नाहीं. एखाद्या भलत्याच नादास लागून मोठे शहाणेहि जसे फसतात तसाच हा त्यांचा केवळ नाद असेल, यापेक्षां कांहीं नाहीं. त्यांची जर त्याविषयीं पक्की खात्रीच झाली असती तर तसें त्यांनीं खचित लिहून ठेवलें असतें व सबळ प्रमाणें दाखविलीं असतीं. पण वरील गोष्टी तशा बिलकुल नसून त्यांच्या मनानें घेतलेल्या समजुती मात्र त्यांत दाखवल्या आहेत. असो; तर एकंदरींत शकुन वगैरे सर्व निवळ भ्रम आहेत, त्यावर विश्वास ठेवून कोणीहि हर्षविषाद मानूं नये; व त्यांचें भयहि बिलकूल बाळगूं नये.

# ८. गर्व

या निबंधांतील विषयाचें वरील नांव पहातांच आमच्या बहुतेक वाचकांस असें वाटेल कीं, या विषयावर नवें तें लिहिण्यासारखें काय आहे? गर्व ही मनोवृत्ति दुष्ट असून ती सर्वथा त्याज्य होय हें उघडच आहे; मग तींविषयीं मोठें विवेचन केलें तरी अधिक काय सिद्ध होणार? जो मनुष्य गर्विष्ठ म्हणून लोकांस माहीत झाला त्याची सर्व हेळणा करितात, व त्या दुर्गुणाखालीं त्याचे असते नसतेहि गुण बहुधा लोपून जातात, हा प्रकार जनांत पुष्कळ दृष्टीस पडतोच; तर याप्रमाणें प्रस्तुत विषयावर सर्वांचा निर्णय अगोदरच ठरला असून त्यावर जास्त विचार करण्यासारखें कांहीं नाहींच असें बहुधा सर्वांस वाटेल.

पण वरील निर्णय सर्वांशीं अगदीं खराच आहे असें नाहीं व प्रस्तुत विषयावर सविस्तर उपपादन करण्यास जागाहि पुष्कळ आहे, हें पुढील मजकुरावरून आमच्या वाचकांस दाखविण्याचा आमचा उद्देश आहे. या पुढील मजकुरांत आजपर्यंत परंपरेनें चालत आलेलीं कांहीं जुनीं मतें व एकंदर लोकांचें साधारण समज यांत पुष्कळ ठिकाणीं विरोध पडलेला दिसेल. असो, आतां पहिल्यानें याचाच विचार करूं कीं, गर्वाची ‘मद’ या पर्यायानें षड्रिपूंत जी गणना केली आहे ती कितपत खरी आहे? कामादि षड्वर्गास आजपर्यंत मनुष्याचे रिपु म्हणजे त्याच्या हिताच्या आड येऊन त्यास अनर्थांत घालणारे मनोविकार असेंच सर्व म्हणत आले आहेत; पण हें म्हणणें केवळ एकदेशीय होय. असें अंमळ विचार केला असतां सर्वांस कळून येईल. कामक्रोधादि मनोविकृति केवळ अनावर होऊन त्यांचा मनुष्यावर पगडा झाला असतां मोठमोठे अनर्थ होतात हें खरें आहे; पण ते या जगांतून मुळींच नाहींसे झाले असें समजा, तर जगाची काय अवस्था होईल बरें? सर्वांत अग्रगण्य जो काम त्याच्या अभावीं तर जगाचा अवश्यमेव लयच होईल हें उघडच आहे. त्याच्यापुढें क्रोध. याचाहि समूळ नाश होऊन सर्वांनीं धर्मराजाची वृत्ति धरली, किंवा खऱ्या ख्रिस्त्याप्रमाणें एका गालावर मारली असतां दुसरा गाल पुढें करण्याचा निर्धार केला, तर

जगांत काय अनर्थ होतील! असो, याप्रमाणेंच बाकीच्या मनोविकारांविषयींहि समजावें. तेव्हां यावरून स्पष्ट दिसेल कीं, वरील सहा जण हे जगाचे केवळ शत्रूच आहेत असें नाहीं. उलट, असेंहि म्हणतां येईल कीं, ते जगाचे हितकर्ते मित्रहि पण होत. आणि आमचा असा पक्का भरंवसा आहे कीं, मनुष्याच्या शरीराचा जसा कोणताहि अवयव वावगा नाहीं, व कोणताहि व्यापार निरर्थक नाहीं, त्याप्रमाणेंच मनाचीहि गोष्ट होय. परमेश्वरानें मनाच्या ज्या निरनिराळ्या शक्ति निर्माण केल्या आहेत व त्यांस निरनिराळ्या वृत्ति जडवल्या आहेत त्यांस अहेतुक अनर्थावह म्हणणें हें धर्माच्या दृष्टीनें पाप व न्यायाच्या दृष्टीनें मूर्खत्व होय! आतां यावर जर कोणी अशी शंका काढील कीं असें आहे तर सर्व देशांतील ज्ञाते पुरुष व आपले शास्त्रकार यांनीं वरील मनोवृत्तींचा एवढा निखालस निषेध कां केला? तर तिचें समाधान करणें अवघड आहे असें नाहीं. एक तर असें कीं, वर जो निषेध सांगितला तो त्या त्या विकाराच्या अतिरिक्ततेचा समजायचा, साक्षात् त्या वृत्तीचाच नव्हे; कारण तसें असतें तर विवाह करणें हें पातक–कर्म मानलें असतें, 'काम' हा तिसरा पुरुषार्थ धरला नसता; आणि कामदेवाची हिंदु, ग्रीक वगैरे जुन्या राष्ट्रांत पूजा झाली नसती. त्याप्रमाणेंच थोर पुरुषांच्या कथांतून त्यांच्या क्रोधावेशांचें वगैरे जें प्रशंसापूर्वक वर्णन केलेलें असतें तेंही आढळतेना. दुसरें असें कीं, जगाच्या व्यवहारांत सामान्यतः पहातां वरील कामक्रोधादि वृत्तींचें योग्य आकलन फारच थोड्या ठिकाणी झालेलें सांपडतें; त्या दुर्धर होऊन मनुष्य अरिष्टांच्या कचाट्यांत सांपडलेलाच फार आढळतो. पण यास्तव या सामान्यतः दृष्टीस पडणाऱ्या प्रकारावरच मुख्यतः कटाक्ष ठेवून वरील अंमळ एकदेशीय वर्णन लोकांनीं केलें आहे हें उघड आहे. वस्तुतः पहातां वरील वृत्तिच अनर्थकारक आहेत असें नव्हे. परमेश्वरानें त्या मनुष्याच्या ठायीं ज्या ठेवल्या आहेत त्या उगीच नव्हेत. त्यापासून त्यास फार उपयोग आहे. इतकेंच मात्र कीं, त्यांस मनुष्यानें आपल्या नेहेमीं स्वाधीन ठेवून त्यांस आपण सर्वथा कधींहि वश होतां कामा नये. जसें, घोड्यावर बसणें. घोडा हा आपलें सामर्थ्य आणि वेग मनुष्याच्या अगदीं स्वाधीन करून देतो, आणि त्याच्या योगानें बसणारा चांगला चतुर असेल तर त्यास हवा तसा

उपयोग करून घेतां येतो हें सर्वप्रसिद्ध आहे. पण बसणारा जर कच्चा असेल किंवा मूर्ख असेल, तर घोड्याच्या अंगचे वरील दोन गुणच त्याच्या नाशास कारण होऊन तो बसणारास एखाद्या खड्डयांत नेऊन टाकणार नाहीं काय ?

वर काम आदिकरून सहा मनोविकारांविषयीं साधारणपणें जें प्रतिपादन केलें आहे तेंच प्रस्तुतच्या निबंधाचा विषय जो गर्व त्यासहि लागतें. म्हणजे तो वस्तुतः वाईट नसून त्याचा बरेवाईटपणा मनुष्याच्या बरेवाईटपणावरच सर्वथा असतो. तेव्हां यावरून वरील मनोवृत्ति अर्थातच दोन प्रकारची झाली. एक शहाण्या समंजस अशा लोकांच्या ठायीं जी आढळते ती, आणि दुसरी मूर्ख लोकांच्या ठायीं जी दृष्टीस पडते ती. आतां दोहोंविषयींहि अनुक्रमानें विवेचन करूं.

पहिल्यानें मूर्ख लोकांतला प्रकार. यांसच पहिल्यानें पुढें आणण्याचें कारण 'दुर्जनं प्रथमं वंदे' हें सर्वप्रसिद्ध सूत्र एक आहेच; आणि दुसरें असें कीं यांचीच कोटि जगदीशाच्या इच्छेनें जगांत फार मोठी आहे. तेव्हां बहुपक्षाचा अगोदर मान करणें हेंच आम्हांस उचित दिसतें. असो; आतां येवढ्या समुदायास गर्व जो बाधा करतो तो एका प्रकारानें नव्हे हें उघडच आहे. निरनिराळ्या द्वारांनीं आंत प्रवेश करून वरील 'रिपु' अंतःकरणरूप गडास सर करून घेतो. कोणास आपल्या बळाचा गर्व असतो. बलिष्ठ काय तो मी, माझ्याशीं सर्वांनीं बेतानें असलें पाहिजे, मला कोणाचें दुरुत्तर खपायाचें नाहीं, मी मात्र हवें त्यास हवें तें बोलणार, असें कित्येकांस वाटत असतें. जें संपादन केलें त्याविषयीं सदासर्वदा गर्व वहाणें हें मूर्खत्वाचें चिन्ह आहे. दुसरा प्रकार संपत्तीचा. हें तर गर्वाचें वरच्याहूनहि मोठें कारण होय. मनुष्य बळकट असूनहि जर त्यापाशीं कांहीं ऐपत नसली तर नुसत्या बळाला कोणी वचकत नाहीं. पण संपत्ति असली कीं, साऱ्या मनुष्यांस त्यांचा दरारा बाळगावा लागतो. थोडीबहुत सत्ता हातीं असल्यामुळें व पैशाचें मोठें पाठबळ असल्याच्या योगानें गरीबगुरिबांचा मनांत आल्यास नाश करण्याचें त्यांच्या हातांत बरेंच असतें. यामुळें जो तो त्यांच्याशीं नमून असतो, व पुष्कळ आशाबद्ध लोक त्यांजपाशीं नेहेमीं हांजी हांजी करण्यास तयार असतात. आपण थोर, आपण मोठे गुणवान्, आपल्या आश्रयावर इतक्या लोकांचा चरितार्थ चालला आहे, वगैरे प्रकारच्या

खऱ्याखोट्या प्रशंसा याच काय त्या त्यांच्या नेहेमीं कानीं पडल्यामुळें व आपल्या पाठीमागें आपणास लोक काय म्हणत असतील हें कधीं त्यांस स्वप्नींहि ठाऊक नसल्यामुळें, श्रीमंत लोक गर्वाचीं आगरें झालेले असतात यांत कांहीं आश्चर्य नाहीं. तसाच या लोकांचा आपल्या दागदागिन्यांचा आणि उंची पोषाकाचा गर्व. या गर्वाची व्यर्थता सोलन नामक विख्यात ग्रीक तत्त्वज्ञानें एके प्रसंगीं जशी स्पष्ट दाखवली तशी फारच थोड्यांनीं दाखवली असेल. त्यास कोणी राजानें आपलें वरील वैभव मोठ्या दिमाखानें दाखवलें असतां त्यानें थोड्याच शब्दांत त्याच्या गर्वाचें पूर्ण खंडन केलें. तो म्हणाला, " हे राजा ! तुजपेक्षां मोर मला जास्त श्रीमंत दिसतो, व त्याचा गर्वहि अधिक यथार्थ वाटतो ! "

असो; तिसरा प्रकार रूपाचा. याबद्दलचा अभिमान पुरुषास मुळींच शोभत नाहीं; तो बायकांचाच सर्वथा विषय होय. नवऱ्याची प्रीति आपणांवर स्थिर करण्याचें तें स्त्रियांस एक मोठें साधन असतें. यास्तव तें राखण्याविषयींची व वाढवण्याविषयींची त्यांची तर्तूद त्यांस शोभते, व पुरुषास आपल्या अंगच्या हिंमतीचा, हुषारीचा वगैरे गर्व जसा शोभतो तसाच स्त्रियांस आपल्या रूपाचाहि शोभतो. आतां शेवटला मोठा प्रकार विद्येचा. या सदराचा प्रस्तुत काळीं वरच्याहून पुष्कळ विस्तारानें विचार केला पाहिजे. कारण हल्लीं आमचा सगळा देश एकदम महानिद्रेंतून एकाएकीं जागा केल्यासारखा होऊन बहुतकरून घरोघर विद्वत्ता झालेली सध्यां दृष्टीस पडत आहे. आमच्या देशांत चोहोंकडे इतक्यांतच विद्वत्तेचा वगैरे जो फैलावा झाला आहे तो कांहीं अपूर्व आहे. मनुष्याच्या मनांत ज्ञानाचा प्रवेश होऊं लागला असतां प्रथमतः गर्वादि दुर्विकार त्यास जडतात. भर्तृहरीनें नीतिशतकांत म्हटलें आहे:—

यदा किंचिज्ज्ञोऽहं द्विप इव मदांधः समभवं
तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः ।
यदा किंचित् किंचित् बुधजनसकाशादवगतं
तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः ॥

जो कोणी शिकण्याचे विषय किती आहेत, मनुष्याची बुद्धि किती अल्प आहे, इत्यादि गोष्टींचा यथास्थित विचार करील त्यास मनुष्याचा

दा. क्र. १०८५६

आपल्या ज्ञानाविषयींचा गर्व किती मूर्खत्वाचा असतो हें तेव्हांच लक्षांत येईल. कोणीहि मनुष्य पहिल्यानें शिकूं लागला म्हणजे त्यास असें वाटतें कीं, मी जेवढें शिकणार आहें तेवढें आटपलें म्हणजे यापुढें मग काय उरलें आहे ! पण तोच मनुष्य जसाजसा अधिकाधिक ज्ञान संपादन करूं लागतो तसतसा ज्ञानाचा प्रदेश अधिकाधिक विस्तृत होत जाईसा त्यास दिसूं लागतो. याप्रमाणें होतां होतां ज्ञानाची सीमा आकाशाच्या सीमेप्रमाणें सरतेशेवटीं अगदीं अनंत होय अशी त्याची खात्री होते.

वरील गोष्ट ज्यांच्या पूर्णपणें मनांत बिंबली असेल त्यांस कळून येईल कीं, मनुष्याचें ज्ञान हें केवळ सापेक्ष आहे, म्हणजे अमुक अमुक मनुष्य शहाणा किंवा विद्वान् आहे असें जेव्हां आपण म्हणतों तेव्हां तो दुसऱ्या कोणाच्या मानानें पाहतां तसा आहे इतकाच अर्थ समजायचा.

वरील उपपादनावरूनच ही मोठी गोष्ट अर्थातच सिद्ध होते कीं, ज्ञान हें अनंत आहे; व यास्तव आपल्या मोठ्या ज्ञानाचा गर्व वाहणें हें मनुष्या-सारख्या अल्पज्ञ क्षुद्र प्राण्यास मुळींच शोभत नाहीं. आपणाहून ज्यांस कमी ज्ञान आहे त्यांजवर हवा तर त्यानें मोठा डौल मिरवावा; पण तो डौल खरोखरी म्हटला म्हणजे डोंगळ्यानें आपण मुंगीहून मोठे आहों म्हणून डौल मारण्यासारखा क्षुल्लक प्रकारचा होय. हीच गोष्ट मनांत आणून खरे ज्ञाते आहेत ते आपल्या ज्ञानानें फुगून जाऊन दुसऱ्याची अवहेलना कधींहि करीत नसतात. त्यांस आपल्या ज्ञानाची इयत्ता केवढी थोडी आहे, व आपलें अज्ञान केवढें अपरंपार आहे, या दोन गोष्टींचा मनास पूर्ण प्रत्यय येऊन चुकलेला असतो. हा प्रत्यय होणें हीच तत्त्वज्ञतेची खरी निशाणी आहे; आणि त्याच्याविरुद्ध प्रकार ही अत्यंत मूर्खत्वाची होय. यास्तव कोणा चतुर ग्रंथकाराचें असें एक वचन आहे कीं, तत्त्वज्ञाचें मत आपण ज्ञानशून्य आहों असें असतें व मूर्खाचें मत मी सर्वज्ञ आहें असें असतें !

येथवर प्रस्तुत विषयाच्या एका अंगाचा विचार झाला. म्हणजे कोत्या समजुतीच्या लोकांत गर्वाचे जे प्रकार दृष्टीस पडतात ते सांगितले. आतां वरील मनोवृत्तीचें दोषरूपत्व ज्या प्रसंगीं नाहींसें होऊन ती मनुष्यास उलटी शोभादायकहि होते त्यांचा निर्देश करतों.

गर्वाच्या ज्या प्रकारांविषयीं वर विचार झाला ते प्रकार आपल्या भाषेंत 'उन्मत्तपणा', 'ताठा', 'अहंपणा', 'मीपणा', वगैरे निंदाव्यंजक शब्दांनीं जे दर्शविले जातात ते होत. हे अर्थातच सर्वथा दूषणास्पद असून सर्व सुज्ञ लोकांहीं समूळ त्याज्य होत. पण यांच्यासारखें दुष्ट स्वरूप ज्यांचें नाहीं, असे कांहीं गर्वाचेच प्रकार सज्जन व थोर मनुष्यांचे ठायीं आढळतात. त्यांचें निरूपण यापुढें करतों.

जो तो मनुष्य आपापल्या ऐपतीप्रमाणें वागून आपणास शोभेल अशाच पोषाखानें बहुधा लोकांत मिरवतो, व असें करण्याबद्दल कोणास कोणीहि नांव ठेवीत नाहीं. ही मर्यादा मोडून जो नुसता डौल आपले ठायीं आणतो त्यास मात्र लोक हंसतात, व तें ठीकच आहे. आणि याचप्रमाणें आपल्या खऱ्या योग्यतेहून उगीच जास्त विद्वत्तेची जो घमंडी मारतो त्याचीहि दशा होते. पण आपल्या पायरीप्रमाणें जो जगांत वागतो त्यास जसें नांव ठेवतां येत नाहीं, त्याचप्रमाणें आपल्या वास्तविक योग्यतेनुरूप जो आपल्या गुणांचा खरा अभिमान मनांत बाळगतो तोहि दोषास बिलकुल पात्र होत नाहीं.

सार्वभौम राजास आपलें वैभव जेवढें बाहेर काढावें तेवढें शोभतेंच! वरील दृष्टांत ज्यास अगदीं यथार्थ वाटेल त्यास निरनिराळ्या देशांत होऊन गेलेल्या महान् महान् ग्रंथकारांचे वगैरे आत्मश्लाघेचे उद्गार वाचून अगदीं आश्चर्य वाटणार नाहीं, आणि ते वाचतांना हृदयवृत्ति कोणत्या प्रकारची झाली पाहिजे हेंहि त्यांस कळेल. असो; आतां या प्रकारचीं कांहीं उदाहरणें येथें घेतों.

इंग्लंडांत सुमारें दोनशें वर्षांपूर्वी मिल्टन् म्हणून एक मोठा नामांकित कवि होऊन गेला, हें सर्वांस विश्रुत असेलच. या कवीच्या लेखांत वर सांगितल्यासारखे आत्मश्लाघापर उद्गार जागोजाग सांपडतात. आपल्या काळच्या अरसिक लोकांत आपल्या अर्वाचीनत्वामुळें आपल्या अद्भुत कवित्वाचें तेज पडत नाहीं हें जाणून वरील कवीनें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, 'मी या काळीं न जन्मतां जर मागेंच जन्मलों असतों, तर बरें होतें!' हें एक उदाहरण झालें. दुसरे वर्ड्स्वर्थ नामक सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी निवर्तलेल्या कवीचें. त्याच्याहि लेखांत आत्मस्तुतीचे जागोजाग

उल्लेख आहेत. आमच्या संस्कृत कवींतहि वरील प्रकार नाहींसा ना हीं भवभूतीच्या ग्रंथांत कांहीं ठिकाणीं जे उल्लेख आहेत त्यांवरून गुणज्ञांची प्रशंसा व राजसत्कार हीं दोन्हीहि त्यास प्राप्त झालीं नाहींत हें स्पष्ट दिसतें. उलटी त्याची अरसिकांच्या पायीं विटंबना मात्र पुष्कळ झाली असावी असें दिसतें. यास प्रत्यक्ष प्रमाण—

ये नाम केचिदिह नः प्रथयंत्यवज्ञां
जानंतु ते किमपि तान् प्रति नैष यत्नः ।
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा
कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥

—मालतीमाधव

" जे कोणी आमची अवहेलना चोहोंकडे पसरवतात त्यांनीं पक्कें समजून ठेवावें कीं, त्यांच्याकरतां हा माझा मुळींच यत्न नव्हे. मला पूर्ण भरंवसा आहे कीं, ज्याचे मनाचे धर्म माझ्यासारखे आहेत असा पुढें मागें कोणीना कोणी तरी निपजेलच निपजेल; कां तर काळ हा अनंत आहे आणि पृथ्वी विस्तीर्ण आहे ! "

असाच, किंवा याहूनहि विशेष उद्दामत्वाचा प्रकार अगदीं अर्वाचीन संस्कृत कवि जगन्नाथ पंडित याच्याहि लेखांत आढळतो.

' भामिनी विलासा ' च्या पहिल्या भागांत प्रायः सगळ्या अन्योक्ति आहेत. त्यांत आरंभींच पंडितराय गर्जतात—

दिगन्ते श्रूयन्ते मदमलिनगण्डाः करटिनः
करिण्यः कारुण्यास्पदमसमशीलाः खलु मृगः ।
इदानीं लोकेऽस्मिन्ननुपमाशिखानां पुनरयं ।
नखानां पाण्डित्यं प्रकटयतु कस्मिन्मृगपतिः ॥

" मदस्रावानें ज्यांचीं गंडस्थळें मलिन झालीं आहेत असे मदोन्मत्त हत्ती दिगंतरीं आहेत असा जनवाद कानीं येतो; आणि सभोंवती पाहावें तों केवळ कारुण्यास पात्र हात्तिणी व क्षुद्र पशु हेच दृष्टीस पडतात; तर

अशा समयास मृगराज जो सिंह त्यानें आपल्या अत्यंत तीव्र नखांचें पांडित्य कोठें प्रगट करावें ! ”

असो. आतां सरतेशेवटीं आमच्या महाराष्ट्रभाषेंतील कवींकडे पाहूं. यांची तऱ्हा एकंदरींत बाकीच्या सर्व भाषांतील कवींहून अगदीं निराळीच असल्यामुळें, म्हणजे जेवढे काव्यरचना करणारे झाले तेवढे बहुधा साधूच असल्यामुळें वरील आत्मश्लाघेचा प्रकार यांत आढळणें कठीण हें सर्वांच्या सहज ध्यानांत येईलच. आणि खरोखरीच तसें आहे. साधूंचा आणि अहंकाराचा परस्पर अत्यंत विरोध असल्यामुळें पूर्वोक्त गर्वोक्तीसारखें त्यांच्या ग्रंथांत कांहीं आढळणार नाहीं. तथापि जरी कवित्वाचा गर्व न आढळला तरी तुकारामासारख्यांनीं आपले स्वतःविषयींचेहि अभिप्राय जागोजाग स्पष्ट बोलून दाखवतांना अगदीं कमी केलें नाहीं. जसें--

मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास कठीण वज्रास भेदूं ऐसे ।
मेले जित असों निजोनियां जागे जो जो जें जें मागे तें तें देऊं ।
भले तरी देऊं कासेची लंगोटी नाठाळाचे काठी देऊं माथा ।
मायबापाहुनी बहु मायवंत करूं घातपात शत्रूहुनी ।
अमृत तें काय गोड आम्हांपुढें विष तें बापुडे कडू किती ।
तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड जया पुरे कोड त्याचेपरी ।

असो.—पण हा प्रकार निराळा. वर दाखल केलेल्या उदाहरणांप्रमाणें जर आमच्या मराठी कवितेंतील स्थळें पहायाचीं असतील तर तीं दोन तीन कवींच्या ग्रंथांतच काय तीं सांपडतील. हे कवि मोरोपंत, रघुनाथ पंडित व रामजोशी हेच मुख्यतः होत. आतां यांपैकीं पहिल्याचे कांहीं उद्गार येथें सादर करतों.--

‘ मंत्ररामायणा ’ च्या शेवटीं ‘ विद्वत्प्रार्थनें ’ त वरील कवि म्हणतो—

जसे होती देव प्रमुदित शचीनायकवनीं,
तसे सारज्ञानें बुधजन मयूरेश कवनीं,
महाराष्ट्रग्रंथीं रसिक कवि जें तेच रमती,
परंतु ज्ञात्याची पळहि न असावी चर मती ॥

अनुक्रमांक 26586 दिः ...
क्रमांक 9226 नों. दि: ...

'आर्यामुक्तामाले' च्या शेवटीं म्हटलें आहे—

आर्यामुक्तमाला दाविन परि जरि तुम्ही न मागाल।
लागाल प्रभुकंठीं घालूं फुगवील कीं रमा गाल ॥

ज्या आमच्या कवीस अलीकडील महापंडितांनीं कवित्वाच्या पदावरून केव्हांच झुगारून दिलें आहे, व ज्याचे ग्रंथ छापून काढण्यापुरती त्यांची योग्यता अलीकडे कोणासहि भासत नाहीं, त्यानेंच आपल्या 'संस्कृती' विषयीं जेथें तेथें येवढी प्रौढी झोकावी हें आमच्या सर्व वाचकांस बहुधा मोठें विलक्षण वाटेल यांत संशय नाहीं, पण आमची तर अशी खात्री आहे कीं 'केकावली' सारख्या अप्रतिम काव्याच्या रचणारास जर वरील गर्वोक्ति शोभत नाहींत, तर त्या कोणत्याहि कवीस शोभणार नाहींत.

असो. मोरोपंताशिवाय दुसरे जे दोन कवि वर सांगितले त्यांच्या ग्रंथांत वरच्यासरखे आत्मश्लाघात्मक निराळे उल्लेख सांपडत नाहींत. प्रसंगोपात्त व काव्याच्या आरंभीं शेवटीं वगैरे आपलें नांव घालण्याची जशी कवींची चाल आहे त्याप्रमाणें मात्र त्यांनीं आपआपल्या कृतीस केलेलें आढळतें; व विशेष म्हटलें म्हणजे 'कविराय', 'कवींद्र' वगैरे उपपदें कोठें कोठें जोडलेलीं आढळतात, इतकेंच.

याप्रमाणें इंग्रेजी, संस्कृत व मराठी कवींनीं आपआपल्या ग्रंथांतून जे स्तुतिपर उद्गार जागोजाग उघडपणें प्रगट केले आहेत त्यांपैकीं कांहीं वर सांगितले. आतां यावर आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस बहुधा असें विचारणें येईल कीं, आपल्याच तोंडानें आपली स्तुति कधीं करूं नये. यावर आमचें असें उत्तर आहे कीं, वरील नियम जरी सामान्यतः पाहतां खरा आहे, तरी तो पुष्कळ ठिकाणीं अपवादक होतो. पहा कीं आपल्या स्वतः-विषयीं बोलणें हें जरी प्रशस्त नाहीं, तरी गिबन्, मिल्ल वगैरे ग्रंथकारांनीं आपलीं चरित्रें आपल्याच हातांनीं लिहून ठेवलीं आहेत, व त्याबद्दल कोणी त्यांस नांव ठेवीत नाहीं. इतकेंच नव्हे, पण तीं स्वरचित चरित्रें लोक उलटीं अधिक आवडीनेंच वाचतात. त्याप्रमाणेंच सीझर व बाबर यांनीं आपापल्या ग्रंथांत आपल्याच पराक्रमांचें जरी स्वतः वर्णन केलें आहे,तरी तें दोषरूप न होतां जगास प्रियच झालें आहे. तेव्हां यावरून काय स्पष्ट होतें बरें ?

अर्थात् हेंच कीं, स्वतःविषयींचें जरी वर्णन असलें, तरी जर तें यथार्थ आहे, तर दूषणास पात्र होत नाहीं. दुसरें असें कीं, गुणिजनांचे चहाते असून त्यापासूनच जेव्हां त्यांस अगोदरच मानमान्यता प्राप्त होते, तेव्हां आत्मश्लाघेचा प्रसंगच येत नाहीं. सत्परीक्षकांनीं केलेल्या प्रशंसेनें संतुष्ट होऊन गुणवान् मनुष्य आपल्या श्रमांचें सार्थक झालेसें मानतो, आणि स्वस्थ रहातो, पण वरच्याच्या विपरीत जेव्हां प्रकार घडतो,—म्हणजे गुणांची चहा न होतां उलटी थट्टा व हेळणा मात्र होते जेव्हां—

नैसर्गिकी सुरभिणः कुसुमस्य सिद्धा
मूर्ध्नि स्थितिर्न चरणैरवताडनानि– ॥

"सुवासिक पुष्पांची स्वभावसिद्ध योग्यता म्हटली म्हणजे डोक्यावर असणें ही होय, पायाखालीं तुडवून जाणें, ही नव्हे." हें विसरून जाऊन लोक एखाद्या महान् ग्रंथकाराची अवज्ञा करूं पाहतात, तेव्हां स्वतःची योग्यता प्रगट करण्यास आत्मप्रशंसेखेरीज मार्गच रहात नाहीं. तसें तो ग्रंथकार न करील तर मोठा तेजस्वी हिराहि जसा अजाणत्या अडाणी लोकांच्या हेळसांडीनें कोणीकडे लोपून जाऊन हरवेल, त्याप्रमाणेंच त्याचे गुणहि अप्रसिद्धच रहातील. वर ज्या कवींच्या ग्रंथांतून उतारे दिले आहेत त्या सर्वांनीं ही अवहेलना स्वतः अनुभवली असून तिच्या संबंधानेंच वरील दर्पोक्ति प्रगट केल्या आहेत. तेव्हां या रीतीनें पाहतांहि त्यावर गर्वाचा दोषारोप करतां येत नाहीं. याखेरीज वर एकदां सांगण्यांत आलेंच आहे कीं, आपआपल्या योग्यतेप्रमाणें उंची पोषाख केलेला जसा सर्वांस चालतो, त्यांत जनदृष्ट्या यांहीं वावगें दिसत नाहीं, तसाच ग्रंथकारांसहि यथायोग्य अभिमान असल्यास तो निंद्य होत नाहीं. तर इकडून पाहिलें असतांहि जे ग्रंथकार साऱ्या जगास वंद्य होऊन राहिले आहेत त्यांचा स्वतःविषयींचा गर्व राजाधिराजांच्या महावैभवाप्रमाणेंच दूषणास मुळींच पात्र न होतां त्यास उलटा भूषणास्पदच होतो.

# ९. टीकाकार कसा असावा ?

आतां ग्रंथावर टीका करणाराच्या अंगीं अवश्य गुण कोणकोणते हवेत तें सांगतों. प्रथमतः अर्थात्च मूळ ग्रंथाचें ज्ञान. हें असल्याशिवाय टिकाकार एरव्हीं केवढाहि विद्वान् असला तरी तें व्यर्थ होय हें उघड आहे. ही गोष्ट वास्तविक पहातां अगदीं स्पष्ट होय; कारण ज्या मनुष्यास एखाद्या वस्तूचें पूर्ण ज्ञान नाहीं, किंबहुना मुळींच नाहीं, त्यानें त्याविषयीं आपलें मत सांगणें हें मुळींच शोभत नाहीं हें अगदीं उघड आहे. पण मनुष्याच्या मनाचा असा कांहीं चमत्कार आहे कीं, स्वतःच्या अज्ञानाची केवळ कल्पनाहि त्यास सहन होत नसते. बेकन्नें कोठेंसें एक मोठें मार्मिक वचन लिहिलें आहे कीं, असे कित्येकजण आढळतात कीं ज्यांस आपणांस माहीत काय नाहीं तेंच माहीत नसतें! असो; तर ग्रंथावर टीका करण्यास निघालेले गृहस्थ अशा प्रतीच्या कामाचे नाहींत. आपण ज्याचे गुणदोष लोकांस दाखविणार तो ग्रंथ खरोखर आपणांस पुरतेपणीं समजला आहे, असा निश्चय झाल्यावरच टीका करणारानें त्या कामास हात घालावा. नाहींतर तो अर्धामुर्धा समजून तितक्यावरूनच जर गुणदोषविवेचनास आरंभ केला, तर तें त्या कर्त्याच्या उपहासास मात्र कारण होईल; व लोकांत सत्याचा प्रसार होणें एकीकडेच राहून मूर्खपणाचीं मतें मात्र चोहोंकडे माजतील.

दुसरा गुण सत्यप्रीति. हाहि गुण वरच्यासारखाच टीकाकर्त्याच्या अंगीं अवश्य असला पाहिजे. याची योग्यता तर वरच्याहूनहि अधिक आहे; पण त्याच मानानें तो जगांत फारच विरळा आढळतो. दुसऱ्याच्या ग्रंथावर जी टीका करायची ती केवळ सत्यास अनुसरूनच करायची, व ती करण्यांत सत्याचा उदय व असत्याचा ऱ्हास करणें येवढाच काय तो हेतु. हा प्रकार फारच थोडा सांपडेल. एरवीं टीका करणारांचे सामान्यतः उद्देश पाहिले तर द्वेषबुद्धीनें, मत्सरानें किंवा उगीच गमतीखातर दुसऱ्याची निंदा करावी, त्याची फजीति उडवावी, त्याची कीर्ति दूषित करावी, इतकाच असतो. किंवा इतकेंहि नसलें तरी निदान आपलें नांव लोकांपुढें यावें, आपली विद्वत्ता प्रदर्शित व्हावी, इतका तरी असतो. याविषयीं ह्यूम, जॉनसन्, मेकॉले हीं सर्व प्रसिद्ध उदाहरणें आहेत. पहिल्यानें आपल्या इंग्लंडच्या

इतिहासांत पुष्कळच खोटा मजकूर लिहिला असल्यामुळें त्याची पत आतां बुडाल्यासारखीच आहे; व दुसरे दोघे आपल्या हेकटपणाच्या लहरींत अनेक प्रसंगीं पुष्कळच भरकटले असल्यामुळें त्यांचीं मतें ग्रहण करणें तीं लोक फार जपून करतात. असो; तर सत्यरूप असें दैवत कडक व जाज्वल्य आहे. त्याच्या क्षोभापुढें मोठमोठ्या प्रचंड ग्रंथकारांचाहि चुराडा होऊन जातो! मग छोटेखानी लुटपुट्या ग्रंथकारांचा खुर्दा तर कोणीकडच्या कोणीकडे उसळून जात असेल कोण जाणे! असो; तर याप्रमाणें वर जी सत्यानुस्मरणाविषयीं आम्हीं जी सूचना केली आहे ती केवळ स्वार्थ दृष्टयाहि यथार्थ होय. ग्रंथाविषयीं जो यथार्थ विवरण करील म्हणजे गुण असतील तेवढे गुण व दोष असतील तेवढे दोष जो यथास्थित दाखवून देईल, त्याचीच टीका चिरकाल जगास मान्य होऊन राहील.

तिसरा गुण शांत स्वभाव. हाहि टीका करणाऱ्याच्या अंगीं अवश्य पाहिजे असून वरच्यासारखाच क्वचित् आढळतो. याचें कारण वरील कलमांतच आलें आहे. तें अर्थातच हें कीं, टीकाकर्त्यांची प्रवृत्ति मुळीं वर सांगितलेल्या द्वेषमत्सरादिकांनींच प्रायः होत असल्यामुळें वरील गुणास जागाच रहात नाहीं. क्रोधास वश होऊन जेथें चित्ताचा क्षोभ झाला तेथें शांतता कशी राहावी? पण क्षोभाचाहि उद्गार बाहेर पडण्यास मनास कांहींशी तरी शांति असावी लागते. ती मुळींच नसून चित्तास अतिशयित क्षोभच जर केवळ झाला असला तर मनाचे व्यापारहि नीट चालण्यास कठीण पडेल. कां कीं, ग्रंथ रचायचा म्हणजे सगळा विषय अगोदर साद्यंत मनांत आणून त्याची यथास्थित मांडणी करायची असते; व वाक्यरचना वगैरे जितकी उत्कृष्ट होईल तितकी साधावी लागते. तेव्हां हें सर्व क्षोभ पावलेल्या मनुष्यापेक्षां शांत, स्थिर मनाच्या मनुष्यास जास्त साधेल हें उघड आहे. हें एक झालें. दुसरें असें कीं, एखाद्या ग्रंथावर जो अभिप्राय देणें तो शांत, गंभीर व सभ्य अशा रीतीनें दिला असतां त्याचें कांहीं निराळेंच वजन पडतें. सारांश, टीकाकर्त्याचा अभिप्राय वकिलाप्रमाणें एकतर्फी कधीं नसावा, तर न्यायाधीशाच्या निर्णयाप्रमाणें केवळ सत्याच्या तर्फेचाच असावा.

चवथा गुण सहृदयता. सहृदयता म्हणजे ज्यावर टीका करावयाची त्यांत हृदयाचा पूर्ण अभिनिवेष होण्याची योग्यता. ही योग्यता अर्थातच

सर्व मनुष्यांच्या ठायीं असत नाहीं. अथवा असली तरी सारख्या प्रमाणानें असत नाहीं. जगांत जें एवढें मतवैचित्र्य दृष्टीस पडतें त्यास मुख्य कारण वरील होय. प्रत्येक मनुष्याची जन्मसिद्ध प्रकृतीच निराळी असल्यामुळें व पुढें ज्या ज्या अवस्था त्यास प्राप्त होतात त्याहि सर्वांच्या सारख्या नसल्यामुळें मनुष्यांमनुष्यामध्यें रुचिभिन्नत्व उत्पन्न होतें हें साहजिकच आहे. पण त्यांतूनहि कित्येक मनुष्यांच्या ठायीं वरील सहृदयता हा गुण इतरांच्याहून जास्त आढळतो. म्हणजे दुसऱ्याच्या मनोवृत्तीशीं आपली मनोवृत्ति मिळविणें हें त्यास सहज करतां येतें. हा गुण असणें हें मनाच्या किंवा हृदयाच्या विशालत्वाचें चिन्ह होय. आणि त्याचा अभाव हा त्याच्या उलट गुणाचें म्हणजे वरील दोहोंच्या संकुचितत्वाचें दर्शक होय. समजा कीं, जयदेवाच्या ‘ गीतगोविंद ’ काव्यावर किंवा मराठेशाहींत रामजोशांसारखे सुरस लावण्या करणारे जे कित्येक कवि झाले त्यांच्या कवनावर टीका करण्यास शुक्राचार्यांसारख्या परमहंसांनीं हातांत लेखणी घेतली, किंवा वृद्धत्वानें अगर सृष्टीच्या चुकीनें मदनव्यापारशून्य असणाऱ्या मनुष्यानें तें काम पत्करलें, तर टीका किती उत्तम तऱ्हेची होईल याचें अनुमान सहज करतां येईल ! एलिझाबेथ राणीचे खाजिनदार लॉर्ड बर्ले म्हणून कोणी होते, त्यांस स्पेन्सरच्या सर्व प्रसिद्ध काव्याबद्दल राणीनें त्यास कांहीं इनाम करून दिलें या गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटलें; त्या प्रसंगीं त्यांचा असा उद्गार निघाला, ‘ अहो, हें काय वेड आहे, नुसतें यःकश्चित् गाणें केल्याबद्दल येवढें इनाम ? ’ दुसऱ्या एका प्रसंगीं असें झालें कीं, कोणा काव्याची कोणी फार फार प्रशंसा केली असतां एका तत्त्वज्ञाचा उद्गार निघाला, ‘ अः—यांत काय आहे ? या काव्याच्या योगानें बाजारांत दाणे स्वस्त झाले कीं काय हें मला सांगा ! असो; तर एकंदरींत या सहृदयता गुणाची नुसत्या विद्वत्तेहून फारच अधिक योग्यता आहे. व म्हणूनच एखाद्या ग्रंथावरील अभिप्राय जरी मोठी विद्वत्ता खर्चून लिहिला असला तरी वरील गुणांच्या अभावीं वरील मत केवळ एक कवडीचा माल होय.

आतां खऱ्या टीकाकाराचें स्वरूप येथें थोडक्यांत सांगतों. ज्या ग्रंथावर टीका करायची त्याचें पूर्ण ज्ञान व त्याशीं सहृदयता हे तर गुण त्याच्या अंगीं अगोदर हवेत हें वर सांगण्यांत आलेंच आहे. पण यांहूनहि दुसरे जे

गुण सांगितले ते तर टीकाकर्त्यास अधिकच अवश्य होत. त्यांच्या योगानें टीकेस खरी शोभा व खरी योग्यता येते; व ती सर्वांस मान्य होते. फार तर काय,पण ग्रंथकर्ता जर समंजस असला तर तोहि तीस मान डोलावल्यावांचून रहाणार नाहीं. ही टीका म्हणजे अशी कीं, ती केवळ तिऱ्हाईतपणें व निःपक्षपातपणानें केली असून केवळ सत्यनिरूपणाखेरीज तींत टीकाकाराचा दुसरा बिलकुल कांहींएक उद्देश नाहीं असें स्पष्ट दिसलें पाहिजे.

येथवर प्रस्तुत विषयाचें बहुतेक विवेचन झालें. आतां या ठिकाणीं हल्लीं एकंदर लोकांत प्रस्तुत विषयाच्यासंबंधीं ज्या कित्येक विलक्षण समजुती नजरेस येतात त्यांविषयीं थोडेसें लिहिणें इष्ट वाटतें. या समजुतींपैकीं पहिली मोठी समजूत दृष्टीस पडते कीं, जो दुसऱ्याचे दोष काढतो तो तसें अहंपणानें फुगून जाऊन किंवा द्वेषबुद्धीनेंच केवळ करतो; यास्तव तो मोठा गर्विष्ठ व दुष्ट मनुष्य असावा. ही समजूत होण्यास कारणें कोणतीं झालीं आहेत हें मागील लेखावरून आमच्या वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच. पण ही समजूत नेहमीं खरी असायचीच असा कांहीं नियम नाहीं. अगदीं निकट संबंधाच्या व सारख्या स्वभावाच्या लोकांतहि मतभेद हरहमेश दृष्टीस पडतोच, व तो पडला असतां कांहीं विलक्षण आश्चर्याची गोष्ट झाली असें होत नाहीं, इतकेंच सांगतों कीं, वरील दोषविवेचन हें वरील दोन हेतूवरून जसा होण्याचा संभव आहे तसेंच पण तें केवळ सत्यनिष्ठेपासूनहि संभवतें. यास्तव तसा लेख लिहिणारावर वरील दोन मनोवृत्तींचा आरोप निखालसपणें करणें ही कांहींशी दांडगाईच होय. हें एक झालें; दुसरें असें कीं, ज्यानें गर्वानें किंवा दुष्ट बुद्धीनें दुसऱ्याची विनाकारण निंदा केली, त्यावर तोंच कडाका उठविण्यास त्या निंदिलेल्या मनुष्यास किंवा त्याच्या कैवाऱ्यास कोणी मनाई केली आहे? त्याच्या निंदेस आपण पात्र नाहीं असें ज्यास वाटत असेल त्यानें तो दोषारोप आपणावरून न उडवितां कां स्वस्थ बसावें? तसें न केलें तर आपण त्या सर्व दूषणांस कबूल आहों असें लोक समजतील हें त्यास कळत नाहीं काय? तर याप्रमाणें द्वेषमूलक निंदेपासूनहि यत्किंचितसुद्धां अनर्थ होण्याचा बिलकुल संभव नाहीं, हें उघड आहे. असो. दुसरी समजूत अशी कीं, आपणाहून जे थोर आहेत त्यांचे दोष काढण्यास आपणांस अधिकार नाहीं. ही समजूत आमच्या

जुन्या भोळ्या भाविक लोकांची जर असती तर तिचा आम्हांस मोठासा चमत्कार वाटला नसता. कारण वाडवडिलांविषयीं वगैरे आमच्या लोकांची पूज्यबुद्धि किती दृष्टीस पडते हें सर्वांस विदित आहेच; पण जुन्या वेड्या कल्पनांच्या दास्यांतून नवीन विद्वत्तेनें आपणांस मुक्त केलें म्हणून ते आपणांस परमधन्य मानतात, आजपर्यंत हिंदुस्थानांत इतके राज्यकर्ते होऊन गेले, पण सांप्रतच्या दयाळू सरकाराप्रमाणें मनाचें स्वातंत्र्य कोणीहि प्रजेस दिलें नाहीं म्हणून जे त्यांचे पोवाडे गातात, आपल्या थोर पूर्वजांची चारगटपणें निंदा करण्यास ज्यांनीं कधींच मागेंपुढें पाहिलें नाहीं, आमच्या प्रभूचा धर्म शांतीचा सागर असून तो जबरदस्तीनें नव्हे तर लोकांचीं मनें वळवूनच वाढविण्याची आम्हांस आज्ञा आहे म्हणून जे चोहोंकडे डांगोरा पिटीत आहेत त्यांनींच मेकॉले, मिल्ल यांसारख्या ग्रंथकारांची निंदा वाचतांच अंगावर शहारा आणून कानांत बोटें घालावीं, ही केवढी आश्चर्याची गोष्ट आहे! सर्व गुणांनीं संपन्न असा मनुष्य एकहि सांपडणार नाहीं तसेंच ज्यांत लेशमात्रहि दोष आढळणार नाहीं असाहि मनुष्य सांपडणें केवळ अशक्य होय. दोषांचा सर्वथा अभाव हा एक परमेश्वराचे ठायीं मात्र संभवतो. त्याचे मनुष्यानें स्पृहा करणें, किंवा त्याचें वास्तव्य आपल्या अंगीं मानणें, यांसारखें भयंकर मूर्खत्व कोणतेंच नाहीं! मग असें जर स्पष्ट आहे तर कोणी केवढाहि थोर असला तर त्याच्या ठायीं कांहीं ना कांहीं तरी दोष दिसल्यास व ते कोणी काढल्यास नवल कसचें? पण कोणी कदाचित् म्हणतील कीं, मोठ्याच्या अंगीं जरी दोष असले तरी ते लहानानें काढूं नयेत. हें म्हणणें म्हणजे चंद्रास कलंकी म्हणूं नये, सूर्याच्या बिंबावरचे काळे डाग पाहूं नयेत असें म्हणण्यासारखेंच असमंजस झालें. वरील दोन ज्योतींचा प्रकाश त्यांच्यावरील डागांनीं कमी होतो काय? किंवा त्या जगाचा नकाशा जे ज्योतिषी काढतात ते तसें करण्यानें त्यांच्या तेजाची निंदा करूं पाहातात काय? कांहीं नाहीं. त्यांचा उद्देश त्यांचें यथावत् स्वरूप प्रगट करणें इतकाच काय तो असतो. असो; तर याप्रमाणें कोणी केवढाहि मोठा असला तरी त्याचे दोष काढण्यांत कांहीं गैर नसून तसेंहि करणें अत्यंत उपयोगाचें आहे असेंहि आम्हीं वर दाखविलें. तिसरी समजूत कीं, वरील दोषाविष्करणानें त्यांचा उपमर्द होतो. हीहि समजूत अगदीं

खोटी आहे. मागें जें सांगितलें आहे कीं मनुष्यानें आपण सर्वगुणसंपन्न आहों असा अभिमान बाळगणें हें अत्यंत मूर्खत्व होय, हें जर खरें आहे तर आपल्या दोषांचें वर्णन सहज न होणें हा तरी वरचाच प्रकार झाला. जो मनुष्य आपल्या गुणांची लोकांनीं प्रसंशा करावी असें इच्छितो, त्यानेंच आपल्या दोषांची निंदा ऐकण्यासाठीं कां सिद्ध नसावें ? असो. तर वरील कारणांवरून सहज ध्यानांत येईल कीं, खरोखर जे आपल्या ठायीं दोष आहेत ते दाखविल्याचा सूज्ञ मनुष्यास कधीं राग येणार नाहीं आणि ते दाखविले असतां कोणाचा उपमर्द होतो हीहि समजूत अगदीं खोटी आहे.

पण ग्रंथकर्त्यास तर वरील गोष्ट विशेष लागू पडते. बाजारांतील जिन्नस चांगला वाईट ठरविणें हा हक्क जसा हवा त्यास आहे, तसाच ग्रंथाचें गुणदोषविवेचन करण्याचाहि साऱ्या वाचकांस आहे. वरील साम्य आमच्या कित्येक वाचकांस कदाचित् उपहासास्पद वाटेल; पण वस्तुतः पहातां ग्रंथकाराची आणि दुकानदाराची गोष्ट अगदीं सारखी आहे. अलीकडे तर छापखाने निघाल्यापासून वरील सादृश्य अधिकच दृढ झालें आहे. पण पूर्वीपासून जरी पाहिलें तरी सगळी दुनिया हाच कोणी बाजार, यांत आपला ग्रंथरूप माल घेऊन कीर्तिरूप द्रव्याच्या आशेनेंच सर्व ग्रंथकार येतात असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. मग असें जर आहे तर बाजारांत दुकानदारांची जी दशा होते तीच ग्रंथकारांच्या कपाळीं आल्यास त्यांनीं कां खेद मानावा ? म्हणजे हजारों गिऱ्हाइकें आणि त्यांचीं हजारों बोलणीं, हीं सर्व वरील दुकानवाल्यास निमूटपणें सोसणें जसें भाग पडतें, त्याप्रमाणेंच लोकांचे आपल्या ग्रंथावर नाना प्रकारचे अभिप्राय ग्रंथकारानें निमूटपणें ऐकून कां घेऊं नये ? यावर दुसरा दृष्टांत. रंगभूमीवर नाटकपात्र आलें असतां त्याच्या अभिनयाची किंवा एखाद्या सभेंत कोणी वक्ते उठून त्यांनीं भाषणास आरंभ केला असतां त्यांच्या वक्तृत्वाची परीक्षा करण्याचा अधिकार सर्व श्रोत्यांस नाहीं काय ? आणि समजा कीं, वरील दोघेजण आपापल्या कलेंत अत्यंत निपुण असतांहि सगळ्यांनीं टाळ्या पिटल्या व हुर्रेवडी करून दिली, तरी त्याबद्दल आपली मानहानि झालीशी वाटून त्या दोघांनीं सर्व लोकांवर बेअब्रू केल्याची जर फिर्याद केली तर तें त्यांस किती

शोभेल व कोर्ट तरी त्यांस काय जबाब देईल ? तर या वरील तीन दृष्टांतांवरून आमच्या वाचकांच्या तेव्हांच लक्षांत येईल कीं, कोणाच्याहि ग्रंथावर कोणास हवें त्यास हवा तसा अभिप्राय प्रकट करण्याची पूर्ण मोकळीक आहे.

आम्हांस एवढें स्पष्ट कळतें कीं, जर मेकॉले, जॉनसन् वगैरे हजारों मोठ्या, थोर मानलेल्या ग्रंथकारांनीं आपापल्या ग्रंथांतून मोटमोठे कवि, इतिहासकार, तत्त्वज्ञ, इत्यादिकांविषयीं हवा तेवढा कडक मजकूर लिहिला आहे व तो सर्वांस मान्य आहे; पोप कवीनें खुद्द बेकनला उद्देशून,

"The greatest, brightest, meanest of mankind"

"सर्व मनुष्यांहून अति बुद्धिमान्, अति चतुर, आणि अति नीच"

असें म्हटलें असतांहि जर पोपवर बेअब्रू केल्याचा गुन्हा येत नाहीं, व त्या जगद्विख्यात अद्वितीय पंडिताची विद्वान् लोकांतील कीर्तिहि लवमात्रसुद्धां कमी होत नाहीं; तर मेकॉले, मिल्ल यांसारखे ग्रंथकार केवढेहि मोठे असले, व त्यांस आम्हीं कितीहि शिव्या दिल्या असल्या, तरीहि पण वरच्याप्रमाणेंच कोणतीहि गोष्ट ठरत नाहीं.

असो; आतां सरतेशेवटीं वर सांगितलेल्या गुणांनीं विशिष्ट असे टीकाकार निपजले असतां भाषेचें व तद्द्वारां लोकांचें हित कोणतें होतें तें सांगतों. चांगलें वाईट अशी कांहींच निवडानिवड न करतां हवें तें अन्न खाल्लें असतां जसें शरीराचें पोषण होणें एकीकडेच राहून उलट्या व्याधी मात्र त्यास जडतात, त्याचप्रमाणें ग्रंथ वाचनाची ही गोष्ट होय. जे ग्रंथ खरोखर वाचण्यालायक असतील,—म्हणजे ज्यांची भाषासरणी उत्तम, विषय प्रतिपादन प्रौढ व सरस, ज्यांपासून मनोरंजन किंवा उपदेश अथवा दोन्हीहि एकदम प्राप्त होतात, असेच वाचणारांनीं वाचावे. पण हें होण्यास वरच्यासारखे ग्रंथ कोणते हें अगोदर अवश्य समजलें पाहिजे. हें ज्ञान वाचणारांस प्रथमतः मुळींच नसतें; तें अनेक ग्रंथांचें बहुत काल जेव्हां सतत परिशीलन करावें तेव्हांच प्राप्त व्हावयाचें. तेव्हां अमूक ग्रंथ वाचण्या-

सारखा आहे आणि अमूक नाहीं हें ज्ञान वाचकांस करून देण्यास अर्थातच निराळेच लोक पाहिजेत. हे लोक टीकाकार होत. मागील काळच्या श्रीमंतांच्या घरीं जसे चोखे बाळगलेले असत, कीं त्यांनीं पदार्थ वाढायला आला असतां अगोदर आपण चोखून तो नीट उतरला असला तरच आपल्या यजमानाकडे जाऊं द्यावा, त्यांच्या सारखेंच कांहीं अंशीं टीकाकर्त्यांचें काम होय. ग्रंथकार हे मुदपाकांतील पाकाध्यक्षासारखे होत. आपली सर्व करामत खर्च करून पदार्थ तयार करण्याचें त्यांचे काम एकंदर वाचणारे लोक हे पाटावर बसलेल्या यजमानांसारखे, त्यांस जातीनें पदार्थांचा बरेवाईटपणा फार करून कळायचा नाहींच; आणि ग्रंथांचे गुणदोष परीक्षक हे अर्थातच वर सांगितलेल्या चोखे मंडळीसारखे; त्यांच्या सर्वानुमतें किंवा बहुमतें जो पदार्थ पसार होईल तो मग पुढें खाशांकडे जायचा. असो; तर याप्रमाणें चांगले गुणदोषविवेचक असले म्हणजे एकंदर लोकांचें त्यांपासून एवढें हित होतें. हें एक झालें म्हणजे याच्या पोटीं दुसऱ्याहि अनेक गोष्टी आल्या. चांगले ग्रंथकार निवडले गेले म्हणजे तशांसच उत्तेजन मिळून त्यांच्या हातून उत्तरोत्तर भाषेची सुधारणा होत जाते. सरतेशेवटीं हाहि एक मोठा नफा सांगितला पाहिजे कीं, निःपक्षपात व सहृदय असे ग्रंथांचे परीक्षक असले म्हणजे बुद्धिमान् मनुष्यांस एरवींच्या साधारण लोकांप्रमाणें मूर्ख व दुष्ट अशा धनिकांचे आर्जव करण्याची किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पुढें पुढें करून पदरीं लघुत्व घेण्याची बिलकुल गरज नाहीं. तर त्यांच्या बुद्धिमत्त्वास अत्यंत अनुकूल, उचित आणि शोभादायक जी निःस्पृहता व स्वतंत्रता ती खुशाल मिरवावयास सांपडते.

● ● ●

# १०. संस्कृत विद्येची उपयुक्तता

बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते ।
पिपासितैः काव्यरसो न पीयते ॥

' लोकहितवादी ' म्हणतात कीं, " ही विद्या कांहीं उपयोगी नाहीं. जर असें नसेल तर मला कोणीं उत्तर द्यावें, कीं व्याकरणाचें पंधरा वर्षें अध्ययन केलें त्यापासून अमुक उपयोग होतो असें मला दाखवून द्यावें, म्हणजे मी वास्तविक म्हणेन. " आम्हीं रावबहादुरास असें परत विचारतों कीं ,जर संस्कृत व्याकरण निरुपयोगी, तर मराठी व इंग्रजीहि तसेंच असलें पाहिजे. मग ती शिकवण्याविषयीं आमचें सरकार इतका अट्टहास कां करतें ? इंग्रजी भाषेचीं आजपर्यंत छप्पन जणांनीं छप्पन व्याकरणें केलीं आहेत, व अजूनहि होत असून पुढेंहि होतील यांत संशय नाहीं. आमच्या सरकारचे आमच्या देशावर जे मोठाले उपकार झाले आहेत त्यांतलाच एक हा होय , कीं आमच्या भाषा आजपर्यंत ज्या सैरावैरा धांवत होत्या त्यांचें त्याच्या आश्रयाच्या योगानें नियमन होऊन त्या व्याकरणाच्या आळयांत आल्या. मग जे परिश्रम मराठी व इंग्रजी भाषांच्या संबंधानें स्तुत्य, तेंच संस्कृत भाषा आली कीं निंद्य झालें काय ? आतां यावर आमच्या प्रतिपक्ष्याचें कदाचित् म्हणणें पडलें कीं, व्याकरण शिकण्यास हरकत नाहीं, पण नुसत्या एका विषयाचा व्यासंग पंधरा वर्षें करीत बसणें , आणि त्यांत व्याकरणासारख्या रुक्ष विषयाचा, यांत काय अर्थ आहे ? इंग्रजी किंवा मराठी व्याकरण जसें भाषाज्ञानास साह्यभूत म्हणून शिकतात, त्याप्रमाणेंच संस्कृत व्याकरणहि तितक्या बेताचें शिकावें. उगीच पोकळ शब्दवाद वाढवण्यांत काय तात्पर्य ? या कोटिक्रमांत पुष्कळच गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. एक मोठी गोष्ट तर ही कीं, सदरील विषय अमुकपर्यंतच शिकावा व अमुकपर्यंत शिकूं नये. ही मर्यादा करण्यांत काय अर्थ आहे ? ज्यास जितकें अपेक्षित असेल किंवा जेथपर्यंत त्याचा बुद्धिप्रवेश होईल तेथपर्यंत तो शिकेल. कोणास समग्र विषयाची

माहिती करून घ्यावयाची असली तर त्यास आडकाठी करणारे रावबहादुर कोण ? नुसत्या अर्वाचीन इंग्रेजी भाषेचें व्याकरण शिकूनच न राहातां जे ॲंग्लोसॅक्सन् वगैरे भाषा शिकतात व शब्दव्युत्पत्तीचा थांग लावीत लावीत अगदीं मुळाशीं जाऊन थडकतात किंवा तितक्यानेंहि तृप्त न होतां इंग्रेजी शब्दांचीं दुसऱ्या छप्पन्न भाषांशीं जें नातीं जुळवीत बसतात, त्यांस आमचे नवीन कौंसलदार एकदम वेड्यांच्या इास्पितळांत नेऊन टाकतील काय ? येथील कॉलेजांतील माजी संस्कृत गुरु डॉक्टर हौ किंवा सध्यांचें उक्षतरणवासी मोक्षमुल्लर यांस जर " लोकहितवादी " विचारूं लागले कीं, " काय हीं इतकीं वर्षांचीं वर्षे तुम्ही नुसते शब्द कुटीत बसतां, व या भाषेंत अमकें रूप होतें, या भाषेंत अमकें चालू आहे, भाषेची उत्पत्ति अमक्या तऱ्हेनें झाली असावी, तींत कालगत्या असे असे फेरफार होत जातात, वगैरे पांडित्य करण्यांत तुम्ही कालक्षेप करतां, हें काय खूळ तुम्हीं माजवलें आहे ? तुमच्यापेक्षां रोटीवाल्याचा उद्योग मी फार चाहतों "— तर वरील शार्मण्यदेशीय पंडिताकडून त्यांस काय उत्तर मिळेल बरें ? दुसरें असें कीं, व्याकरणविषय आमच्या रावबहादुरांस जरी रुक्षत्वास्तव अप्रिय असला तरी तेवढ्यावरून तो सर्वांस नापसंत झालाच पाहिजे असें आहे काय ? व्याकरण, गणित, न्याय ( तर्कशास्त्र ) धर्मशास्त्र ( कायदे ), वगैरे विषय पुष्कळांस रुचिपरत्वें करून कंटाळवाणे वाटतात, म्हणून तेवढ्यावरूनच ते त्याज्य झाले ? आपणास जें आवडेल तेंच इतरांस आवडलें पाहिजे असा आग्रह धरणें हें किती असमंजस होय ! आतां बारा बारा, पंधरा पंधरा वर्षे एकच विषय धरून बसणें हें चांगलें कीं वाईट याचा जर विचार केला, तर इकडूनहि आमचे जुने शास्त्री केवळ मूर्खच ठरतील असें आम्हांस वाटत नाहीं. एकच कां विषय होईना, पण तो पुरतेपणीं येणें हें चांगलें, कीं अनेक विषय अर्धेमुर्धे येणें हें चांगलें, याविषयीं विचार केला असतां कोणाच्याही लक्षांत येईल कीं सर्वांनीं गुडघाभर पाण्यांत पोहण्यापेक्षां एकेका विद्येंत एकेक जण पारंगत असणें हें फार चांगलें. सर्व विद्या देशांत सामग्र्यानें जागृत राहण्यास वरीलच साधन उत्कृष्ट होय, हें उघड आहे. अर्थशास्त्रांत श्रमविभागाचा जो सिद्धांत आहे तोच इकडे व सर्वत्र लागू पडण्यासारखा आहे. त्यांतून परमेश्वराच्या कृपेनें आमच्या देशांत धारणाशक्तीचा असा दुष्काळहि

नाहीं कीं, एक एक शास्त्रच झेंपतां झेंपतां पुरेसें होऊन इतरांकडे अवलोकन होणेंही दुरापास्त व्हावें. चार शास्त्रांचें किंबहुना सहांचेंहि आकलन केलेल्या बुद्धि या देशांत निपजलेल्या आहेत. तसेंच हेंहि आमच्या बहुश्रुत म्हणवणाऱ्या 'लोकहितवादीं'स माहीत असायाला पाहिजे होतें, कीं केवळ व्युत्पत्तीपुरतें व्याकरणज्ञान होण्यास पंधरा वर्षें अध्ययन करण्याची जरूर आहे असें नाहीं. इंग्रेजी व्याकरण शिकण्यास जसें भाषाशास्त्राचें अध्ययन अवश्य आहे असें नाहीं, तसेंच संस्कृत भाषेच्या व्याकरणाचें ज्ञान होण्यासहि भाषाब्धींतच उडी घातली पाहिजे असें नाहीं!

प्रस्तुत लेखांत आमच्या रावबहादुरांनीं एकंदर शास्त्रविद्येवर जो भडिमार केला आहे त्याचें सार पुढील वाक्यांत आहे–"ही विद्या कांहीं उपयोगी नाहीं." हें लहानसें वाक्य नमूद करतांना प्रस्तुत ग्रंथकारानें कितीसा विचार केला असेल बरें! "उपयोगी" म्हणजे काय? उपयोगित्वाची व्याख्या काय करायाची? 'जिवास, शरीरास, प्रपंचास' जें अवश्य लागेल तें उपयोगी हा जर सिद्धांत स्वीकारला, तर साऱ्या जगांत दोन विद्या मोठ्या उपयोगाच्या दिसतात. एक नांगऱ्याची, व दुसरी रोटीवाल्याची. अन्नावांचून जीव जगत नाहीं यास्तव धान्य जमिनींतून उत्पन्न केलें पाहिजे, व कच्चें धान्य मनुष्यास पचत नाहीं म्हणून त्यास अग्निसंस्कार करून तें भक्षणीय केलें पाहिजे. याव्यतिरिक्त इतर ज्या हजारों विद्या व कला सर्व सुधारलेल्या देशांतून चालू आहेत त्या सर्व निरुपयोगीच म्हटल्या पाहिजेत. उदाहरणार्थ, बागाईत व गायनकला घ्या. 'लोकहितवादीं' च्या शिष्यास मोठ्या नंदनवनांत नेलें तरी तो भोंवतालचा सर्व देखावा पाहून म्हणणार, "काय हो, काय हा धनाचा अपव्यय! हीं शेंकडों तऱ्हेचीं तुम्हीं फुलझाडें लावलीं आहेत त्यांच्यापासून उपयोग कोणता? या संगमरवरी दगडांच्या वाटा तुम्हीं केल्या आहेत व चंदनाचे मंडप उभे केले आहेत. हा तुमचा कोण मूर्खपणा! या बागेचा धनी महामूर्ख आहे असें मी समजतों. या फुलापासून, फळांपासून व कुंजापासून अमुक अमुक उपयोग आहे असें मला कोणी दाखवून द्यावें म्हणजे मी खरें म्हणेन. माझी येथें सत्ता असती तर मी तर या साऱ्या बगीच्यावर गाढवाचा नांगर फिरविला असता, व एक खासा भटारखाना येथें उठवून दिला असता: गायनकलेच्या

संबंधानेंही वरील राजश्रींच्या तोंडून वरच्यासारखेंच पांडित्य निघावयाचें. मोठ्या तानसेनाच्या आवाजदारीपेक्षां जात्याचा घर्घर शब्द त्यांच्या कानास अधिक गोड लागेल; कां कीं, पहिला स्वर केवळ निष्फळ असून दुसरा मात्र चपातीच्या रूपानें फलद्रूप होणार आहे. 'जीव, शरीर व प्रपंच' यांचा जर अगदीं मूळचा अर्थ घेतला, तर चपातीवाल्याची पायरी तानसेनाच्या वरची होणार हें उघड आहे. 'जीव' व 'शरीर' शब्दांत जर इंद्रियगणाचाहि अंतर्भाव केला तर बरीक बगीचा व गायन हीं केवळ निरुपयोगीं ठरणार नाहींत; कां तर, पहिल्यानें चक्षुरींद्रियाची व दुसऱ्याच्या योगानें श्रोत्रेंद्रियाची तृप्ति आहे. पण ही मीमांसा एकदां सुरू झाली म्हणजे ती कोठपर्यंत जाऊन थडकेल याचा नियम नाहीं. शरीर निर्वाहापासून इंद्रियतृप्तीपर्यंत एकदां मजल येऊन पोंचली कीं, लागलींच पुढें 'उपयोगी' या विशेषणाच्या अर्थात् शिवडमरूंतून प्रगट झालेलीं चवदा सूत्रें 'अवच्छेदकावच्छिन्नांची गर्दी, 'घटपटाची लटपट,' व एकंदर 'पुरंदरचें बंड' हीं येऊन घुसलींच समजावयाचीं ! कारण मनुष्य हा चिदंश व जडांश या दोहोंचा संयोग होय. चिदंश म्हणजे मन. जडांश म्हणजे शरीर. मग एका अंशाला जेणेंकरून सुख होतें तो पदार्थ जर उपयोगी समजावयाचा, तर निदान तितक्याच मानानें दुसरा अंश जें मन त्यास आनंद देणाऱ्या वस्तुही उपयोगीच मानल्या पाहिजेत हें उघड आहे. चपातीनें भूक निवते म्हणून ती जर उपयोगी, व गाण्यानें कर्णेंद्रियाचें समाधान होतें म्हणून तेंहि जर उपयोगी, तर बिचारें पाणिनीयच कशाचें निरुपयोगी झालें ? पाणिनीयाचें अध्ययन करणारांस त्यापासूनहि आल्हाद होतो. आमच्या रावबहादुरांसारख्या महापंडितांस "अंतीं 'च' असला काय, आणि 'चा' असला काय" त्याची कांहींच क्षिति नाहीं हें उघड आहे; पण त्यांच्या अभिप्रायावरून जर मुनित्रयांची किंमत करावयाची, तर एखाद्या नांगऱ्याच्या हातून तानसेनाला सर्टिफिकेट पोंचवलें पाहिजे.

वरील महासिद्धांताचें प्रणयन करण्यापूर्वी 'लोकहितवादी'नीं दुसरीहि एक मोठी गोष्ट लक्षांत आणायाची होती ती ही कीं, व्याकरण, न्याय, मीमांसा अलंकार यांचा जिवास, शरीरास व प्रपंचा'स जितपत उपयोगी नाहीं, तितपतच हल्लीं मराठी शाळांतून, हायस्कुलांतून व कॉलेजांतून ते विषय,

पांचपांचशें हजार हजार रुपयांचे मास्तर व प्रोफेसर शिकवतात, त्यांचाही नाहीं. वरील सर्व विषय जसें संस्कृतांत आहेत, तसेच इंग्रजींत व एकंदर युरोपांतील साऱ्या नव्या जुन्या भाषांतूनहि आहेतच आहेत. 'न्याया'च्या जागीं 'लॉजिक' म्हटलें, 'अलंकारा' ऐवजीं 'ऱ्हेटारिक' शब्दाचा प्रयोग झाला; कीं वरील विद्यांचा अनुपयुक्ततेचा दोष चटदिशीं उडून त्या लागलींच उपयुक्त बनल्या काय! रावबहादुरांच्या चिरंजीवांपैकीं कोणी वैयाकरण, नैयायिक किंवा मीमांसक बनला असता तर त्या गोष्टीची त्यास अत्यंत लज्जा वाटली असती हें उघड आहे; वरील कल पाहतांच बहुधा त्यांनीं फ्रेडरिक दि ग्रेट याच्या तीर्थरूपांचें अनुकरण केलें असतें. पण इंग्रजी व्याकरण, इंग्रजी न्याय, इंग्रजी अलंकार शिकून 'ग्रॅज्युएट' पदाला पोंचणें हें बरीक अत्यंत भूषणास्पद होय नव्हे? शालजोडी व गाउन यांमध्यें वस्तुतः इतकें अंतर आहे काय? आम्हांस तर दोहोंत एवढा फेरबदल कोणता आहे तो समजत नाहीं. पंधरा वर्षें अध्ययन केलेला जुना पंडित बाजारांत उभा केला असतां तो जितक्या किंमतीला जाईल त्याहून बारा वर्षें डोळेफोड करून एम्.ए. बनलेला अर्वाचीन विद्वान् अधिक मोलानें विकेल असें 'लोकहितवादीं'स वाटतें काय? वरील गोष्ट हल्लींच्या काळीं तर सर्वांच्या चांगली प्रत्ययालाहि येत चालली आहे, हें सुप्रसिद्धच आहे. भूगोलाचे भूगोल तोंडपाठ करा, साऱ्या इतिहासांतल्या कर्मकटकटींची संथा घ्या, व्याकरण घोटघोटून त्याच्या आवृत्ति करा, शून्यलब्धीपर्यंत माराकूट करून मजल मारा; आणि शेवटीं फळ पाहिलें तर काय, शून्यलब्धिच! रावबहादूर मोठ्या डौलानें हा प्रश्न प्राचीन पंडितांपुढें टाकतात, कीं पंधरा वर्षें व्याकरण म्हटल्यापासून अमुक अमुक उपयोग होतो असें मला कोणी सांगावें. आम्हींहि त्यास प्रतिपृच्छा करतों कीं, चारी खंडाचा भूगोल वगैरे घडघड म्हणतां आल्यापासून तरी काय फायदा आहे? साऱ्या पृथ्वीतील नद्या तोंडांत बसल्या, तरी त्यांतील एकहि तहानेच्या वेळीं उपयोगी पडेल काय? शिकंदर बादशहाचा किंवा नेपो-लियनचा पराक्रम वर्णिला तर दोघांच्यापासूनहि एका छदामाची तरी प्राप्ति होणारी आहे काय? अवघ्या देशांतील उत्पन्नाच्या यादी मुखोद्गत झाल्या, म्हणून अजराजाच्या खजिन्यांत चौदा कोटी मोहरांची रास जशी रात्रीच्या

रात्रीं अचानक येऊन पडली, तसें आमच्या कोठारांत होईल काय ? माजी गव्हर्नरसाहेबांनीं मोठी दयाळू होऊन बी. ए. ची परीक्षा झालेल्या नवीन विद्वानांची मामलेदार कचेरींत योजना केली; तेथें त्यांस वर्षानुवर्षें घोकलेल्या विषयांपैकीं एकाचा तरी उपयोग होतो काय ? कधीं जन्मांत बोरूच्या पेराचा संस्कार नाहीं व लेखणी कशी करावी हें माहीत नाहीं; मग शंकुच्छेदाचा एकादा सिद्धान्त तर तेथें लावायचा नसेल ना ? तेव्हां एकंदरींत पाहतां शास्त्रविद्येंत अनुपयुक्ततेच्या संबंधानें जे 'लोकहितवादीं'नीं प्रतिपादन केलें आहे, तेंच सारें अर्वाचीन शिक्षणपद्धतीसहि तंतोतंत लागणारें आहे, मग एकीच्याच नांवानें तेवढी सदोदित हाकाटी करीत बसावी हा केवढा अन्याय आहे ?

मेकॉलेसाहेबांनीं इ. स. १८३४ सालीं प्राच्यदेशीय विद्येची पाश्चात्य विद्येशीं तुलना करून पाहिली. केवळ निरर्थक म्हणून जो साहेबी पेनाच्या सफाईत शेरा झोंकून दिला, त्यांत त्यांनीं मोठी जबरदस्त म्हणून ही कोटी सरकारच्या नजरेस आणली कीं, संस्कृत किंवा फारसी ग्रंथ पढून त्यापासून पढणारांस कांहीं उपयोग पुढें घडत नाहीं; व लोकांचाही कांहीं फायदा होत नाहीं. ही कोटी किती शुष्क आहे, तें वरील विवेचनावरून सहज लक्षांत येईल. हल्लींच्या सरकारनें जसें विद्याखातें उत्पन्न करून त्यांत इंग्रजी भाषेच्या द्वारें लोकशिक्षणाची पद्धति सुरूं केली आहे, त्याप्रमाणेंच संस्कृताच्या व फारसीच्या द्वारेंहि लोकांस ज्ञानप्राप्तीचें साधन करून देतां आलें नसतें काय ? हल्लीं जसें इंग्रजी प्रोफेसर, गणिताचे प्रोफेसर, तर्कशास्त्राचे प्रोफेसर यांच्या नेमणुका झाल्या आहेत, त्याप्रमाणेंच व्याकरण—न्यायादिशास्त्रांचें अध्यापन करण्यास पंडित व मुनशी यांची योजना करण्यास कांहीं मोठी पंचाईत पडती असें कांहीं नाहीं. आतां येवढी गोष्ट अवश्य कबूल केली पाहिजे कीं अलीकडे पदार्थविज्ञानाच्या संबंधानें पुष्कळ अधिक शोध झाला आहे; व इतिहासाचें अंग संस्कृत विद्येस मुळींच कमी आहे; पण शेक्सपियरच्या जागीं कालिदास, टॉडहंटरच्या जागीं भास्कराचार्य, मिलच्या जागीं गदाधरभट्ट, मिल्टनच्या जागीं फर्दोशी असा कांहीं मोबदला होता, तर कांहींच उपयोग न होता हें म्हणणें निव्वळ दांडगाईचें आहे ! त्यांतून वरील लॉर्डसाहेबांची फर्डेशाही चालली असतां

त्यांचें हातचें कलम हिसकावून घेऊन त्यांस कोणी असें कसें कोणी विचारलें नाहीं कोण जाणे ?—कीं "पंडित महाराज, आपण संस्कृत, फारसी, अरबी भाषेंतील ग्रंथांचें हार्द पुरतेपणीं काढून आपली तारतम्य-शक्ति पूर्णपणें प्रगट केली खरी,व वरील भाषांतील ग्रंथ कवडीच्या मोलाचेहि नाहींत.त्यांतील पदार्थविज्ञान, ज्योतिष, भूगोल, वैद्यक वगैरे सर्व चुकलेलें आहे. हें आपलें पांडित्य सर्व खरें आहे;पण आपण आम्हांस एवढें सांगा पाहूं, कीं पाश्चात्यांच्या सुधारणेस मूलस्तंभभूत जे ग्रीक व लॅटिन भाषेंतील ग्रंथ त्यांत कितपतसा भूगोल आहे,कितपतसें ज्योतिष आहे, कितपतसें पदार्थ-विज्ञान आहे ? न्यूटनचें ज्योतिषांतील व दर्शनानुशासनांतील सिद्धांत, फ्रँक-लिनचे विद्युत्प्रयोग,छापखाना, होकायंत्र, आगगाडी, तारायंत्र प्रकाशालेख्य वगैरे सर्व जर सुधारणेची आवश्यक अंगें होत तर जुने ग्रीक व रोमन यांस रानटी लोकांतच सामील केलें पाहिजे, मग हा काय बरें चमत्कार आहे, कीं वरील लोकांचे ग्रंथ अद्याप विलायतेंतील व सर्व युरोपांतील विद्या-लयांतून शिकविण्याचा तडाका चालूंच आहे ? कांहीं शतकांपूर्वीं पाश्चात्य राष्ट्र अज्ञान व रानटी होतीं तेव्हां प्लेटो, ॲरिस्टॉटल, लिव्ही, सिसरो वगैरे मंडळींचें माहात्म्य होतें तें ठीकच होतें, पण आज एकोणिसाव्या शतकांत सुधारणुकेचा प्रकाश साऱ्या युरोप खंडांत आणि त्यांतून श्वेतद्वीपांत येवढा कोंदला असतां अजूनहि वरील रानटी ग्रंथकारांची पहिल्यासारखीच चहा राहावी हें केंवढें आश्चर्य आहे ?" त्यांतून खुद्द साहेबांसच ग्रीक रोमन ग्रंथकारांनीं किती वेडावून टाकलें असें हें कोणास सांगितलें तर खरें तरी वाटेल काय ? त्यांच्या भाच्यानें जें त्यांचें चारित्र लिहिलें आहे तें वाचलें असतां होमर प्लेटो, थुसिडिडीज् इत्यादिकांच्या कृतींचीं पारायणें त्यांनीं कितीदां केलीं याचा ठिकाणा लागत नाहीं ! मग नाहीं नाहींत ते वेडगळ आक्षेप प्राच्य ग्रंथावरच आणून इकडील विद्या तेवढ्या सफाई बुडवल्याचें श्रेय जें साहेबबहादुरांनीं घेतलें, व नेटिव बहादुरांच्या अप्रयोजक लेखांत आपला अज्ञानमूलक व दुराग्रहप्रचुर लेख कारणीभूत केला ही प्राच्य राष्ट्रांची त्यांनीं केवढी थोर आगळीक केली बरें ? साऱ्या पाश्चात्य राष्ट्रांतून जर ग्रीक व लॅटिन विद्यांच्या अध्ययनाचीं विद्यालयें

आहेत व शाळाहि आहेत व त्यांच्याप्रीत्यर्थ लाखों रुपयांचा खर्च प्रतिवर्षी चालू आहे, तर येथील एक पाठशाळा तेवढी आमच्या सरकारला जड व्हावी हा केवढा चमत्कार आहे ? वेदांची आवृत्ति इंग्लंडांत निघावी व पाणिनीचा जीर्णोद्धार जर्मनींत व्हावा; आणि आमच्या इकडच्या महापंडितांनीं पाठशाळा मोडल्याचें श्रेय घेऊन हें 'एक पुरंदरचें बंड मोडलें म्हणून नाचूं लागावें हें या आर्यभूमीच्या पुत्रांस केवढें भूषण होय ! !

• • •

# ११. संपत्तीचा उपभोग

अर्थमनर्थं भावय नित्यं नास्ति ततः सुखलेशः सत्यम् ॥

—शंकराचार्य.

या विषयावर आपल्या लोकांत, विशेषेंकरून जुन्या मंडळींत मोठीं विलक्षण मतें त्यांच्या मानानें घेतलेलीं आढळतात. हीं अर्थातच पिढ्यान् पिढ्या कायम चालून विचार करण्याची कधीं संवय नसल्यामुळें आपल्या लोकांच्या मनांतून कधीं ढळलीं नाहींत. पण सध्यांच्या काळीं त्यांचा खरेंखोटेपणा विचारांतीं ठरविणें अवश्य आहे. यास्तव या विषयाच्या संबंधीं आमच्या ज्या समजुती झाल्या आहेत त्या येथें प्रगट करितों.

अर्थशास्त्राची उत्पत्ति होऊन त्याचा युरोपखंडात सर्वत्र प्रसार झाल्यापासून या विषयाच्या संबंधानें लोकमत अगदीं फिरून गेलें आहे. प्राचीन काळीं महाज्ञानी म्हणविणारांनीं संपत्तीपासून जसें नेहमीं तुच्छ करूं पहावें व सुमारें गेल्या शतकापर्यंत ती अनर्थमूल व विशेषतः एकंदर राष्ट्रास

अत्यंत अपायकारक असें मानण्याकडे जसा सुज्ञ लोकांचा कल होता; तसेंच हल्लींच्या काळीं संपत्तीविषयीं लोकांच्या मनानें वरच्याच्या अगदीं उलट अशा समजुती ग्रहण केल्या आहेत. संपत्ति म्हणजे सर्व सुखाचें व समाधानाचें परम स्थान होय; तिचा लोभ धरण्यांत कांहीं वाईट नाहीं. इतकेंच नव्हे, तर तिजविषयींचें प्रेम मोठें प्रतिष्ठादायक होय, असा सर्वांचा अलीकडे सिद्धांत होऊन गेला आहेसा दिसतो !

आतां पहिल्यानें प्राचीन मत. सर्व देशांतील महाज्ञानी लोकांचें प्राचीन काळीं असें मत होतें कीं, संपत्ति ही सर्व प्रकारें अनिष्टाचें मूळ आहे. इहलोकीं तर तिजपासून तिच्या मालकांस निरंतर श्रम, काळजी, दौर्बल्य, हीं मात्र पैदा होऊन शिवाय याहूनहि अत्यंत भयंकर काय कीं, संपत्तीच्याकरितां तिच्या जोरावर केलेलीं महापातकें त्यास परलोकीं अक्षय नरकवास घडण्यास कारण होतात. आपले आचार्य 'मोहमुद्गरां' त आरंभींच हा उपदेश करतात.

" मूढ जहीहि धनागमतृष्णां कुरु तनुबुद्धे मनसि वितृष्णाम । "

' बारे मूढा ! ही धनतृष्णा सोड. अरे वेड्या ! मनांत संतोषरूप समाधानवृत्ति धारण कर. '

असाच उपदेश कित्येक संस्कृत काव्यांतून व साऱ्या मराठी कवितेंत आहे. ग्रीक व रोमन लोकांतहि धनास तुच्छ मानणारे पुष्कळ थोर लोक होऊन गेले. त्या सर्वांत सॉक्रेटीस हा अग्रगण्य होय. हा साऱ्या जन्मभर आकिंचिन राहिला.

आतां वरील मत खरें आहे व खोटेंहि आहे हें सहज दाखवतां येईल. खरें असें कीं, वर सांगितलेले धनाचे अनर्थ सर्वांनीं प्रत्यक्ष पाहिले आहेत; म्हणजे तें प्राप्त झाल्याच्या योगानें मनुष्य मदांध होतो, त्यांस नाना तऱ्हेचे ढंग सुचतात, व्यसनास वश होऊन तो अन्वनित कृत्यें करूं लागतो, इत्यादि प्रकार झालेले ज्यानें पाहिले नाहींत असा माणूस सांपडणें नाहीं ! श्रीमंतांच्या घरोघर दुराचार व गृहच्छिद्रें किती असतात हें जवळ जवळच्या लोकांस तरी पूर्णपणें विदीत असतें. श्रीमंतीच्या जोरावर हवी तेथें सत्ता चालते, अनेक प्रकारचीं दुष्कर्में बिनधोक

करतां येतात. प्रसंगीं न्यायाधीशांची, डॉक्टरसाहेबांची मूठ दाबायास सांपडते. हें कोणास सांगावयास पाहिजे? असो. तर हीं सर्व अनिष्टें धनजन्य नव्हेत काय? बरें, आपले छंद पुरविण्याकरितां इतकी दुसऱ्यांस पीडा देऊन तो संपत्तीचा उपभोक्ता तरी सुख पावतो काय? अंतःस्थ प्रकार कसा काय आहे तो जो अंमळ विचारपूर्वक पाहील, त्याची खात्री होईल कीं, शेतांत रात्रंदिवस खपणाऱ्या कुणब्यानेंहि त्यांच्या श्रीमंतीचा हेवा करूं नये! सदासर्वदा दुखणीं, त्यामुळें शरीरास आलेला दुबळेपणा, व्यायाम नसल्यामुळें केव्हां केव्हां पाय जाणें, उद्योग काडीचाहि नसल्यामुळें मनास नेहमीं कंटाळा, सुखोपभोगांचा नित्य सेवनानें आलेला वीट, करमणूक दुसरी कांहींच नसल्यामुळें दुर्व्यसनांत आसक्ति व तिचे परिणाम शरीरास व मनास अस्वस्थता, तसेंच निरंतर कलह, सदोदित भय, इत्यादिक हे श्रीमंतीचे सोहाळे होत! तेव्हां हें सर्व जाणत असतांहि 'धना गमाचीं तृष्णा मूढा' शिवाय कोण धरील?

पण वरील निरूपण केवळ एकदेशतः झालें. संपत्तीपासून अनर्थ घडतात खरें. पण त्याप्रमाणेंच तिजपासून महान् लाभहि होत नाहींत काय? केवळ स्वतःच्याच संबंधानें पाहिलें, तरी दारिद्र्याच्या नानाविध विपत्तीपासून तें आपणांस सोडवितें. हाच काय आधीं थोडा लाभ आहे? मनुष्य केवढाहि मोठा तत्त्वज्ञ झाला, तरी भुकेची तजवीज केल्यावांचून त्यास गत्यंतर नाहीं! तसेंच थंडी, वारा, पाऊस, ऊन यांस तरी वेदान्ताची भीड पडून तन्निष्ठाची ती गय करतील असेंहि नाहीं! तेव्हां जीवितास केवळ आवश्यक अशीं अन्न, वस्त्र, घर इत्यादि तीं त्याच्या योगानें आपणांस प्राप्त होतात, व ज्याच्यामुळें ते पदार्थ दिवसेंदिवस अधिक सोईवार बनताहेत, त्याचा संग्रह व्यर्थ कसा म्हणावा? शिवाय, निर्धन पुरुषास कोठेंहि मान नसतो, त्यास सर्व तुच्छ करतात; त्याजवर बलवान् लोक अनेक वेळां बिनदाद जुलूम करूं शकतात. त्याच्या अंगीं उत्कृष्ट गुण असले तरी त्यांचा सर्वथा लोप होऊन जाण्याचाहि पुष्कळ संभव असतो, चोरी, चहाडी वगैरे गोष्टीहि हलक्यांच्या संगतीनें व पैशाच्या लालचीनें त्यांच्या अंगीं जडतात, तेव्हां हीं तरी लहान अरिष्टें आहेत काय? तेव्हां पैशापासून जसे अनर्थ होतात म्हणून वर लिहिलें त्याप्रमाणेंच त्यापासून लाभहि पण होतात.

याप्रमाणें दोन्ही पक्षांचे साधकबाधक विचार वर प्रदर्शित केले त्यावरून सुज्ञ मनुष्याची खात्री होईल कीं, मनुष्याच्या कृतीबद्दलचा दोष बिचाऱ्या संपत्तीवर ठेवणें गैर आहे. एकादें उत्तम शस्त्र आहे तर त्याचा योग्य ठिकाणीं उपयोग करणें किंवा भलतेंच करून चोहोंकडे हाहाःकार उठविणें जसें सर्वथा मालकाच्या स्वाधीन आहे तसेंच संपत्तीचेंहि होय. अथवा आणखी अग्नीचें उदाहरण घ्या. तो तर आपल्या अटकेंत ठेवून त्याची नीट योजना केली तर त्यापासून पाकनिष्पत्ति, प्रकाश, इत्यादि अनेक कार्यें करून घेतां येतात; पण जर एक ठिणगी गवताच्या गंजीवर टाकून दिली, किंवा घरास कोलीत लावलें तर केवढा अनर्थ होतो बरें ? तर या उदाहरणांत शस्त्र व अग्नि हीं केवळ मध्यस्त होत. लाभ व हानि हीं दोन्हीहि त्यांच्या हातीं नाहींत. तीं केवळ साधनें असून योजक जसा भेटेल त्याप्रमाणें तीं वर्तणारीं आहेत.

वर व्यक्तिमृत म्हणजे एकेक मनुष्याच्या संबंध-संपत्तीचा विचार झाला. आतां एकंदर राष्ट्राच्या संबंधानें पाहूं. गेल्या शतकाच्या सुमारें अखेरपर्यंत सर्वांचें याविषयीं असें मत होतें कीं, राष्ट्रांत संपत्ति फार झाली म्हणजे त्याच्या ऱ्हासास आरंभ झाला म्हणून समजावें. पैसा फार फार होत चालला म्हणजे त्याच मानानें ऐषआराम, इष्कबाजीही वाढते. ही जसजशी वाढत जाते त्या त्याप्रमाणें लोक दुर्बल, व्यसनासक्त, अभिमान-हीन असें होऊं लागतात. अशी एकंदर राष्ट्राची स्थिति झाली म्हणजे मग अर्थातच त्यावर परचक्रें येऊं लागून त्याचा टिकाव निर्वेनासा होतो, आणि लवकरच तें पराजयाचें अंकित होतें. आजपर्यंत जेवढीं राष्ट्रें उदयास चढलीं त्या सर्वांची शेवटीं अशीं दशा झाली, आणि मोडकळीस धन-समृद्धीनें पाया घातला. असो. याप्रमाणें त्यांचें म्हणणें असें. आतां हेंहि वरच्याप्रमाणें अंशतः खरें आहे; कारण संपत्ति फार झाली म्हणजे वरील वाईट परिणाम व्हावे हें पुष्कळ अंशी स्वाभाविकच आहे. संपत्ति हें एका तऱ्हेचें मद्यच आहे; तें आपला गुण केल्याखेरीज बहुधा सोडणार नाहीं.

संस्कृतांत एक म्हण आहे. 'ऋद्धिश्चित्तविकारिणी' म्हणजे धनाची विपुलता ही चित्तास विकार करणारी आहे.* असो; पण जो शहाणा आहे तो जसा केवळ मदांध होऊन जात नाहीं त्याप्रमाणेंच ज्या राष्ट्रांची राज्य-रीति उत्कृष्ट आहे त्यास धनाची समृद्धि कांहींहि अपाय न करतां उलटी अधिकच बलाढ्य करते. यास उदाहरण इंग्लंड, फ्रान्स, प्रशिया इत्यादि राज्यें होत. तशींच प्राचीन काळचीं रोम, कार्थेज हींहि होतीं.

या उदाहरणांवरून स्पष्ट दिसेल कीं, राज्य मोडकळीस आणण्याचा दोष संपत्तीवरच सर्वथा ठेवणें बरोबर नव्हे.आतां उलटपक्षीं पहा कीं,जेथें संपत्तीचें वारें नाहीं, किंवा लागूं दिलें नाहीं, तेथचा प्रकार कसा काय आहे? संपत्तीचें वारें सृष्टीच्या आरंभापासूनहि आजपर्यंत कसें तें मुळींच लागलें नाहीं, असे देश पृथ्वीवर पुष्कळ आहेत. आफ्रिकेंतील बहुतेक देश, तसच, कांहीं अमेरिकेंतील देश, पॅसिफिक महासागरांतील बेटें, यांतील लोक अजूनहि आद्यावस्थेंतच आहेत. बरें, मग दारिद्र्याच्या जोरावर त्यांच्यांत मोठीं टोलेजंग अशीं राज्यें किंवा संस्थानें कितीक उठलीं! हें एक झालें. दुसरें उदाहरण स्पार्टन लोकांचें. यांचा राज्यव्यवस्थापक जो नामांकित लायकर्गस त्यानें यांस संपत्तीचें कधीं वारें लागूं नये म्हणून मुद्दाम मोठे कडक कायदे करून ठेवले होते, व ते बहुधा शेवटपर्यंत चांगले अंमलांत होते. बरें, मग परिणाम काय झाला! तेव्हां एकंदर काय कीं, संपत्तीची विपुलता ही उत्कर्षास किंवा अपायास कारण होणें हें राज्याच्या अगर संस्थानाच्या अंगच्या मजबुतीवर आहे; व म्हणूनच तीं बुडाल्याचें अपेश तिच्यावर घालणें बरोबर नव्हे.

याप्रमाणें पहिल्या दोन मतांचा विचार झाला. आतां तिसऱ्यांत किती तथ्य आहे तें पाहूं. हें मत अलीकडील नव्या लोकांचें आहे. या लोकांच्या

* 'ज्यानें स्वभावतःच चंचल हा जो लक्ष्मीवराचा अपवाद तो तीस आपले ठायीं निरंतर स्थिर करून काढून टाकिला. सारांश, लक्ष्मी स्थिर राहात नाहीं हा तिचा दोष नव्हे. तर ज्यापासून ती जाते त्याचा होय. तो जर मतिमंद किंवा दुर्बल असेल तर त्यास तिनें काय करावें?'

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.



मनाच्या स्थितीविषयीं जर नीट विचार केला तर तेव्हांच लक्षांत येईल कीं, सध्यां ती मोठी चमत्कारिक झाली आहे. जुने विचार, जुनीं मतें यांची भास आतां बुडाली. यास्तव त्यास अनुसरणें त्यांस नीट वाटत नाहीं. बरें, नवीन सर्वथा ग्रहण करावीं, तर तसेंहि करणें अजून प्रशस्त झालें नाहीं. यास्तव दोहोंच्या मध्यें लोंबणें त्यांस प्राप्त झालें आहे. तेव्हां आजपर्यंत धनसंचयाच्या निषेधाविषयीं पूर्वीच्या लोकांचीं जीं मतें होतीं, तीं सर्वथैव खोटीं असा नियम करून पैसा जोडणें म्हणजे एक मनुष्याचें कर्तव्यच आहे अशी यांचीं समजूत झाली आहेशी दिसते; पण ती सुखानें व समाधानाचें मोठें साधन होय अशा समजुतीनें त्याविषयीं मोठें प्रेम प्रकट करणें किंबहुना त्याचा हव्यास धरणें, ही बुद्धि कृपणासारख्या नीच प्राण्यासच योग्य! सारांश, संपत्ति ही केवळ साधन आहे. साध्य म्हणजे साक्षात् उपभोग्य वस्तु नव्हे, हेंहि ज्यास कळेनासें झालें त्यापरता मूर्ख व हतभाग्य कोण?

येथवर नुसत्या संपत्तीच्या संबंधानें सामान्यतः विचार झाला. आतां प्रस्तुत निबंधाचा मुख्य विषय जो तिचा उपभोग याविषयीं लिहितों.

संपत्ति ही सर्वांस इष्ट आहे, व प्रायः सर्वांचा तत्प्राप्त्यर्थ उद्योग चालू आहे हें सांगावयास नकोच. तसेंच तिजकरितां जे सतत श्रम करावयाचें ते तरी तिच्यामुळें आपण सुखी व्हावें येवढ्याचकरितां, हेंहि उघड आहे.

या संपत्ती-सुखाविषयीं मनुष्या-मनुष्याच्या निरनिराळयाच समजुती असतात. पहिल्यानें कृपणबोवा हें आपल्या नांवानुरूप संपत्तीविषयीं पराकाष्ठेचें 'कृपाळु' असतात. त्यास तिचा वियोग क्षणभर सहन होत नसतो. पैशास पैसा, कवडीस कवडी जोडून ते आपल्या देवतेचीहि अशी सेवा करतात कीं, त्यांच्या जोगवणीस कसचीहि उपमा साजत नाहीं. तर या मूढ अनुकंपनीय जनांस संपत्तीचा उपभोग केवळ दर्शनमात्रेंकरून हा उपभोगाचा एक प्रकार झाला. यांत सुखोत्पत्तीचा इष्ट हेतु खरोखर सिद्ध झालासें म्हणतां येत नाहीं हें उघडच आहे. दुसरा प्रकार विषयवासनातृप्तीचा. मनुष्यमात्राची स्वभावतःच इकडे प्रवृत्ति असल्यामुळें संपत्तीचा विनियोग अशाच प्रकारचा पुष्कळ होतो. आतां हा जर समर्याद असेल

तर त्यांत वाईट नाहीं. आणि विचार करून पाहतां जगदीशाचें सूत्रहि असेंच दिसतें. कां तर इंद्रियजन्य सुख जोंवर मर्यादाकलित असतें, तोंवरच त्याचें सुखत्व राहतें. ती मर्यादा उल्लंघिलीशी झाली कीं, लागलींच दुःखरूप होऊं लागतें. तेव्हां हा दुसरा प्रकारहि बहुधा सुखावह होत नाहीं.

आतां या दोन्ही अपव्ययांखेरीज संपत्तीच्या उपभोगाचे दुसरे कोणते मार्ग आहेत तें पाहूं. या ठिकाणीं आपल्या जुन्या लोकांच्या कांहीं विलक्षण समजुतींचें स्वरूप उघड करणें अवश्य वाटतें. वरच्या दोन्ही वाईट मार्गांचें अवलंबन न करतांहि पुष्कळ आपल्या धनाचा असमंजसपणानें विनियोग करतात तो काय? तर अतोनात मिजास वाढविणें. ही मिजास मुसलमानांची आम्हांस लागली असावी असें वाटतें. हिचा एकंदर रोख पाहिला तर हा दिसतो कीं, अगदीं इकडचे इकडे न हालतां निव्वळ रिकामपणांत वेळ घालविणें म्हणजे सुखाचें शिखर! ताटावरचें पाटावर, पाटावरचें ताटावर; बसायाच्या ठिकाणीं जिकडे पडायाचा दिल लागेल तिकडे तक्के, लोड, आहेतच; अंमळ इकडे तिकडे हिंडणें झालें तर रथ, पालख्या इत्यादि वाहनांची तयारी; वस्त्रें नेसवायास, पांघरावयास, सावरायास माणसें, स्नान घालण्यास, अंग चोळण्यास, हात धुण्यास, जेथें तेथें चाकर; बरें, इतकेंहि होऊन तऱ्हेतऱ्हेची चाकरी घेतल्यामुळें झालेला शीण घालविण्यासच कीं काय, कोण जाणें, निद्रासमयीं पाय चेपणें, अंग रगडणें हें पुनः आहे! हा श्रीमंतीच्या सोहळ्यांचा नित्यक्रम, सुखाची परमावधि त्यांच्या लोकांच्या मतें काय ती हीच, पण याचा परिणाम लवकरच कसा होत असे हेंहि येथें सांगितलें पाहिजे. गाड्या, घोडीं, पालख्या यांनींच वाहनाचें काम सर्वथा पतकरल्यावर, मग ईश्वरदत्त जें वाहन तें कशाला राहील? अरेरे! केवढें मूर्खत्व हें! केवढा वेडेपणा! ईश्वरानें हस्तपादादि जे अवयव दिले ते आपल्या स्वाधीन ठेवून त्यास दृढतर करावयाचें टाकून मुद्दाम पराधीनपणा पतकरायाचा हा एकेपरी मूर्खपणा; त्यांतून त्याचें आणखी भूषण मिरवावयाचें म्हणजे तर त्याची सीमाच! कांहीं न करतां स्वस्थ पडून असणें हेंच जर श्रीमंताचें स्वरूप, तर मग मनुष्याची अंत्यावस्था म्हणजे खरोखरीच स्वर्गस्थितीच म्हटली असतां चालेल!

येथवर या समजुतीच्या मूर्खपणाबद्दलच लिहिलें. आतां हें क्रियाशून्यत्व वस्तुतः सुखदायक आहे किंवा होणें शक्य तरी आहे काय याविषयीं विचार करूं. रिकामपणीं सुस्त असल्यापासून किती वेळपर्यंत सुख होतें याचा अनुभव बहुधा प्रत्येकास असेल. याचें एक थोडेसें उदाहरण घेतों. आठ पंधरा दिवसांची, किंवा महिन्या दोन महिन्यांची सुट्टी झाली असतां विद्यार्थ्यांस पाहिल्यानें केवढा आनंद होतो ! त्यांस वाटतें कीं, इतके दिवस आतां खुशाल घरीं बसावयास व मौज मारावयास सांपडेल ! असें वाटून पहिले चार पांच दिवस त्यांस फार बहारीचे वांटतात; पण पुढें लागलीच असा कंटाळा येऊं लागतो कीं, दिवस जातां जात नाहींत; आणि शेवटीं इतका त्रास आलेला असतो कीं, पुनः शाळेंत जाण्याच्या दिवशीं सर्वांस हुशारी वाटते. या पोरपणाच्या अनुभवांत सर्व सुखदुःखाची किल्ली आहे ! नुसतें सुख असा कांहीं पदार्थ नाहीं. तें भासण्यास दुःखाचा अनुभव वाटत असला पाहिजे. जोंवर पोटांत भूक आहे तोंवरच जेवण्याचें सुख, तहान आहे तोंवरच पाणी पिण्याचें, थंडी आहे तोंवरच उष्णतेचें, उकाडा होत आहे तोंवरच शीतळ उपचारांचें याप्रमाणेंच श्रम आणि विश्रांति हेंहि द्वंद परस्परसापेक्ष आहे तेव्हां एकंदर सिद्ध काय होतें कीं, उद्योगाखेरीज रिकामपण हें सुख नव्हे हें तर काय; पण महादुःखच आहे.

याप्रमाणें रिकामपण सुखास कितपत कारण व्हावें याविषयीं विचार झाला. पण इतकेंच नव्हें, रिकामपणापासून महान् अनर्थहि आहेत हेहि पुढच्यावरून दिसेल. इंग्रजींत एक म्हण आहे कीं, " रिकाम्या मनांत सैतान आपला कारखाना घालतो. " * याचा अर्थ काय कीं, मनुष्यास अगदीं रिकामपण सांपडलें कीं त्यांस नाना प्रकारचे कुमार्ग सुचतात, हें ठीकच आहे. कारण मनुष्याच्या शरीरांतले व्यापार जसे कधीं कळत नाहींत, त्याचप्रमाणें त्याच्या मनाचेहि सारखे चाललेले असतात. एरवींच्या मनुष्याचें ईश्वराच्या योजनेनेंच शरीराचे व मनाचे व्यापार सदोदित चालू राहातात; कारण श्रमाशिवाय चरितार्थच न चालल्यानें त्यांच्या दोहोंचाहि चाळा नेहमीं चालू असावा लागतोच. पण श्रम न करितांहि कांहीं थोड्या

* " An idle brain is Satan's Workshop. "

(एकंदर लोकांच्या मतें 'भाग्यवान्' अशा) लोकांचें चालतें तेव्हां अर्थातच त्यांचें शरीर व मन हीं दोन्ही इतरांच्या मानानें व्यापारशून्य राहतात. पण अगदीं व्यापार नाहीं अशी मनाची अवस्था कधीं असूं शकत नाहीं. यास्तव सहजच नाना तऱ्हेचें ढंग व व्यसनें त्यांस जडतात.

सारांश, एकान्तवासांतहि मन शुद्ध ठेवणें कठिण आहे; त्यांस अवकाश सांपडला कीं तें दुर्वासनांस वश होतें. आपल्या धर्मांत कर्ममार्गाचा जो एवढा खटाटोप विहित केला आहे त्याचें बीज हेंच होय.

आतां आणखी एक मात्र संपत्तीचा उपभोग सांगणें राहिला तो धर्म होय. यास उपभोग म्हणणें हें सत्कृद्दर्शनीं विलक्षण वाटेल; पण उपभोग म्हणजे सुख हाच अर्थ जर आहे तर धनाचा विनियोग धर्माकडे करणें हाहि त्याचा उपभोगच होय. का कीं, धर्म करणारास त्यापासून फार समाधान वाटतें. वास्तविक पाहतां संपत्तीचा अत्यंत थोर उपयोग म्हणजे ती परोपकारी लावणें हाच होय; यास्तव तशा महात्म्यांस अशा विनियोगानें जें चित्तास सुख होत असेल त्यास दुसऱ्या कशाची उपमा साजणार नाहीं! परोपरीच्या भूषणांनीं आपलें शरीर लेववून त्यांत संतोष मानणें ही प्राकृत जनांची कोती समजूत होय.

भर्तृहरी म्हणतो—

"श्रोत्रं श्रुतेनैव न कुंडलेन। दानेन पाणिर्नतु कंकणेन ॥
विभाति कायः करुणापराणां। परोपकारैर्नतु चंदनेन ॥"

पण धर्म करण्यांत एका गोष्टीकडे अवश्य लक्ष पोंचवावें लागतें; ती गोष्ट पात्रापात्रत्व-विचार होय. जर पात्रीं दान घडलें तरच उत्तम; नाहीं तर भलत्यासलत्यासच तें घडलें असतां व्यर्थ जातें आणि अपात्री झालें तर उलटा दातांच दोषांत पडतो. आतां अलीकडे पात्रापात्रत्वाविषयींचें विचार पहिल्यापेक्षां चांगले झाले आहेत. समदृष्टीनें पहातां सर्व विपन्न मनुष्यें धर्मास सारखींच सत्पात्र आहेत, धर्माच्या संबंधानें दुसरी अशी ही गोष्ट ध्यानांत ठेयली पाहिजे कीं, मुळींच हातचा पैसा न सुटण्यापेक्षां कीर्तीच्याहि हेतूनें धर्म झालेला बरा; पण

तो खरा धर्म नव्हे. कां तर तितका परोपकार कीर्तीसाठीं विकल्यासारखें तें होतें. खरा धर्म तोच, कीं जो अंतःकरणाच्या कळवळ्यानें व निरपेक्ष बुद्धीनें केला असतो, व असाच त्या करणारास अत्यंत सुख देतो, यांत संशय नाहीं.

याप्रमाणें संपत्तीच्या उपभोगाचे निरनिराळे प्रकार सांगून प्रत्येकापासून उपकर्त्यास सुख किती होत असतें हेंहि लिहिलें. आतां शेवटीं इतकेंच सांगतों कीं, ऐश्वर्य काय तें आम्हींच भोगावें, हा मूर्खपणाचा अभिमान सोडून देऊन जर आमचे राजेरजवाडे आणि इतर श्रीमान् गृहस्थ यासंबंधीं युरोपियन लोकांचा कित्ता उचलतील तर तो त्यांस फार हितावह होईल. या म्हणण्याचा अर्थ असा नाहीं कीं, ते सर्वच आपल्या पैशाचा चांगला व्यय करीत असतील; किंवा जो जो करतात तो चांगलाच असतो.

पण त्याजपासून ग्रहण करावयाचे गुण हे कीं, तक्के-लोडाशीं बसण्यांत व इकडची काडी इकडे न करण्यांत प्रतिष्ठा न मानतां त्यासारखे यांनीं व्यायाम करावे, देशाटनें करावीं, तसेंच अक्षरशून्य व नेहमीं रिकामें राहण्यांत भूषण न मानतां त्यांसारखे विद्यानिपुण होऊन जगांत नांव राखण्याची उमेद धरावी, दानशूरत्वांत त्यांस आमच्या पारशी बंधूचें— कीं, ज्यांचा धर्म आणि जीवित महासंकटसमयीं वांचविल्याबद्दलचें या देशाचें ऋण जे कृतज्ञताबुद्धीनें अनेक प्रकारांनीं फेडीत आहेत त्यांचें— आणि विशेषतः त्यांस व एकंदर मनुष्यजातीस भूषणरूप जो महात्मा त्यांच्यांत होऊन गेला त्याचें उत्कृष्ट उदाहरण आहेच. तर याप्रमाणें जर आमचे लोक आपलें वर्तन सुधारतील, तर संतति संपत्ति यांचा विरोध जो आमच्या लोकांस दैवमत्सरकृत वाटतो तो तेव्हांच नाहींसा होऊन, पूर्वीं भगवा झेंडा व जरीपटका रणांत नाचवून त्यांच्या पूर्वजांनीं जी कीर्ति मिळविली तीस अजूनहि ते उज्ज्वल करतील !

●●●

# १२. मोरोपंतांचें कवित्व

मोरोपंतांच्या संबंधानें पहिला मोठा वाद म्हटला म्हणजे हा होय कीं, त्याला 'कवि' ही संज्ञा येईल कीं नाहीं. हा वाद अर्थातच नव्या विद्वन्मंडळांत उत्पन्न झालेला आहे; जुन्यास या वादाचा अर्थहि फार करून कळायचा नाहीं. नव्या लोकांत तरी मोरोपंत हा कवि आहे कीं नाहीं ही चर्चा कशावरून निघाली याचा जर विचार केला, तर ती प्रख्यात इंग्रजी कवि ड्रायडन् व पोप यांच्यावरून निघाली आहे हें उघडच आहे. अर्वाचीन मंडळीची ही एक चमत्कारिक प्रवृत्ति सर्वांच्या सहज लक्षांत येण्यासारखी आहे कीं, युरोपांतल्या व इकडल्या गोष्टींत सकृद्दर्शनीं साम्य आढळून आलें कीं, लागलींच देशकालभेदाकडे बिलकुल लक्ष न पुरवतां व वरील साम्य वस्तुतः बरोबर आहे कीं नाहीं याचाहि फारसा विचार न करतां तिकडच्यासारखी कृति इकडे उठवून द्यावयाची! युरोपच्या इतिहासांत आढळलें कीं, मार्टिन लूथर हा पोपवर उठून त्यानें धर्मक्रांति केली; कीं लागलींच इकडे शंकराचार्यांवर हत्यार धरून मंडळी सरसावलीच! पण साऱ्या युरोपाला दरारा घालणारा आणि जॉन् राजास पदच्युत करून खुद्द नेपोलियनावर बहिष्कार घालणारा पोप कोणीकडे, आणि आमचे भिक्षावृत्ति गरीब बिचारे जगद्गुरु कोणीकडे हा कांहीं विचार नाहीं! असो; तर प्रस्तुत वादाचें जें बीज,—कीं मोरोपंत हा कवि नव्हे,—हें ड्रायडन् व पोप यांचें साम्य आमच्या महाराष्ट्र कवीशीं बळेंच घालून दिल्याचें फळ होय.

प्रस्तुत शतकास आरंभ झाल्यापासून इंग्लंडांत अनेक विषयांवर मतांतरें सुरू झालीं. तेव्हां अलीकडे सर्वानुमतें एकंदर असें ठरलें आहे कीं, पोपप्रभृति कवि नादान व जॉन्सन् प्रभृति टीकाकारहि नादान! कवित्वाचें तत्त्व दोघांसहि माहीत नसून केवळ टुमदार रचना व नोकझोक या बाह्य गुणांवरूनच ते कवितेची पारख करीत! या नवीन मतांचा विशेष प्रसार व दृढीकरण हे वर्डस्वर्थ नामक अर्वाचीन विख्यात कवीनें केलें. त्यानें आपल्या काव्यांत पूर्वीच्या वेळोवेळीं लिहिलेल्या प्रस्तावना एकत्र करून

त्या जोडल्या आहेत. त्यांत अठराव्या शतकांतील कवींस व रसिकांस खऱ्या कवित्वाचें स्वरूप कितपत समजत होतें तें दाखवलें आहे.

आतां वरील गोष्टींचें सादृश्य आमच्या मराठी कवितेकडे कसें लागतें तें पाहा. ड्रायडन्‌विषयीं मिल्टन्‌नें एकदां अशी उक्ति प्रगट केली कीं, 'तो काय नुसता यमक्या आहे, कवि कसचा?' पोपविषयींहि पुष्कळांनीं अशाच प्रकारचा अभिप्राय दर्शवला आहे. या दोन गोष्टींवरून मोरोपंतां-विषयीं नवीन मंडळींचें मत ठाम ठरून गेलेंच,—कीं हा कवि कसचा? हा बोलूनचालून यमक्या; प्रास जुळवावे, यमक साधावें, या गोष्टींकडे ज्याचें सदासर्वदा लक्ष लागून राहिलेलें, व त्यांतच ज्याची काय ती प्रतिष्ठा, त्याचें कवित्व तें काय असणार? जॉन्सननें वर सांगितल्याप्रमाणें ड्रायडनची व पोपची तुलना करून ड्रायडन् यास पोपहून वरची पायरी दिली आहे. हें पाहतां इकडे वामन व मोरोपंत यांच्याविषयीं मत उत्पन्न झालेंच, कीं कवि म्हटला तर वामनच, मोरोपंतांचा नुसता थाटमाटच पाहून घ्यावा. पुढें मूषकमंडूक न्यायानें ड्रायडन व पोप या दोघांसहि उचलून भरारी मारणारा जसा वर्डस्वर्थ इंग्लंडांत निपजला, त्याप्रमाणेंच इकडे आमच्या देशांतहि वामनास वामनत्व देणारा व मयूराचा पिच्छभार उतरवणारा एक महाकवि निपजून त्यानें सारा महाराष्ट्र देश दणाणून दिला आहे!

तर याप्रमाणें मोरोपंतांच्या मुळीं कवित्वावरच जी अलीकडे धाड येऊन पडली आहे तिचें कारण वर सांगितलेला, ड्रायडन् व पोप यांच्या-संबंधानें उत्पन्न झालेला वाद होय. तिकडचें अनुकरण करून इकडेहि तिक-डच्यासारखी कांहीं तरी गडबड उडवून द्यावयाची ही जी आधुनिक प्रवृत्ति तिचेंच केवळ फळ वरील वाद होय. बाकी ज्या पंडितांच्या तोंडून वरील कलमांत दाखल केलेले अनेक सिद्धांत ऐकूं येतात त्यांनीं म्हणजे पोपचीं किंवा ड्रायडन्‌चीं शें दोनशें तरी पानें वाचलेलीं असतात किंवा आमच्या इकडच्या महाराष्ट्र कवींच्या वाङ्मयाशीं ते विशेष परिचित असतात असा मुळींच अर्थ नाहीं. एकाद्या मिशनरीस वेदांविषयीं व्याख्यान देण्याची हुक्की आल्यास त्यास जितपत संहितेचें पारायण करावें लागतें, जडदर्शनाविषयीं अभिमान प्रगट करतांना 'ज्ञानोदया'सारख्या

पत्रांच्या प्रकाशकास जितपत कणादजैमिन्यादि अपवित्र शास्त्रकारांची ओळख करून घ्यावी लागते, मेकॉलेप्रभृति बहाद्दरांस प्राच्य देशांतील कोणत्याहि कोनाकोपऱ्याविषयीं लिहायाचें असल्यास त्यास जितपत परिश्रम करणें अवश्य होतें, किंवा आमच्या अर्वाचीन महापंडितांस जेंदा वेस्ता आणि वेद, वेद आणि कुराण, कुराण आणि पवित्रशास्त्र, पवित्रशास्त्र आणि धम्मपद, धम्मपद आणि गुलामगिरी यांची सांगड घालून देतांना जितपत पंचाईत पडते, तितपतच वरील कवित्वाची तुला धारण करणाऱ्या रसिक मंडळीस ! प्रस्तुत वादाचा निर्णय होण्यास सध्यां येवढेंच बस आहे कीं, मोरोपंत हा कवि नव्हे असें जें प्रतिपादन करतात त्यांच्या आक्षेपांचें निरसन करून आमच्या स्वतःच्या मतांचीं कारणें पुढें वाचकांस सादर करतों.

मोरोपंत हा कवि नव्हे या प्रमेयावर सविस्तर उपपादन ज्यांत केलें आहे असा ग्रंथ अद्याप मुळींच झाला नाहीं. मराठी कविता वाचणारे आपल्या लोकांत किती आहेत याचा विचार केला असतां वरील गोष्टीचें आश्चर्य वाटणार नाहीं, आणि त्यांतून प्रस्तुत महाराष्ट्र कवीचें काव्य वाचून वरील निर्णय करणारा मनुष्य तर थोडाच आढळेल असें वाटतें ! प्रस्तुत विषयावर कोठें कोठें जे दोन चार उल्लेख आमच्या आढळण्यांत आले आहेत त्यांचें येथें अवतरण करून त्याविषयीं विवेचन करतों.

'विविधज्ञानविस्तारा'च्या पहिल्या वर्षाच्या पांचव्या व सातव्या अंकांत 'मोरोपंत' या सदराखालीं कांहीं मजकूर लिहिलेला आहे. त्यांतील पुढील तीन उतारे घेतों:---

"नलाख्यानांत' कोठें एक आर्या आहे. ती अशी:--

राधाप्राप्त्यर्थ जसा तो स्वकरगतामळा यशा शिनळ ।
सोडी दमयंत्यर्थ क्षिप्राचि अतिदुर्लभा तशाशि नळ ॥

(आर्याभारत-वनपर्व)

यमक जोडण्यासाठीं ज्यानें भगवंताला 'शिनळ' असें विशेषण दिलें, त्याची भक्ति केवढी होती ती सहज ध्यानांत येईल. श्रीमद्भागवतांत दुष्टांनीं

जी परमेश्वराची निंदा केली आहे त्या श्लोकांचा टीकाकारानें प्रथम वास्तविक अर्थ सांगून, नंतर टीकेच्या योगानें भगवंताची निंदा आपल्याहि तोंडांतून झाली म्हणून दोषशमनार्थ पुनः त्याच श्लोकांचा अर्थ ओढून-ताणून स्तुतिपर केला आहे. मोरोपंताला हें ठाऊक असून त्याला तें अभद्र भाषण करण्यास अगदीं संकोच वाटला नाहीं; किंबहुना लज्जा देखील वाटली नसावी.

येथें श्रीकृष्णाला 'शिनळ' म्हणून, त्यानें राधेसाटीं आपलें निर्मल यश घालवलें असें कवि म्हणतो. असें जर आहे तर त्याचे गुण कां गावे? श्रीमद्भागवतांत कृष्णाची आणि गोपींची क्रीडा शुक्राचार्यानें वर्णिली आहे. परंतु शुक्राचार्य एवढा साधु आणि उर्ध्वरेता असून त्यानें ती क्रीडा कधीं दूषिली नाहीं; परंतु त्या कृत्याला भगवंताचीं यशें असें म्हटलें आहे. मोरोपंताला तीं कृत्यें वाईट वाटत होतीं असेंहि कोठें आढळत नाहीं. दुसरें, जर श्रीकृष्ण जार, तर त्याची उपमा नळाला साजत नाहीं. कारण नळानें हंसाला पाठवलें तें जारकर्माच्या हेतूनें नव्हे."

"विराटपर्वांत अर्जुन उत्तरास सांगतोः--

न्यावा चमूवरि तुवां ।
रथ, तरुणीप्रति जसा स्मरें तरुण ॥

वीररसांत शृंगाररस मिसळल्यानें काव्यास कशी गोडी येत असते ती एक मोरोपंताचे भक्तच केवळ जाणत असतात, इतरांस अतर्क्य.

"मोरोपंतानें रामायणांत कोठें एक उत्प्रेक्षा केली आहे ती अशीः--

सेतु न तो यत्पतिनें स्वसुता नेली, जसी वृकें एणी
त्या लंकेची श्रीभूदेवीनें ओढिली असें वेणी ॥

(आर्याभारत वनपर्व)

रामचंद्रानें शिलासेतु बांधला, तो कवि म्हणतो सेतु नव्हे, तर काय? आपली कन्या जानकी रावणानें नेली, या कारणानें पृथ्वीनें त्या रावणाची लंकारूप जी स्त्री तिची वेणी धरून ओढिली आहे.

काय हा अलंकार! रावणानें जर दुसऱ्याची बायको आणली, तर त्याच्या स्त्रियेला तें बरें वाटेल काय? सहसा वाटणार नाहीं. तर मग तिची उगीच कां वेणी धरून ओढावी?

रा. ब. भास्कर दामोदर यांनीं नवनीताच्या प्रस्तावनेंत या उत्प्रेक्षेची फारच प्रशंसा केली आहे. त्याला तिजमध्यें काय जो चमत्कार वाटला असेल तो वाटो. आमचें मत तर अगदीं भिन्न."

'अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रहांत' एके ठिकाणीं असा लेख आहे.

"वाक्याचा किंवा त्यांतील शब्दांचा अर्थ दोहोंकडे लागत असला म्हणजे श्लेषनामक अलंकार होतो. जसें:—

तूं मलिन कुटिल नीरस।
जडहि पुनर्भवपणेंहि कच साच।
धरिला शिरींहि न स्व—
प्रकृतिगुण त्याजिसि; नाम कच साच॥

मोरोपंत, कचोपाख्यान, [ आदिपर्व ]

ह्या स्थळीं कचनामक ब्राह्मणास जीं विशेषणें दिलीं आहेत, तीं केसांसहि लागतात. साधारण कवि ह्या अलंकाराचा हवा तेथें प्रयोग करून आपल्या काव्यांस दुर्बोधता आणितात व त्यांच्या ग्रंथांत एका शब्दाचे दोन अर्थ होत असतात. एवढयानेंच त्यांस व किती एक अरसिकांस ते ग्रंथ मोठे चांगले वाटतात; पण सहृदय पुरुष तसले लेख पसंत करीत नाहींत; हें आमचेंच मत आहे असें वाचणाऱ्यांनीं समजूं नये; तर मोठमोठ्या सुज्ञ ग्रंथकारांचेंहि मत असेंच आहे."

आतां अनुक्रमेंकरून वरील चारी स्थलांविषयीं विचार करूं.

प्रस्तुत आर्या वनपर्वांतर्गत नलोपाख्यानांतील आहे. तिचा अर्थ उघडच आहे कीं, नळराजाच्या हातीं हंस सांपडला असतां तो त्यास सोडून देता झाला; कसा? तर असें कृष्णानें राधेशीं रमण्याची इच्छा धरून आपल्या हातचें निर्मल यश घालविलें. या आर्येंत नलाचें आणि कृष्णाचें, दमयंतीचें आणि राधेचें, हंसाचें आणि यशाचें, असें तीन प्रकारचें

साम्य कवीनें वर्णिलें आहे, व उपमालंकार केला आहे. वरील तीन साम्यांत चित्तास चमत्कार देणारें साम्य म्हटलें म्हणजे हंस आणि यश यांचें होय, व उपमेचा मुख्य भाग हाच होय. कृष्ण आणि राधा यांच्या जागीं आणखी कोणाची योजना केली असती तरी चालली असती; कारण त्यांचें नल आणि दमयंती यांशीं जें साद्दश्य वर्णिलें आहे तें केवळ गौण आहे. मुद्द्याची गोष्ट काय ती अमूर्त, जें यश त्याशीं संस्कृत कवींच्या संकेतास अनुसरून मूर्त जो परम शुभ्र हंस त्याची तुलना करून दोहोंशीं 'सोडणें' या क्रियेचा चमत्कारिक रीतीनें अन्वय करून दिला आहे ही होय. ही तुलना यथार्थ असली म्हणजे कवींचें काम झालें, व जो खरा रसिक आहे त्याचें लक्ष तिच्यापलीकडे तिळमात्रहि जाणार नाहीं. आमच्या टीकाकर्त्यानें कृष्णास 'शिनळ' हें लावणें बरोबर आहे कीं नाहीं, शुक्राचार्यांचा प्रस्तुत प्रकरणीं कसा अभिप्राय होता व मोरोपंतांचा कसा होता. हंसाला जो दमयंतीकडे पाठवला तो जारकर्माच्या हेतूनें नव्हे, अतएव श्रीकृष्णाची उपमा नळाला साजत नाहीं वगैरे जें पांडित्य केलें आहे तें निव्वळ अरण्य-रोदन आहे. त्याचा वरील आर्येतील उपमेशीं बिलकुल संबंध नाहीं. मोरोपंतांच्या धर्मसंबंधीं मताविषयीं जर विचार कर्तव्य असता तर प्रस्तुत लिहिणाराचा वरील सर्व ऊहापोह यथायोग्य होता; पण जोंपर्यंत कवित्वाच्या संबंधाचेंच विवेचन आहे तोंपर्यंत वरील धर्ममीमांसा केवळ अप्रस्तुत होय.

विराटपर्वांत उत्तरगोग्रहण प्रसंगींची पुढील आर्या आहे :—

> " बैस रथीं, तूं माझा सारथि हो, तरणिचा जसा अरुण,
> न्यावा चमूवरि तुवां रथ, तरुणीप्रति जसा स्मरे तरुण ॥ "

[ आदिपर्व ]

या आर्येंत वीररसांत शृंगाररसाची भेसळ झाली आहे ती आमच्या आक्षेपकास खपत नाहीं. वरील रससंकराच्या योगानें त्याच्या ठायीं हास्य-रसाची उत्पत्ति होऊन तो जो वाहवत गेला आहे तो टेंबर नदींत जाऊन पडला आहे ! तरी पुढील कालिदासीय अस्त्र आमच्या बिचाऱ्या प्राकृत कवीचा बचाव करील असें वाटतें.

राममन्मथशरेण ताडिता
दुःसहेन हृदये निशाचरी
गंधवद्रुधिरचंदनोक्षिता
जीवितेशवसतिं जगाम सा ॥

हें पद्य रघुवंशाच्या अकराव्या सर्गातलें आहे. प्रसंग ताटकावधाचा असून वरील पद्यांत ताटकेवर श्लेषेंकरून अभिसारिकेचें रूपक केलें आहे हें उघडच आहे. आतां शृंगारांत वीराचें मिश्रण असल्याचा प्रकार पाहा—

शान्ते मन्मथसङ्गरे रणभृतां सत्कारमातन्वती
वासोऽदाज्जघनस्य पीनकुचयोर्हारं श्रुतेः कुण्डलम् ।
बिम्बोष्ठस्य च वीटिकां स्मितमुखी पाण्यो रणत्कंकणे
पश्चाल्लंबिनि केशपाशनिचये युक्तो हि बंधक्रमः ॥

वरील दोन उदाहरणांवरून वाचकांस कळून येईल कीं शृंगार आणि वीर यांचा परस्पर केवळ विरोध आहे असें नाहीं. येवढें मात्र खरें आहे कीं, कोणी वीर रणावेशानें भरून गेला असतां त्याच्या तोंडून शृंगारोक्ति वदवणें, किंवा कोणी अनंगरंगमग्न झाला असतां त्यानें वीरश्रीचें भाषण करणें, हें शोभणार नाहीं; पण उपमेकरतां शृंगारांत वीररस आला किंवा वीरांत शृंगार आला तर तो हास्यास्पद होतो असें नाहीं. लौकिक भाषेंतहि ‘ रतियुद्ध ’ आणि ‘ रणनवरा ” या शब्दावरून वरील प्रमाणच मिळतें.

त्यांतून ज्या प्रसंगविशेषीं वरील शृंगारोपमा योजली आहे तेथें तर ती विशेष शोभते असें आम्हांस वाटतें.

आमच्या आक्षेपकास लंकादेवीची वेणी धरून ओढल्याबद्दल तिची फार कींव आली आहे. या क्रियेवरून त्याची सदयता प्रगट होते; पण सहृदयता होत नाहीं. पहिल्या आक्षेपास कृष्णभक्ति अस्थानीं प्रगट होऊन ती जशी प्रस्तुत रसिकांच्या यथार्थदर्शनास विघातक झाली त्याप्रमाणेंच येथें वरील हृदयप्रवृत्ति झाली आहे. लंका ही रावणाची स्त्री यास्तव तिजविषयीं सीतेची माता जी भूदेवी तिची अत्यंत द्वेषबुद्धि होणें

हें स्त्रीस्वभावास अनुसरूनच आहे, व आपल्या कन्येचा ज्या दुष्टानें विनाकारण छळ आरंभला आहे त्याच्यावर कसा तरी प्रतिकार घडो अशी इच्छा तीस होणें हेंहि सहजच आहे. द्वेषाचें व प्रेमाचें मनुष्या-पासून मनुष्याकडे किंबहुना पदार्थांकडेहि कसें संक्रमण होत असतें, हें मनुष्यस्वभावाकडे ज्यानें अंमळ लक्ष पुरवलें असेल हें त्याच्या सहज लक्षांत येणारें आहे.

वरील उत्प्रेक्षेची प्रशंसा केल्याबद्दल कै. भास्कर दामोदर पाळंदे याजवरहि प्रस्तुत टीकाकर्त्यांचा शेवटचा फटकारा गेला आहे, पण माजी रावबहादुरांसारख्या खऱ्या रसिकास चमत्कार वाटण्याजोगें वरील उत्प्रेक्षेंत कांहींच नाहीं असें आम्हांस वाटत नाहीं. एक तर केशाकर्षणाचा प्रकार स्त्रियांच्या कृतीस अनुसरून असल्यामुळें स्वभावोक्तिरूप होय आणि शिवाय सेतूचें आणि वेणीचें सादृश्य कृष्णत्वास्तव, दैर्घ्यास्तव, आणि संवीतत्त्वास्तव अत्यंत समर्पक व हृदयंगम होय! कवीचे विचार तर्कशास्त्राच्या तराजूंत जोखूं पाहणें हें तर अरसिकतेचें केवळ शिखर होय!

असो. आतां शेवटला जो 'अनेकविद्यामूलतत्त्वां'तील उतारा त्याविषयीं विचार करायचा. हा हातीं घ्यावयाचें आम्हांस मोठें भय वाटतें. यापूर्वी आम्ही आमच्या प्रस्तुत राजकर्त्यांविषयीं, इंग्रेजी ग्रंथकारांविषयीं, विलायती धर्माविषयीं, वगैरे जें जें लिहिलें त्या सर्वांवरून राजद्रोहाचा व सद्धर्म-द्रोहाचा जबरदस्त चार्ज आम्हांवर आला, व वरील महापातकांची निष्कृति आम्हीं अद्याप करीतच आहों. तेव्हां यावरून पाहतां वरील पुस्तकांतील लेखाविरुद्ध अभिप्राय प्रगट केल्यानें तर केवढा भयंकर गुन्हा होणार आहे याची कल्पनाहि करवत नाहीं! वर इंग्रज लोकांस न रुचण्यासारखें कांहींहि लिहिल्यानें राजनिष्ठेचा लगेच चुराडा होऊन जातो; आणि तो कां, तर तें आमच्या देशाचें राज्यसूत्र हातांत वागवून आमचें रक्षण करताहेत व त्यांच्या कृपेनें आम्हांस ज्ञानप्राप्ति झाली आहे म्हणून; तर मग मुळीं जन्मलाभच जेथपासून त्या ठिकाणीं विरोध प्रगट करणें हें केवढें धाष्टर्य व केवढा अधमपणा होय! आपले राज्यकर्ते जें जें करतील त्यास नेहमीं मान डोलवीत जायची ही जर राजनिष्ठा, इंग्रज ग्रंथकारांच्या पेनांतून जें जें निष्पन्न

होईल तें तें शिरसावंद्य करायचें ही जर सत्यनिष्ठा, पाद्रीसाहेब जें जें सांगतील त्यास 'आमेन्' (तथास्तु) या एका पदानेंच उत्तर करायाचें ही जर धर्मनिष्ठा तर मग 'बाबावाक्यं प्रमाणम्' हें पितृभक्तीचें परमस्वरूप होय! या कडकडीत व्रताची दीक्षा घेऊन तें आजन्म अबाधित पाळण्याचा ज्यांचा कृतसंकल्प असेल व त्यांत ज्यांस धन्यता वाटत असेल त्यांस ती सुखेनैव वाटो. आमच्या मनाची नैसर्गिक प्रवृत्ति तर अगदीं निराळ्या प्रकारची आहे: व आम्हीं आजपर्यंत जेवढें वाचलें व ऐकलें त्यावरून वरील प्रवृत्तीचें दोषस्वरूपत्वहि अद्याप आमच्या लक्षांत आलें नाहीं. शिवाय हेंहि सांगणें याप्रसंगीं अप्रस्तुत होणार नाहीं, कीं ज्या महापंडितांचा पितृनामानें निर्देश करण्याचा अधिकार जगदीशाच्या कृपेनें आमच्याकडे आहे, ज्याचें पूर्ववय गदाधरादिकांच्या समागमें जाऊन उत्तर वय मिल प्रभृति पाश्चात्य तत्त्वज्ञांच्या संगतीनें गेलें, रविकरगतकमलन्यायानें ज्याच्या विकासप्रद सान्निध्याचा अमूल्य लाभ आजपर्यंत इतका काळ आम्हांस लागला, आणि ज्याचें स्वभावाभिवृद्धीचें व्रत आज पांच वर्षें यथाशक्ति चालवून देशोन्नतीच्या धुराकर्माचा अंगीकारहि ज्याच्या पद्धतीस अनुसरून आम्हांस अवश्य करणें आहे,—त्या विख्यात पुरुषाचा प्रस्तुत प्रकरणीं कसा अभिप्राय पडता याची आम्हांस पूर्ण खात्री आहे. तर आतां एवढी प्रस्तावना करून व परमपूज्य श्रीमत्पितृपदीं प्रणाम करून पूर्वोक्त अवतरणाविषयीं आमचे विचार वाचकांस सादर करतों.

सदरील उताऱ्यांतील मुख्य गोष्ट 'हवा तेथें प्रयोग' ही होय म्हणजे मोरोपंतानें ज्या प्रसंगीं वरील आर्येंत श्लेषाची योजना केली आहे तो प्रसंग श्लेषरचनेस उचित नव्हे हा त्यावर आक्षेप होय. आतां वरील श्लेष अप्रासंगिक कां याचा जर विचार केला तर येवढेंच कारण दिसतें कीं, देवयानीचें बोलणें रोषाचें आहे. वास्तव चित्तवृत्ति कलुषित झाली असतां श्लेषाची स्फूर्ति कोठून होणार? मिरवणुकीच्या वेळची घोड्याची ऐटदार चाल जशी रणांगणावर अप्रासंगिक होईल, त्याप्रमाणेंच क्रोधाच्या शोकाच्या वगैरे भाषणांत श्लेष तर काय, पण सामान्यत: कोणताहि अलंकार शोभणार नाहीं! पण असें असतां सर्वमान्य महाकवींच्या ग्रंथांतून पाहिलें असतांहि शोकाच्या, क्रोधाच्या वगैरे आवेशांत केलेलीं भाषणेंहि केवळ अलंकारविरहित

असतात असें नाहीं. काव्याचा मुख्य हेतु मनोरंजन असल्यामुळें अलंकाराचा थोडाबहुत प्रयोग वरील प्रसंगींहि केलेला आढळतो. उदाहरणार्थ, पुढील श्लोक पहा :—

स्वप्नांतरेऽपि खलु भामिनी पत्युरन्यं
या दृष्टवत्यसि न कञ्चन साभिलाषम्।
सा संप्रति प्रचलितासि गुणैर्विहीनं
प्राप्तुं कथं कथय हन्त परं पुमांसम् ॥

( भामिनीविलास, ३–१७ )

निर्दूषणा गुणवती रसभावपूर्णा
सालङ्कृतिः श्रवणकोमलवर्णराजिः ।
सा मामकीनकवितेव मनोभिरामा
रामा कदापि हृदयान्मम नापयाति ॥

( भामिनीविलास, ३–६ )

वरील पद्यें जगन्नाथकृत 'भामिनीविलासा'च्या 'करुण' नामक तृतीय विलासांतील आहेत. पहिल्या पद्यांत 'गुण' आणि 'पर पुमान्' हे शब्द श्लिष्ट आहेत; व दुसऱ्याचा तर सगळाच अर्थ श्लेषमय आहे.

तेव्हां वादविषयक आर्येंत श्लेषाच्या प्रयोगाबद्दल जर आमच्या कवीवर दूषण आलेंच तर वरील महारसिकावर व महाकवीवरहि तितक्याच मानानें येणार आहे!

शिवाय हेंहि लक्षांत आणलें पाहिजे कीं, निर्भर्त्सनेच्या भाषणांत नामाच्या यथार्थत्वाविषयींचा किंवा अयथार्थत्वाविषयींचा उल्लेख येणें हें अगदीं साहजिक आहे. कोणी गोरा मनुष्य असतां त्यांस उद्देशून रागानें बोलतांना 'तूं बाहेर जितका गोरा आहेस तितका आंतून काळा आहेस,' किंवा तो वर्णानें काळा असल्यास तूं आंत बाहेर सारखाच काळा आहेस.' अशी बोलण्याची प्रवृत्ति लोकव्यवहारांतसुद्धां आढळते. मग काव्यांत तर हा प्रकार आढळेलच आढळेल. 'गीतगोविंदां'त विप्रलब्धा नायिका नायकास रोषपूर्वक म्हणते:—

बहिरिव मलिनतरं तव कृष्ण मनोऽपि भविष्यति नूनम्।
कथमय वञ्चयसे जनमनुगतमसम-शर-ज्वर-दूनम् ॥

( हरिहरी याहि० ॥ सर्ग ८१६ )

हे कृष्णा! तूं बाहेरून जसा अत्यंत मलिन ( काळा ) आहेस त्याप्रमाणें तुझें मनहि आहे असें वाटतें. एरवीं मदन संतापानें पीडलेल्या अशा स्वानुरक्त जनाचें वंचन तुझ्या हातून कसें होईल?

कृष्णास व बलरामास धनुर्यागप्रेक्षणार्थ बोलवायास कंसाकडून अक्रूर आला असतां गोपी भग्नमनोरथ होत्सात्या अक्रूरास शिव्या देतात—

"यमदुतशतक्रूर स्वमुखें अक्रूर म्हणवितो मेला;
आला गांव बघाया, परि बाई हो! न लेश कोमेला. ॥"

( मंत्रभागवत दशमस्कंध ४९५ )

तेव्हां वरील प्रमाणावरून पाहतां वादविषयक आर्येंतील श्लेषावर अप्रासंगिकत्वाचा जो दोषारोप केला आहे तो दूर होईल असें वाटतें.

वरच्याखेरीज इतर जीं दूषणें प्रस्तुत कवीवर वरील लेखांत सामान्यतः दिलेलीं आहेत त्याविषयीं यापूर्वीं विचार झालेलाच आहे. श्लेषाचा प्रयोग आमच्या कवीस कितीसा प्रिय होता व तो त्याच्या कवितेंत कितीसा आढळतो, तसेंच जीं थोडींबहुत अशीं स्थळें आहेत त्यास श्लेषरचनेच्या योगानें दुर्बोधत्व कितीसें आलें आहे, याविषयीं येथें कांहीं निराळें लिहिणें नकोच. वरील सर्व गोष्टींचा विचार झाला असतां प्रस्तुत महाराष्ट्रकवीची 'साधारणकवि' या पदांनीं जी अवगणना केली आहे तीहि सहजच निराधार होणार आहे.

◆ ◆ ◆

# १३. महाराष्ट्र देशाचा इतिहास

जुन्या काळच्या हकीकती व जुनीं काव्यें हीं राखून ठेवून काय करायाचें आहे, असा प्रश्न कित्येक समंजस लोक कदाचित् करतील. जे गेले मेले त्यांची आठवण करण्यांत काय फायदा आहे? जें चाललें आहे तें खरें. इतिहास म्हणजे मेलेल्यांची किंवा गत गोष्टींची कथा होय हें उघडच आहे; पण यावरून त्याचा अभ्यास निरर्थक हें मात्र ठरत नाहीं. पाहा कीं, सॉक्रेटीस् मरून आज दोन हजारांवर वर्षें होऊन गेलीं; सध्यां सारें भूमंडळ जरी शोधलें, तरी त्याचा गोत्रज, वंशज किंवा कोणी कसलाहि संबंधी एकहि सांपडणार नाहीं. खुद्द आथेन्स येथें गेले तरी त्याचें राहण्याचें ठिकाणहि सांपडेल किंवा नाहीं याचा वानवाच दिसतो. त्याचें शरीर तर केव्हांच मातीबरोबर मिळून पार झालें असेल! दुसरें उदाहरण रोम व कार्थेज यांच्या लढाईचें घ्या. याहि लढाईस आज दोन हजारांवर वर्षें लोटलीं; व दोन्ही शहरांचें वैभव नष्ट झाल्यासहि किती काळ लोटून गेला! कार्थेज तर वरील लढाई आटपल्यावर पन्नास वर्षांनींच धुळीस मिळून गेलें, व पुढें कितीक राष्ट्रें तो सारा प्रदेश एकामागून एक तुडवीत गेलीं, रोमची तरी कालांतरानें तशीच धूळधाण झाली, व सध्यां जरी तें शहर कायम आहे तरी हा त्याचा दुसरा जन्म म्हटला पाहिजे. पूर्वींची भाषा, पूर्वींचा धर्म, पूर्वींचा रीतीरिवाज, पूर्वींची लोकव्यवस्था, वगैरे सर्व कांहीं नाहींसें झालें आहे. तेव्हां असल्या दोन शहरांच्या त्रेतायुगांतल्या लढाईचा वृत्तांत हा सध्यां इसापनीतींतल्या पशुपक्ष्यांच्या युद्धासारखाच होय! म्हणजे वस्तुतः पाहतां इसापानें वर्णिलेल्या युद्धाचा प्रस्तुत काळीं चाललेल्या रहाटीशीं जितका संबंध आहे तितपतच वरील महायुद्धाचाहि होय. नुसता वरवर जो विचार करणारा आहे त्यास वरील दोन्ही सिद्धांत अत्यंत मान्य होऊन सॉक्रेटीस्चें चारित्र व कार्थेजची लढाई ही लिहिणारे व वाचणारे दोघेहि मूर्ख असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. पण अंमळ खोल जर विचार केला तर कोणाच्याहि ध्यानांत येईल कीं, वरील महापंडित हा लोक सोडून गेल्यास जरी आज दोन हजार वर्षें होऊन गेलीं, व कार्थेजचें युद्धहि जरी केवळ धर्मकथाच होऊन बसलें आहे तरी दोहोंच्या वृत्तांतापासून होणारा जो

वास्तविक उपयोग तो इतक्या काळानेंहि लवमात्र सुद्धां कमी झाला नाहीं. कोट्यवधि योजनें दूर असणारे जे तारागण त्यांचा स्वयंभू प्रकाश जसा इतक्या अगणित अंतरावरूनहि आपणाकडे सतत पोंचून जगाच्या आरंभापासून मार्गदर्शक होत आला आहे त्याप्रमाणेंच आजपर्यंत साऱ्या देशांत ज्या ज्या ईश्वराच्या विभूति वेळोवेळीं प्रगट होऊन पुनः निजधामास गेल्या त्यांचें चरित्रहि लोकांस उन्नतिप्रदच होत गेलें आहे. वरील चरित्र व वरील इतिहास वाचून धीरोदात्त पुरुषांचा महिमा कोणाच्या हृदयावर ठसत नाहीं, व कोणाच्या मनास सदाचरणाविषयीं, स्वदेशप्रीतीविषयीं स्फुरण होत नाहीं ? तर याप्रमाणें जे गतवृत्तांत अतज्ज्ञ जनांस बाह्यतः केवळ नीरस वाटतात त्यांच्या आंत नारिकेलपाकन्यायानें अत्यंत आल्हादकारक व उत्साहप्रद असा रससंचय असतो !

पण हें केवळ सामान्यतः झालें. कोणत्याहि देशाच्या इतिहासाच्या वाचनापासून कोणता लाभ आहे हें वर सांगितलें. मग यावरून आपला जिशीं अत्यंत निकट संबंध, जिचें वैभव तें आपलें वैभव, जिचें दूषण तें आपलें दूषण, जिची आपणांस सर्वांत अधिक माहिती, जी आपलें जन्मस्थान, त्या भूमीचा वृत्तांत समजल्यापासून तर किती फायदा आहे हें काय सांगावें ! इतर देशांचा इतिहास व आपल्या देशाचा इतिहास या दोहोंमधील भेद म्हटला म्हणजे अंतराळांतील अवघ्या इतर तारागणांत व आपापल्या ग्रहमालेचा जो अधिपति त्यांत जितका आहे तितका होय.

पाहा कीं, रोम व कार्थेज यांच्या युद्धांत सोफॉनिस्बा नांवाच्या सरदारकन्येची गोष्ट आहे, आणि इकडे भीमसिंगाची बेटी कृष्णाकुमारी हिचा वृत्तांत आहे; तिकडे सीजराचा वध आहे, इकडेहि नारायणराव पेशव्यास मारेकऱ्यांनीं मारला आहे; तिकडे नेपोलियन् बादशाहाची जंगी स्वारी रशियाची खोड मोडून सगळें युरोपचें राज्य एकछत्री करण्याकरतां निघाली आहे; इकडे शिवाजीनें शंभर वर्षांपूर्वी सुरू केलेल्या मंदिरावर कळस बसवण्याकरतां भाऊसाहेबांचा जरीपटका असंख्य महाराष्ट्र वीरांनीं वेढलेला होत्साता दिल्लीपदावर निघाला आहे; तिकडे ऑगस्टस् बादशाहा रोमक पत्तनाच्या सिंहासनावर बसून व्हर्जिल, हॉरेस यांच्या वाग्विसरांत आनंदभरानें

वाहवत आहे; इकडे शकांचा आपल्या प्रतापकिरणांनीं विध्वंस करून विराजमान झालेला जो विक्रमादित्य तो कालिदासप्रभृति कविवरांचा प्रत्यक्ष वाग्देवीच्या वीणावादनपर हस्तास व नेत्रकमलांसहि स्तिमित करणारा जो वीणारव त्यास लुब्ध होऊन डोलत आहे! वस्तुतः पाहतां वरील दोन्ही वृत्तांत हे समसमान आहेत, पण दोहोंचें एतद्देशीयांच्या मनावर कार्य किती भिन्न होतें? दोन्ही गतवृत्तांत असतां दुसरे स्वदेशांत घडलें असल्यामुळें त्याची जणों काय प्रत्यक्षता आपणांस भासते. सारांश, अगस्त्याच्या किंवा व्याधाच्या प्रकाशांत आणि उन्हांत किंवा चांदण्यांत जितपत अंतर तितपतच द्वीपांतरींच्या इतिहासांत व स्वदेशाच्या इतिहासांत होय!

मग असला इतिहास जर नष्ट झाला, तर त्यापरती देशाची हानि कोणती? आमच्या पूर्वजांनीं गेल्या शें दोनशें वर्षांत येवढाले दिग्विजय गाजवून भारतवर्षाच्या पूर्वापार चालत आलेल्या कीर्तींत येवढी जी भर घातली, व शेंकडों स्थलांचा महिमा चिरकाल नाहींसा करून टाकला, तें सर्व आमच्या मूर्खपणानें व हयगयीनें जर होऊन न झाल्यासारखेंच झालें तर केवढी शोचनीय गोष्ट होय? युरोपांतल्या देशांत एकंदर देशांच्या इतिहासाविषयीं तर राहोच, पण प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें, शहरांचीं वर्णनें, धर्म, कलाकौशल्य, ग्रंथसंग्रह, इत्यादिकांचा इतिहास याविषयींहि लोकांस जिज्ञासा असून ती तृप्त करणारांस हवा तितका लोकाश्रय मिळतो, पण इकडे कशी बहार आहे पाहा!

नूतन विद्येनें आमची नजर सगळ्या भूमंडळावर फांकली असून कामश्चाटका कोठें आहे, टिंबक्टू शहराची वस्ती किती आहे, माजिल्लनची सामुद्रधुनी कोणी शोधून काढली, वगैरे खडान् खडा आम्हांस पुसून घ्या, पण वस्तीच्या ठिकाणाहून दहा वीस कोसांवर नेऊन सोडलेंत तर परत आपल्या जागीं येण्याची आम्हांस मारामार पडेल! आपल्या आजापणजांचें नांव वेळेनुसार आठवायचें नाहीं, रामायणांतील, महाभारतांतील अतिप्रसिद्ध कथा किंवा मराठ्यांच्या इतिहासांतील ठळक ठळक गोष्टीहि माहीत नसतील; पण ग्रीस व रोमच्या इतिहासांतील शक विचारा, किंवा इंग्लंडची

वंशावळ म्हणायाला सांगा, म्हणजे विल्यम राजापासून तों तहत कैसर-इ-हिंदपर्यंत तडक आगगाडी !

आतां कोणतेंहि ज्ञान संपादन केलें तरी तें प्रशस्यच होय हें खरें; पण आपल्या घरच्या गोष्टींची गैरमाहिती असून माहिती काय ती हजारों कोसांवरच्या मुलखांची हें हास्यास्पद होय यांत संशय नाहीं. शिवाय जे आपल्या घराची दुरुस्ती करणार व त्यांस सुधारणेची कळा आणणार त्यांस तर वरच्यासारखा दिव्याखालीं अंधेर अगदींच उपयोगी नाहीं. तर मॉरिस्-साहेब सांगतील तो आमचा इतिहास, मेकॉलेबोवा सांगतील ती आमची नीति, डॉ. विल्सन सांगतील तो धर्म ही लज्जास्पद स्थिति आजपर्यंत जी चालत आली तीच पुढें चालू नसावी.

कोणत्याहि राष्ट्राचा इतिहास म्हटला म्हणजे केवळ राजांचे वृत्तांत व लढायांच्या हकीकती दिल्यानें होत नाहीं. वरील शब्दाचा अर्थ किती व्यापक आहे हें मागें एके ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे. तेव्हां या व्याप्ती-प्रमाणें म्हटलें म्हणजे महाराष्ट्र देशाच्या इतिहासांत पुढील सर्व गोष्टी आल्या पाहिजेत. प्रथमारंभीं मराठे लोकांची स्थिति शिवाजी महाराजांच्या पूर्वीं कशी होती, त्यास पुढें जें येवढें वैभव प्राप्त झालें त्यास कारणभूत असें त्यांच्या अंगीं मूळचे गुण कोणते व कितपत होते व वरील राज्य-स्थापकानें त्यांचा विकास कोणत्या प्रकारानें केला, हिंदुधर्माची स्थिति त्या वेळेस कशी होती व तिनें यवनांच्या अपकर्षास कितपत साह्य केलें, इत्यादि गोष्टी मूळ उपोद्घातांत आल्या पाहिजेत. नंतर मावळे लोकांचें वर्णन, शिवाजीचे संवगडे तानाजी, बाजी, येसाजी यांचे वृत्तांत, शिवाजीचें शिक्षण, सैन्यव्यवस्थेचा व राज्यव्यवस्थेचा प्रकार, आरमारी फौजेची तयारी, औरंगजेबाचा दरबार, मोंगली लष्कर, भगवा झेंडा, रामदासाचा राजनीतीपर व धर्मपर उपदेश, तुकारामबोवांचें कीर्तन, वामनाचें पांडित्य व कवित्व, परभू लोकांचें शौर्य इत्यादि गोष्टी शिवराजांच्या वृत्तांतांत दाखल झाल्या पाहिजेत. नंतर संभाजीपासून शाहूपर्यंतच्या इतिहासांत सैन्यव्यवस्थेंत झालेले फेर, कलुशाचें वर्चस्व, फिरंग्यांची सत्ता, बेगमसाहेबांची हकीकत व शाहूचें आपल्या शत्रूच्या घरीं वाढणें, चित्पावनांची पूर्वस्थिति व

उत्कर्ष, ब्राह्मणांच्या व मराठ्यांच्या झटापटी, बाळाजीचें चातुर्य व वक्तृत्व, त्याचे दोघे बच्चे, याज्ञिकीच्या किंवा कारकुनीच्या कामांत फार झालें तर वाकबगार व्हावयाचें तें हानिबल् व हसड्रुबल् यांसारखे महावीर बनून शत्रूंचे काळ कसे होऊन राहिले तो प्रकार, दोघां भावांची परस्पर प्रीति, मस्तानी व समशेरबहाद्दर, शूर अधिपतींचा अभ्युदय, महाराष्ट्रांतील जातिभेदजन्य वैमनस्य मोडून सर्वांचा कट करण्याविषयीं पेशव्यांचा कटाक्ष, शाहूच्या गळ्यांतील केवळ ताईत बनून गेल्यामुळें त्यानें अंतकाळीं सर्व राज्याधिकाऱ्यांचें त्यांस केलेलें समर्पण, इत्यादि गोष्टींचा या दुसऱ्या भागांत अंतर्भाव झाला पाहिजे. यापुढें तर मराठ्यांचा इतिहास म्हणजे साऱ्या हिंदुस्थानचाच इतिहास; कां कीं, चारी मुलखांत त्यांचे सत्ताधारी कायम होऊन राहिले. तेव्हां नदीचें पात्र रुंदावत जातां जातां समुद्रसंगमाच्या स्थानीं जसें अफाट होऊन सागराशीं एकात्म होऊन जातें, त्याप्रमाणें वरील कालाच्या इतिहासांत अवघ्या भारतवर्षाच्या इतिहासाचा अंतर्भाव होतो! यापुढें छत्रपतींचें किंवा पेशव्यांचें घराणें हें मागील सूत्र सुटून शिंदे, होळकर, गायकवाड, भोसले, पवार, बुंदेले, पटवर्धन इत्यादि शाखांच्या पृथक् विस्तारांत शिरावें लागतें. तेव्हां या सर्वांचें यथातथ्य वर्णन म्हटलें म्हणजे पुन्हां वरच्यासारखा प्रत्येकाचा अवांतर परिवार आला. सारांश, मराठ्यांचा इतिहास म्हणजे शिवाजीचे, बाजीरावाचे किंवा यशवंतरावाचे पराक्रम वर्णिले किंवा नाना फडणविसाच्या राजकारणाचें वर्णन केलें म्हणजे झालें नाहीं; तर वरील वीरांच्या मोहिमांबरोबर व मुत्सद्यांच्या मसलतींबरोबरच रामशास्त्रीबोवांचा न्यायमनसुबा, रामचंद्रबाबांची जमाबंदी, बखतरामाची कारागिरी, दयारामाची सावकारी, गंगाविष्णूची वैद्यक्रिया, काशीनाथोपाध्यायांचा धर्मसिंधु, भवदेवमिश्रांचें पांडित्य, अमृतरायांचें कीर्तन, मोरोपंताची आर्यावाणी, जोशीबोवांचा तमाशा, व्यंकटनरसीचें गाणें, बाळंभटदादाची कुस्तीगिरी वगैरे सर्व प्रकार त्यांत इत्थंभूत आले पाहिजेत. त्याप्रमाणेंच त्या वेळची लोकस्थिति कशी होती,—म्हणजे बापलेक, नवराबायको, बहीणभावंडें, धनीचाकर, गुरुशिष्य इत्यादिकांचे परस्पर संबंध कसकसे होते, धर्मावर लोकांची कितपत श्रद्धा होती, त्यांचें आचरण कसें होतें, मेकॉले

प्रभृति तत्त्ववाद्यांच्या मताप्रमाणें सर्व येथून तेथून लबाड व मूर्ख होते किंवा कसे; त्याप्रमाणेंच शुभवर्तमानाची बातमी किंवा एकेश्वराचें वर्तमानही त्यावेळेस कानीं येण्याचा संभव नसून उलटा मूर्तिपूजेचा व पुराणांचा अंमल मात्र जारीनें सुरू होता. मग घरोघर व्यभिचार, लांडीलबाडी, मारामाऱ्या हे प्रकार सुरूं असत किंवा काय; चौकांत कोणत्या विद्यांचा कितपत अभ्यास सुरूं असे, व अभ्यासाची रीति कशी होती, मुसलमानी विद्येचा, भाषेचा व रिवाजाचा कितपत प्रचार होता, मुल्लासाहेबांच्या पवित्र शास्त्रानें हिंदुधर्माच्या अंधःकारांत सत्याचा प्रकाश कितपत पडला होता, व 'न काशी मक्का वा शिवाशिव न हिंदुर्न यवनः' ही स्थिति कितपत दृष्टीस पडत असे, ह्याप्रमाणेंच लोकांतील उत्सव, रीतीरिवाज, पेहेरावांच्या तऱ्हा वगैरे सर्व कांहीं वरील इतिवृत्तांत समाविष्ट झाले पाहिजे. मराठे लोकांविषयीं अमुक प्रकारची माहिती यांत मिळत नाहीं असें जोंपर्यंत राहील तोंपर्यंत 'महाराष्ट्र देशाचा इतिहास' अपूर्णच समजायचा !

आतां हें खरें कीं, वरील मानानें पाहिलें असतां संपूर्ण इतिहास असा कधींहि मनुष्याच्या हातून तयार व्हावयाचा नाहीं; कां कीं, सर्व प्रकारची माहिती कोणाला असणार आहे ? व ती सर्व मिळावी तरी कशी ! पण असें आहे म्हणून इतिहासाचें यथार्थ स्वरूप सांगणें बरोबर नाहीं असें मात्र होत नाहीं. आकाश अनंत आहे म्हणून आपल्या आढ्याला आभाळ लागलें आहे असें म्हणून कसें चालेल ? वामनाचा श्लोक सर्वविश्रुतच आहे.

आकाशअंत न कळोनिहि अंतरिक्षीं
आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी ।

◆ ◆ ◆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६५८७ वि: निबंध
क्रमांक १२२६ नों: दि: २६।३।६८

# १४. इतिहासाचा उपयोग

इतिहासाचा उपयोग काय ? हा प्रश्न दिसतांच असंमजस दिसून कोणी करीत नसतीलसें प्रथमतः वाटतें. कां कीं दुसरा कोणताहि उपयोग नाहीं म्हटला, तरी मनुष्याच्या मनास अत्यंत स्वाभाविक अशी जी जिज्ञासा ती तरी त्याच्या योगानें तृप्त होते हाच काय थोडा उपयोग आहे ? हा अगदीं निदानपक्षींचा उपयोग सांगितला, दुसरे जे इतिहास वाचल्यापासून मोठमोठे नफे आहेत ते पुढें सांगण्यांत येतीलच. असो; पण असें असतांहि इतिहासांत ज्यांस कांहीं एक अर्थ दिसत नाहीं, जे त्याचा तिरस्कार करतात असे मनुष्य पुष्कळ आढळतात. ज्यांत आपला कांहीं नफा नाहीं व तोटाहि नाहीं, अशा मागच्या गोष्टी मिळवायाच्या, जुने लेख पाहावयाचे, वगैरे जी विनाकारण यातायात करायची तींत काय अर्थ ? साहेब लोकांस कांहीं उद्योग नसतो, त्यांचीं हीं कामें ! असा रिकामा उद्योग कोणी करीत बसावें ? त्यांत निष्पन्न काय ? खरेंच ! जीवमान आहे तोंवर खाऊन घ्यावें, पिऊन घ्यावें, दुपारची वामकुक्षी चुकूं देऊं नये, संध्याकाळच्या खाशा वेळीं शानदारसा पोषाक करून बाहेर पडावें; मग गंध्याचें दुकान, किंवा ( विद्येचा षोक अथवा सुधारणेंत पुढारीपणा दाखविणें असल्यास ) लायब्ररी, अशा चार ठिकाणीं चार घटका साऱ्या जगाच्या उलाढाली करून नंतर रमत रमत घरीं यावें.

असो; तर याप्रमाणें इतिहासास नाक मुरडणारे वर सांगितलेले दोन प्रकारचे लोक असतात. एक वरचे वामकुक्षीवाले हा एक वर्ग व हा फार मोठा आहे यांत संशय नाहीं. दुसरा वर्ग दुराग्रही व स्थूल बुद्धि लोकांचा. या दोन्ही लोकांचे आक्षेप मनांत आणण्यासारखे नाहींत. आतां इतिहासाचे उपयोग कोणकोणते आहेत याविषयीं लिहितों.

एक तर वर सांगण्यांत आलाच आहे. कोणता ? तर जिज्ञासातृप्ति ईश्वरानें ही मनोवृत्ति मनुष्याच्या ठायीं मोठी प्रबळ ठेविली आहे. सूर्यबिंबाचा चंद्रानें ग्रास केला, किंवा शुक्र सूर्याच्या आड आला, कीं लोक कोणी हिंदुस्थानांत, कोणी अमेरिकेंत, कोणी दक्षिण समुद्रांत धांव घेतातच

कीं नाहींत ? जिवावर उदार होऊन केवळ जिज्ञासाप्रेरित होत्साते तोफेच्या गोळ्यांत बसून चंद्रलोकांवर स्वारी करतात कीं नाहीं[1] ? असो. तेव्हां मनुष्यमात्राचे ठायीं जिज्ञासा ही मोठी उच्छृंखल आहे. हिचा मुळींच अभाव असता तर जगाच्या मूळच्या स्थितींत आज फारसा फरक पडताना, हें उघड आहे. असो; तेव्हां सांगावयाचें काय कीं, अंतरांतील दूरदूरच्या गोलांविषयींहि जर मनुष्याच्या मनांत जिज्ञासा उत्पन्न होते, तर ज्या गोलावर तो वास करतो त्यावर निरनिराळ्या ठिकाणीं काय काय वृत्तांत घडले ते समजून घेण्याची त्यास उत्कंठा होणार नाहीं काय ?

वर सांगितलेला इतिहासाचा उपयोग सर्वांत पाहिला, साधा व लहान असा होय. तरी इतिहासाची प्रवृत्ति मूळारंभीं पडण्यास तोच कारण आहे असें दिसून येईल. त्याहून वरचढ दुसरा उपयोग म्हटला म्हणजे नीतिबोध. सज्जनांचा जय व दुर्जनांचा पराजय असेंच जरी इतिहासांत नेहमीं आढळत नाहीं, तरी एकंदरींत परिणाम असाच दृष्टीस पडतो. शिवाय दुसरें हेंहि लक्षांत येतें कीं, भलेपणानें वागूनहि जरी नेहमीं परिणाम लागतोच असें नाहीं, तरी पण दुष्टपणा केल्यानें तर तो नाहींच नाहीं लागत ! मनुष्याचें सर्व प्रकारें हित होणें तें केवळ याच मार्गानें व्हावयाचें; कुमार्गानें तें व्हावें हें वस्तुगत्याच शक्य नव्हे. याप्रमाणेंच मोठ्या प्रसंगींहि ज्यांचें धैर्यबळ ढळत नाहीं असे थोर पुरुष तर विपत्तींतहि सुख पावतात तें दुष्ट व कुत्सित मनाच्या लोकांस मोठ्या भाग्यशालीपणांतहि लाभत नाहीं. सारांश, या संसाररूप महा नाटकांत आजपर्यंत कोणकोणतीं पात्रें आपापली भूमिका आटपून निष्क्रमण करतीं झाली, हें चित्तावर चांगलें ठसलें असतां चांगला मार्ग कोणता, वाईट कोणता हें सुज्ञ मनुष्यास सहज निवडतां येतें. खरें सुख, खरें समाधान, खरी प्रतिष्ठा कशांत आहे हेंहि कळूं लागतें. सहस्रावधि मनुष्यांचा अनुभव थोडक्यांत त्यांस आलासा होतो; त्याच्या योगानें त्याची दृष्टि फाकते; आणि तो जर तसा समजुतीचा व दृढ निश्चयाचा असेल, तर

१. हें वर्तमान हल्लीं कित्येक पत्रांतून समजतें. तें खरें असेलसें बहुधा वाटत नाहीं. तरी मनुष्याचें धाडस व जिज्ञासा हीं काय करतील याचा नेम सांगवत नाहीं !

दा. क. १०८५६

लवकरच तो कोणाचा तरी कित्ता उचलून खलाशी लोक ध्रुवाच्या ताऱ्यावरून जसें नौकेचें नियमन करतात, त्याप्रमाणें तो त्या निवडलेल्या पुरुषाच्या चरित्रावर सारखी नजर ठेवून तदनुरूप आपलें आयुष्य क्रमण करतो. याप्रमाणें इतिहासापासून सदुपदेश प्राप्त होतो व म्हणूनच एका थोर ग्रंथकारानें 'इतिहास हा प्रत्यक्ष उदाहरणें दाखवून केलेला बोध होय' असें यथार्थ म्हटलें आहे.

इतिहास हा मनास उन्नति व प्रसन्नत्वहि देणारा आहे. म्हणजे त्याच्या निरंतर वाचनानें चित्त शांत व स्थिर राहतें, आणि थोर होतें. याचें कारण उघडच आहे. एका चतुर ग्रंथकाराचें असें वचन आहे कीं, 'इतिहास म्हणजे या जगांत जे महापुरुष होऊन गेले त्यांचीं चरित्रें आहे.' म्हणजे अशा पुरुषांनीं जीं कृत्यें केलीं त्यांनींच इतिहास भरला आहे. तीं काढून निराळीं केलीं तर त्यांत काय उरेल? अर्थात् कांहीं नाहीं. तेव्हां आजपर्यंत या जगतास भूषणभूत जीं रत्नें निरनिराळ्या देशांत निपजलीं त्यांचा सहवास जर अक्षयीं घडेल, तर त्यापरता लाभ कोणता?' सत्यसमागमाचा महिमा असाच आहे.आपल्या मराठी व संस्कृत कवींनीं या माहिम्याविषयीं निरनिराळ्या कथानकांनीं व दृष्टांतांनीं पुष्कळ लिहिलें आहे. या दृष्टांतांपैकीं तुकारामादि मराठी कवींची फार आवडती जी लोहपरिसाची उपमा ती या ठिकाणीं फार सुंदर व समर्पक होय. लोखंड मूळचें किती हलकें असतें व दिसण्यांत किती भिकार दिसतें! पण परिसाशीं वरच्यावर संघटन जसजसें घडेल तसतसें त्याचें सर्व धातूंत श्रेष्ठ व यथार्थनाम जें सुवर्ण तें बनत जातें! आणि वस्तुतः मनुष्य कसाहि चांगला वाईट निपजणें हें पुष्कळ अंशीं ज्या ज्या स्थिति त्यास प्राप्त होत जातात त्यांचेंच फल असतें. कोणी कोणी तर तें सर्वथाच त्यांचें फल होय असें सुद्धां म्हणतात. पाहा बरें, सध्यां आपल्या देशांत शिवाजीसारखा किंवा हैदरासारखा राज्यकर्ता कां निपजत नाहीं? किंवा नाना फडणविसासारखा राजकारणी पुरुष कां होत नाहीं! कारण उघडच आहे कीं, तसे गुण असले तरी त्यांचा विकास होण्यास हल्लींच्या स्थितींत मुळींच अवकाश नाहीं. असो. तेव्हां एखाद्या अंगच्या गुणाचा उत्कर्ष व्हावयास तशी स्थिति मनुष्यास अनुकूल असावी लागते. या स्थिति-

विशेषांतील एक मोठी गोष्ट तशा मनुष्याची संगत हा एक होय. जगांत जे मोठे मोठे लोक होऊन गेले ते त्यांस तशी संगत नसती तर कधीं न होते. प्राचीन काळचे शिकंदर, हानिबॉल, सिंपीओ इत्यादि व अलीकडचे आपल्या देशांतील थोरला बाजीराव, टिपू सुलतान, यांचींहि उदाहरणें देतां येतील. तेव्हां संगतिविशेषाचें फल अचिंत्य होय. याचें तरी कारण पाहूं जातां फार खोल आहे असें नाहीं. मनुष्य जन्मून त्यास जगांतील व्यवहार थोडेबहुत कळूं लागले म्हणजे त्याच्या हातून कांहींना कांहीं तरी व्यापार अवश्य झाला पाहिजे. त्यास सर्वथा निर्व्यापार असें कधींच राहतां येणार नाहीं. असें जर आहे तर मग त्यानें कोणतें आचरण करावें? अर्थात् जवळच्या चारचौघांचे जें पाहील तेंच. हें अगदीं स्वभावास अनुसरून आहे. ह्यास्तव मुलांस आईबापांचे जितके गुण लागतात–त्याहूनहि विशेषतः आईचे—तितके दुसऱ्या कोणाचे गुण लागत नाहींत. असो;तर अनुकरणाकडे मनुष्याची प्रवृत्ति जर येवढी साहाजिक व बलवत्तर आहे तर लहानपणापासून इतिहास चरित्रें वगैरे वाचण्याची जर त्यास गोडी लागेल तर ती त्यास किती हितावह होईल बरें!

इतिहास, चरित्रें वगैरे लिहिण्याचा प्रघात नसला म्हणजे पांच पन्नास वर्षांत त्यांची आठवणहि पार बुजून जाते! मग पुढील लोकांच्या ठायीं उत्साह कसा उत्पन्न व्हावा? व देशाची पहिली थोरवी तरी कशी रहावी?

होमरकवीनें आकिलिसाचा पराक्रम वर्णिला नसता तर शिकंदर होता काय, व्यासानें पांडवांचें चरित्र गाइलें नसतें तर शिवाजी उत्पन्न होऊन त्यांनें यवनांपासून राज्यश्री माघारीं हरण केली असती काय! शिकंदराचा इतिहास नसता तर सीझर कशाला होता? सीझर नसता तर नेपोलियन कशाला होता? शिवाजी महाराजांची कीर्ति जर मागें न रहाती; तर त्यांच्या पुत्राचा वध होऊन, राजकुल व राजधानी शत्रूंच्या कबजांत सांपडून, सर्व शून्याकार झालें असतांहि मराठ्यांनीं दिल्लीच्या औरंगजेबास पुरेपुरेसें करून मोठ्या कष्टानें व मोठ्या शर्थेनें अहमदनगरास कशाला पळवून लाविलें असतें? थोरल्या बाजीरावसाहेबांनीं घरचें दाभाडयांचें बंड मोडून

दिल्लीच्या मोंगलांची व हैद्राबादच्या नबाबाची[1] कशाला खोड मोडली असती? चिमाजी आप्पानें फिरंग्यांस कशाला जेरीस आणलें असतें? राघोबा भरारी[2] गिलच्यास अटकेपार कशास पळवून लावता? थोरला माधवराव साऱ्या जगास भारी असणाऱ्या इंग्रजांसहि जो भारी झाला, त्या हैदरास वरचेवर कसा तुडवून टाकता? सरतेशेवटीं भेकड, मूर्ख, बायक्या असा धनी पेशव्यांच्या कुळास अक्षय कलंक लावून पळत सुटला असतां, शत्रूवर एकटा चालत जाऊन समशेरबहाद्दर गोकलखां[3] अष्टयास कसा पडता? असो; तेव्हां अनुकरणाचें फल कांहीं विलक्षण आहे! पण ते पुरुष होऊन गेल्यावर त्यांचें स्मरण पुढें कोणासच होत नाहीं. यास्तव इतिहास असावे लागतात; कां कीं, देशाची स्थिति जरी अगदीं बदलून गेली तरी ते वाचून पुढेंमागें कोणास तरी त्यांपासून उत्साह-प्रेरणा प्राप्त होते. ग्रीसचें, रोमचें व अलीकडील इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांचीं राज्यें इतके दिवस टिकल्याचें हें एक कारण असावें यांत संशय नाहीं. शिवाजीचें चरित्र पहा! बापानें नावडत्या आईबरोबर पुनवडीस ठेवला असतां दादोजी कोंडदेवानें लहानपणीं थोडेंबहुत जें त्यास कांहीं शिकविलें तेवढ्यावरच ज्ञानानें पुढें केवढें अकांडतांडव केलें! जे लोक मागेंहि कधीं प्रसिद्धीस आले नव्हते व

---

१ हल्लीं ज्यास निजाम म्हणतात त्यास आपले आजे, पणजे, नबाब म्हणत. ते आपणांस दिल्लीपतीचे अंकित म्हणवीत असून त्यांचें तें नांव ठीक होतें. 'निजाम' हें नांव वास्तविक पहातां अप्रयोजक आहे. साऱ्या पेशव्यांस 'माधवराव' किंवा 'बाजीराव' म्हणण्यासारखें हें होय.

२ इंग्लंडच्या कित्येक जुन्या राजांस जशी त्यांच्या गुणांवरून उपपदें दिलीं असत; किंवा नेपोलियनच्या शिपायांनीं त्यांचें नांव जसें 'लिटल् कार्पोरेल्' (छोटा नाईक) असें आवडीनें ठेवलें होतें, तसें राघोबादादाच्या रणवेगावरून त्यास 'राघोभरारी' असें म्हणत. ही गोष्ट व पुढील टीपेंतील माहिती एका वृद्ध मनुष्यापासून आम्हांस मिळाली.

३ बापू गोखल्यापाशीं जे आरब होते ते त्यास 'गोखलखां' असें त्याच्या शौर्यावरून म्हणत.

पुढेंहि लवकरच पुनः अप्रसिद्ध झाले, ज्यांच्या अंगीं बाहेरून शरीराचें किंवा बुद्धीचेंहि सामर्थ्य दृष्टीस पडत नाहीं, अशांच्या ठायीं आपणांस अत्यंत उपयोगी पडतीलसे गुण ओळखून त्यांस त्यानें आपले जिवलग संवगडे केले. त्यांच्या बळावर जी हिंदूंची राजसत्ता सुमारें हजार वर्षें अस्तास गेली होती तिचा अरुणोदय मावळत्या डोंगरावर पुनः झाला! थरमॉपिलीच्या लियोनिडसास त्यांच्या तानाजीनें व सूर्याजीनें लाजविलें! सर्व पृथ्वीभर ज्या शहराच्या मातब्बरीची प्रसिद्धि होती, जें मोंगलांच्या राजश्रीचें केवळ कुंकू होतें, तें शहर त्यांनीं दोनदां सावकाश लुटलें. विजापुरकरास तर हां हां म्हणतां चिरडून टाकून गर्वानें माजलेल्या मोंगलांस त्यांनीं असा उच्छाद दिला कीं, शिवाजी एक आहे कीं दोन आहेत असें त्यांस भासविलें! तेव्हां केवढें सामर्थ्य हें! व याहीपेक्षां वाखाणण्यासारखें काय, कीं, तिचा केवढा सद्व्यय झाला! तेव्हां मोठी बुद्धि असण्यापेक्षां सदाचरणप्रीति असणें विशेष हितकारक हेंच आहे. मनुष्याच्या मनाचा असा चमत्कार आहे कीं, ‘ लाभाल्लोभः प्रवर्तते ’ ‘ जसा जसा लाभ होत जातो तसा तसा लोभहि वाढतो! ’ तेव्हां आहे त्यांत संतोष मानून राहणारा मजूरहि मोठ्या बादशहापेक्षां सुखी असेल यांत संशय नाहीं! याप्रमाणें शहाणपणाच्या अनेक गोष्टी जर त्याच्या मनांत ठसून गेल्या, तर मोठा अधिकार मिळाल्यापेक्षांहि त्यास अधिक लाभ होणार नाहीं काय? असो; तर इतिहासापासून मनास शांति व उन्नतत्त्व प्राप्त होतें हा एक त्यांपासून मोठा लाभ आहे.

लंकापतेः[१] संकुचितं यशो यत् यत्कीर्तिपात्रं रघुराजपुत्रः ।
स सर्व एवाद्य कवेः प्रभावो न कोपनीयाः कवयः क्षितीन्द्रैः ॥ १ ॥

बिल्हण—

---

१ “ लंकेचा राजा रावण याची कीर्ति थोडी, व रामराजाचें यश विशाल हा प्रभाव अवघा आद्यकवीचा ( वाल्मीकीचा ) होय! यास्तव मोठे राजे जरी झाले तरी त्यांनीं कवीशीं नम्रच असावें! ”

इतिहासापासून चवथा उपयोग मनाचें रंजन निरनिराळ्या देशांत घडलेले वृत्तांत समजल्यानें व त्यांचें मनन केल्यानें मागें सांगितल्याप्रमाणें जिज्ञासावृत्तीचें समाधान तर होतेंच, पण जर ते इतिहास तशा शैलीनें लिहिले असतील तर त्यांच्या वाचनानें वाचकांस आल्हादहि होईल. असे इतिहासग्रंथ ग्रीक, लॅटिन, फारशी या भाषांत आहेत. तसेंच अलीकडे इंग्लिश भाषेंत झालेले ह्यूम, गिब्न, मेकॉले यांचेहि ग्रंथ सर्वत्र प्रसिद्ध आहेतच. अशा इतिहासांची भाषासरणी यथास्थित ग्रंथरचना, कथानकाची जुळणी, गहन विचार, तऱ्हेतऱ्हेची माहिती मध्यें घालून देण्याची खुबी, यांच्या योगानें सर्व प्रकारच्या वाचणारांस ते मान्य होतात. ज्यांस केवळ भाषाच शिकायची असते त्यांस तिचें अत्यंत रमणीय रूप त्यांत पाहावयास सांपडतें; ज्यांस विषयाची मांडणी कशी करावी याची समजूत करून घ्यावयाची असते त्यांस ती धाटणी त्यांतून उचलतां येते, केवळ गोष्ट-वेल्हाळच जे असतात त्यांस आणि ज्यांस चमत्कारिक व मौजेच्या गोष्टींचा संग्रह करावासा वाटतो त्यांस तो त्यांतून सहज करतां येतो. याप्रमाणें इतिहास अनेक प्रकारांनीं मनोवेधक होतो. कादंबऱ्या वाचतांना श्रम न घेतां जशी करमणूक होते, तशीच बहुधा अलीकडील कित्येक उत्कृष्ट इतिहासांनीं होते; व यास्तवच अलीकडे इतिहास वाचण्याची प्रवृत्ति पडून तो सर्वांस सामान्यतः जितका माहीत असतो तितका पूर्वी कधींहि नसेल. ही गोष्ट दोन्ही तऱ्हेनें नफ्याची झाली. एक तर इतिहासाचें ज्ञान सर्वांस उपयोगी आहे म्हणून; आणि दुसरें असें कीं, त्यामुळें कादंबऱ्या, नाटकें इत्यादिकांकडेच जो लोकांचा पूर्वी ओढा होता तो कमी झाला. मनोरंजनाचा दुसरा प्रकार कांहींच अनुकूल नसल्यामुळें पूर्वी लोकांचा कादंबऱ्यांकडेच विशेषतः भर असे; व त्यामुळें मुख्यत्वेंकरून तरुण लोकांस त्या फार अनर्थावह होत. त्या वाचणारे बहुधा तरुण वयाचेच असायाचे, व लिहिणारेहि तसेच, मग काय विचारावें ? त्या वयांत अंतःकरणवृत्ति अत्यंत सुक्षोभ असल्यामुळें अद्भुत, असंभवी गोष्टींत मन रंगून शृंगारवीरादि रस, जे त्यांत आतिशयोक्तीनें वर्णिले असतात त्यांत तल्लीन होऊन मन भडकून जाई. तेव्हां मन बिघडणें हा कादंबऱ्यांपासून होणारा एक अनर्थ

आहे. दुसरा अनर्थ मनाचें दौर्बल्य. कादंबऱ्याच वाचण्याची ज्यांस चटक लागते त्यांस मग दुसरें कांहींच वाचावेंसें वाटत नाहीं. कादंबऱ्या भराभर वाचावयाच्या, व त्यांत समजण्यासहि कांहीं कठीण नसतें; यास्तव विद्या काय ती हीच असें वाचणारास वाटूं लागून त्याहून वरचढ जे शास्त्रीय वगैरे ग्रंथ त्यांचा त्यांस त्रास होऊं लागतो. त्यांत शिकणारानें आपली मति शिरकवावी लागते. कारण ते कठीण व गहन विषय पडले, पण तें याच्यानें होत नाहीं. अशी एकदां संवय पडून गेली म्हणजे मग ती कधींहि मोडतां येत नाहीं. याप्रमाणें वाजवीपेक्षां जास्त असा हा कादंबऱ्यांचा नाद लागला असतां तो मनास अपाय करतो.तें अगदीं निःसत्त्व होऊन जाऊन कोणतेंहि श्रमाचें काम त्यांस झेपेनासें होतें.

पण मनोरंजक इतिहासाच्या योगानें वरील तिन्ही अनर्थ टळून कादंबऱ्यांचें तर कार्य होतें. त्यांत निव्वळ सत्यच लिहावयाचें असतें यास्तव भुताराक्षसांच्या, ' नाईट ' लोकांच्या, अशा विलक्षण प्रकारच्या अद्भुत गोष्टी येत नाहींत. तरी पण त्यांत अद्भुत रस नसतो असें नाहीं. नेपोलियन-सारख्या वीरांच्या, वॉट्सारख्या कल्पकांच्या, बेकन्सारख्या तत्त्वज्ञांच्या चरित्रांत अद्भुत् रसास काय उणीव आहे ! पण दोहोंत फरक किती आहे तो पाहा ! पाहिल्यावांचून जसे पुष्कळ भ्रमिष्ट झाले तसे दुसऱ्यांच्या योगानें कधीं तरी होतील काय? दुसरी गोष्ट मन बिघडणें. हेंहि इतिहास-वाचनानें होण्याचा अगदीं संभव नाहीं हें उघडच आहे. तिसरें मनाचें क्षीणत्व. हें इतिहासवाचनानें होण्याचा संभव मुळींच नाहीं.हें तर काय, पण जसजसा इतिहासाचा कोणास नाद लागत जाईल, तसें तसें त्याचें मन विशाल व विचारक्षमच होत जाईल. फार तर काय, पण त्यास हा नाद लागला हेंच वरील दोहोंचें मोठें चिन्ह होय! तर याप्रमाणें इतिहास हा सर्व प्रकारें हितकर असून कादंबऱ्यांप्रमाणें त्यापासून कोणताहि अपाय होण्याचा संभव नाहीं. शिवाय सर्वांत मोठी गोष्ट ही कीं,इतिहास अक्षरशः खरा असल्यामुळें

त्यांतील गोष्टी जशा मनावर पक्क्या ठसल्या जातात, तशा कादंबऱ्यांतील ठसत नाहींत.

इतिहासापासून पांचवा उपयोग राजकारणी पुरुषांस म्हणजे मुत्सद्दयांस होय. इतिहासाचा मुख्य उपयोग वास्तविक पाहतां हाच असून याचकरितां इतिहासकार पूर्ववृत्त लिहून ठेवतात. व्यक्तिभूत मनुष्यास जितका चरित्रांचा उपयोग तितकाच मुत्सद्दयांस इतिहासाचा; म्हणजे 'पुढच्यास ठेच मागला शहाणा' या मराठी म्हणीप्रमाणें पूर्वी होऊन गेलेल्या मनुष्यांचा अनुभव जसा पुढच्यास उपयोगी पडतो, त्याचप्रमाणें या पृथ्वीवर आजपर्यंत जीं अनेक राज्यें होऊन गेलीं त्यांचा अनुभव हल्लींच्यांस कामास येतो. राज्यास हितकर गोष्टी कोणत्या, त्यांवर अनिष्टें आलीं असतां कोणत्या युक्तिप्रयुक्तीनें त्यांचें निवारण करावें, तंटेबखेडे कशामुळें उत्पन्न होतात, प्रजेस सुखी ठेवण्याचे मार्ग कोणते, कायदेकानू कशा प्रकारचें असावे, वगैरे शेंकडों गोष्टी पूर्वीच्या इतिहासावरून सध्यांच्या राज्यकर्त्यांस समजल्या आहेत. एखादें वडाचें जुनाट झाड अवाढव्य विस्तार पावून शेवटीं वठलें असतां त्याचे नवे सोट जसे वाढत जाऊन मूळच्या झाडाच्या जागीं होतात, त्याचप्रमाणें रोमच्या अफाट पसरलेल्या बादशाहींतून हळूहळू अलीकडचीं युरोपांतील अनेक राज्यें उद्भवलीं. भाषा, रीतिरिवाज वगैरेंचें मूळ जसें तें राज्य होय, तसेंच राज्यव्यवस्थेचा पायाहि सध्यांच्या राष्ट्रांचा तेथपासून आहे. हा बळकट आधार नसता तर युरोपची स्थिति आज कोणत्या प्रकारची असती हें सांगणें कठीण आहे! पाहा बरें पंधराव्या शतकांत ग्रीक व रोमन विद्येचें पुनरुज्जीवन होऊन तिचा प्रसार युरोपभर होतांच त्या खंडांतील सगळ्या राष्ट्रांस एकदम किती जोर आला! हर एक गोष्टींत तेथील लोकांचा पगडा साऱ्या पृथ्वीवर जो तेव्हांपासून बसला आहे त्यास मुख्य कारण पाहूं जाता वर सांगितलेल्या प्राचीन राष्ट्रांनीं ग्रंथांत सांठवून ठेवलेलें अमोलिक ज्ञानभांडार एकदम त्यांच्या हातांस जें लागलें तेंच

होय. राज्यरीति, सैन्यव्यवस्था कायदेकानू वगैरे सर्व वरील जुन्या लोकांमध्यें पूर्णदशेस आली असल्यामुळें ती अलीकडील राष्ट्रांस आयतीच उपयोगी पडलीं, तेव्हां हा त्यांस केवढा लाभ झाला! पूर्वीं नाशिखान नामें करून एका पारस देशाच्या राजानें* मुद्दाम एक वकील हिंदुस्थानांत पाठवून आपल्या संस्कृत 'हितोपदेशाचें' फारशी भाषेंत भाषांतर करविलें, रोमच्या सेनेट सभेनें तसेंच तीन वकील अथेन्स शहरास पाठवून तेथून सोलनचे कायदे आणविले, लैकर्गसही— स्पार्टन् लोकांस राज्यव्यवस्थेचें नियम बांधून द्यावे या उद्देशानें एशिया मैनर या दूरदूरच्या देशांत जाऊन हिंदुस्थानांतहि आला होता असें म्हणतात. असे दीर्घ प्रयत्न त्या वेळच्या लोकांस राज्यनीतिविषयक ज्ञान मिळायास पडत असत! आणि तेवढेहि त्या ज्ञानाची योग्यता जाणून लोक करीत! मग अलीकडच्या हजारों नव्या सोयींच्या योगानें तेंच अमोलिक ज्ञान जर सर्वांस सुलभ झालें आहे तर हा लाभ लहानसान काय? मागें इतिहासाचे जे आक्षेप सांगितले ते एवढाहि विचार करीत नाहींत, कीं मुळांशिवाय जशी झाडाची स्थिति संभवत नाहीं, किंवा पायावांचून जसें घर रहाणें अशक्य, त्याचप्रमाणेंच प्राचीन स्थितीशिवाय कोणत्याहि राष्ट्रांची त्या त्या वेळचीं नवी स्थिति आली नसती. नुसत्या वरवर पाहणारांची दृष्टि मुळांपर्यंत न पोंचल्यामुळें त्यांस वाटतें कीं, सध्यां जें रूप दिसतें आहे तें स्वयंभूच आहे. यास आदिकारण किंवा आधारभूत असें कांहींच नाहीं. ही मूर्ख समजूत मनांत धरून असे

---

* संस्कृत ग्रंथांचा कालक्रम बसण्यास कांहीं गोष्टी ठोकीव माहीत आहेत—जसें, शिकंदराची स्वारी, काश्मीरचा श्रीहर्ष राजाचा शक सन ११११३, चिनी प्रवाशांचे ग्रंथ. यांपैकींच वरील राजाचा शक (सुमारें इ. स. ५६०) हा आहे. यावरून कालिदासादिकांसाहि जे आठव्या शतकापर्यंत ओढतात त्यांनीं अंमळ जपून लिहावें.—

लोक आपल्या अज्ञानास, अरसिकतेस, किंवा आळसास इतिहासाचा मुळीं तिरस्कारच करून लपवूं पाहतात. असो. तेव्हां एखाद्या राष्ट्राविषयीं पूर्ण साद्यंत ज्ञान ज्यास संपादन करायाचें असेल, त्यास त्याची त्या वेळचीच स्थिति पाहिल्यानें तें कधीं होणार नाहीं. अगदीं मुळारंभापासून कसकसें फेरफार होत गेले ते पूर्णपणें जेव्हां तो लक्षांत आणील तेव्हांच त्या वेळच्या स्थितीविषयीं त्यांस यथार्थ ज्ञान होईल. तसेंच त्याच्या भावी स्थितिविषयीं जर त्यास अटकळी बांधण्याच्या असतील तर तेंहि वरील समग्र ज्ञान असल्याखेरीज त्याच्यानें होणार नाहीं.

इतिहासाचा शेवटला एकंदर उपयोग म्हटला म्हणजे मनाचें पोषण होय. म्हणजे त्याच्या वाचनानें व मननाने मनाच्या निरनिराळ्या शक्ति प्रगल्भ दशेस पोंचतात. एक तर स्मरणशक्ति शक, मिति, स्थळांचीं नांवें, मनुष्यांचीं नांवें, एकंदर मजकूर हीं अगदीं बरोबर ध्यानांत ठेवावीं लागल्यामुळें या शक्तींचें काम पडून ती उत्तरोत्तर अवश्य वाढत जाते. दुसरी कल्पनाशक्ति. इतिहास म्हणजे अर्थात्च गतगोष्टींचा वृत्तांत असल्यामुळें तो मनांत यथास्थित आणण्यास कल्पनेचें काम पडतें. ज्या काळचा, ज्या देशाचा इतिहास वाचायचा, त्याची विशेष स्थिति पूर्णपणें लक्षांत आणल्यावांचून तो कधीं समजत नसतो; यास्तव तसें होण्यास वाचणाराची कल्पनाशक्ति चांगली चलाख असावी लागते. ही चलाख कल्पना व मोठी पोक्त किंवा सूक्ष्म बुद्धि हीं एक नव्हेत. यास्तवच कविता, कादंबऱ्या, नाटकें इत्यादिकांचा तिरस्कार करणारे जसे मोठे बुद्धिमानहि आढळतात तद्वत्च जॉन्सनसारखे इतिहासास तुच्छ करणारे पंडितहि आढळतात. पण या त्यांच्या अवहेलनेनें ते स्वतःस जितका अपाय करून घेतात तितका वरील कवितादिकांच्या अधिदेवतांस होत नाहीं! त्यांचें मनोहर सौंदर्य लेशमात्रहि कमी होत नाहीं, व त्यांच्या रसलुब्ध खऱ्या भजकांतूनहि एकाची सुद्धां भक्ति लवमात्रहि उडत नाहीं. हें

अवहेलना करणारे मात्र कल्पनेचे जड ठरून वृद्धप्रमदान्यायानें उपाहास्य होतात. तेव्हां इतिहास त्यांतूनहि विशेषतः दूरच्या देशांचा किंवा काळाचा–यथास्थित समजण्यास व त्याची पुरतेपणीं गोडी लागण्यास वाचकाची कल्पना जागृत असली पाहिजे. असें असल्याविना त्या त्या इतिहास-पात्राशीं तादात्म्य पावून तो तो वृत्तान्त केवळ प्रत्यक्षसा मनास भासणें हें घडत नाहीं. तेव्हां ही शक्ति इतिहास वाचणाऱ्याच्या अंगीं मूळची असली पाहिजे. ती असली म्हणजे मग अर्थात्च याच वाचनानें ती पुढें वृद्धिंगतहि होत जाते. इतिहासांत नाना प्रकारचे देश, पुरुष, प्रसंग यांचें वर्णन असल्यामुळें कल्पनाशक्तीस रमण्यास हवा तेवढा अवकाश सांपडतों, व त्यामुळें तिचें अर्थात्च अधिक अधिक पोषण होत जातें. शिवाय इतिहासांतील हकीकत सगळी अक्षरशः खरी असल्यामुळें कारण तशी ती असेल तरच तो इतिहास–कादंबऱ्यांच्या असत्यतेमुळें जो एका रीतीनें त्यांपासून मनास खेद होतो तो यापासून होत नाहीं. पाहा बरें ‘ आरबी भाषेंतील गोष्टीं ’ तल्या दर्यावर्दीच्या निरनिराळ्या सफरी वाचल्या असतां मनास मोठा चमत्कार वाटून कल्पनाशक्ति त्यांत अगदीं चूर होऊन जाते! पण काय? वाचणें संपतांच लागलीच मनांत येतें कीं, या सर्व गोष्टी मोठ्या मौजेच्या खऱ्या, पण शेवटीं काय येथून तेथून खोट्या! पण तेंच कोलंबसाच्या सफरी वाचा; म्हणजे मनाची कशी स्थिति होते!

तेव्हां सांगायाचें तात्पर्य काय कीं, मनुष्याच्या मनास स्वभावतःच सत्य आवडत असतें, यास्तव खऱ्या इतिहासाकडे त्याची प्रवृत्ति जितकी सहज व जितक्या प्रेमानें होईल तितकी कल्पित कादंबऱ्यांकडे होणार नाहीं, व म्हणूनच मनुष्याची कल्पना इतिहासवृत्तांतांत मोठ्या आवडीनें निःशंक रमते; कारण त्यांत असत्यतादोष मुळींच नसल्यामुळें तींत यथेच्छ विहार केल्याचा तीस अगदीं शीण वाटत नाहीं. तसेंच इतिहासांतील विषय पुष्कळ प्रत्यक्ष इंद्रियगोचर होण्यासारखे असल्यामुळें त्यांचा ठसा मनावर जितका ठळठळीत उठण्यासारखा असतो तितका

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
इतिहासाच्या उपयोग 26546 वि: 111
क्रमांक 9226 नों दि: 25.5.60

काल्पित कथांतील विषयांचा अर्थातच नसतो. असो; तर याप्रमाणें कल्पनाशक्तींत रंजविण्याच्या संबंधानें कादंबऱ्यांत व इतिहासांत इतकें अंतर आहे. तेव्हां इतिहासाच्या वाचनानें वाढली जाणारी दुसरी मानसिक शक्ति कल्पना होय. तिसरी विचारशक्ति. ही इतिहासाच्या ज्ञानानें वाढते हें अगदीं उघड आहे,—फार तर काय, पण हें नुसतें लिहिणें म्हणजे सुद्धां 'सूर्य तेजाळ आहे,' 'पाण्याच्या अंगीं प्रवाहित्व धर्म आहे.' इत्यादि वाक्यांप्रमाणें अत्यंत प्रसिद्ध अर्थाचा अनुवाद केल्याप्रमाणें असमंजस दिसते. तथापि ती कां वाढते व कशी वाढते यावर अंमळ विस्तार करणें जरूर आहे. एकतर इतिहासांत तऱ्हेतऱ्हेची माहिती असल्यामुळें मनाच्या कोठारांत पुष्कळ नव्या गोष्टींचा भरणा होतो. त्या तर्क चालविण्यास किंवा हातीं घेतलेल्या विषयास वैचित्र्य किंवा विशदत्व देण्यास उपयोगी पडतात. दुसरें, इतिहासांत निरनिराळ्या पात्रांचे निरनिराळे गुणदोष, निरनिराळे स्वभाव, निरनिराळ्या कृति स्पष्ट दाखविलेल्या असतात. यास्तव मानवी स्वभावाचीं अनेकविध अशीं चित्रविचित्र रूपें वाचकांच्या दृष्टीस पडून त्यांचें व्यवहारांत अत्यंत उपयोगी असें मार्मिक व पूर्ण ज्ञान त्यांस होतें. निरनिराळ्या देशांतील लोकस्थिति, राज्यव्यवस्था, रीतिरिवाज, धर्मादि विषयांवर समजुती वगैरे कळल्या असतां मनुष्याची नजर दूरवर फांकते. त्यामुळें बुद्धीची पोंच वाढून एकंदर वस्तुमात्राविषयीं त्यास पहिल्याहून विशेष यथार्थज्ञान होऊं लागतें. एकच स्थितिविशेष नेहमीं दृष्टीसमोर असल्याच्या योगानें बुद्धीवर जो संकुचितत्वाचा वाईट संस्कार घडलेला असतो तो मोडण्यास दोनच मार्ग आहेत. एक देशोदर्शी हिंडून परराष्ट्रांविषयीं प्रत्यक्ष माहिती करून घेणें; आणि याच्या खालोखालचा दुसरा मार्ग म्हटला म्हणजे अर्थातच तसें ज्यांनीं केलें आहे, त्यांपासून भाषणद्वारां किंवा लेखनद्वारां तें ज्ञान मिळविणें. आतां पाहिला मार्ग व दुसऱ्यांतील पहिली सोय हीं फारच थोड्यास अनुकूल असतात, यास्तव एकंदर लोकांच्या उपयोगाचा मार्ग म्हटला म्हणजे इतिहास, देशांतरवर्णनें, प्रवासाच्या हकीकती

वगैरेच होत. याचा यथास्थित अभ्यास केला असतां कूपमंडूक किंवा उंबरांतले किडे यांसारखी सदोदित अवस्था असल्याच्या योगानें ज्या मूर्ख समजुती व जे दुराग्रह मनास स्वभावतःच जडून कालेंकरून त्यांस अगदीं खिळून जातात ते दूर होतात.

इतिहासाच्या योगानें आपणांविषयीं व इतर राष्ट्रांविषयीं यथार्थ ज्ञान वाचकांस होतें. आपली मोठी मानवजाति जी साऱ्या भूमंडळावर पसरली आहे, व एकेक राष्ट्र केवढेंहि ज्ञानसंपन्न किंवा थोर असलें तरी तें जिचा केवळ एक कोपरा असतें, तिचें सर्वांशीं जेव्हां पर्यालोचन करावें तेव्हांच तिचें एकंदर खरें स्वरूप लक्षांत येतें. मनुष्यस्वभावाचा नित्य व शाश्वत स्वरूपापासून त्यांचें आगंतुक म्हणजे देशकालविशेषजन्य स्वरूप निवडतां येण्यास अर्थात् असेंच एकंदर सर्व राष्ट्रांचें मनानें आकलन झालें पाहिजे. असो; तेव्हां मनाचा दृक् प्रदेश वाढवून कोणत्या समजुतींपासून व भ्रमांपासून इतिहास त्यांस मुक्त करितो, व आपणांविषयीं व इतरांविषयीं यथार्थबुद्धि मनांत आणून देऊन इतरांशीं सलोख्यानें वागण्यास तो आपणांस शिकवितो हाहि त्याच्या अध्ययनानें होणारा एक मोठा लाभ आहे.

# १५. मराठी भाषेची सांप्रतची स्थिति

तोयैरल्पैरपि करुणया भीमभानौ निदाघे
मालाकार! व्यरचि भवता या तरोरस्य पुष्टिः।
सा किं शक्या जनयितुमिह प्रावृषेण्येन वारां
धारासारानपि विकिरता विश्वतो वारिदेन॥

जगन्नाथराय.

हा विषय मोठा अगत्याचा आहे. सध्यांच्या वेळीं तर त्याविषयीं विचार करणें फारच जरूर आहे. कां कीं ही वेळ देशाच्या व भाषेच्या स्थित्यंतराची होय. आजवर या दोहोंत जे फेरफार होत गेले ते सर्व मिळून त्यांची एकच अवस्था मानली असतां चिंता नाहीं. कारण दोहोंत जरी पुष्कळ उलथापालथी झाल्या, तरी यापुढें जें एकंदर अवस्थान्तर होण्याचा रंग दिसत आहे त्यापुढें तें कांहींच नाहींत म्हटलें असतां चालेल. यास्तव या मोठ्या संधीस सुज्ञांनीं दोहोंच्या स्थितीकडे चांगलेंच लक्ष दिलें पाहिजे.

आतां एकंदर देशाचें अवस्थान्तर पुढील काळांत कोणत्या प्रकारचें होणार हा विषय प्रस्तुत निबंधाचा नव्हे. त्याविषयीं नुसत्या अटकळीहि बांधण्यास मोठमोठ्या इतिहासवेत्त्यांस सुद्धां पंचाईत पडेल यांत संशय नाहीं. तेव्हां सामान्य जनांनीं तेथपर्यंत न भरकटतां ईश्वराच्या दयालुत्वावर भरंवसा ठेवून स्वस्थ रहावें इतकीच गोष्ट. असो; पण भाषेची अभिवृद्धि ही देशाच्या उत्कर्षाचें एक मोठेंच साधन असून तें प्रयत्नाधीनहि बरेंच आहे. यास्तव त्यासंबंधींच येथें विचार करूं.

मराठी भाषेचा इतिहास – म्हणजे ती कोणत्या भाषेपासून उत्पन्न झाली, केव्हां झाली, तींत पुढें कसकसे फेरफार होत गेले, वगैरे गहन गोष्टींचें निरूपण–येथें अप्रस्तुत होय. यास्तव त्याविषयीं येथें कांहीं न

लिहितां सध्यां ती कोणत्या स्थितीस येऊन पोंचली आहे व ती सुधारण्याची आशा आहे कीं नाहीं, याविषयीं मात्र जे विचार सुचतात ते वाचकांस कळवितों.

वरील दोन गोष्टींविषयीं आमच्या लोकांत प्रमुख म्हणविणारांचें बहुधा कायम मत केव्हांच ठरून गेलें आहेसें दिसतें. आम्हांस कित्येकांच्या तोंडून ऐकलेलें आठवतें कीं, मनांतील अभिप्राय खुबीदार रीतीनें स्पष्ट करण्यास मराठी अगदीं अप्रयोजक, तींत कांहीं जीव नाहीं. कित्येक शिक्षक इंग्रजींतील अर्थ मराठींत समजून देतांना निरुपाय होऊन हात टेकतात; त्यांतून जे कोणी अंमळ चणचणीत असतात ते तर साफ सांगून जातात कीं, छे! मराठी भाषेंत याचें भाषान्तरच होऊं शकत नाहीं, आपली भाषा फार भिकार पडली. अलीकडील विद्वानांनीं तर जुन्या शास्त्री लोकांवरहि चढ केली! त्यांस देशभाषेचा विटाळहि सोसत नाहीं. दहा वीस वर्षांमागें शिकलेल्या लोकांस मराठींत ग्रंथ लिहिण्याची बरीच हौस वाटत असे; पण आतां ती भाषा कोणास डोळ्यांसमोरहि नको! आपले अमूल्य विचार प्रदर्शित करणें झालेंच तर इंग्लिश भाषेहून हलक्या द्वारानें ते लोकांच्या मनांत शिरकवणें त्यांस अगदीं आवडत नाहीं,पण सद्धर्मोपदेश करतांना अगर देशहिताबद्दल बोध करणें झाल्यास असल्या अडाणी लोकांशीं जेव्हां गांठ पडतेच, तेव्हां त्यास क्षणभर आपली योग्यता एकीकडे ठेवावी लागते. तरी अशा प्रसंगीं सुद्धां आपली मानहानि त्यांस सर्वथा सहन होत नाहीं. प्रतिपादन करावयाचे गहन अर्थ कोत्या मराठी भाषेस झेपण्यास कठीण असें वाटून विलायती शिक्क्याचे नवे शब्द त्यांस पदोपदीं आपल्या भाषणांत आणावे लागतात. हे अमूल्य शब्द प्रचारांत कसे झपाट्यानें येत चालले आहेत, बहुतेकांचें त्याविषयीं मत कसें असतें, त्यांची उत्पत्ति कशापासून झाली आहे, वगैरे गोष्टींचें यथास्थित विवरण करणें या स्थलीं अशक्य आहे. पुढें प्रसंगानुसार एखाद्या निबंधांत त्याविषयीं विचार करूं.

पण आपल्या भाषेची वरच्याप्रमाणें विटंबना व अवहेलना करण्याचें आम्हांस अगदीं प्रयोजन दिसत नाहीं. जी भाषा बोलणाऱ्यांनीं दिल्ली-

अटकेपर्यंत आपले झेंडे नेऊन लावले, जींत तुकाराम रामदासांसारख्या भगवत्परायण साधूंनीं आपले श्रुतिवंद्य अर्थ ग्रथित केले, जीस मुक्तेश्वर, वामन पंडित, मोरोपंत इत्यादि कवींनीं आपल्या रसाळ व प्रासादिक वाणीनें संस्कृत भाषेचीच प्रौढी आणली, त्या भाषेस आवेश, गांभीर्य व सरसता या गुणांकरितां कोणत्याहि अन्य भाषेच्या तोंडाकडे बघण्याची खास गरज नाहीं अशी आमची खात्री आहे! हें मत कोणास उगीच फुशारकीचें वाटूं नये म्हणून सर्वांस खात्रीनें कळवितों कीं, ज्या कोणास आपल्या भाषेची खरी योग्यता जाणण्याची इच्छा असेल त्यानें मोलस्वर्थ व क्यांडी यांच्या कोशांतील प्रस्तावना वाचून पहाव्या. विशेषतः मोलस्वर्थकृत कोश तर शुद्ध मराठी भाषेचें मार्मिक ज्ञान आपणांस होऊं इच्छिणारास फारच उपयोगाचा आहे. तो मोठ्या परिश्रमानें व मोठ्या आस्थेनें तयार केला असून आपल्या भाषेचें विचित्र शब्दभांडार त्यांत समग्र भरलें आहे. साधारण मतांहून इतकें भिन्न मत त्याचें कां बरें झालें?

अर्थात् एवढ्याचकरितां कीं, कोश रचण्याच्या अचाट कामांत त्यांस सगळी भाषा धुंडाळणें अवश्य पडून तींतील सर्व गुण त्यांस स्पष्ट दिसून आले. पण मोलस्वर्थसारख्यांचें मत कसेंहि असलें तरी तें त्यांचे कोशांतल्या कोशांत. तें वाचून कोणी पहावें? किंवा आमच्या भाषेविषयीं आमचें मत असेल तेंच खरें, त्यांत साहेब कोण मत देणार? असो. याप्रमाणें स्वभाषेच्या लज्जास्पद अज्ञानास्तव व दुरभिमानास्तव आजपर्यंत मराठी भाषेची फारच हयगय होत गेली. व ज्यांनीं तिच्या अभिवृद्ध्यर्थ निरंतर उत्साहानें झटावें, त्यांच्यांत सुस्ती, कृतकृत्यताबुद्धि, पंडितमन्यता, वगैरे दोष अखंड असल्यामुळें तिची मोठीच हानि होऊन ती क्षयाच्याच पंथास दिवसेंदिवस लागत चालली आहे.

या भावी अनर्थाच्या परिहारार्थ कित्येक जे उपाय सुचवितात ते मोठे मोजेचे आहेत. कोणी म्हणतात, युनिव्हर्सिटीच्या वरच्या परीक्षांत मराठी भाषा पुनः घालावी, मॅट्रिक्युलेशन परीक्षेस मराठी भाषा आवश्यक करावी. युनिव्हर्सिटी स्थापन झाल्यापासून पहिलीं आठ दहा वर्षें वरील दोन्ही प्रकार चालू नव्हते काय? बरें, मग तितक्या काळांत मराठी भाषेचें कोणतें मोठें हित झालें? आपला ज्ञानौघ किती ग्रंथकारांनीं तींत

ओतला? पण इतकेंचसें काय? आज वीस बावीस वर्षें दक्षिणाप्रैज कमिटी मराठी भाषेच्या हितकर्त्यांस माळ घालण्यास सतत तत्परतेनें उभी नाहीं काय? मग तिच्या सत्कृतीचा आदर करण्यास असे कोण आले, कीं ज्यांच्या बुद्धीस तिच्या कृपाकटाक्षाशिवाय स्फूर्तिच न होती? युनिव्हर्सिटीचे किताब-वाले तिच्या भजकांत किती सांपडतील? अशा जबरदस्तीच्या उपायांचे पुरस्कर्ते जर क्षणभर विचार करतील तर त्यांस खचित कळून येईल कीं, जगांतील कित्येक भाषांस जी अभियुक्तता आली ती अशा बळजबरीनें व लालचीनें आली नाहीं. कोणत्याहि कामांत मनुष्य जो नांवालौकिकास चढतो तो वरच्यासारख्या कृत्रिम उपायांनीं कधींहि चढत नाहीं; तसें होण्यास मूळचा अंकुरच पाहिजे. दुसरे कोणी म्हणतात कीं, कोडतांतूनहि मराठी भाषा काढण्याचा सरकार यत्न चालवीत आहे—हें अगदीं गैर आहे. तीस तेथें थारा अवश्य असावा.—वकिलांच्या अर्ध्याबोबड्या वक्तृत्वानें,–त्यांच्या 'आक्टा'नें, 'च्यार्ज्या'नें, कैदीस 'संशयाचा फायदा' दिल्यानें–जर महाराष्ट्र भाषेची अभिवृद्धि होणार, तर तिचे खांब म्हणून सुतारांनीं, शिंप्यांनींहि कां पुढें होऊं नये हें आम्हांस समजत नाहीं! असो. वरील आक्षेप आमच्या कित्येक वाचकांस कदाचित् फार असमंजस वाटून ते आम्हांस उलट विचारतील कीं, तर मग मराठी भाषा बुडूं न देण्यास तजवीज तरी कोणती? या प्रश्नावर आमचें उत्तर एवढेंच आहे कीं, हल्लींची स्वभाषेविषयीं उपेक्षाबुद्धि जोंपर्यंत लोकांच्या मनांत अशीच राहील तोंपर्यंत कोणत्याहि उपायास लवमात्रहि यश येणार नाहीं; पण जर कांहीं कारणानें ती कमी होत जाऊन नाहींशी झाली, तर वरील उपायांपैकीं एकाची सुद्धां बिलकूल गरज लागणार नाहीं. वरील दीर्घ प्रयत्न म्हणजे क्षयरोगी माणसास बळेंच चालवून त्याच्या अंगीं शक्ति आणवूं पाहण्यासारखे आहेत. यास्तव ते केवळ व्यर्थ असून विशेष क्लेश-कारक मात्र होत. पण जर ईश्वरी कृपेनें रोगाच्या मुळावर औषध पोंचलें, तर त्याच्या अवयवांस आलेली ग्लानि दूर करण्यास जसा यत्किंचितहि प्रयत्न नको; तद्वतच परभाषादूषणरूप जें क्षयाचें बीज आपल्या भाषेस लागून दिवसेंदिवस तीस खिळूं पाहात आहे, तें जर कां एकदां दूर होईल, व विद्वानांची तिजकडे प्रवृत्ति होईल, तर तिच्या अभिवृद्धीस आरंभ

झाला म्हणून समजावें. पण हें जर होणार नाहीं, तर तिचा लय जितका लवकर होईल तितका बराच !

या ठिकाणीं आमच्या वाचणारास एक मोठीच शंका येईल; तिचें निवारण केलें पाहिजे. ते विचारतील कीं, मराठींत मागेंहि दोन परभाषा— फारशी व आरबी—पुष्कळच मिसळल्या होत्या. मग आतां इंग्रजीचेंच एवढें भय कसचें ? ही शंका सकृद्दर्शनीं खरी वाटते; पण अंमळसा बारीक विचार केला तर ती अगदीं शुष्क दिसेल. त्या परकीय भाषांचा संबंध मराठीशीं ज्या प्रकारचा होता त्याहून इंग्रेजीचा संबंध फारच निराळा आहे. त्यांपैकीं आरबीचा संबंध तर दक्षिणेकडे मुसलमानांचेंच जोंपर्यंत प्राबल्य होतें तोंपर्यंतच असून आतां मुळींच नाहींसा झाला आहे; सध्यां जे कांहीं आरबी शब्द आढळतात, ते फारशी भाषेच्या द्वारेंच आले असावे असें वाटतें. तसाच या दुसऱ्या भाषेचाहि संबंध पेशव्यांच्या कारकीर्दीच्या अखेरपर्यंतच असून तेव्हांपासून नाहींसा झाला आहे. यास्तव चालू मराठी भाषेंतून जुने परकी शब्द गेल्या पन्नास वर्षांत शेंकडों निघून जाऊन कांहीं वर्षांनीं तर ते आणखीहि कमी होतील असें दिसतें. पेशव्यांच्या राज्यांत दप्तर फारशी भाषेंत ठेवीत असल्यानें व ब्राह्मण लोक पुष्कळ त्यांतच चाकरीस रहात यास्तव, त्या भाषेचे शब्द प्रचारांत पुष्कळ येऊं लागले. पण त्या वेळचे लोक फारशी ज्या रीतीनें शिकत तीपेक्षां आतांची इंग्रेजी शिकण्याची तऱ्हा फार वेगळी आहे. त्यांची ती परभाषा शिकण्याचा उद्देश केवळ व्यावहारिक होता,—म्हणजे सरकारी काम बजावतां येण्यापुरतीच ती शिकत. सध्यांच्या लोकांत इंग्रेजींतील अनेक ग्रंथांत निष्णात झालेले विद्वान् जसें शेंकडों सांपडतील तसें त्या वेळेस अगोदर कोणी असेलच तर फार असतीलसें वाटत नाहीं. बहुतेक तर आतां जशी हिंदुस्थानी भाषा लोक शिकतात त्याप्रमाणेंच सरासरी बोलण्या-चालण्यापुरतीच केवळ शिकत असतील असें दिसतें. तेव्हां अशा प्रकारें परभाषांचा संबंध कितीहि काळ जरी असला तरी त्यांपासून चालू देशभाषेस भीतीचें कांहींच कारण नाहीं हें उघड आहे.

पण इंग्लिश भाषेची गोष्ट तशी आहे काय ? या भाषेचें सामान्य ज्ञान तर आतांशा बहुधा प्रत्येक मनुष्यास जरूर झालें आहे. दिवसेंदिवस तर तींत

निपुण होणें हा जीवनाचाच एक उपाय होऊं पहात आहे. चोहोंकडे प्रतिष्ठा मिरविण्याचें तर यासारखें सध्यां दुसरें साधनच नाहीं. तेव्हां तिचा जो हल्लीं फैलावा झाला आहे, व होत चालला आहे त्यापुढें वर सांगितलेल्या भाषांची गोष्ट काय बोलावी ?इंग्लिश लोक आपल्या उत्कृष्ट भाषेचा साऱ्या भूमंडळावर प्रसार होत चालला आहे याचा अतिशायित गर्व वहातात, व तो त्यांचा गर्व यथार्थ आहे. आमच्या नुसत्या हिंदुस्थानांतच पाहिलें तर आमच्या तरुण विद्वानांस तिनें इतकें वेडावून टाकलें आहे कीं, त्यांस आपल्या आईबापांशीं, बायकांशीं, बहिणींशीं, चाकरांशीं सुद्धां शुद्ध व सरळ बोलण्याची मारामार पडते ! मग ग्रंथांतील भाषेविषयीं तर काय सांगावें ! त्यांच्या मनाचा जो व्यापार चालतो तो सारा इंग्रजी भाषेंत; तेव्हां देशभाषेंत बोलणें किंवा लिहिणें झाल्यास तें भाषांतर होऊन निघायचें ! असो. तर या सर्व गोष्टींचा क्षणभर विचार केला असतां सहज ध्यानांत येईल कीं, मुसलमानांच्या सहवासानें आपल्या पेहेरावांत जितकी तफावत पडली तितकीच भाषेंतहि पडली. म्हणजे मूळची साधी रीत जीं दोनच वस्त्रें वापरण्याची ती जाऊन डौलाचा जो सध्यांचा आंगरखा, पागोटें, उपवस्त्र हा पोशाख जसा त्या लोकांपासून आपण उचलला, त्याप्रमाणेंच त्यांच्या भाषेंतून आपल्या भाषेंत कांहीं शब्द येऊन व तीस नवें वळण लागून तींत झोंकदारपणा व आवेश हे गुण मात्र जास्त आले. तेव्हां त्या भाषेच्या मिसळण्यानें आपल्या भाषेचें अहित न होतां हितच झालें, यांत संशय नाहीं. पण इंग्लिश भाषेचा प्रचार हाच आतां सार्वत्रिक होऊन मूळच्या भाषेचा लोप होऊं पहात आहे. कारण विचार, कल्पना यांची उत्पत्ति ज्या मनापासून तेंच इंग्रजी बनल्यावर मूळच्या भाषेची प्रधानता कोठें राहिली ? अर्थात्च नाहीं; तीस सर्व प्रकारें गौणत्व येऊन इंग्रजी जिकडे नेईल तिकडे जाणें तीस प्राप्त झालें.

वरील उपपादनावरून सर्वांच्या ध्यानांत सहज येईल कीं,सध्यां मराठी भाषा मोठ्या कचाटींत सांपडली आहे. इंग्रेजीसारख्या प्रबल परभाषेचा तिजवर अगदीं पगडा बसून तिचें स्वत्व म्हणजे निराळेपणा नष्ट होण्याच्या बेतांत आहे. तेव्हां अजून जोंवर हें संकट अनिवार्य झालें नाहीं तोंवरच तिच्या कैवाऱ्यांस कंबर बांधण्याचा अवकाश आहे !

सोबत आमच्या लिहिण्यावरून सुज्ञ वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, इंग्रेजी विद्येचा जो एवढा फैलावा आपल्या लोकांत हल्लीं झाला आहे, व होत चालला आहे, तो आम्हांस अनिष्टसा वाटतो असें नाहीं तर त्याच्या योगानें त्या परभाषेचें वर्चस्व जें आपल्या मराठीवर होत चाललें आहे त्यापासून होणारा अनर्थ आम्हीं वाचकांस दाखविला. पण इतकेंच नव्हे. हा अनर्थ होतां होतां एवढा भयंकर होणार आहे कीं, शेवटीं त्याचें अनर्थत्वच नाहींसें होऊन आपल्या भाषेस इंग्रेजी विद्येपासून व भाषेपासून लाभ झाला या शब्दांतच कांहीं अर्थ रहाणार नाहीं. कारण जर सध्यां-प्रमाणें इंग्रेजी शब्दांची व रचनेची आपल्या भाषेंत सतत भेसळ होत गेली—आणि जर कांहीं प्रतिबंधक कारण न झालें तर असेंच होणार हें कोणीहि सांगेल!—तर तिचें रूप पालटतां पालटतां असें होईल कीं, ती इंग्रेजीपासून निवडतां येणार नाहीं; व तिच्या मूळच्या रूपाचा मागमूसहि राहणार नाहीं. मग असें झाल्यावर 'आपल्या भाषेस असे असे लाभ झाले' असें म्हणतांना 'आपल्या' या शब्दांत कांहीं अर्थ राहिला काय? तसेंच मराठीस वर सांगितलेली सरूपता-मुक्तीच मिळाल्यावर तिचा आधींचा देह कोठें राहिला? व म्हणूनच मग अनर्थ तरी कसचा? यास्तव मोक्षमुल्लरसाहेबांनीं आपल्या देशांतील लोकांस जो धर्माच्या बाबतींत उपदेश केला आहे, तोच आम्हीं एतद्देशीय भाषांविषयीं त्यांस करतों. म्हणजे जर आपण सर्व इंग्रेज व ख्रिस्ती बनलों, तर आपला आपलेपणा अर्थातच समूळ विनष्ट झाला; मग आमच्या देशाचें आम्हीं पुनरुज्जीवन केलें हे शब्द सहजच विगतार्थ झाले! त्याप्रमाणेंच जर मराठी भाषा होतां होतां इंग्रेजीच बनली तर आपल्या लोकांचा तींत ग्रंथ लिहिल्याचा अटाट सर्व केवळ व्यर्थ झालासें होईल! यास्तव मराठींत इंग्रेजीची भेसळ होऊं देणें हें आपणांस लज्जास्पद आहे. इतकेंच नव्हे, तर त्याच्या योगानें आपल्या सर्व प्रयत्नांचा शेवटीं विघातहि होणार आहे.

इंग्लिश भाषेचा आम्हीं द्वेष करीत नाहीं हें तर काय, पण आपल्या मराठीच्या उत्कर्षास ती मोठेंच साधन होईल अशी आमची खात्री आहे. सर्व जगांतील ज्ञानभांडार तींत सांठवलें असल्यामुळें तिचें साहाय्य मराठी-सारख्या परिपक्व होऊं पहाणाऱ्या भाषेस जितकें होईल तितकें थोडें आहे!

इतकेंच मात्र कीं, तें ज्ञानभांडार खुद्द आपलेसें करून घेण्यास आपल्या भाषेचें स्वत्व म्हणजे निराळेपण कायम राखलें पाहिजे. ज्याप्रमाणें तेच रस शरीरास हितावह होत, कीं जे शरीर प्रकृतीस मानवून जीवतत्त्वास ढका लावणार नाहींत; त्याचप्रमाणें जे भाषांतरादि ग्रंथ भाषेच्या सरणीस अगदीं बरोबर उतरून तिच्या रचनेस यत्किंचितहि अपाय न करतील तेच मात्र तीस वर्धक होतील. एरवींच्यांनीं जी तिची वृद्धि होईल ती केवळ वातमोलक स्थौल्याप्रमाणें होय. तिच्या योगानें तीस दुरून दिसण्यापुरती बळकटी आलीशी वाटेल खरी; पण वस्तुतः पहाणारापुढें तिच्या अंगीं आलेली क्षीणता क्षणमात्रहि झांकली जाणार नाहीं. तर मराठी भाषेच्या हितकर्त्या विद्वानांनीं हें पक्कें लक्षांत वागवावें कीं, इंग्रजींतील केवळ अर्थ मात्र घेऊन त्यास शुद्ध मराठीच्या सांच्यांत त्यांनीं ओतलें पाहिजे. अशा तऱ्हेचे ग्रंथ बनले असतां ते भाषेस फारच हितावह होऊन भूषणप्रद होतील.

आपल्या भाषेस दुसरी उत्कृष्ट सोय ही आहे कीं, तीस प्रसंगानुरोधानें प्रौढता देण्यास व शास्त्रपरिभाषेचे शब्द नवे बनवण्यास संस्कृत भाषेचें साहित्य तीस अनुकूल आहे. कित्येक शास्त्रें अगोदर संस्कृतांतच असल्यामुळें त्यांची परिभाषा तर ठरलीच आहे. पण दुसरीं जीं अनेक अलीकडे युरोपियन लोकांनीं काढलीं आहेत त्यांवरहि ग्रंथ लिहिण्यास मराठींत कांहींच अडचण पडणार नाहीं. ही उत्तम सोय नसती तर 'मेडिटेरेनियन्', 'आट्मसफीयर', 'रिफ्रयाक्शन्' असे कर्णकटु अडाणी शब्द मराठींत घेणें भाग पडतें; व 'भूमध्यसमुद्र', 'वातावरण', 'वक्रीभवन', अशा मूळच्या इंग्रेजी शब्दांसहि प्रौढतेंत व वर्णसौंदर्यांत लाजविणाऱ्या शब्दांस आपण अंतरलों असतों. शिवाय संस्कृत भाषेंत काव्यादि ग्रंथांचा भरणाहि पुष्कळ असल्यामुळें तिचेंहि साहाय्य वरच्या इंग्रेजीप्रमाणें आपल्या भाषेस पुष्कळच होणार आहे. मराठींत प्रवीण होऊं पहाणारास निदान काव्यव्युत्पत्तिपुरतें तरी संस्कृत भाषेचें ज्ञान अवश्यमेव हवेंच. कारण दोहोंचा संबंध निकट असल्यामुळें मूळच्या भाषेशिवाय चालू भाषेचें ज्ञान पुरतेपणीं होणें कठीण आहे. आतां इंग्रेजींत व संस्कृतांत मराठी भाषेच्या उत्कर्षास कारणीभूत होण्याच्या संबंधानें एक मात्र मोठा भेद आहे. तो अर्थात् हाच कीं, पहिली सर्व प्रकारें परभाषा पडल्यानें तिच्या धर्तीवर जाणें

तसें तीस अत्यंत दूषणार्ह होणार आहे, तसें ती दुसरीच्या पद्धतीवर पडली असतां केवळ तितकें होणार नाहीं.

याप्रमाणें आपल्या भाषेची अभिवृद्धि होण्यास एकीकडून संस्कृत व एकीकडून इंग्रेजी अशा दोहोंचा आधार तीस बळकट सांपडला पाहिजे. तशीच तिसरी गोष्ट ही आहे कीं, ती सांप्रत जितपत स्थितींत येऊन पोंचली आहे तीहि तिची वृद्धि होण्यास पुष्कळ अनुकूल आहे. सध्यां जर ती केवळ अडाणी अवस्थेंतच असती, तर इंग्लिश व संस्कृत अशा प्रौढ भाषांपासूनहि तीस कांहींएक नफा न होता. पण दैवयोगानें अनेक कारणांस्तव ती आधींच पुष्कळ नांवारूपास आली आहे. यास्तव अशा स्थितींतहि तिची हेळसांड केली असतां आपणांवर फारच दोष येईल यांत संशय नाहीं.

आतां आपल्या भाषेच्या वृद्ध्यर्थ अलीकडे कितपत उद्योग झाला व सध्यां कितपत चालू आहे याविषयीं कांहीं लिहून प्रस्तुत विषय पुरा करितों.

गेल्या पन्नास वर्षांत सरकारनें विद्यावृद्ध्यर्थ किती खटपट केली ती सर्वांस माहीत आहेच; तीविषयीं येथें सविस्तर लिहिणें नको. कोश व व्याकरण या दोहोंशिवाय भाषेस ठरीवपणा येत नाहीं, यास्तव सरकारनें पहिल्यानें ती तयार करवून भाषेच्या उत्कर्षास प्रथम पाया घातला. पुढें हळूं हळूं गद्य ग्रंथांची प्रवृत्ति पडून ते वाढविण्याकरितां सरकारानें कित्येक उत्तेजनाचे उपाय करवून ठेविले. ते अजूनहि चालू आहेत. या सर्व स्तुत्य प्रयत्नांस बरेंच यशहि आलें; व लोकांत समजूत व उपयुक्त ज्ञान यांचा बराच प्रसार झाला. पण अलीकडे आठ दहा वर्षांत इंग्रेजीचा अभ्यास मनस्वी होत गेल्यानें एका मोठ्या अनिष्टास आरंभ झाला. तें अर्थातच भाषेचें दूषण होय. या दूषणाचा प्रसार निष्प्रातिबंधक सतत चालल्यानें सध्यांच कितपत अनर्थ झाला आहे, व पुढें कोठपर्यंत पोंचणार, याविषयीं निबंधारंभीं आम्हीं लिहिलेंच आहे. असो. सध्यांच्या काळींहि मराठीच्या तर्फेनें बराच उद्योग चालला आहे. एक पत्र व पुस्तक–कर्त्यांचा; आणि दुसरा स्वतंत्र ग्रंथकारांचा. या दोहोंच्याहि संबंधें अनुक्रमें विचार करूं.

पहिल्यानें वर्तमानपत्रें. हीं आतांशा चोहोंकडे निघूं लागून पुष्कळ झालीं आहेत. हेंच आपल्या लोकांत विद्या अतोनात झाल्याचें एक मोठें चिन्ह होय असा पुष्कळांचा समज आहे. पण आम्हांस तसें वाटत नाहीं. सध्यां जो उठतो तो इंग्रेजी शिकूं लागतो हें जितपत विद्याभिरुचीचें चिन्ह होय, किंवा किरकोळ जिनसांच्या विक्रीचीं पुष्कळ दुकानें या शहरांत नवीं झालेलीं दृष्टीस पडतात हें जितपत त्यांतील संपत्ति वाढल्याचें दर्शक होय, तितपतच वरील फैलावा विद्यावृद्धीचा सूचक होय असें आम्हांस वाटतें. ही इतकी वाढल्याचें कारण साधारण ज्ञान लोकांत बरेंच वाढलें, हें एक आहे खरें; पण दुसरें मोठें कारण आम्हांस हें वाटतें कीं, एकानें केलें म्हणजे दुसऱ्यानें करूं लागावें हा कच्च्या समजुतीचा प्रकार. या अल्प समजुतीचीं दुसरींहि उदाहरणें दृष्टीस पडतात. जिकडे तिकडे वक्तृत्वोत्तेजक सभा, पुस्तकालयें वगैरेंची स्थापना; 'मुक्तामाले' च्या धाटणीवर केलेल्या शेंकडों पानचट गोष्टी, 'परशियन नैट्स', 'नेटीव नैट्स', 'सवाई माधवरावावर नाटक', इत्यादि सर्व उक्त अनुकरणेच्छेचीं उदाहरणें होत. असो. आतां हें खरें कीं, ही अनुकरणेच्छा मनुष्यमात्रास स्वाभाविक आहे; पण आपली योग्यता, शक्ति वगैरे न जाणून केवळ दुसऱ्याचें पाहूनच करण्याची जी बुद्धि ती मनाच्या पराधीनत्वाची व कोतेपणाचीच दर्शक होय यांत संशय नाहीं. असो. पण सांप्रतकाळीं वर्तमानपत्रांचा सुकाळ होण्याचीं कशींहि कारणें असलीं तरी त्यापासून आपल्या भाषेला पुष्कळ उपयोग होण्यास तीं साधनें झालीं आहेत ही आमची खात्री आहे. सुमारें आठ दहा वर्षांपूर्वी उत्कृष्ट पत्रें जितपत चालत होतीं तितपत आतां अगदीं सामान्य प्रतीचीं आहेत. तीं चालतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. कित्येक तर मोठ्याच योग्यतेस चढलीं आहेत, हेंहि येथें लिहिण्यास आम्हांस आनंद वाटतो. आतां त्यांतील मराठी भाषा नेहमीं शुद्धच असते असें नाहीं, पूर्वोक्त दूषितत्वाचा प्रकार त्यांत नजरेस येतो हें खरें आहे; पण यासंबंधींहि त्यांत सुधारणा होत चालली आहे, व कांहीं काळानें पुष्कळ होईल असा आम्हांस अजमास दिसतो.

दुसरीं मासिक पुस्तकें. यांपैकीं एकाविषयीं तर आम्हांस लिहितांच येत नाहीं. दुसरीं तीन आहेत. त्यांपैकीं दोन सुमारें दोन वर्षांमागें निघूं

लागून बहुधा तिसऱ्याच्याच धाटणीवर चालूं झालीं आहेत. हें तिसरेंच त्या तिहींत कालाच्या व योग्यतेच्या मानानें श्रेष्ठ आहे. त्याची भाषा शुद्ध व प्रौढ असून त्यांतील विषयहि महत्त्वाचे असतात. तारखेच्या तारखेस अंक काढून वर्गणीदारांच्या ठपक्यांतून सुटावें येवढीच इच्छा न धरतां हातीं घेतलेल्या कामाचा बोज त्यास चांगला कळतोसें स्पष्ट दिसतें. त्यांतील लेखांवरून लिहिणारांचा देशाभिमान, निर्भीडपणा, निर्मत्सरता, गुणग्राहित्व, वगैरे उत्कृष्ट गुण सर्व व्यक्त होतात. दुसरीं जीं दोन सांगितलीं तीं एकंदरींत पहातां बरींच आहेत; तरी त्यांत सुधारणा करण्यास पुष्कळ जागा आहे असें आम्हांस वाटतें. एकाची भाषा शुद्ध असते; पण ज्याच्या त्याच्यावर हत्यार धरण्याचा जो त्यानें बाणा उचलला आहे तो विचारी मनुष्यास खास आवडणार नाहीं. त्याच्या योगानें त्याची योग्यता मात्र कमी होऊन दुसऱ्यास फजीत करण्याचा जो त्याचा उद्देश तो सिद्धीस न जातां उलटा फसून मात्र जातो. मोठमोठ्या इंग्रेजी ग्रंथकारांची कोणास खोंचा मारण्याची रीत किती संभावितपणाची व किती रामबाण असते हें त्यास ठाऊक असेलच, तर तिचेंच अनुकरण करण्यास आम्हीं त्यास शिफारस करतों. शत्रूचा पाडाव करणें असल्यास हातांतील शस्त्राची धार जितकी उपयोगी पडेल तितका तीशिवाय नुसता मनगटाचा जोर कामास येणार नाहीं हें त्यानें पक्कें लक्षांत ठेवावें. आतां आपल्या धर्माच्या तर्फेनें भांडून त्याच्या प्रतिपक्षांचें खंडन करणें हाच जर त्याचा उद्देश असेल तर तो आमच्या लोकांस कांहींसा मानवेल यांत संशय नाहीं; व पाद्री, बाटे वगैरे लोकांच्या जो तोंडीं लागेल त्यानें कांहीं अंशीं जशास तसें केल्यावांचूनहि उपाय नाहीं हें खरें आहे. तरी या कामींहि आमच्या देशबंधूनें आपली इतकी विटंबना करून घ्यावी हें आम्हांस सहन होत नाहीं. हा दोष राहिलेल्या दुसऱ्या पुस्तकांत अगदीं दिसत नाहीं. पण त्यांत भाषाशुद्धीकडे चांगली नजर दिलेली नसते. शिवाय विषयांचीहि निवड म्हणण्यासारखी चांगली नसते. ज्या विषयांची माहिती वाचकांस मजेची वाटून उपयोगाची होईल, असेच विषय प्रायः मासिक पुस्तकांतून असावे. तादृश प्रसिद्ध नसणाऱ्या पुरुषांचीं चरित्रें, दूर देशांचें वर्णन, मराठींत नीरस

वाटणारीं भाषांतरें हीं कामाचीं त्यांत नाहींत. असो; एकंदरींत सर्वांपासून भाषेस बराच फायदा होईलसा सुमार दिसतो.

आतां एका प्रकरणाविषयीं मात्र विचार करावयाचा राहिला. तें इतर ग्रंथांचा भरणा आपल्या भाषेंत जो कांहीं झाला आहे व होत आहे त्याविषयीं होय. हा भरणा जरी अद्याप मोठासा झाला म्हणतां येत नाहीं, तरी त्या सर्वांविषयीं यथायोग्य लिहिणें बऱ्याच वेळाचें व विचाराचें काम आहे. यास्तव त्याविषयीं येथें विशेषतः कांहीं न लिहितां सामान्यतः कांहीं निरूपण करतों.

इंग्लिश भाषेंत पाहिल्यानेंच गति होऊन तींतील सुरस ग्रंथांची आपल्या लोकांस जेव्हां गोडी लागली, तेव्हां त्यांसारखें आपल्याहि भाषेंत कांहीं करावें अशी त्यांस सहजच मोठी हौस वाटली. मग पुष्कळांनीं हा उद्देश भाषांतरद्वारां सिद्धीस नेला. यांच्या योगानें लोकांचें पुष्कळ हित झालें, व इंग्रजी भाषेची योग्यता सर्वांस स्पष्टपणें कळून आली. पुढें कित्येकांनीं यावरहि तोड करण्याचें मनांत आणिलें. कोणी इंग्रेजी ग्रंथांच्या नमुन्यावर कल्पित कथा, नाटकें, व इतर ग्रंथ केले; व कोणी इंग्रेजींतील गोष्टींचें देशाचारानुरोधानें रूपांतर करून मराठी ग्रंथ बनवले. तशीच संस्कृतांतूनहि काव्यादि ग्रंथांचीं भाषांतरें होऊन भाषेची व रसिकत्वाची लोकांस वृद्धि होण्यास बरींच कारणें झालीं. असो. याप्रमाणें तऱ्हेतऱ्हेचे ग्रंथ होऊन मराठीस पुष्कळ शोभा येत चालली होती. पण पुढें हळूंहळूं विद्वानांची तिजवर अवकृपा होऊं लागून पहिलें मान फिरतां फिरतां आतां अगदीं फिरून गेलें. तिचीं सूत्रें ज्यांनीं हातांत वागवावीं त्यांनीं तीस सोडल्यापासून तिजवरची कळा उडत चालली. तिच्याविषयीं कळकळ बाळगणारे असे कोणी राहिलेंच नाहींत. नाहीं म्हणण्यास सध्यां दोघांचा मात्र आश्रय तीस उरला आहे. एक पाद्री लोकांचा; व दुसरा तिजवर उपजीवन करणाऱ्या ग्रंथादि कर्त्यांचा. पण या आश्रयाची योग्यता कितपत आहे हें सांगणें नको. मिशनरी लोकांच्या लेखांत तर मराठीचें रूप कित्येक ठिकाणीं असें चित्रविचित्र प्रकार दृष्टीस पडते कीं, 'ती बेबलच्या बुरुजावरील भाषेचीच बहीण, शोभेल ! ती समजण्यास धोतर नेसलेला;

शालजोडी पांघरलेला व डोक्यावर साहेबी टोपी घातलला महाराष्ट्र संस्कृतांग्ल भौमभाषाभिज्ञ महापंडितच आणून पुढें उभा केला पाहिजे! दुसरा मोठा आधार अर्थलुब्ध लोकांचा. अशांचे ग्रंथ कित्येक असे मासलेदार आहेत कीं, त्यांत चोहोंकडे हिंडलें असताहि अर्थाचा पत्ता लागत नाहीं. दुसऱ्यांचें इकडून तिकडून चोरून आणून सरासरी पानांची भरती करून दिलेली असते.

पण यावरून सध्यां छापलीं जाणारीं सारीं पुस्तकें येथून तेथून अगदीं नादान असतात असा आमच्या लिहिण्याचा अभिप्राय कोणी समजूं नये. तरी सत्परीक्षकांचा बहुधा अभावच असल्यामुळें चांगल्यास व वाईटास हल्लीं एकाच पंक्तींत बसणें येतें हें खरें. सध्यां लिहिण्याची हौस एकंदर लोकांत पुष्कळांच्या ठायीं दृष्टीस पडते; तेव्हां या सर्वांचे लेख सारख्याच योग्यतेचे असतील हें ते मुळींच संभवत नाहीं. न्यूनाधिकभाव वस्तुगत्याच असायचा. ग्रंथाची यथार्थ परीक्षा करणारे असले, म्हणजे चांगल्या वाईटाची तेव्हांच निवड होते; व चांगल्यास उत्तेजन मिळून भाषेचें उत्तरोत्तर हित होत जातें. पण सध्यांची स्थिति त्या प्रकारची नसून कांहीं विलक्षणच आहे. ग्रंथकर्त्यांस प्रासिद्ध होण्याचे तीन मार्ग आहेत. एक त्यानें स्वतःच्या जोखमीवर आपलें पुस्तक छापावें, म्हणजे लोकांकडून आश्रय मिळाला तर नशिब, नाहींतर सरासरी छापणावळ तरी काढण्यापुरते कोणा विद्याखात्यांतील अधिकाऱ्याचे आर्जव करावे. या मार्गाचें अवलंबन ज्यास पैशाची कमताई आहे त्याच्या हातून तर अर्थात् होतच नाहीं. तेव्हां नुसत्या प्रसिद्धीचा मार्गहि पैशाखेरीज कोणास अनुकूल नाहीं, व यामुळें कोणाचे ठायीं कसाहि गुण असला तरी ठिकाणच्या ठिकाणींच मुरून जाण्याखेरीज त्यांस गत्यंतर नाहीं. दुसरा मार्ग दाक्षिणाप्रैज कमिटी. हा मार्ग वरच्याहून सोयीवार खरा; पण या सभेकडे आपला ग्रंथ पाठविण्याचा धीर येण्यास ग्रंथकर्त्यांस आपली योग्यता बक्षिसापुरती आहे एवढा तरी भरंवसा पक्का असला पाहिजे. हा त्यास कसा यावा? कोणाच्या अंगीं योग्यता वास्तविक असतांहि ती त्यास परप्रत्ययाशिवाय भासत नाहीं व कोणाच्या अंगीं ती थोडी असतां किंवा मुळींच नसतांहि स्वाभिमानास्तव मोठी वाटते. यास्तव प्रस्तुत उद्देश पुरता सिद्धीस जात नाहीं. तिसरा मार्ग

विद्याखात्याचे मुख्य अधिकारी यांकडे अर्ज. येथें तरी वरचीच अडचण—म्हणजे आपल्या योग्यतेचा पक्का भरंवसा आधीं असणें, ही आहेच; पण एवढीच असती तर पुरवती ! एखाद्या चांगल्या अभिज्ञाकडून आपला ग्रंथ मान्य होईल कीं नाहीं याविषयीं अभिप्राय घेतां येतो; पण इतकी तयारी करूनहि वरील अधिकारी तो पसंत करतातच असा काय नेम आहे? त्यांचा अनन्यभाव दोघां दुसऱ्या कामगारांवर. ते सांगतील तो अखेरचा निकाल. इंग्रजी वैद्यकांत निष्णात म्हणविलेल्या डॉक्टरांचा अभिप्राय जसा वज्रलेप, त्यावर कोणाची कोटीच चालणें नाहीं; त्याचप्रमाणें वरील दोघांचें मत जें एकदां ठरेल तें कायम, त्यांत चुकीचा संभवच रहात नाहीं ! आमचें सरकार त्यास हुद्दयाचा किताब देते त्याबरोबरच इटली देशाच्या पोपाप्रमाणें त्यांस प्रमादराहित्याचा महाअधिकारहि देत नसेल ना ! ! कोणी सांगावें ? —पण सामान्य जनाच्या समजुतीस तर त्यांच्या प्रमादाभावाचा व सर्वज्ञतेचा त्यांच्या अभिप्रायांशीं मेळ घालतां घालवत नाहीं असें अनेक वेळां होतें ! ग्रंथकर्त्यानें डोळ्यांत तेल घालून व कितीहि अचाट श्रम करून ग्रंथ तयार केला. असो. त्याची योग्यता एका क्षणार्धांत ओळखून एका टाकासरसा त्याचा निकाल फाडकन् पाडण्याची त्यांची शर्थ खरी ! एरवीं साधारणरीत्या पाहिलें तर कामकाजास ठेवलेल्या चाकर-माणसाशीं त्यांच्या भाषाज्ञानाचा प्रकाश पडत नाहीं. सरासरी खाणाखुणांनींच व्यापार चालतो; सभासदाच्या नात्यानें एखाद्या पुस्तकावर मत देणें आल्यास दुसऱ्याच्या व विशेषतः सरचिटणीसांच्या—अभिप्रायावर निर्वाह करणें भाग पडून ते एका ओळीवर कधींहि लांबत नाहीं; पण एखाद्या हतभाग्य ग्रंथकाराचें दुर्दैव उभें राहून त्याच्या श्रमाचा निकाल जेव्हां त्यास स्वतंत्रतेनें करणें पडतें, तेव्हां त्यास अकस्मात् कोठून स्फूर्ति होत असेल ती परमेश्वर जाणें ! या धडधडीत अंधाराची जेव्हां जेव्हां आम्हांस आठवण होते, तेव्हां तेव्हां सरकारच्या असमंजसपणास किंवा जात्यभिमानास,अथवा या कामगारांच्या धृष्टतेस, यांतून कशास जास्त हंसावें हें आम्हांस कळत नाहीं!हा एक प्रकार तर शुद्ध अज्ञानाचा व घमेंडीचा झाला. आतां दुसरा प्रकार जो आम्ही सांगणार तो यासारखा केवळ हास्यास्पद नाहीं; तरी अनर्थमूलक

आये यांत संशय नाहीं. या दुसऱ्या सरकारतर्फेच्या परीक्षकास देशभाषेचें ज्ञान उत्कृष्ट आहे खरें; पण लिहिण्यास खेद वाटतो कीं, ग्रंथाच्या व्याकरणशुद्धीपुढें पलीकडे त्याचें लक्षच पोंचत नाहीं. गद्य असो, पद्य असो, शास्त्रीय विषय असो; त्यांत ऱ्हस्व, दीर्घ, काना, मात्रा, अनुस्वार, शुद्धप्रयोग, इतकीं त्यानें बसविलेल्या नियमांस अनुसरून असलीं कीं, ग्रंथ चांगला, नाहींतर वाईट, असो. याप्रमाणें सरकारतर्फे ज्यांच्या हातून ग्रंथाची पारख होते ते त्या कामास यथायोग्य नसल्यामुळें भाषेचे फार हाल होतात. जे ग्रंथ छापखान्यांतून निघून लोकांचे हातीं पडल्यावर लवकरच वाण्याच्या घरीं वास करावयास योग्य, अशांचें मोठ्या चमत्कारानें दैव उघडून त्यांची शाळांतून गर्जना ऐकूं येते व ज्यांची चोहोंकडे मानमान्यता व्हावी त्यांची फारशी पुस्तापास्तहि न होऊन ते कोनाकोपऱ्यांत कसरीच्या भक्षस्थानीं पडतात. असा उलटा न्याय झाल्याचीं उदाहरणें आमच्या अभिज्ञ वाचकांस ठाऊक असतीलच; यास्तव वरील उल्लेखांत केवळ अत्युक्ति केली नाहीं अशी त्यांची खचित खात्री होईल. असो; आतां या अनर्थाच्या परिहारार्थ आम्हांस एकच कांहीं अंशी आपल्या हातचा असा उपाय सुचतो तो येथें सांगतों. पत्रकर्त्यांनीं व मासिक पुस्तककारांनीं सध्यांप्रमाणें नुसती उडवाउडव न करितां जे ग्रंथ त्यांकडे येतील त्यावर निर्भीडपणानें व निःपक्षपातबुद्धीनें आपले अभिप्राय प्रगट करावे. तसेंच चांगलें असून मागें पडलेल्या ग्रंथांचीहि योग्यता लोकांस लक्षांत आणून देण्याचा यत्न करून फुकट मिरवणाऱ्या हल्लींच्या ग्रंथांची चांगली चर्चा करावी. हें कृत्य भाषेस किती हितावह होईल हें सांगणें नको.

• • •

# १६. आमच्या देशाची स्थिति

प्रस्तुत विषय हा मोठा खोल आहे. ज्यानें उठावें त्यानें त्यावर वाक्पांडित्य चालवावें किंवा लेखणीची फर्डेशाई उडवावी अशांतला तो नव्हे. त्यास पुष्कळ वाचन, पुष्कळ विचार, पुष्कळ अनुभव व मोठी पोक्त बुद्धि हीं पाहिजेत. केवळ चार दिवस येथें बडेजावी भोगून गेलेल्या पाश्चात्य ग्रंथकारांनीं, किंवा चवाठ्यावर शेणमार खाल्लेल्या खिस्त पुत्रांनीं, आपलें अगाध ज्ञान मिरविण्याच्या उद्देशानें केलेल्या एकदेशीय वर्णनावरून एवढ्या प्रचंड व प्राचीन राष्ट्राची खरी अंतर्गत स्थिति समजणें हें केवळ अशक्य होय. कोणत्याहि राष्ट्राच्या स्थितीचें वास्तविक स्वरूप ज्यास माहीत करून घेणें असेल त्यास बड्या दरबारांतील गुळचेट नाटकी बोलण्यावरून समजत असतें असें नाहीं; किंवा साहेबी बंगल्यांतून दुर्भिणी रोखल्यानेंहि वरील उद्देश सफळ होत नाहीं. वरील ज्ञानाची ज्यास खरोखरच अपेक्षा असेल त्यानें अंग मोडून जातीनें मेहनत केल्याखेरीज तें कधीं प्राप्त होणारें नाहीं. आपली बडेजावी एकीकडे गुंडाळून ठेवून जो लहानथोरांत सामील होईल, राजापासून रंकापर्यंत परिचय ठेवील, देशभाषांतील ग्रंथांचें सामग्र्यानें अवलोकन करील, चोहोंकडे पर्यटन करून साऱ्या प्रकारची माहिती मिळवील, त्यासच वरील हेतु साध्य होणार आहे. तेव्हां हें सर्व लक्षांत आणलें असतां, आजपर्यंत सदरील विषयावर आम्ही आपली लेखणी कां चालवली नाहीं,व सध्यांहि चालविण्याची आम्हांस धास्तीच कां वाटते, या दोन्ही गोष्टींची उपपत्ति कोणासहि करतां येणार आहे.

असो; आतां या अवाढव्य विषयाचें निरूपण आम्ही कोणत्या पद्धतीनें करणार तें सांगून नंतर विषयास लागूं. आमच्या देशाच्या स्थितीविषयीं जो विवेचन करील त्यानें पुढील तीन विभागांवर आपलीं मतें प्रदर्शित केलीं असतां बस होईल असें वाटतें. हे तीन विभाग येणेंप्रमाणें—(१) आमच्या राज्यकर्त्यांची स्थिति, (२) एतद्देशीय राजेरजवाड्यांची स्थिति, (३) सामान्य लोकांची स्थिति. तर आतां पहिला विभाग उचलून त्यांच्या संबंधानें आमचे आजमितीला काय काय अभिप्राय झाले आहेत ते निवेदन करतों.

सोबतच्या तीन भागांपैकीं या प्रथम विभागावर आपले काय विचार असतील ते बेधडक कागदावर नमूद करणें हें हल्लींच्या बादशाही कारकीर्दींत मोठें कठीण काम झालें आहे हें सर्वांस महशूर आहेच. त्यांतून दिल्ली-पदावर आरूढ झाल्यानंतर लौकरच आमच्या राज्यकर्त्यांनीं छापखान्यांवर केवढी कदर चालू केली, व सार्‍यांचीं मुसकटें कशीं आवळून टाकलीं, हेंहि सर्व प्रसिद्धच आहे. आतां विलायतेंत त्यावर जी झटापट झाली, व बीकन्सफील्ड महाराजांच्या जागीं ग्लाडस्टन्‌साहेबांचें प्रभुत्व स्थापित झालें त्याच्या योगानें वरील खग्रास बराच सुटला आहे हें खरें; तरी पूर्ण मोक्ष होऊन कैलासवासी लॉर्डसाहेबांच्या नांवें बुचकळी मारण्याची मोकळीक सर्वांस होईपर्यंत चकोर-मंडळीस स्वच्छंदें करून भरार्‍या मारण्याचें अवसान येणार नाहीं, हें उघड आहे. यास्तव इंग्रेजी पेन हातीं धरलें असतां प्रस्तुत विषयाचें विवेचन जसें आम्ही करूं किंवा एखादा फ्रेंच, रशियन, अगर अमेरिकन ग्रंथकार जसें त्यावर निष्प्रतिबंध लिहील तसें प्रस्तुत प्रसंगीं आमच्या हातून होणार नाहीं हें खरें; तथापि पुढें ज्या गोष्टी आम्ही दाखल करणार त्या सर्व इतिहासप्रसिद्ध व लोकप्रसिद्ध असल्यामुळें त्यांच्यासंबंधानें यथास्थितपणें विवेचन करण्यास आम्हांस कोणतीहि हरकत नाहीं.

इसवी सनाचें सोळावें शतक संपेतोंपर्यंत आम्ही इंग्रेजांचे कोणी नव्हत व इंग्रेज आमचे कोणी नव्हत ही स्थिति होती, हें सर्वांस माहीत आहेच. शत्रु, मित्र व उदासीन या संबंधत्रयापैकीं आमचा व आमच्या प्रस्तुतच्या राज्यकर्त्यांचा त्या वेळेस शेवटला काय तो संबंध होता. पुढें या देशाची कीर्ति ऐकून पोर्च्युगीज, डच, फ्रेंच, डेन्स वगैरे लोकांप्रमाणें इंग्रेज हेहि आमच्या देशांत येऊन येथें वखार घाल, तेथें थोडीशी जमीन खरेदी कर, याप्रमाणें त्यांनीं क्रम आरंभला. सारांश, पारशी लोक जसे स्वदेशास पारखे होऊन गुजराथच्या राजाला शरण येऊन त्यांच्या मुलखांत वणिग्‌-वृत्तीनें राहिले, किंवा मारवाडी जसे लोटा व रस्सी येवढें भांडवल घेऊन प्रथमतः येतात व ‘कांच बांगडी फुटाणो’ करून वाणिज्यवृत्तीस आरंभ करतात, त्याप्रमाणेंच आमच्या सांप्रतच्या राज्यकर्त्यांची मूळ पीठिका आहे. पुढें एका इंग्रेजी डाक्तरानें दिल्लीच्या बादशाहास बरा केला. नानासाहेब

पेशव्यानें इंग्रेजांची मदत घेऊन आंग्र्यांचा मोड केला. आरकाटच्या नबाबास त्यांनीं साह्य केलें. अशा लहानमोठ्या कामगिऱ्यांवर या लोकांनीं एतद्देशीय राजांपासून जकातीची माफी घेतली, गांव घेतलें, असा प्रकार चालू झाला. पुढें हे जरासे जोरावर आल्यावर त्यांच्या व फ्रेंच लोकांच्या लढाया सुरू झाल्या. यांत सुदैवेंकरून आमच्या भावी राज्यकर्त्यांसच जय येत गेला. फ्रेंच लोकांनीं शेवटपर्यंत इंग्रजांचा पाडाव चालवला होता व एके प्रसंगीं डच लोकांनींहि आपलें बोट शिरकविण्याचा लाग केला होता; पण इंग्रेजांची सद्दी जबर! त्यांच्या आणीबाणीच्या प्रसंगीं क्लैव, कूट, वेलेस्ली, हवलॉक यांच्यासारखे जाडे सरदार सेनानायक होऊन त्यांचा मागें पाय म्हणून फार करून कोठें आलाच नाहीं! आतां हें खरें कीं, त्यांनीं माधवराव, महादजी, रणजितसिंग अशा प्रबळ पुरुषांशीं स्नेहभावच राखून त्यांच्या मरणानंतर त्यांच्या कारभारांत ढवळाढवळ केली, व दोन्ही पक्षांकडील सेनानायक एका तोडीचे आहेत असा फार करून योग आलाच नाहीं; तरी एकंदरींत पाहतां या पाश्चात्य लोकांची सद्दी, त्यांचें कारस्थान व कवायत हीं विशेष खरीं. त्यांच्या योगानें हिंदुस्थानासारखें अफाट राज्य त्यांच्या अचानक पदरीं पडलें. एरवीं मुळारंभीं पाहतां एक लहानशी व्यापाऱ्यांची मंडळी ती काय निघाली, तिनें दीडशें वर्षेपर्यंत या देशांत नुसती वाणिज्यवृत्ति ती काय केली, पुढें एकाएकीं तराजूची दांडी टाकून देऊन ते वैश्यांचे क्षत्रिय काय बनले, व हळूंहळूं पाय सरकवतां सरकवतां साऱ्या राजेरजवाड्यांस वेताबातानें गुंडाळून टाकून सेव्यसेवक भावाचा विपर्यय करून सार्वभौमपदावर आरूढ ते काय झाले! एकंदरींत साराच गौडबंगाली खेळ!

इंग्रेजी राज्यापासून आमची पहिली मोठी हानि कोणती झाली म्हणाल तर स्वातंत्र्यनाश. स्वातंत्र्याची स्थिति पारतंत्र्यापेक्षां किती सुखावह असते हें कोणालाहि सांगायला नकोच. यदृच्छेनें अंतराळांत फिरणाऱ्या व वनगहनांत यथेच्छ आहारविहार करणाऱ्या पक्ष्यांत आणि मोठ्या सोन्याच्या किंवा रत्नखचित पिंजऱ्यांत कोंडलेल्या पोपटांत किती अंतर! ज्याचा ईश्वरदत्त अधिकार हा, कीं त्यानें आपल्या सुंदर पक्ष्यांच्या बळावर हवा तिकडे अनिरुद्ध संचार करावा, नानाविध फलांचा रसास्वाद घ्यावा, स्वजनांत

मराठी ग्रंथ सं... ग. ठाणे. स्थळप्रत.
२६५८६
वि: १९३९
क्रमांक ९२२८ नों. दि. २०।३।५



राहून संसारसुख अनुभवावें, त्यानें टीचभर जागेंत राहून सदोदित ‘ लटपटपंची ’ करीत रहावें ही केवढी दैन्यावस्था ! हीच गोष्ट राष्ट्रांसहि लागू आहे. वस्तुतः पाहतां ज्या त्या राष्ट्रानें आपापली व्यवस्था ठेवावी, व इतरांशीं जो संबंध ठेवायाचा तो फक्त व्यापाराच्या वगैरे संबंधानें ठेवावा, हा सचोटीचा मार्ग. प्रत्येक गृहस्थानें जसें आपलें घरदार, कुटुंब व जिनगी ही सुरक्षित ठेवून आपल्या शेजाऱ्यास उपद्रव लावूं नये, ही नीति होय. त्याप्रमाणेंच एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राशीं जो व्यवहार ठेवायाचा तोही माणुसकीस अनुसरूनच ठेवणें उचित होय. गोमाजीनें उठून तिमाजीच्या घरावर दरवडा घालावा, त्याची चीजवस्तु लुटून त्याचा जीव घ्यावा, बायको उपटावी, मुलामाणसांस बंदे गुलाम करून आपल्या घरीं न्यावें, हा प्रकार जितक्या दुष्टपणाचा व पाजीपणाचा आहे, तितकाच दुसऱ्याच्या मुलुखावर स्वारी करणें, हजारों माणसांचा लढाईत प्राण घेणें, सारा देश उध्वस्त करून त्यांस कंगाल करून सोडणें, हाहि होय. पण असें असतां आजपर्यंत जगाचा क्रम पाहिला तर काय आढळेल बरें ? दुसरें काय, लठ्ठालठ्ठी, मारामारी, रक्तपात, लुटालूट, जाळूनपोळून फस्त हाच काय तो ? पण हल्लीं चालू असणारें एकोणिसावें शतक हें तर सुधारणेच्या संबंधानें पहिल्या प्रतीचा बाणा मिरवीत असतां व या शतकांत सद्धर्माचे पवित्र प्रेषित आकाशांतील दिवटी घेऊन सारें भूमंडळ आक्रमीत असतां कंठस्नानाचा व झोटिंगपाच्छाईचा प्रचार पहिल्यापेक्षां आतां काडीभरहि कमी आहे असें नाहीं. हें शतक सुधारणेंत जसें सर्वांत पुढें आहे त्याप्रमाणेंच रक्तपातांतहि त्याची सरशीच आहे. असो. तर मनुष्याचें अन्तर्गत हें अद्याप पहिल्यासारखेंच मलिन आहे व त्याची परस्वापहरणाविषयींची जी लालसा तिचें फळ तूर्त आम्ही भोगीत आहों !

आतां या एका स्वातंत्र्यनाशाच्या पायीं आमचीं कितीक नुकसानें झालीं आहेत पहा ! एकतर आमचें जगांतून अस्तित्वच नाहींसें झाल्यासारखें झालें आहे. केवळ प्राण धारण करून आम्ही आहों इतकेंच काय तें ! गेल्या शतकांत हिंदु लोकांचीं राज्यें, हिंदु लोकांची संपत्ति, हिंदु लोकांची विद्या वगैरे शब्दांचा जसा अर्थ होता तसा आतां कांहीं राहिला आहे काय ? सांप्रत आमचे लहानमोठे सर्व राजे म्हटलें म्हणजे सरासरी

बुदबळांतलेच होत. हलतां नये, बोलतां नये, बडेसाहेबांच्या सदोदित मुठींत, जवळ फौजफाटा म्हणतात तर केवढा, बुदबळांतलाच सरासरी प्रकार! हाच प्रकार आमच्या विद्येचा व धर्माचाहि. आमची अलीकडील विद्वत्ता म्हणून जी आम्ही येवढ्या डौलानें मिरवतों, ती वस्तुतः पाहतां पाश्चात्य विद्येचा एक रजःकण आहे; तींत आमचें स्वतःचें बहुधा कांहींच नाहीं, व आहे तीहि प्रायः शब्दज्ञानात्मकच' आहे. उद्यां जर आमचें सरकार आम्हांस सोडून गेलें तर तिला दीड दमडीलाहि कोणी विचारील कीं नाहीं कोण जाणे! इंग्रेज लोक जर एकदम आमच्या देशांतून अंतर्धान पावले, तर आमच्या बड्या विद्वानांत कोणी रेल्वे एंजिन करणारा मिळेल किंवा तारायंत्र जुळवून देणारा मिळेल याचा वानवाच वाटतो! त्याप्रमाणेंच शेंकडों प्रकारचे कारागीर जे आमच्या देशांत आज शेंकडों वर्षे नांदत आले, ते अलीकडे एकामागून एक जे नाहींसे होत गेले व चालले आहेत, ते तरी पुनः उत्पन्न व्हावयाचें म्हणजे केवढी दुरापास्त गोष्ट आहे! सारांश, जसा एखादा आयदोजी असतो, व त्याला पाटावर बसवून ठेवून त्याचें सर्व कामकाज दुसऱ्यांनीं करावें, त्यासारखी आमची स्थिति दिवसेंदिवस होऊं पहात आहे. असें होतां होतां लवकरच काडीचाहि वकूब नाहीं असें आम्ही नादान होऊन जातों कीं काय कोण जाणें! हल्लीं आमची धर्माच्या संबंधानें कोणत्या प्रकारची स्थिति होऊन गेली आहे ती तर सांगायला नकोच. जुन्या धर्माची आम्हांस अतिशय लाज वाटून खिस्ती लोकांचें पोकळ अनुकरण करणें हाच ईश्वराराधनाचा व लोकनीति सुधारण्याचा काय तो मार्ग आहे असें आम्हांस वाटूं लागलें आहे.

तेव्हां एकंदरींत पाहतां आम्ही तूर्त जगांतून उठल्यासारखेंच झालों आहों. ज्यांस आम्हीं प्रथमतः थारा दिला व जे आमच्या पुढें पुढें कित्येक दिवस करीत होते, तेच आतां आमचे धनी होऊन बसले आहेत; व साऱ्या देशांतील जमीन सरकारची, जंगलांतील प्रत्येक झाड व झाडाचें प्रत्येक पान सरकारचें, सरकारास हवे तसे कर बसविण्यास पूर्ण अधिकार आहे, व त्या पैशाचा हवा तसा विनियोग करण्यास 'केसरी हिंद'चे कुलमुखत्यार व्हॅसरॉयसाहेब यांस मुभा आहे. देशांतील लोक म्हणजे सारे बैल, त्यास आम्ही जसें वागवूं तसें त्यांनीं वागलें पाहिजे. त्यांस वस्तुतः

म्हणजे कांहीं हक्क नाहींत, आम्ही मेहेरबानी करून काय हक्क देऊं तेवढे घेऊन त्यांनीं मुकाट्यानें राहावें व आमची निरंतर स्तुति गात बसावें. असें जो न करील तो राजद्रोही समजला जाईल, अशा प्रकारची एकंदर आमची हालहवाल आहे.

वर इंग्रेजी राज्यापासून आमचें कोणकोणतें अहित झालें आहे तें सामान्यतः सांगण्यांत आलेंच आहे. एक पारतंत्र्य म्हटलें म्हणजे तें दरएक ठिकाणीं नडत असते. या गोष्टीचा प्रत्यय सध्यां या देशांतील लोकांस पदोपदीं आहे. पहा कीं, आम्ही व्यापारांत लक्ष घालूं म्हटलें तर आमचें कांहीं चालणार आहे काय! इकडे मोठे भगीरथ प्रयत्न करून जरी देशी माल उत्पन्न केला, तरी कायदे कौन्सिलांतून एखादा वटहुकूम सुटला कीं पुरें, आमचे सारे कारखाने चीत! म्यांचेस्टरवाले सरकारचे देशबंधु पडल्यामुळें त्यांनीं तिकडे हकाटी करून थोडीशी उचल केली, कीं इकडे आमचे हातपाय मोडले! इकडे उरसफोड करून तपेंचीं तपें विद्याध्ययनांत घालवावीं, आणि शेवटीं नोकरी मागितली म्हणजे आमचे चॅन्सलरसाहेब आम्हांस प्रेमपूर्वक उपदेश करणार कीं, "लाडक्यांनों, तुम्हांस आम्हीं येवढ्या औदार्यानें विद्यादान जें केलें, तें सरकारपुढें हात पसरण्याकरितां कां रे! अरे तुम्ही, आपला देश सुधारावा, लोकांस सज्ञान करावें, त्यांचे हक्क त्यांस समजावून द्यावे, आपल्या राज्यकर्त्यांचें निरंतर स्तुतिस्तोत्र करून आकाशांतील बापाच्या पायापाशीं त्यांच्या कल्याणार्थ डोळे मिटून प्रार्थना करावी, विलायतेंत जावें, अमेरिका पालथी घालावी, जॉन्सनसारखे ग्रंथ लिहावे, बर्कसारखें वक्तृत्व करावें; ल्यूथरप्रमाणें धर्मसुधारणा करावी, मंगोपार्कप्रमाणें देशाटनें करावीं, हें सर्व करायाचें सोडून देऊन खुळ्यासारखें चाकरीच्या रे काय नादीं लागतां! उदरपोषण हें काय रे विद्योपासनेंचें पर्यवसान! सरकारानें तुम्हांस विद्या दिली, ती दिली आणि तुम्हांस नोकऱ्या देण्याचाहि पतकर त्यांनींच घेतला पाहिजे काय? छे छे, एकूण तुम्हीं या युनिवर्सिटीजननीस व्यर्थ शिणविल्याचें श्रेय घेऊं पाहत आहां, दुसरें कांहीं नाहीं!!" याप्रमाणें आमच्या झगेवाल्या मंडळींच्या कानीं विद्यादेवीच्या निष्काम उपासनेचा तत्त्वोपदेश दरवर्षी पडतो खरा; पण इकडे व्यवहारांत जों पहावें तों त्याची प्रतीति फारशी येत नाहीं. जे आमचे प्रभु येथील विद्वानांस

वरील ब्रह्मज्ञान शिकवतात तेच दर वर्षास वीस लाखांचा फन्ना उडवून 'कुपर्स हिल्ल' वासी मंडळीस इकडे पाचारण करतात; व आपल्या सनदी नोकरांस आगबोटीवर पाय ठेवल्यापासून तीनशें रुपयांचा तनखा चालू करतात. या खेरीज आमच्या दक्षिण विद्यालयांतील प्रसिद्ध विद्यारण्यासारखे व मागें आलेल्या एका छिन्नांगुष्ट विद्यागुरूंसारखे एकेक जाडे विद्वान विद्याखात्यावर गुदरून दिले जातात ते निराळेच! एतावता तात्पर्य काय कीं, सर्वोपरी नागवलेले जे आम्ही त्या आमच्या वांट्याला वरील कोरडें ब्रह्मज्ञान आणि ज्यांस उदरनिर्वाहाच्या शेंकडों इतर सोयी आहेत ते जसे काय सरकारचे जांवई; नाहीं तेथून त्यांची भर झाली पाहिजे!

पण पारतंत्र्यापासून होणारी सर्वांतली मोठी हानि अद्याप सांगायचीच राहिली आहे. ती ही कीं, त्यापासून मानसिक उन्नति अगदीं नष्ट होऊन जाते. ज्याच्या परवशता ही कालेंकरून अंगवळणीं पडते तो हळूहळू मानधनता, लज्जा, धैर्य वगैरे सद्गुणांस पारखा होत जाऊन वरच्याच्या उलट जे दुर्गण ते त्यास सहजीं जडूं लागतात; व उत्तरोत्तर मूळ स्थितीपासून तो भ्रष्ट होत जातो. ही परमावधि हल्लीं आमच्या देशांत बहुधा सर्वत्र दृष्टीस पडूं लागली आहे. जन्मास येऊन करावें काय, तर परदास्य करावें, यजमानाची खुषामत करावी, लांड्यालबाड्या कराव्या, लोकांच्या मुंड्या मुरगळाव्या, वरिष्ठांची थुंकी झेलून हाताखालच्यांस गांजावें, व शेवटीं पैशाचीं गांठोडीं उराशीं घट्ट आवळून धरून एकादे दिवशीं मरून जावें,— हें एकंदर तत्त्वज्ञान अलीकडे माजलें आहे. आमच्या देशांत अलीकडे विद्येचा फैलावा थोडा झाला आहे असें नाहीं; पण या विद्येच्या योगानें जें वास्तविक ज्ञान निष्पन्न व्हावें, व जी मनाची थोरवी वाढावी, त्यांतलें अजून कांहींच दृष्टीस पडूं लागलें नाहीं असें म्हणायास हरकत नाहीं. त्यांतून इंग्रेजी विद्या ही तर वस्तुतः पाहतां वाघिणीसारखी आहे, तिच्या दुधावर जो पोसला तो लेंचापेंचा कधींच निपजूं नये. उत्साह, धैर्य, अश्लाध्य कर्माचा तिरस्कार, स्वावलंबन, इत्यादि उदात्त गुण वरील भाषेंतील ग्रंथांच्या अध्ययनापासून उत्पन्न होणारे आहेत. पण आजपर्यंतच्या तऱ्हेवाईक शिक्षणपद्धतीनें म्हणा अगर तितका संस्कार आमच्या ठायीं अद्याप

बिंवला नसल्यामुळें म्हणा, वरील गुणांचा उदय अद्याप तर कांहींच झालेला दृष्टीस पडत नाहीं.

तेव्हां एकंदरींत पाहतां तूर्त आम्हीं आकाबाईच्या फेऱ्यांत पुरे सापडलों आहों असें म्हणायास हरकत नाहीं. जिकडे जिकडे दृष्टि फेंकावी तिकडे तिकडे आनंदीआनंदच हल्लीं नजरेस येत आहे. कोणत्याहि बाजूनें आम्हीं धड राहिलों आहोंत असें नाहीं. निव्वळ रानटी राष्ट्रांची स्थिति एका अंशानें चांगली असतें तसें आमचें नाहीं; किंवा सुधारलेल्यांत हल्लीं जीं प्रमुख होऊन बसलीं आहेत, त्यांस ज्या सोई असतात त्याही आम्हांत नाहींत. धड ना विद्वान, ना सुधारलेले, ना रानटी, ना अविद्वान, ना स्वतंत्र, ना परतंत्र, ना हिंदु, ना ख्रिस्ती, ना म्लेंच्छ अशा कांहीं विलक्षण कचाटींत सध्यां येऊन पडलों आहोंत. या महागर्तेंतून काढून आम्हांस कोण ईश्वराचे घरचा लाल पुनः मार्गास लावील तो लावो. तर एका तऱ्हेनें पाहतां रानवटपणाच्या स्थितीतला जो अनावर आवेश तो सर्व नाहींसा होऊन आम्ही केवळ प्रेतवत् होउन राहिलों आहों. बरें, दुसऱ्या बाजूनें पाहतां सुधारलेल्या लोकांची बडी अक्कल व कर्तृत्व हें जर पाहावें तर तेंहि पण आमच्या अंगी आलेलें नाहीं. आमचें ज्ञान म्हणजे इंग्रेजांचे उष्टेमाष्टे विचार, आमची सुधारणा म्हणजे त्यांचे बालिश अनुकरण, आमचें कर्तृत्व म्हटलें म्हणजे पार्लमेंटच्या जागीं सार्वजनिक सभा, सेंटपॉल चर्चच्या जागीं प्रार्थनामंदिर व क्रिकेटच्या जागीं क्रीडाभुवन ! एतावता "इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः" या म्हणीप्रमाणें आमच्यांत धड आमचें मूळचें तत्त्वच राहिलें नाहीं. आमच्या पाश्चात्य बंधूंच्या समागमें करून नवें पाणी आम्हांस दृष्टीस पडूं लागावें तेंहि अजून तर आलें नाहीं मग पुढें आमचें हें तारूं कोणच्या थडीला लागणार आहे तें परमेश्वर जाणे !

• • •

## १७. आमची दैन्यावस्था व तिच्यावर उपाय

आमच्या प्रस्तुतच्या दैन्याचें मुख्य कारण काय आहे हें कोणालाहि सांगायला नकोच. तें परकी अंमल हें होय हें उघड आहे. इंग्रेज लोक इकडे प्रभु होण्यापूर्वी हा देश फार संपन्न होता व मुसलमानांची जुलमी म्हटलेली कारकीर्द सांप्रतच्या सुधारलेल्या कारकीर्दीहून शंभर वांट्यांनीं बरी होती वगैरे गोष्टी अलीकडे सिद्धान्तासारख्या होऊन बसल्या आहेत, व प्रत्यक्ष इंग्रेज लोकहि त्या बोलून दाखवितात, हें आज बहुधा सर्वांस माहीत असेलच. असो; तर आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंचें आधिपत्य हें जर आमच्या विपत्तीचें मोठें कारण होय, तर तें नाहींसें झालें असतां आमची स्थिति सुधारेल ही अर्थातच कोणाच्याहि मनांत प्रथमतः मोठी कल्पना येणार आहे. तर आमचा व आमच्या राज्यकर्त्यांचा संबंध तोडून टाकून आपणांस सुखी करण्याचें आमच्या स्वाधीन आहे कीं काय याविषयीं पहिल्या प्रथम विचार करूं.

वरील उपाय म्हटला म्हणजे आम्ही आमच्या राज्यकर्त्यांशीं लढाईला उभे राहून त्यांचा पराजय करावयाचा व आपलें राज्य पुन्हां आपलें आपण वहिवाटायाचें हा होय. आतां ही गोष्ट हल्लींच्या काळीं कितपत साध्य आहे हें बहुधा एकाद्या लहान पोरालाहि कळण्यासारखें आहे. जो असंबंध सिद्ध करावयास आमच्या पातालवासी बंधूंस आठ वर्षें घनघोर संग्राम करावा लागला व ऐरिश लोकांनीं आज शेंकडों वेळां सटापटी खाल्ल्या पण कांहीं एक झालें नाहीं, तो आमच्यानें आज तडीस जावयाचा म्हणजे खरेखुरेंच मुसळास अंकुर फुटायाचे होत. आमच्या राज्यकर्त्यांचें केवढें अपार सामर्थ्य व केवढा कट्टा सरंजाम, तसाच केवढा जगड्व्याळ बंदोबस्त; आणि आमच्याकडे मंडळींत परस्पर किती सुत, आमची हल्लींची रणसामग्री व युद्धकलेचें ज्ञान किती—सर्वच गोष्टी अनुकूल! असो; तर वरील थोरल्या उपायांच्या संबंधानें तर आज कोणी गोष्टहि काढूं नये अशी सांप्रतची अवस्था आहे हें स्पष्टच आहे.

तेव्हां हें सिद्ध आहे कीं आम्हांस सांप्रतच्या दुरवस्थेंतून जर निघावयाचें असेल तर आमच्या सांप्रतच्या राज्यकर्त्यांशीं बिघडून आम्हांस बिलकूल

सोय नाहीं. जो प्रसंग पडला आहे. त्यांस अगोदर सादर होऊन त्यांच्या सलोख्यानेंच जें कांहीं कार्य होईल तेवढें करून घेतलें पाहिजे. हा सलोखा होण्यास दिवसेंदिवस अधिकाधिक सोयीहि होत चालल्या आहेत. पूर्वी टोपकराचा स्पर्श होतांच सचैल स्नान करावें अशा ज्या आमच्या ठिकाणीं आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंविषयीं समजुती होत्या त्या आतां पुष्कळ कमी होऊन त्यांचें वैभव व थोरवी हीं आमच्या पुरतीं लक्षांत येऊन चुकलीं आहेत. त्याप्रमाणें हिंदु म्हणजे आफ्रिकेंतील निग्रो लोकांचे बंधु ही जी आकाशांतील बापाच्या पवित्र लेकरांनीं चोहोंकडे समजूत पसरून दिली होती, तींतहि आतां इतकें अंतर पडलें आहे कीं, जगाच्या चारी खंडांत गीर्वाण वाणीचा घोष सुरू होऊन अमेरिकेंतली मंडळी अर्धा गोल ओलांडून आम्हांस कडकडून भेटण्याकरितां उड्या टाकूं लागली आहे. तसेंच अर्वाचीन शास्त्रांनीं व कलांनीं सारें भूमंडळ एकमय करून टाकून 'पवित्र शास्त्रांतील' सार्वलौकिक बंधुत्वाचें जें पोकळ मत त्यांस अयथार्थता आणण्याचा योग आणला आहे. खेरीज या शतकांत राजांच्या, सत्तेस धक्का बसून त्यांचें माहात्म्य किती कमी होत चाललें आहे. आणि लोकप्रभुत्व व स्वातंत्र्य हीं तत्त्वें चोहोंकडे किती जारीनें पसरत चाललीं आहेत, हें कोणाहि शोधक मनुष्याला अश्रुत नाहीं. तर वरील सर्व गोष्टींचा विचार केला असतां अशी उमेद, करतां येण्यासारखी आहे, कीं हल्लींच्या निकृष्टावस्थेंतून निघून हिंदुस्थाननें पुनः आपलें नांव जगांत गाजवावें, असें होण्यास दिवसेंदिवस अधिकाधिक उपाय सिद्ध होत आहेत.

मनुष्याची किंवा राष्ट्राची सुधारणा करावयाची म्हटली म्हणजे तिचा पाया आत्मस्थितीचें पूर्ण ज्ञान हें होय. ज्यांस आपली अवस्था काय आहे, पुढें काय होणार, आपलें बलाबल किती वगैरे गोष्टींचें चांगलेसें ज्ञान नाहीं त्याची स्थिति कधीं सुधारायची नाहीं. तर आमच्या लोकांस प्रथमतः स्वतःविषयींचें ज्ञान करून देणें अवश्य होय. आतां स्वतःविषयींचें ज्ञान म्हणजे काय अशी कोणी पृच्छा करील तर तिचें उत्तर असें आहे; साऱ्या जगाची स्थिति हल्लीं काय आहे, अलीकडे निरनिराळ्या पृथ्वींतील देशांचे परस्परांशीं व्यापार कसे सुरू आहेत, त्यांत या आमच्या देशाचें इतरांशीं दळणवळण कोणत्या प्रकारचें आहे, आमच्या राष्ट्राची पूर्वी स्थिति

कशी होती व हल्लीं कशी आहे, या स्थित्यंतराची उपपत्ति काय, आपली पुनः भरमराट होण्यास कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत इत्यादि विषयांवर सर्वांचें यथार्थ समज होणें हें अगोदर फार जरुरीचें आहे. हें जोंपर्यंत होणार नाहीं, तोंपर्यंत हल्लीसारखें पोकळ लोककल्याण व रिकामी बडबड चालेल व वास्तविक उपयोगाचें असें कांहीं होणार नाहीं. ज्यास आपली प्रकृति नीट करून शरीर सुदृढ करावयाचें असेल त्यानें प्रथमतः आपल्या प्रकृतीचें मान समजून घेणें जसें अत्यावश्यक त्याप्रमाणेंच येथेंहि प्रत्येक मनुष्यास आपल्या देशाची स्थिति पूर्णपणें लक्षांत येऊन आपलें बळाबळ जेव्हां पुरतेपणीं त्याच्या मनांत भरेल तेव्हां आमच्या सुधारणेला आरंभ झाला असें खास म्हणतां येईल. आतां ही साऱ्या राष्ट्राची जागृति व्हावी कशी? हा वरच्याचा पुढचा प्रश्न होय. पण याचाहि निकाल करणें फार कठीण आहे असें नाहीं. अज्ञान वसनाचीं अलीकडे जशीं जबरदस्त साधनें उपलब्ध झालीं आहेत तशी पूर्वी कधींहि नव्हतीं. छापखाने, आगगाड्या, आगबोटी, डाका, तारायंत्र, वगैरे अर्वाचीन कला हीं सर्व युद्धांत उपयोगी पडणारी अशीं केवळ दिव्य अस्त्रेंच होत असें म्हटलें असतां चालेल; पण हीं सर्व स्वतः केवढींहि प्रबळ असलीं तरी उपयोग काय? पंतांनीं आपल्या प्रसिद्ध महाकाव्यांत म्हटलें आहे—

सहाय आसिला असें तरिच मानवे शत्रुला।

मोठी भवानी तलवार असली तरी तिचें पाणिग्रहण जेव्हां 'यवनकुंजर-शिरपर' चढणाऱ्या सिंहानें करावें तेव्हां तिचें पाणी खळाळणार नाहीं तर कोंडून राहिलेल्या डबक्याप्रमाणें तें जागच्या जागीं मठ्ठ बसून राहणार! तर वरील महासाधनांच्या द्वारें जो आमचा येवढा सारा देश कुंभकर्णासारखा निद्रापद भोगीत स्वस्थ व सुस्त होऊन पडला आहे; त्यास हालहालवून जागें करण्याची प्रथमतः तजवीज झाली पाहिजे. हाच प्रकार यापूर्वी साऱ्या युरोपांत, फ्रान्स देशांत व रशियांत झालेला आहे. अवघें युरोपखंड हें सोळाव्या शतकापूर्वी आमच्या देशाप्रमाणें स्वस्थपणें घोरत पडलें होतें; पण चीन देशांतून मुद्रणकलेनें येऊन पाश्चात्य राष्ट्राचे ठायीं वस्ती मात्र केली तों लागलींच पन्नास साठ वर्षांत जिकडे तिकडे चळवळ सुरू झाली.

जुन्या ग्रीक व लॅटिन ग्रंथांचा साऱ्या देशांत अभ्यास व्हावयास लागून युरोपची बुद्धिदेवता फार दिवसपर्यंत जी निद्रिस्त झाली होती ती एकाएकीं जागृत झाली. हिचें फळ सोळाव्या शतकांतील जगप्रसिद्ध धर्मक्रांति हें होय. याप्रमाणेंच फ्रान्स देशांतहि अठराव्या शतकापर्यंत बिलकूल गडबड नसून हवी तशी अंदाधुंदी चालली होती; व एकंदर राष्ट्र हें मेंढवाड्यासारखें होऊन गेलें होतें. सरकारी अधिकाऱ्यांनीं हवे तसे जुलूम करावे आणि खुशाल खपले जावे; पण व्हालटेर प्रभृति महान् महान् ग्रंथकारांनीं देशभाषेच्या द्वारें लोकांचें मन क्षुब्ध करून त्यांस सुजाण केल्याबरोबर वरील शतकाच्या शेवटीं अशी धुमश्चक्री उडाली आहे कीं, तिनें फ्रान्सच काय पण सारें युरोपखंड खळबळून सोडलें! असो; तर ज्ञानाच्या प्रसाराचा महिमा असा विचित्र आहे.

जेव्हां आमच्या देशाची हलाखी पाहून ज्यास खरोखर दुःख होत असेल, व तिजपासून त्याची सुटका व्हावी म्हणून जे झटत असतील त्यांनीं वरील ज्ञानार्जनाचा प्रयोग करण्याचें मनावर घेतलें पाहिजे. सर्व क्रियेचें मूळ मन आहे. यास्तव तेंच सुविचारसंपन्न व पोक्त झालें असतां केवढा फायदा होणार बरें! ही गोष्ट एवढी स्पष्ट असतांहि हिजकडे आमच्या आजपर्यंतच्या पुढारी मंडळींचें कांहींच लक्ष पोंचलें नाहीं असें म्हटलें पाहिजे. देशहिताची दीक्षा विद्यापीठांतील भट्टाचार्यांपासून घेऊन निघाल्यावर आमच्या नूतन पंडित मंडळीनें करावें काय, तर सरकारी हुद्दे मिळवावे,जन्मभाषेची व आपल्या देशाची ओळख विसरून जाऊन पाश्चात्य भाषेंत निरंतर अद्वातद्वा प्रलाप करावे व आपल्या राज्यकर्त्यांचें सर्व प्रकारें अनुकरण करून मोराचीं पिसें लावून आयता थोरपणा मिळवूं पाहणाऱ्या डोमकावळ्याच्या पंक्तीला बसावें, आणि लोककल्याणाची मोठी शिकस्त काय तर मोठा थोरला तंबुरा घेऊन आकाशांतील बापाच्या कानीं सुस्वर आक्रोश पाडावा. प्रार्थनासमाजीय तंतुवाद्याच्या शंभर भोपळ्यांनीं तरी हा विपन्मय देश तरण्याचा संभव आहे काय? त्यांचा कर्णमधुर व पवित्र रव हिंदुस्थानच्या वीस कोटी प्रजेच्या कानीं कधीं पडणार? आणि तो पडला असेंहि जरी मानलें तरी त्यापासून या भारतवर्षाची उन्नति होण्याचा कितीसा संभव आहे याविषयीं आम्हांस फार संदेह

आहे. ब्राह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज हे जरी खूप जारीनें सुरू झाले तरी त्यांत देशास किफायत ती काय होणार? इतर शेंकडों पंथ आहेत त्यांत हेहि आणखी सामील होतील, दुसरें काय? त्याप्रमाणेंच अलीकडे पूर्वीचे संप्रदाय मोडून टाकून हवे तसे गंमतीचे विवाह जे होत आहेत त्यापासून तरी काय निष्पन्न होणार असेल तें होवो! इकडील एकादी फाकडी मिस् (कुमारी) आणि तिकडचा एकादा घोटक ब्रह्मचर्य आचरणारा गोरा नवरा यांचा गांधर्वविवाह झाल्यानें आमचा देश-सुधारणेचें तारूं जर पुढें ढकललें जाणार तर बटोदर मुक्कामीं कांहीं वर्षांपूर्वीं जो कपोतविवाह येवढ्या कडाक्यानें गाजला तोहि देशोन्नतीची पताका फडकवण्यास परमसाधनीभूत म्हणून समजावयास नको काय? एकंदरींत पाहतां आम्हांस वरील प्रकार केवळ बालिशत्वाचे वाटतात, त्यांत व देशोन्नतींत ज्यास कार्यकारणभाव दिसत असेल त्यांचें तार्किक आमच्याहून फार निराळें आहे असें म्हणून स्वस्थ बसणें भाग आहे!

देशसुधारणेचा राजमान्य मार्ग म्हटला म्हणजे लोकांस ज्ञानसंपन्न करणें हा होय. ही संपन्नता सिद्ध करण्याचीं मोठीं दोन साधनें म्हटलीं म्हणजे रचना व लेखणी हीं होत. पहिल्या सदराखालीं शाळा व्याख्यानें हीं येतात व दुसऱ्याखालीं वर्तमानपत्रें, मासिकें, पुस्तकें व ग्रंथ हे येतात. ह्या दोन्ही साधनांचा उत्कर्ष होऊन या अज्ञानांध राष्ट्राचे डोळे उघडावे एतदर्थ आमच्या थोर व दयाळु सरकारनें आजपर्यंत थोडा उद्योग केला आहे असें नाहीं. युनिव्हर्सिटी (विद्यापीठ) विद्यालयें, शाळा वगैरेंची स्थापना करून आज वर्षानुवर्षें त्यांची व्यवस्था चालविली आहे. व देशभाषांची अभिवृद्धि व्हावी म्हणूनहि होईल तितका प्रयत्न सरकारनें केला असून अजूनहि तो चालू आहेच, पण सरकारनें आपलें काम बजाविलें म्हणून तितक्यानें काय झालें? आम्ही स्वतः मोठे कर्तृत्वाचे पडलों ना? आमच्या तोंडावर अचानक जांभूळ पडलें तरी तें आंत लोटायलाहि आणखी कोणी पाहिजेच! आमची मर्दुमकी असली, कीं रडतरावाप्रमाणें आम्हांला घोड्यावर बसवून शिवाय आमच्या हातून लोकांनीं तलवारहि मारविली पाहिजे! वस्तुतः पाहतां सरकारनें जर इतका पल्ला मारला तर बाकीची मजल आम्हीं मोठ्या संतोषानें व उत्साहानें केव्हांच आटपावी. एवढा ज्ञानाचा प्रवाह आडवून

त्याची मालकी जर आमच्या सरकारनें आमच्या नवीन बांडास दिली तर नलिकाद्वारें घरोघर उदकसंचय करण्याचें अल्पस्वल्प कामहि त्याच्यानें होऊं नये? पण हें करतो कोण व गरज कोणाला ? शिवाय असें करण्यापासून कांहीं फायदा होण्यासारखा आहे हें तरी कोणाच्या अंतःकरणांत बिंबलें आहे ? आमच्या भाषेंत म्हण आहे कीं, ‘ डोळ्यांत केर आणि कानांत फुंकर ’ तर याच न्यायानें सारी व्यवस्था चालली आहे. आमची अन्नान्नगत झाली आहे. दुष्काळाचा तडाका उडाला म्हणजे लाखों लोकांची चांदी उडते आहे. सरकार-देण्याखालीं रयतेचा चुराडा होत आहे. लोकांस आपल्या सामान्य हक्कांचें व सामान्य गोष्टींचेंसुद्धां ज्ञान नसून त्यांच्या अभावीं त्यांची स्थिति पशुवर्गासारखी होऊन गेलेली आहे. येवढा हा संपन्न देश असतां येथील लोकसंख्या येवढी असतां, लोकांची बुद्धि येवढी प्रखर असतां व आहे तेथें अर्थसंचयहि विपुल असतां कल्पवृक्षाखालीं उपवास या न्यायानें इतकी प्रजा व्यर्थ हाल सोसते आहे ही स्थिति सर्वांच्या डोळयांसमोर आहे; आणि देशोन्नतीचे धुरंधर वरील विपत्तींच्या प्रतिकारार्थ उद्योग काय करीत आहेत म्हणाल तर एक आकाशांतील बापास आरोळी देत आहेत. दुसरें आपल्या लेडीकरवीं दुसऱ्या गौरकाय अधिकाऱ्यांचें हस्तपीडनपूर्वक स्वागत करताहेत, कोणी पार्लमेंटच्या गर्दीत गुंग होऊन गेले आहेत, कोणी अर्वाचीन सोमरसांत तल्लीन होऊन जातीभेदरूप महान् अनिष्टाचा उपशम होऊन या देशास आराम पडावा म्हणून अर्वाचीन ऋषींचा तांडा जुळवून गवालंभाचें आनुष्ठान करीत आहेत कोणी सरकारी अधिकाऱ्याचे प्रतिदिवशीं उंबरठे पुजूत त्यांच्यापुढें निरंतर लांगूलचालन करीत आहेत इ. इ. हा सर्व प्रकार आम्हांस तर लज्जास्पद दिसतो. मेकॉलेसारख्यांनीं येवढी भवति न भवति करून व येवढा अट्टाहास करून जी शिक्षणपद्धति सुरू केली तिची वर सांगितलीं हींच फळें काय? त्यांनीं लावलेल्या उत्तम वृक्षास दरवर्षी येवढा मोहोर येत असतां तो बहुधा सगळाच्या सगळा गळून जावा आणि फळ म्हणून प्रायः मुळींच धरूं नये ही केवढी खेदाची गोष्ट आहे ! आमच्या राष्ट्राचे पालक म्हणून ज्या सरकारनें नेमले आहे त्यांनीं आपला अधिकार किती उत्कृष्टपणें आजपर्यंत बजावला बरें ?

विश्रामं लभतामिदं च शिथिलज्जाबंधमस्मद्धनुः ।

—शाकुंतल

# १८. वेदांचें प्राचीनत्व

वेदग्रंथांचें साऱ्या जगास कोणतें महत्त्व आहे व त्यांच्या अध्ययनापासून कोणता उपयोग आहे हें अलीकडे सर्वांस माहीत होत आलेलें आहे. याचें प्रमाण प्रत्येक सुधारलेल्या देशांत संस्कृतास व त्यांतून वरील ग्रंथास जो आदरपूर्वक मान प्राप्त झाला आहे तो होय. सर्व देशांतील संस्कृतज्ञांची दिवसानुदिवस खात्री होत चालली आहे कीं, वेदांच्या बरोबरीचा जुना लेख पृथ्वीवर कोठेंहि नाहीं. युरोपांत अत्यंत प्राचीन मानलेलीं जीं ग्रीक व रोमन हीं राष्ट्रें त्याहून, किंबहुना त्यासहि पूज्य होऊन गेलेलें असें मिसर देशचें जुनें राष्ट्र त्याहूनहि येथील लोक पुरातन होत. तेव्हां इतक्या प्राचीन राष्ट्राचा जो अत्यंत प्राचीन ग्रंथ, कीं ज्यास ते 'अनादि' ही संज्ञा देतात, तो प्रत्येक जिज्ञासु मनुष्याच्या अत्यंत आदरास पात्र होईल यांत नवल कसचें ? उगाच शंभर दोनशें वर्षांची जुनी एखादी अपूर्व वस्तु पाहिली कीं केवढी मौज वाटते व जिज्ञासा जागृत होऊन तिच्या तृप्ती-विषयीं केवढी प्रबळ इच्छा उत्पन्न होते ! मग मानवी जातीच्या आद्य स्थितीचें स्वरूप ज्यांत दृष्टीस पडतें, ज्यांत चार हजार वर्षांपूर्वींचीं मनुष्यें कशीं बोलत होतीं, कशीं चालत होतीं, त्यांचे मनोव्यापार कसे होते, निरनिराळ्या विषयांवर मतें कशीं होतीं. वगैरे गोष्टींची माहिती ज्यावरून व्हावी असा अत्यंत विश्वसनीय लेख जर सांपडला, तर शोधक व जिज्ञासु जनांस केवढा मनोवेधक विषय होईल ! इतिहास खरा म्हटला म्हणजे मनुष्यजातीच्या मनोव्यापारांचे शाश्वत स्वरूप कोणतें व प्रसंगानुरोधानें त्यांवर कसकशीं कार्यें घडतात याचें ज्यांत उद्घाटन केलें आहे असा लेख होय. मग वरील ज्ञान होण्यास वेदासारखा ग्रंथ तर किती साधनीभूत होय ! कां कीं तो अत्यंत प्राचीन असल्यामुळें मनुष्यस्वभावाचें अगदीं साधें व मूळचें रूप त्यांत जसें सांपडेल तसें पुढील काळच्या ग्रंथांत सांपडणार नाहीं. असो; तर एतद्देशीयांखेरीज बाकीच्या सर्व लोकांस वेदग्रंथांच्या ज्ञानापासून वरील एक मोठा उपयोग आहे, तसाच दुसरा उपयोग भाषा-ज्ञानाच्या संबंधानें आहे. हेंहि सर्वत्र प्रसिद्धच आहे.

आतां आपणांसच खुद्द वरील ग्रंथाच्या अध्ययनापासून कोणकोणते लाभ आहेत हें पाहिलें तर ते बऱ्याहूनहि अधिक आहेत हें सहज लक्षांत येईल.

एक तर लाभ स्पष्टच आहे कीं, सर्व आर्यजनांच्या पूज्यताबुद्धीस व प्रीतीस पात्र झालेला जो प्रस्तुत ग्रंथ त्याचा अर्थ समजल्यानें त्यांत आहे काय याची अगोदर फोड होईल. दुसरा असा कीं, आपले अत्यंत प्राचीन पूर्वज, ज्यांचा अभिमान आम्हांस वाटतो हें तर सहजच आहे; पण ज्यांचें अपूर्व बुद्धिवैभव पाहून युरोपांतील पुरातन राष्ट्रें जशीं विस्मित होत होतीं, तसेंच त्यांचे आधुनिक वंशजहि होतात,— त्यांची त्या वेळची स्थितिरीति आम्हांस कळेल. ही कळल्यापासून त्यांचे कोणी नव्हेत अशा दूरच्या युरोपियन लोकांसहि जर कौतुक वाटतें, तर आम्हांस तर तें किती वाटेल! याचें विशेष कारण असें कीं, ती स्थितिरीति आमच्या पाश्चात्य बंधूंहून आम्हांस निकट संबंधास्तव विशेष चांगल्या रीतीनें कळेल. या ज्ञानापासून दुसऱ्याहि पुष्कळ गोष्टी समजून येतील. त्या अशा कीं आमच्याच राष्ट्राची अगदीं पूर्वीं स्थिति कशी होती, ती आज हजारों वर्षांच्या कालांतरानें कशी बदलली आहे, ती बदलण्याचीं कारणें काय काय झालीं; धर्म, नीति, आचार, विद्याभ्यास वगैरेंचा प्रकार पूर्वीं कसा होता व सध्यां कसा आहे, अशा अनेक गोष्टी आपल्या लक्षांत येतील.याशिवाय भाषेच्या संबंधानें प्रस्तुत ग्रंथावरून पुष्कळ ज्ञान होईल हें उघडच आहे.

येथवर प्रस्तुत विषयाच्या महत्त्वाविषयीं व उपयोगाविषयीं लिहिलें; आतां त्याच्या स्वरूपाचें थोडेंसें विवरण करून मुख्य विषयास लागूं. वेद चार आहेत, हें येथें कोणास सांगावयास नकोच: ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद. या चोहोंत मुख्य म्हटला म्हणजे पहिलाच होय. याच्याच ऋचा प्रायः बाकीच्या तिघांत आहेत. चवथा तर तीहीहून अर्वाचीन आहे, हें सर्वत्र प्रसिद्धच आहे. चारी वेदांस समुदायरूपानें 'श्रुति' असें म्हणतात. या शब्दाचा अर्थ 'जें ऐकलें तें' असा होतो, यावरून वेद ज्यावेळेस उत्पन्न झाले किंवा मंत्र द्रष्टया ऋषींनीं पाहिले त्यावेळेस लेखनकला चालू नव्हती असें अनुमान करण्यास जागा आहे. श्रुतीमध्यें तीन भाग आहेत : संहिता, ब्राह्मण,आणि अरण्यक. संहिता म्हणजे मूळ वेदमंत्र,ब्राह्मण म्हणजे त्यांतर टीकारूप व्याख्यान; आणि आरण्यक म्हणजे उपनिषदादि भाग. प्रत्येक वेदाची संहिता निरनिराळी आहे; व तिचें पुनः पदें, क्रम इत्यादि आणखी भेद आहेत. ब्राह्मणें (हा शब्द नपुंसकलिंगी आहे) ही

प्रत्येक वेदाचीं निरनिराळीं आहेत. जसें ऋग्वेदावर ऐतरेय व कौषीतकी ब्राह्मण, यजुर्वेदाच्या दोन शाखा कृष्णयजुर्वेद व शुक्लयजुर्वेद; त्यावर अनुक्रमें करून तैत्तिरीय व शतपथ ब्राह्मण; सामवेदावर प्रौढ व अद्भुत ब्राह्मण; आणि अथर्वावर गोपथ ब्राह्मण. आरण्यकें हीं ब्राह्मणांच्या परिशिष्टासारखीं होत. यांत सारी उपनिषदें अंतर्भूत होतात. यांचें पठण अरण्यांत करावें लागतें म्हणून वरील संज्ञा त्यांस प्राप्त झाली आहे. वेद प्रायः सर्व छंदोबद्ध आहे. यजुर्वेदाचा कांहीं भाग मात्र गद्यरूप आहे. ऋग्वेदसंहितेचे दहा भाग केले आहेत; त्या प्रत्येकांस मंडल म्हणतात. मंडलाचे पुनः आणखी उपभाग आहेत, त्यांस सूक्तें म्हणतात. हीं सूक्तें वरील संहितेंत हजारांवर आहेत. प्रत्येक सूक्तांत सुमारें दहा ऋचा येतात. या मानानें पाहतां नुसता ऋग्वेदच सुमारें दहा हजार ग्रंथ आहे. आतां या निरनिराळ्या संहितांत व ब्राह्मणादि ग्रंथांत काय काय विषय आहेत हें पाहिलें तर ऋग्वेदांत इंद्रादि देवतांची स्तुति आहे. यजुर्वेदांत यज्ञ प्रकरण आहे; सामांत ऋग्वेदांतील ऋचा, पण त्या गायनाच्या रीतीनें म्हणावयाच्या आणि चवथ्या आथर्वणांत जारणमारणादि क्रियांचे मंत्र आहेत. वर सांगितलेल्या निरनिराळ्या ब्राह्मणांत प्रायः यज्ञक्रियेविषयीं मजकूर आहे. आरण्यकांत व उपनिषदांत अध्यात्मज्ञान आहे.

वेदांच्या संबंधानें एका मोठ्या गोष्टीविषयींची माहिती देणें अवश्य आहे. ही गोष्ट वेदग्रंथांचा काळ होय. या कालाचा निर्णय अगदीं बरोबर होणें तर बहुधा अशक्यच दिसतें, तरी त्या विषयींची कांहीं अटकळ करण्याची युक्ति पाश्चात्य पंडितांनीं एक चांगली योजिली आहे. ती संपात बिंदूंचें चलन होय. ज्योतिष म्हणून एक वेदांग आहे, त्यांत आपल्या ऋषींच्या वेळीं सूर्य कोणत्या अयनांशावर होता हें सांपडतें. त्यावरून गणित करतां असें निघतें कीं, तो ग्रंथ ज्या वेळेस रचला तो काळ इ. स. पूर्वीचें ११८१ वें वर्ष होय. यावरून स्पष्ट कळतें कीं, वरील वेदांगाचा जर इतका काळ तर मूळ वेदांचा याच्याहि मागला असला पाहिजे. तो एका विख्यात संस्कृतज्ञाच्या मतें इ. स. पूर्वीं २,००० वर्षें होय. हें खुद्द वेदाविषयीं म्हणजे संहितेविषयीं झालें. ब्राह्मणें व आरण्यकें हीं पुढें झालेलीं आहेत.

● ● ●

# १९. डॉ. जॉन्सन्‌च्या चरित्रापासून घ्यावयाचा बोध

प्रस्तुत चरित्राच्या साग्र अवलोकनापासून पहिली मोठी गोष्ट ही लक्षांत येते कीं, जॉन्सन हा नुसता पुस्तकवाल्याचा मुलगा असून पुढें जो येवढ्या अप्रतिम योग्यतेस चढला तें त्याच्या विशाल बुद्धीचें तर फळ आहेच, पण बुद्धीपेक्षां निश्चयाचें बळ वरील उन्नतीस विशेष कारण झालें असें म्हटलें पाहिजे. हें बळ ज्यास अनुकूल नाहीं तो केवढाहि अचाट बुद्धीचा असला तरी ती बुद्धि त्यांस कांहीं कामास पडायाची नाहीं;वाऱ्यावांचून अग्नि जसा निर्बळ त्याप्रमाणेंच मोठी जाज्वल्य बुद्धीहि दृढनिश्चयावांचून केवळ पंगु होय. जें काम हातीं धरलें तें शेवटास न्यावयाचेंच अशा अटीनें जो त्यास प्रवृत्त होईल, त्याच्याच हातून तें सिद्धीस जाईल, व अशाच निश्चयाचा मनुष्य विख्यातीस चढेल. जॉन्सन्‌नेंच कोठेंसें म्हटलें आहे कीं, मोठमोठीं कामें जीं उठतात तीं केवळ बुद्धिसामर्थ्यावर उठत नसतात, तर सतत उद्योग व निर्धार यांच्या बळावर उठतात. त्याचीच गोष्ट पाहा बरें, कीं इंग्लिशसारख्या परिपक्वतेस येऊन पोंचलेल्या भाषेचा कोश पहिल्या प्रथम आणि पुनः एकट्यानें करायाचा म्हणजे केवढें साहसाचें व केवढ्या अचाट श्रमाचें काम! सदरहू पुस्तक साद्यंत वाचायाचें किंवा लिहून काढायाचें येवढेंच काम कोणाच्या माथीं मारलें समजा, तर त्यास आपल्या डोक्यावर केवढा बोजा ठेवलासा वाटेल बरें! त्याची छाती अगदीं दडपून जाऊन हें कोठून लचांड गळयांत पडलें असें त्यास वाटेल यांत संशय नाहीं. मग जी अवाढव्य इमारत नुसती डोळ्यांनीं पाहणें किंवा आयता मालमसाला असतां पुनः रचणें हें केवढें दुर्धर काम वाटतें, ती स्वतः खाणींतून दगड काढून, झाडें तोडून, चुना कमावून पायापासून उभी करणें म्हणजे तर केवढा पर्वतप्राय उद्योग आहे! पण तोहि प्रस्तुत प्रचंड पंडितानें सहज लीलेनें शेवटास नेला; व मध्यें

अनेक प्रकारचीं विघ्नें व संकटें आलीं तरी तीं जुमानलीं नाहींत. हें तर काय, पण जॉन्सन्‌चें बुद्धिवैभव येवढें अपार होतें व तो एकदां अंग मोडून बसला म्हणजे काम सपासप उडवण्याची त्याची अशी विलक्षण हातोटी होती कीं, ज्या कोशरचनेच्या कामाखालीं कोणी सामान्य मनुष्य चिरडून जाऊन डोकें वर उचलण्याचेंहि त्यास सामर्थ्य राहतें ना, त्याच्याच ऐन गर्दींत त्यानें एक काव्य रचलें; एक नाटक संपूर्ण केलें, व त्याच्या ग्रंथांपैकीं उत्तम मानलेला जो 'रॅंब्लर' त्याचे दोनशें आठ अंक लिहिले !

बरें इतकेंहि करून स्वारी पुनः थकली काय ? नाहीं. थकून करते काय ! कोश संपून वर्गणीदारांच्या हातीं तो समग्र जाऊन पडला व साऱ्या राष्ट्राच्या अभिमानास व हर्षास कारण झाला; पण कोशकारांची अवस्था काय ? इंग्लिश भाषारूप समुद्राचें जरी त्यांनीं समंततः पर्यटन केलें तरी पर्यटन करणारा जसा निघालेल्या जागीं येऊन पुनः लागतो, त्याप्रमाणें ते नेमकेच पूर्वस्थितीशीं येऊन पुनः भिडले; म्हणजे पुनः बाबू के भाई दरवेशी,ही अवस्था कांहीं चुकली नाहीं ! येवढा इकडचा डोंगर इकडे केला, पण पुनः हातातोंडाशीं गांठ आहे ती आहेच. वरील प्रचंड उद्योग संपतांच पूर्ववत् अल्पस्वल्प उद्योग करून दोन प्रहरची वेळ टाळावी हा त्यांचा क्रम लागलीच सुरू झाला. असो. तर अशा विपत्तींतहि सदरहू ग्रंथकारानें इकडे मोठमोठाले ग्रंथ रचले. व आपलें सर्व आयुष्य विद्यासंपादनांत व विद्याप्रसार करण्यांत खर्चलें, हें मोठें विलक्षण नव्हे काय ? तर प्रस्तुत चरित्रापासून सर्व लोकांनीं व विशेषतः आमच्या नवीन विद्वानांनीं सतत उद्योग करण्याविषयीं उपदेश घ्यावा.इंग्रेजांसारख्या परम ज्ञानसंपन्न राष्ट्रांशीं सुदैवेंकरून एतद्देशीयांचा जो योग झाला आहे त्याचें जर साफल्य व्हावयाचें असेल, व स्वातंत्र्यनाशरूप जी या देशाची महाहानि झाली आहे तिची जर भरपाई व्हावयाची असेल, तर लोकसुधारणेचे खांब म्हणवणारांनीं सध्यांपेक्षां फार निराळ्या तऱ्हेनें आपलें वर्तन ठेवलें पाहिजे. हल्लीं जी त्यांस पोकळ घमेंडी वाटते, कीं युनिव्हर्सिटींतून आपण पार पडलों कीं ज्ञानाची अत्यंत सीमा आपण गांठली, ती त्यांनीं अगोदर दवडली पाहिजे. विद्यालयांतील सर्व संस्कार होऊन बाहेर पडलेला मनुष्य हा खरोखरच पांखबीख फुटून

घरट्यांबाहेर पडलेल्या पांखरांच्या बच्च्यासारखा होय. म्हणजे त्यास त्याचीं आईबापें ज्याप्रमाणें पोसून उडायाजोग्या स्थितीपर्यंत आणून पोंचवतात, त्याप्रमाणेंच आमचे विद्यालयीन पंडितहि तीन चार वर्षांच्या शिक्षणाच्या योगानें सामान्यतः कोणत्याहि विषयांत स्वतःच्या परिश्रमानें प्रवेश होई. इतक्या प्रगल्भतेला येऊन पोंचलेले असतात; इतकेंच काय तें. मग ही ज्यांची स्थिति त्यांनीं ज्ञानसमुद्राचें पैल तीर गांठलें, कीं ते अलिकडच्याच तीरावर आहेत हें कोणासहि सहज समजेल. पांख फुटलेल्या पक्ष्यास आकाशाक्रमण जसें पुढें करायाचें असतें, त्याप्रमाणेंच विद्यालयाच्या बंधांतून जो सुटला तो विद्यासमुद्रावर सफर करण्यास नव्या नाविकाप्रमाणें नुकता तयार झालेला असतो. तर ही वास्तविक स्थिति मनांत आणून आमच्या होतकरू लोकांनीं अल्पविद्येंत संतोष न मानतां व वृथा गर्वानें फुगून न जातां जॉन्सन्ची ज्ञानप्राप्तीविषयीं जशी पराकाष्ठेची उत्कंठा होती व तो स्वतः मोठमोठ्या ग्रंथकारांस वंद्य असतांहि शेवटपर्यंत त्याचें अध्ययन जसें सुटलें नाहीं, तसाच त्यांनीं क्रम ठेवला पाहिजे.

युनिव्हर्सिटी स्थापन होऊन आज वीस वर्षें झालीं; व त्यापूर्वींहि कित्येक वर्षांपासून इकडे इंग्रेजी विद्येचा प्रचार सुरू झाला होता; मग इतक्या वीस तीस वर्षांत लोकसुधारणेला किती साह्य झालें असतें! तरुण जनांस वाचण्यालायक अशीं नाना प्रकारचीं मनोरंजक पुस्तकें, बहुश्रुत लोकांच्या उपयोगी पडण्यासारखे तऱ्हेतऱ्हेच्या माहितीचे चमत्कारिक ग्रंथ; विद्यार्थ्यांस इष्ट असे देशोदेशींचे संक्षिप्त इतिहास; निरनिराळ्या शास्त्रांवर सुबोध ग्रंथ; त्याप्रमाणेंच या देशांतील जुनी कविता व जुना इतिहास यांचा संग्रह; कीं जो होण्याची सोय दिवसेंदिवस कमी होत चालली आहे; तसेंच साऱ्या भारतवर्षीयांच्या किंबहुना साऱ्या जगाच्या प्रीतीचें व पूज्यबुद्धीचें स्थान झालेली जी प्राचीन गीर्वाण भाषा, तींत काय काय ज्ञानभांडार आहे; तिच्या खालोखाल मानलेली जी फारशी भाषा तींत काय मौज आहे, याविषयीं शोध; हिंदुस्थानी, गुजराथी वगैरे एतद्देशीय भाषांचा मराठीशीं कितपत संबंध आहे, व्याकरणरीत्या सर्वांचा कसा कसा मेळ आहे. इत्यादि विचार;— या या प्रकारें उद्योग करण्याचें आमच्या पुढारी मंडळीनें जर मनावर घेतलें असतें तर आजला लोकांची किती निराळी स्थिति असती!

यासारखेंच देशी शेतीकडे व देशी व्यापाराकडे जर कोणी लक्ष दिलें असतें; व आपल्या इंग्रेजी ज्ञानाचा लाभ आपल्या देशबंधूस त्यांच्या भाषेच्याद्वारें करून दिला असता, व व्यावहारिक कृत्यांच्या संबंधानेंहि त्यांत उपयुक्त माहिती करून दिली असती, तर त्यांस व सर्वांस केवढें भूषण झालें असतें. मूळची बुद्धि कितीहि उत्कृष्ट असली, तरी तिचें तेज पडण्यास उद्योगाची अपेक्षा आहे. ही गोष्ट आमचे लोक अलीकडे विसरत चालले आहेत. कोणाच्या ठायीं कोणताहि गुण असो; त्यांची अंमळ प्रशंसा झाली कीं पुरें तेथें गर्व जडलाच. गर्व जडला कीं, उद्योगाचें मान कमी झालेंच.

तर प्रस्तुत ग्रंथकारांच्या चारित्रावरून आमच्या वाचकांनीं ' ग ' रूप रोगावर महामात्रा घ्यावी. त्यांनीं असें ध्यानांत आणावें कीं, जॉन्सन्‌ची येवढी लोकोत्तर बुद्धि होती तरी त्याचा उद्योग राहिला नाहीं. आपण बुद्धिमान आहों. तेव्हां जडबुद्धीचा सामान्य लोकांप्रमाणें आपणांस सतत अध्ययनाची काय गरज आहे, इतरांस पुस्तकांपासून व शिक्षकांपासून जें ज्ञान प्राप्त होणार तें आपल्या ठायीं जिवंत झऱ्याप्रमाणें आपोआपच प्रादुर्भुत होईल, या मूर्खत्वाच्या भ्रमांत तो कधींहि पडला नाहीं, तर ज्ञानप्राप्तीचा जो एक मार्ग कोणता तर अध्ययन ( आतां हा कोणास बुद्धिमत्त्वास्तव सुगम होतो, कोणास स्वाभाविक जाड्यास्तव दुर्गम असतो, इतकांच काय तो भेद ) तोच प्रस्तुत महापंडितानें शेवटपर्यंत क्रमिला.

या चारित्रावरून दुसरी शिकण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे जॉन्सनचा गृहाचार होय. गृहाचार म्हणजे घरांतील वागणूक. ही पुष्कळ वेळां मोठमोठ्या लोकांचीसुद्धां बाह्याचरणांहून म्हणजे जगांत जी त्यांची वर्तणूक दिसते तिजहून अत्यंत भिन्न असते. जें बाहेर बोलायाला चालायाला मोठे गोड, दिसायाला मोठे सभ्य व सकृद्दर्शनीं लोकहितार्थ झटणारे अशा प्रकारचे वाटत असतात, तेच कधीं कधीं उंबरठ्याच्या आंत पाऊल ठेवतांच कपाळांस आंठ्या पडणारे, नाना प्रकारच्या दुराचारांत निःशंक रमणारे व पहिल्या प्रतीचे आपमतलबी असे असतात. हा चमत्कारिक विरोध जगांत अनेकशः आढळत असतो; यास्तव प्रसिद्ध पुरुषांच्या लौकिक चरित्रांच्या शेवटीं त्यांच्या गृहचरित्राचा नेहमीं वृत्तान्त

दिलेला असतो. हा मागील चारित्रांत दाखल झाला आहेच, त्यावरून जॉनसन्ची घरगुती वागणूक म्हणजे आईबापांशीं, बायकोशीं, चाकराशीं वगैरे त्याचें वर्तन कोणत्या तऱ्हेचें होतें हें वाचकांस कळलेंच आहे.

हा प्रस्तुत पंडिताच्या वर्तनाचा कित्ता घेऊन त्यांनीं मोडला पाहिजे. आतां हें खरें कीं, बायकोस आपणावांचून दुसरी गतीच नाहीं, आपण पाहिजे तसा तिजवर अंमल चालवला असतां चालणार आहे हें लक्षांत आणून तिला सतत जाच करणें हें परम अधमाचें कृत्य आहे व रथचक्र न्यायानें स्त्रीचा अधिकार संसारकृत्यांत पुरुषाच्या बरोबर आहे. यास्तव तोहि तिला देणें हें रास्त आहे, परंतु ‘ अबला यत्र प्रबला ’ असा प्रकार घरांत असून पुरुषानें निर्माल्य होऊन बसणें किंवा वेडे लाड करून बायकोस वडील माणसांहून शिरजोर करून ठेवणें हीं दोन्हीं कृत्यें अत्यंत लज्जास्पद होत. यास्तव स्त्रीचा बंदा होऊन न राहतां तिजशीं प्रेमभावानें वागण्याचें उदाहरण प्रस्तुत चारित्रापासून घेण्यासारखें आहे. याप्रमाणेंच जॉन्सननें पहिला संबंध तुटला असतां शेवटपर्यंत दुसरा जोडण्याची बिलकुल इच्छा केली नाहीं व यावज्जन्मांत दहा बारा वर्षे संसारसुखाचा अनुभव जो त्यास घडला, तितक्यांतच त्यानें संतोष मानला, हा प्रेमातिशय व मनोनिग्रहहि अत्यंत विचारार्ह होय.

यापुढचा उपदेश आईबापांशीं वागण्याच्या संबंधानें. हाहि प्रस्तुत चारित्रांपासून बराच घेण्यासारखा आहे. तो असा कीं, जॉनसन् हा आपला चारितार्थ चालवून द्रव्यसंपादन जरी करूं लागला, व त्याची कीर्ति तर साऱ्या विद्वन्मंडळांत जरी गाजूं लागली, तरी आपल्या वृद्ध मातेची लवमात्रहि उपेक्षा न करतां पूर्वींप्रमाणेंच त्याची तिच्या ठायीं अतिशयित भक्ति राहिली. ही त्याची भक्ति अशीच शेवटपर्यंत होती; व शेवटपर्यंत तिच्या नांवानें तो प्रार्थना करीत असे.

आतां वरील गुण आमच्या नवीन मंडळींत कितपत आढळतो हें जर पाहिलें तर एखाद्या आणीबाणीच्या विवाहादि प्रसंगीं जरी तो पूर्ण उदयास येतो, तरी सामान्यतः पाहतां त्याचें तेज मलिनच दृष्टीस पडतें. कित्येक ठिकाणीं तर यासंबंधानें पहातां एका महाराष्ट्र—कवीचें वर्णन

सर्वथा प्रत्ययास येतें. आतां या वर्तणुकीचें मुख्य बीज काय हें जर पाहिलें, तर पाश्चात्य विद्येच्या योगानें उत्पन्न झालेला मूर्खपणाचा गर्व हें तें होय यांत संशय नाहीं.

जॉन्सन् हा भाविक ख्रिस्ती होता. लहानपणीं त्याच्या आईबापांनीं जीं धर्मसंबंधीं मतें त्याच्या मनांत भरवून दिलीं होतीं तींच त्यानें शेवटपर्यंत ठेवलीं, व त्यांच्याचतर्फेनें तो नेहमीं भांडत असे. कॉलेजमध्यें असतांना त्याच्या मनांत बरीच चलबिचल होऊन ख्रिस्ती धर्माची चेष्टा करणें व त्याच्या विरुद्ध प्रतिपादन करणें यांत सुद्धां त्याला मौज वाटायला लागली होती; पण पुढें कांहीं काळानें त्याचें त्यासच तें वाईट वाटायला लागून तो पक्का भाविक बनला. आतां येवढ्या उल्लेखावरून किती गोष्टी सिद्ध होतात पाहा! एक तर ख्रिस्तीधर्माचें गौरव त्याच्या अनुयायांच्या तोंडून जें ऐकूं येतें कीं, तो ईश्वरप्राणित असल्यामुळें तो स्वीकारल्याबरोबर सर्व संशय छिन्न होऊन मनास अप्रातिम शांतिसुखाचा अनुभव होऊं लागतो हें बिलकुल खरें नाहीं. खरें असतें, तर जॉन्सन् हा जन्मतःच सत्यधर्माचा असून व पवित्र सत्याचा त्यास लहानपणापासून सारखा बोध चालला असतां व ते तो आचरीत असतां कॉलेजचें वारें लागतांच त्यास स्वधर्माची टवाळी करण्याची कां इच्छा व्हावी? यावर कोणी सद्धर्माभिमानी प्रतिपक्षी कदाचित् म्हणतील कीं, त्या वेळेस त्याची बुद्धि परिपक्व झाली नव्हती म्हणून वरील उपहासास तो प्रवृत्त झाला, तर तसेंहि केवळ निवळ म्हणतां येत नाहीं. कां कीं पुढें जरी नास्तिकपणा अगदीं सोडून देऊन जॉन्सननें शेवटपर्यंत अत्यंत भाविकपणाची वृत्ति धारण केली; तरी हें केवळ भक्तिच्या बळानें त्यानें केलें. स्वतः सर्वदा छिन्नसंशय होऊन कोणी वाद करायाला उभा राहील त्याशीं सामना घालण्यास तो तयार झाला असें कधींहि झालें नाहीं.

आतां वरील उल्लेखापासून एतद्देशीयांनीं विशेषतः कोणता बोध ग्रहण करण्यासारखा आहे तो सांगतों. एक तर अर्थात् हा कीं शुभवर्तमानासारख्या लटपटींत शास्त्रावर भरंवसा ठेवूनहि प्रस्तुत पंडितास जर पारमार्थिक लाभ झाले, म्हणजे दया, शांति वगैरे सद्गुण त्याचे ठायीं नांदून दुराचारापासून त्याची निवृत्ति झाली—तर वरील पुस्तकाहून फार मोठ्या योग्यतेचे

आमच्या लोकांत जे धर्मग्रंथ सर्वप्रसिद्ध आहेत त्यांचा आश्रय केल्यानें किती अधिक फळ होईल ! तर या दुसऱ्या ग्रंथावर जे पूर्ण भाव ठेवून चालत असतील, त्यांस नांव ठेवणें हें बरोबर नाहीं; कां कीं, त्यांचा त्यांवर जर पूर्ण विश्वास आहे, व हा विश्वास बैबलासारख्या ग्रंथावर ठेवल्यानेंहि पूर्वोक्त फळ जर प्राप्त होत आहे; व त्यामुळेंच तो विश्वास निंद्य होत नाहीं, तर आमच्या देशांत जे मोठमोठे मुमुक्षु होऊन गेले व त्यांनीं अध्यात्मिक ज्ञानावर जे सर्वसामान्य ग्रंथ करून ठेवले त्याचें अनुकरण केलें असतां तें मात्र निंदास्पद कां व्हावें ? अगदीं तान्ह्या मुलाचें डोक्यावर पाद्रीसाहेबांनीं आपल्या पवित्र हातानें पाण्याचे चार थेंब टाकले म्हणजे त्याचा नरकवास चुकून ते मोक्षास जाण्यास योग्य होतें हें मत जर अत्यंत समंजस होय, तर गंगेसारख्या महानदींत मज्जन केल्यानें पापक्षालन होतें हें मत कशानें बरें वेडगळ झालें ? येशूनें वादळ शांत करून तो समुद्रावरून चालत गेला, व सरतेशेवटीं थडगें फोडून वर येऊन लोकांदेखत आकाशांत आपल्या बापाकडे गेला, हा जर पवित्र इतिहास, व त्यावर शंका काढणें हें अघोर पाप; तर सेतुबंधाची कथा किंवा, तुकारामबुवांचें स्वर्गारोहण हें तरी कशावरून खोटें ?

यास्तव असल्या वादग्रस्त विषयावर उगाच हुज्जत घेत बसणें व एकमेकांच्या रिकाम्या कुटाळक्या करण्यांत कालक्षेप करणें यांत कांहीं जीव नाहीं. हें करण्यापेक्षां जो धर्म ज्यास जन्मतः प्राप्त झाला आहे, त्यासच अनुसरून त्यांतच सदाचरणाचा व परमार्थाचा जो मार्ग त्यास सांपडेल तो त्यानें स्वीकारला असतां कलहाचें तोंड मिटेल; अमूल्य कालाचा अपव्यय होणार नाहीं; व खरी धार्मिकता ही जगांत वाढेल असें आम्हांस वाटतें.

● ● ●

# २०. वक्तृत्वाची उपपत्ति

प्रथमतः ‘ वक्तृत्व ’ शब्दाचा मूळ अर्थ पाहिला तर ‘ बोलणारेपणा ’ म्हणजे ‘ बोलण्याची शक्ति ’ असा होय. पण हा अर्थ केवळ यौगिक झाला. रूढीवरून पाहिलें असतां नुसत्या वाचाशक्तीस वरील शब्द लागत नाहीं, त्याच्या पोटीं वरच्याहून पुष्कळ जास्त अर्थ गर्भित होतो. सध्यां प्रसंगानुसार थोडक्यांत एवढेंच सांगतों कीं, ‘ वक्तृत्वाचे मुख्य लक्षण मोहकपणा होय. म्हणजे जें भाषण ऐकतांच श्रोत्यांची चित्तवृत्ति तटस्थ होऊन ती बोलणाराकडे अगदीं वेधून जावी त्याचें नांव वक्तृत्व.

तेव्हां प्रस्तुत वक्तृत्वगुणाची उत्पत्ति कशी होते व त्याचा फैलाव होण्यास कोणत्या गोष्टी कारणभूत होतात याविषयीं विचार करायाचा. आतां एकंदर इतिहासावरून जर पाहिलें तर एक मोठी गोष्ट कळून येते कीं, जेथें जेथें लोकसत्तात्मक राज्यें होतीं तेथें तेथें वरील गुणाचें वास्तव्य होतें. पाहा कीं, सगळ्या ग्रीस देशांत आथेन्स येथेंच काय तो वरील राज्यप्रकार चालू असल्यामुळें मोठमोठे नामांकित वक्ते तेथेंच मात्र निपजले. बाकी, त्या शहराच्या जोडीचीं दुसरीं जीं स्पार्टा, थीब्स, मासिडन् वगैरे संस्थानें होतीं त्यांच्या सगळ्या इतिहासांत कोणी मोठा वक्ता होऊन गेल्याचें एक सुद्धां उदाहरण सांपडत नाहीं. तोच प्रकार पुढें इटाली देशांतहि नजरेस येतो. त्या देशांतहि ग्रीसप्रमाणें अनेक संस्थानें होतीं, पण मोठे वक्ते झालेले असे रोम शहरीं मात्र इतिहासांत प्रसिद्ध आहेत. तोच प्रकार अर्वाचीन काळीं अलीकडे सुमारें शंभर दोनशें वर्षें इंग्लंडांतहि दृष्टीस पडतो. तो तरी केव्हांपासून म्हणाल तर राजाचें आणि प्रजेचें मोठें युद्ध होऊन दुसऱ्या पक्षास अधिकाधिक स्वातंत्र्य ज्या वेळेपासून मिळूं लागलें तेव्हापासूनच. तसेंच सुमारें शंभर वर्षांपूर्वीं फ्रान्स देशांत मोठी धामधूम होऊन व तद्देशीय लोकांस जें क्षणिक स्वातंत्र्य प्राप्त झालें होतें त्या प्रसंगींहि एवढ्याशा थोड्या वेळांत सुद्धां वक्तृत्वशक्तीचा क्षणमात्र उदय झाला होता. तसाच अलीकडे अमेरिकेंतील नव्या प्रजासत्तात्मक राज्यांतहि झाला आहे, आतां तोंच प्रकार उलट पाहा. इकडे आशिया खंडांत आजपर्यंत शेंकडों मोठमोठीं

राज्यें होऊन गेलीं, पण एकांतहि वक्त्याच्या भाषणानें सगळे लोक एकदम चेतून गेले आहेत, वक्त्यांच्या पाठशाळा घातल्या असून त्यांतून मोठ्या नामांकित गुरूंचें शिष्यांस व्याख्यान चाललें आहे अथवा संस्थानिक कारभाराच्या मोठाल्या सभांतून दोन वक्त्यांच्या परस्परांवर कोट्या प्रति-कोट्या चालल्या आहेत,असा प्रकार बिलकुल कोठेंहि आढळत नाहीं. फार तर काय, पण 'वक्ता' व 'वक्तृत्व' हे शब्दहि अलीकडील नव्या अर्थांचे दर्शक असे एशिया खंडांतील कोणत्याहि भाषेंत सांपडतीलसें वाटत नाहीं. कारण कोणत्याहि शब्दानें वाच्य जो अर्थ तोच जर लोकांच्या मनांत कधींच आला नसेल तर त्याचा व्यंजक शब्द भाषेंत कधीं असणार नाहीं, हें उघडच आहे. असो; तसेंच दुसरें प्रत्यंतर हें पाहा कीं, आमच्या प्राचीन हिंदु लोकांत अनेक शास्त्रें व विद्या उदयास आल्या होत्या, व यास्तव ग्रीक रोमन वगैरे जुन्या राष्ट्रांतून जे जे प्रकार आढळतात ते सर्व आमच्या देशांत होते, पण नव्हते असे दोन मात्र एक इतिहास आणि दुसरें वक्तृत्व. दुसऱ्याच्या अभावाची उपपत्ति प्रस्तुत प्रतिपादनावरून सहजच होईल. ती अर्थात् अशी कीं, आमच्या देशांत राज्यांचा प्रकार काय तो साम्राज्याचाच होता; म्हणजे सगळी सत्ता एका राज्याच्या हातीं असून सर्व प्रजा त्याची केवळ अंकित; अशीच राज्यरीति अगदीं प्राचीन काळापासून तों आज-पर्यंत सारखी चालत आली आहे. यास्तव वक्तृत्वाची उत्पत्ति येथें कधीं झाली नाहीं ती ठीकच. मुसलमानांचा इतिहास जर पाहिला तर त्यावरून प्रकृत सिद्धांतास फारच मोठी दृढता येते. पाहा कीं, महंमदाच्या अनुयायांनीं अरबस्थान, इराण, हिंदुस्थान, चीन असे पूर्वेकडील देश व पश्चिमेकडे मिसर देश, आफ्रिकेचा उत्तर किनारा, स्पेन फ्रान्स, व हल्ली ज्यास तुर्कस्थान म्हणतात ते दोन देश एवढा पृथ्वीचा अफाट विस्तार व्यापून इतकीं निरनिराळीं राज्यें स्थापिलीं असतां व त्यांतून विशेष काय कीं ग्रीक व रोमन लोकांच्या सगळ्या विद्या त्यांनीं आपल्याशा करून टाकल्या असतां; लोकसत्तात्मक राज्याची कल्पनाहि त्यांच्या मनांत कधीं आली नाहीं. आणि ग्रीक लोकांचे वैद्यकावरील, ज्योतिषावरील अध्यात्म-विद्येवरील वगैरे सर्व ग्रंथ जरी त्यांनीं आपल्या भाषेंत उतरवून त्यांचा मोठ्या हौसेनें अभ्यास केला; तरी त्या भाषेंतील वक्तृत्वाचे जे अत्युत्तम

ग्रंथ ते मात्र त्यांच्या राज्यरीतीस अगदींच विरुद्ध असल्यामुळें त्यांस विशेष प्रिय झाले नाहींत असें दिसतें. कारण ते प्रिय होऊन त्यांतील मतें जर त्यांच्या मनांवर ठसतीं, तर ग्रीक व रोमन लोकांच्या सारखें एखादें तरी लोकसत्तात्मक राज्य त्यांच्या एवढ्या अफाट मुलुखांत कोठें तरी स्थापित झालें असतें. असो. पण वरील लोकसत्तात्मक राज्याची कल्पना इकडील पूर्वदेशीय लोकांच्या मनांस किती अत्यंत अपरिचित आहे याची उत्कृष्ट प्रचीति आम्हांस आमच्या घरचीच आहे. हल्लीं आमच्या देशांत इतक्या हजारों सभा दरवर्षी उपस्थित होतात व लवकरच लयासहि पावतात. याचें मुख्य कारण पाहूं गेलें असतां ही सभांची पद्धत केवळ अन्य देशीय असल्यामुळें तीचें त्रीं इकडील लोकप्रचारांत रुजण्यास अजून पुष्कळ काळ पाहिजे हें होय असें आम्हांस वाटतें. आज हजारों वर्षें लोकप्रवृत्तीचा जो ओघ चालत आला आहे त्यास एकाएकींच नवें वळण देऊं लागलें असतां कसें चालेल? असो; तेव्हां वरील उल्लेखावरून एकंदर सिद्ध काय होतें कीं, लोकसत्तात्मक राज्याची कल्पना आशियाकडील लोकांस बिलकूल माहीत नव्हती. म्हणून संस्कृत, फारसी, अरबी, वगैरे भाषांतून ग्रीक लॅटिन् भाषांप्रमाणें वक्तृत्वाचे ग्रंथ मुळींच नाहींत यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

वरील प्रतिपादनाचा रोख आमच्या वाचकांच्या सहज लक्षांत आलाच असेल कीं, वक्तृत्वशक्तीचा उदय होण्यास देशांतील राज्यरीति एका विशेष प्रकारची असायास लागते. हा विशेष प्रकार लोकसत्तात्मक राज्य होय. आतां हाच प्रकार मात्र वक्तृत्वाच्या उत्पत्तीस व अभिवृद्धीस कां कारण व्हावा, व इतरांत वरील दोन गोष्टी कां होऊं नयेत, याचें कारण जर कोणी विचारील तर तें सांगण्यास फार कठीण आहे असें नाहीं. पाहा कीं मनुष्याचा काय अगर राष्ट्राचा काय, कोणाचे अंगभूत गुण प्रगट होण्यास कांहीं विशेष प्रसंगच यावा लागतो तो जर आला नाहीं तर तो कधींहि दृष्टोत्पत्तीस यावयाचा नाहीं. तर याप्रमाणें कोण्या मनुष्याच्या ठायीं वक्तृत्वशक्ति कितीहि उत्कृष्ट असली तरी जोंपर्यंत तिचा विकास होण्यास हवा तसा अवकाश मिळाला नाहीं, तोंपर्यंत ती त्यांची त्याजपाशींच त्यास स्वतःसहि न कळतां राहील हें उघड आहे. तर यावरून सहजच दिसून येईल कीं, लोकसत्तात्मक राज्य असून समाजाच्या किंवा सभेच्या बहुमतानें जेव्हां

राज्यकारभार नेहमीं चालत असतो, तेव्हां बुद्धिमान पुरुषांस अशा समाजांचें किंवा सभांचें एकचित्त करून आपल्यासारखा एखादा सल्ला करून घेणें असतां त्यांस वक्तृत्वासारखें जबरदस्त हत्यार कोणतेंहि सांपडणार नाहीं, तें त्याजपाशीं पुरें असेल त्याच्या मग सर्व लोक मुठींत आले असें समजायाचें. तो म्हणेल ती पूर्व दिशा होऊन सगळ्या संस्थानांवर त्यांचाच अंमल चालू आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. असो; तर याप्रमाणें सर्व राज्यप्रकारांत लोकसत्तात्मक राज्य हेंच वक्तृत्वशक्तीच्या उदयास अनुकूल होय. कारण बाकी कोणत्याहि प्रकारांत बहुजनांच्या मनावर राज्यकारभार चालत नसल्यामुळें बहुजनांचें मन आपल्या मताकडे वळविण्याची कला जें वक्तृत्व त्याची गरजच पडत नाहीं आणि याप्रमाणें वरील कलेचें मूळच खुंटल्यामुळें तिचा विस्तार होण्याचा संभवच नाहीं हें उघड आहे.

वरील दोन कलमांत वक्तृत्वशक्तीचा उदय होण्यास कोणत्या प्रकारची स्थिति असावी लागते याविषयीं सामान्यतः लिहिलें. आतां वरील नियमाचीं कांहीं इतिहासप्रसिद्ध उदाहरणें दाखल करतों. यावरून वरच्या नियमाचा खरेपणा आमच्या वाचकांच्या चांगला लक्षांत येईल.

पहिलें मोठें उदाहरण ग्रीस देश. या देशाचा इतिहास ज्यानें वाचला नाहीं त्यानें मानवी बुद्धीचे अद्भुत चमत्कार मुळींच पाहिले नाहींत असें म्हटलें पाहिजे. हा देश पृथ्वीच्या साऱ्या खंडांत अगदीं लहान जें युरोपखंड त्याच्या नकाशांतहि पाहिला असतां पुरतां टीचभरहि भरणार नाहीं, पण एवढासा चिमुकला देश असतांहि 'मूर्त लहान पण कीर्त मोठी' ह्या आपल्या भाषेंतील म्हणीप्रमाणें याच्या कीर्तीचा दुदुंभि आजपर्यंत साऱ्या जगभर वाजत आहे व तसाच तो जलप्रलयावधि वाजत राहील! याच्याहून शंभरपट, हजारपट मोठमोठाले असे दुसरे कित्येक देश आहेत व कित्येकांत देवाच्या पैगंबरांनीं आकाशांतून उतरून त्याच्या प्रियत्वाबद्दल लोकांस आश्वासन दिलें आहे; पण वरील देश आकारमानानें येवढा लहान असतां व देशाचा लाडका नसतांहि त्यानें केवळ स्वतःच्या बुद्धीबळावर जें आपलें नांव गाजविलें आहे त्याची सर आजपर्यंत कोणत्याहि अन्य देशास आली नाहीं व पुढेंहि येईलशीं वाटत नाहीं! असो; या देशाविषयीं प्रस्तुत विषयाच्या संबंधानें हेंच सांगावयाचें आहे कीं वक्तृत्वाचा यांतच पहिल्यानें

# २१. आमच्या देशाचे आक्षेपक

लोकहितवादी प्रभृति जे आमच्या देशाचे आक्षेपक आहेत त्यांच्या लेखांतून व भाषणांतून आढळणारा पहिला मोठा मुद्दा पाहिला तर हा आढळेल कीं, आम्ही आपलें प्राचीन वैभव आपल्या मूर्खपणानें घालवून आतां व्यर्थ हांका मारीत बसलों आहों, व इतकी निकृष्ट स्थिति प्राप्त होऊन साऱ्या जगांत केवळ नादान ठरलों असतां व परकीय लोकांच्या लाथा खात असतां निलाजऱ्यासारखें अद्यापि सुस्त होऊन पडलों आहों. मेकॉले प्रभृति स्वदेश महिमा गाणारे ग्रंथकार, सद्धर्माच्या आवेशानें बरळणारे मिशनरी व बाटे मंडळ, उसनी धर्मस्फूर्ति आणून नव्या धर्माच्या खटपटीस लागलेली ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज, सत्यशोधकसमाज यांतील भक्तमंडळी, 'घाशीराम कोतवाल'कारप्रभृति चार दिवस घाशीरामी चालवून घेतलेले अर्वाच्य पंडित या साऱ्या मंडळींची, आमच्या देशाच्या संबंधाची एक मोठी समजूतही आहे कीं, आमचा देश केवळ आसन्नमरण झाला आहे, आमच्यांत कोणत्याच प्रकारचा कांहींच वकूब म्हणून राहिला नाहीं,ही परमशोचनीय स्थिति आम्ही आपल्या मूर्खपणाच्या योगानें आपणांस आणली, आणि हींतून निघण्याचे उपाय म्हटले म्हणजे वरील तत्त्वमंडळी आमच्यावर मेहेरबानी करून आम्हांवर आपआपल्या मात्रांचे प्रयोग काय करील तेवढेंच काय तें! या प्रयोगांखेरीज सध्यां आमची बिलकुल धडगत नाहीं. आमचे रावबहादुर तर आज चाळीस वर्षें आमच्या कानीं कपाळीं ओरडताहेत कीं, तुमची ऋषींच्या कारकीर्दींत मात्र बरी स्थिति होती, तेव्हांपासून आज दोन हजार वर्षें तुम्हीं सारखें खालीं जात आहां. भर्तृहरीनें जसें म्हटलें आहे कीं,

अधोधो गंगेयं पदमुपगतास्तोकमधुना ।
विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः ॥

"गंगा ही शंकराच्या मस्तकापासून जी भ्रष्ट झाली ती जातां जातां शेवटीं अगदीं भूमितलापर्यंत जाऊन पोहोंचली; तर याप्रमाणेंच ज्यांचा विवेक सुटला त्यांची शेंकडों प्रकारांनीं विटंबना होते." त्याप्रमाणेंच दोन हजार वर्षांपूर्वींचे

इंद्रवरुणादि देव, गवांलभ नियोग वगैरे आचार, गुरुगृहीं बारा बारा चोवीस चोवीस वर्षें वास इत्यादि गोष्टी चट साऱ्या सुटून जाऊन पुराणांचा शिमगा जेव्हांपासून सुरू झाला व भटांच्या घृतकुल्या व मधुकुल्या देशांत प्रवृत्त झाल्या, तेव्हांपासून वरील कुल्यांच्या प्रचंड प्रवाहाच्या वाटें येथील संपत्ति, येथील पराक्रम, येथील विद्या, येथील कौशल्य, येथील चट सारें पार वाहून गेलें! भटांच्या पायीं या देशाची गेल्या दोन हजार वर्षांत अशी दशा होऊन गेली कीं, आम्हांस हवे त्यानें खुशाल तुडवावें, आमचें भरलें घर लुटावें, आम्हांस गुलाम करावें, तरी आपल्या नीच अवस्थेबद्दल आम्हांस कांहीं वाटूं नये. असें होतां होतां शेवटीं आमच्या डोळ्यांत दारिद्र्यांजन घालून आम्हांस शुद्धीवर आणण्याकरतां आकाशांतील प्रभूनें दयाळू होऊन साऱ्या पृथ्वींतले शहाणे लोक आम्हांवर अंमल करण्याकरतां पाठवले म्हणून बरें झालें नाहीं पेक्षां आमची आजला काय अवस्था होऊन जाती कोण जाणें!

आतां सर्वांनीं गृहीत धरलेला हा जो पहिला मोठा मुद्दा हा कितपत खरा आहे, याविषयीं प्रथमतः विचार केला पाहिजे. हा विचार दोन प्रकारांनीं करायचा, एक आमच्या देशाची खरोखरच अत्यंत निकृष्टतेची स्थिति आहे कीं काय? आणि दुसरें, ती तशी असल्यास तीस आमचें मौर्ख्य कितपत कारणभूत आहे?

आतां वरील दोन प्रश्नापैकीं पहिल्याचें उत्तर तर सर्वांपाशीं सिद्धच आहे, कीं हा देश अगदीं खराबीला येऊन पोहोंचला आहे. लोकांस अठरा विश्वे दारिद्र्यानें गांठलें असून खाण्याचीसुद्धां दिवसेंदिवस भ्रांत होऊं लागली आहे; कोणत्या व्यापारांत म्हणून तेजी राहिली नाहीं; घरींदारीं विलायत भरली आहे. सरकारी देण्यानें तर लोकांस अगदीं टेकीला आणून वरचेवर नव्या बाबी निघतच आहेत; लोकांतला वकूब पाहिला तर कोणाच्या अंगीं हिंमत नाहीं, जो तो आपल्या पुरतें पहाणारा, दुसऱ्याचें पागोटें माझ्या हातीं कसें येईल; वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे चुगली करून दुसऱ्यांस पेंचांत कसा आणीन, पुढें पुढें शेपूट हलवून व बुटाचे पवित्र प्रहार सोसून खुशामत कशीं करीन, या विचारांत बहुतेक मंडळी मग्न;

शिपाईगिरी लोकांत किती राहिली आहे म्हणाल तर शस्त्रास्त्रांचीं चित्रें पुस्तकांतून पहावीं व त्यांचे प्रयोग इतिहासांत वाचावे. नुसत्या शरीर-सामर्थ्याकडे पाहावें, तर दर पिढीला आंत आंत पाय येत असून लवकरच हरभऱ्याच्या झाडाला शिडी लावण्याची पाळी येते कीं काय कोण जाणें असें वाटतें! जुन्या विद्या, जुन्या कला, या तर नाहींशा होत चालल्या आहेत; त्यांच्या जागीं नव्या येत चालल्या आहेत म्हणावें तर तेंही नाहीं. याखेरीज दुष्काळ, महामारी वगैरे हळूं हळूं येथें निरंतरचें बिऱ्हाड करूं पहात आहेत असेंहि दिसतें! एकंदरींत हल्लींच्या काळाला या देशाची स्थिति मोठी भयंकर झाली आहे. यांत बिलकुल संशय नाहीं.

तेव्हां वरील रीतीनें पाहतां आमच्या देशाच्या आक्षेपकांचें म्हणणें सर्वथैव खरें आहे हें कोणीहि कबूल करील. पण निकृष्ट स्थितीचीं दोन स्वरूपें असतात; एक शाश्वत अथवा नित्य व दुसरें आगंतुक अथवा नैमित्तिक. जसा झाडाच्या मुळाला अपाय झाला किंवा मनुष्यास क्षयाची भावना झाली म्हणजे त्याची वाट खुंटून ती दुसऱ्या पंथाला लागली असें समजायचें. त्याप्रमाणेंच फार दिवस परकी अंमलांत राहिल्यानें किंवा त्याची स्वतःची व्यवस्था सुटल्यानें जें अगदीं निःसत्त्व होऊन गेलें त्या राष्ट्राची स्थिति होय. अशा अवस्थेस शाश्वत निकृष्टावस्था म्हणतां येईल. अशा स्थितींत राष्ट्र फार दिवस राहणें म्हणजे मुष्कीलच हें सांगणें नको. दुसरी आगंतुक अथवा नैमित्तिक निकृष्टावस्था म्हणजे कांहीं अपूर्व अनर्थपात होऊन त्यांच्या योगानें जेव्हां राष्ट्र क्षीण होऊन जातें; पण त्याच्या अंगचा जोम कायम असल्यामुळें कालेंकरून त्याची स्थिति पुनः सुधारते किंवा पहिल्याहून त्यांची अधिक भरभराटहि होते. या दोन्हीहि स्थितींचीं उदाहरणें अनेक आहेत. मिसर, इराण वगैरे देशांचें वैभव नष्ट झाल्यास आज हजारों वर्षें झालीं व आजला तर त्यांचा फारसा मागमूसहि उरला नाहीं म्हटलें असतां चालेल. ग्रीस देश हा प्राचीन काळीं अत्यंत उत्कर्षाच्या स्थितीस येऊन पोंचला असतां आणि सर्व विद्या व सर्व कला जशा काय तेथें अवतीर्ण होऊन राहिल्या असतां, हल्लीं त्या देशाची स्थिति पाहिली तर पन्नास वर्षांपूर्वी तर तो मुसलमानांच्याच ताब्यांत होता, आणि हल्लीं जरी स्वतंत्र स्थितींत आहे तरी पूर्वीच्या वैभवाची

आज तेथें छायाहि दृष्टिगोचर होत नाहीं. युरोपच्या संस्थानांतील अत्यंत निकृष्ट स्थितींतलें संस्थान ग्रीस हें होय. यासारखींच पुष्कळ अंशीं इटाली देशाचीहि स्थिति होय. जे लोक पूर्वी साऱ्या जगास अजिंक्य होऊन राहिले होते, व ग्रीक लोकांची विद्या ज्यांनीं संपादन करून वृद्धिंगत् केली होती, त्या लोकांची आज प्रसिद्धी म्हटली म्हणजे मिजास, छानछुक, नीतिभ्रष्टता, या गुणांनींच फार करून आहे. शेजारच्या राष्ट्रांनीं त्यांस यापूर्वी अनेक वेळां पादाक्रांत करून टाकलें आहे. व हल्लीं एकंदर युरोपियन राष्ट्रांत सदरील देशाची गणना सामान्य प्रतींतच आहे. तेव्हां मिसर, इराण, ग्रीस, रोम हीं उदाहरणें वर सांगितलेल्या पहिल्या स्थितीचीं होत. दुसऱ्या स्थितीचीं उदाहरणें म्हटलीं म्हणजे केनीच्या लढाईनंतर रोमची जी अवस्था झाली, पानपतच्या दारुण संग्रामानंतर ब्राह्मण बादशाहीचा जो अपकर्ष झाला, किंवा शिवाजीच्या मरणोत्तर त्याच्या विजवत्या लेकानें जें लवकरच चोहोंकडे वाटोळें करून टाकलें, हीं सर्व होत. या सर्व महाप्रसंगीं वरील राष्ट्रांची स्थिति खग्रास झालेल्या चंद्राप्रमाणें झाली होती. पूर्णग्रस्त चंद्र जसा सर्वथा निष्प्रभ होत्साता दीन दिसूं लागतो, किंवा सूर्य तर पूर्णग्रास समयीं आकाशांतून अगदीं नाहीसा झाल्यासारखा होतो, त्याचप्रमाणें केनीच्या लढाईनंतर कांहीं दिवस रोमची सत्ता त्या शहराच्या तटापर्यंतच काय ती होती. पानपतच्या रणमुखांत जी पूर्णाहुति पडली, तिच्या योगानें खुद्द पेशव्यांची तर कंबरच खचून तो मरणाच्या दारीं बसला; व एकंदर राज्यावरहि अत्यंत ग्लानि आली, आणि तिसऱ्या उदाहरणांत तर मराठ्यांची राजधानी व राजकुल त्यांच्या चिरंतर वैऱ्यांच्या कबजांत सांपडून संपूर्ण राज्यवृक्ष उपळून पडण्यासारखाच झाला होता! तरी असल्या भयंकर विपत्तींतहि वरील तीन संस्थानें डगमगलीं नाहींत; कारण त्यांचा बाह्यतः जरी अगदीं विध्वंस झाला, तरी त्यांचा आंतला जोम जसाचा तसा कायम होता.

आतां सध्यां हिंदुस्थानची जी निकृष्ट स्थिति आहे, ती वरच्यांपैकीं कोणती आहे याचा विचार करणें अवश्य आहे. या विषयावर एकंदरींत पाहतां कोणाचाहि मतभेद नाहींच म्हटलें असता चालेल. राजा राममोहन

रायापासून तों ज्योतीबापर्यंत व एडन्वासी दरोडेखोरापासून तों परवां निवर्तलेल्या जोशीबुवांपर्यंत आज शेंकडों लोकांचे जे अनेक प्रकारांनीं उद्योग चालू झाले व पुढें चालू आहेत त्या सर्वांवरून अर्थात् हें अनुमान निघतें कीं, ही आर्यभूमि आज अनेक कारणांनीं जरी विपन्न स्थितीस येऊन पोंचली आहे तरी प्रयत्नांनीं तिचा उत्कर्ष होण्याचा अद्याप संभव आहे.

आजपर्यंत आमच्या राज्यकर्त्यांनीं आम्हांस अज्ञानदशेंतून काढण्याचे पुष्कळ प्रयत्न केले, व अद्यापहि ते प्रयत्न चालूच आहेत; तसेंच वरील प्रयत्नांस यशहि पुष्कळ आलें यांत संशय नाहीं. ही जी पाश्चात्यांच्या प्रयत्नांची येथें सफलता झाली हिजविषयींच नुसता विचार केला असतां आमच्या राष्ट्राची अंतर्गत स्थिति कशी आहे हें कोणाच्याहि लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. जसा एकादा नदीप्रवाह लव्हाळ्यांनीं चहूं-कडून आच्छादून टाकला असल्यामुळें दृष्टिगोचर होत नसतो व तो आटून गेला कीं काय असा भास होतो, किंवा एकादा जबरदस्त घाव घातल्यानें चांगला सशक्त मनुष्यहि जसा कांहीं वेळ निश्चेष्ट होऊन पडतो, तशी वस्तुतः पाहतां आज आमच्या देशाची स्थिति झाली आहे. पूर्वीं कधींहि पडली नव्हती अशी परकी अंमलाची मगरमिठी त्यावर एकाएकीं येऊन पडली त्यामुळें त्याची हालचाल अगदीं बंद झाल्यासारखी बाह्यतः दिसते खरी; व इतक्या दिवसांच्या निश्चेष्टतेनें त्याच्यावर पुष्कळ ग्लानि आली आहे हेंहि खरें; तरी एकंदरींत पाहतां आंतल्या शरीरप्रकृतीस कांहीं धक्का पोंचला आहे असें आम्हांस वाटत नाहीं.

वरील मत पुष्कळांस विलक्षण वाटण्यासारखें आहे, व आजपर्यंत आमच्या देशाच्या संबंधानें जे जे म्हणून विचार बाहेर पडले आहेत त्या सर्वांस तें विरुद्धच आहे म्हटलें असतां चालेल. आमचा धर्म बिघडला आहे, आमची नीति सुटली आहे, आमचे मूळचे चांगले आचारविचार जाऊन वेडगळ रीतिभाति आम्हांस लाभल्या आहेत. इत्यादि विषयांचें प्रतिपादन कोणी ऐकलें नाहीं ! लोकहितवादींच्या ग्रंथांतून तर प्रायः याच तत्त्वांचें विवेचन आढळतें, मग हीं सर्व मतें एकीकडे ठेवून या आमच्या

देशाच्या प्रकृतीचें मान यथास्थित आहे; व त्याच्या रक्तशुद्धीबद्दल विशेष आयास करण्याची जरूर नाहीं, हें मत किती धाष्टर्याचें वाटणारें आहे हें सांगणें नको ! यास्तव त्यावर सविस्तर विवेचन करणें जरूर आहे.

एखाद्या मनुष्याची शरीरप्रकृती दुरुस्त किंवा नादुरुस्त आहे याची परीक्षा जशी त्याच्या नाडीवरून करतां येते; त्याचप्रमाणें देशाची स्थिति ठाम करण्याचें अमुकच एक साधन आहे असें जरी नाहीं तरी सामान्यतः कित्येक गोष्टींवरून वरील निर्णय होण्यासारखा असतो. या गोष्टी शिपाई-गिरी, बुद्धिमत्त्व, कलाकौशल्य इत्यादि होत. आतां हे गुण आमच्या देशांत अद्याप कायम आहेत हें म्हणणें पुष्कळांस केवळ हटवादीपणाचें वाटेल, पण जो वस्तुतः शोध करील त्यास वरील उल्लेख केवळ तसा वाटणार नाहीं. तेव्हां एकंदरींत वरील मत, कीं एतद्देशीयांवर परकी लोकांचें वर्चस्व झालें आहे यास्तव ते पराक्रमहीन होत, हें अगदीं असमंजस होय. याशिवाय प्रत्यक्ष प्रमाण पाहिजे असल्यास या देशांतील काळी फौज हें एक आहेच. शिवाय हेंहि कोणास सांगावयास नकोच, कीं पूर्वीपासून शिपाईगिरीविषयीं प्रख्यात असे जे रजपूत, पुरभय्ये वगैरे लोक यांच्या अंगचें पाणी हल्लींच्या चिरकालिक स्वस्थतेनेंहि कमी झालें आहे असें नाहीं; इतकेंच कीं तें प्रगट होण्यास हल्लीं बिलकूल जागाच नाहीं !

हें वर सांगितल्यापैकीं एका गुणाविषयीं झालें. आतां दुसरा गुण बुद्धिमत्त्व. या गुणाविषयीं आमच्या देशाची पहिल्यापासून प्रख्याति आहे. युरोपांतील अत्यंत प्राचीन राष्ट्रें जेव्हां उदयालाहि आलीं नव्हतीं तेव्हां-पासून या आर्यभूमींतील लोकांच्या बुद्धीचा जो विकास झालेला आहे तो हल्लींच्या अपकर्षाच्या स्थितींतहि लयास गेला आहे, असें म्हणवत नाहीं. पंचनद देशांत जेव्हां आर्यांची प्रथमतः वसाहत झाली, तेव्हां जी त्यांच्या बुद्धीची प्रखरता होती, ती आज हजारों वर्षें लोटून गेलीं असतां अद्याप जशीची तशीच कायम आहे असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.

तेव्हां एकंदरींत पाहतां आमच्या बुद्धीचा असा पक्का निश्चय आहे कीं, आमचे पूर्वींचे सर्व गुण आमच्या ठिकाणीं अद्याप कायम आहेत. इतकेंच कीं भस्माच्छादित अग्नीप्रमाणें किंवा गंजलेल्या तरवारीप्रमाणें त्यांची हल्ली

स्थिति झाली आहे. त्यांस प्रगट होण्यास हल्लींच्या मन्वंतरांत जर कोठें अवकाश असता तर ते कधीं असें अगोचर राहते ना.

तेव्हां एकंदरींत काय, कीं कालाची गति अत्यंत विचित्र आहे; यास्तव ती न जाणतां हव्या तशा वल्गना करणें हें अप्रयोजकपणाचें लक्षण होय. त्यांतूनहि पाश्चात्य ग्रंथकारांनीं गर्वोक्ति प्रगट केल्या तर त्यांत मोठेंसें नवल नाहीं; कां कीं स्वदेशाच्या संबंधानें कोणी खोटाहि अभिमान वाहिला असतां तो तादृश दूषणार्ह होणार नाहीं, पण आमच्या देशांतल्याच पंडितांनीं आपला एकंदर इतिहास गुंडाळून ठेवून, आपली स्वतःची कुळकथा विसरून जाऊन, व डोळ्यांसमक्ष घडलेल्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून आपल्या जन्मभूमीच्या संबंधानें सदोदित कृशानूचें व्रत धारण करावें; व आम्ही मूर्ख, आम्ही नामर्द, आम्ही कोडगे अशी सतत हातांत जपमाळ घ्यावी, या बहादूरीस काय म्हणावें हें बरीक आम्हांस समजत नाहीं!!

● ● ●

# २२. शास्त्रीबुवांचें आत्मकथन

आमच्या पुस्तकांचा पहिला मोठा विशेष हा आहे कीं त्यांतील सारा मजकूर आम्हांस स्वतःचा नवा बनवावा लागतो. ' वेदार्थयत्न, ' षड्दर्शन-चिंतानिका ' माजी झालेला ' कौमुदीमहोत्सव ' हीं जशीं व्याख्यात्मक मासिक पुस्तकें आहेत; ' नाट्यकथार्णव ' हें जसें प्रायः भाषांतररूप आहे; ' काव्येतिहाससंग्रह ' हें तर केवळ प्रकाशनरूपच आहे; तसा प्रकार 'निबंधमाले'चा नाहीं.वर सांगितलेला हा मासिक पुस्तकांचा एक वर्ग झाला. आतां दुसरा पाहा; या दुसऱ्यांत सध्यां चालू असणारें ' विविधज्ञानविस्तार' व यापूर्वी बुडालेली ' ज्ञानप्रसारक ' ' ज्ञानसंग्रह ' वगैरे यांचा अंतर्भाव होतो. या पुस्तकांतून जरी विषयबाहुल्य आढळतें, तरी त्यांत व आमच्या पुस्तकांत वर सांगितलेला मोठा विशेष कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखा आहेच. तो अर्थात् हा कीं, वरील पुस्तकांतील बरींच प्रकरणें भाषांतरद्वारां उपलब्ध झालेलीं होत. तर आमच्या पुस्तकाच्यातर्फेनें वरील विशेष अंमळ ध्यानांत आणला असतां आमचें घड्याळ अगदीं तोफेबरोबर कधींच चाललें नाहीं याचें आश्चर्य वाटण्यास कोणासहि जागा रहाणार नाहीं.

आमच्या पुस्तकाचा दुसरा मोठा विशेष हा होय कीं,त्यांत लौकिक विषयां-वर कधींहि विवरण असत नाहीं. जगांत घडणाऱ्या घडामोडींविषयीं किंवा सामान्यतः आढळणाऱ्या लोकस्थितीविषयीं निबंधरचना करणें झाल्यास तें काम सुलभतेचें आहे हें उघड आहे. कां कीं झालेल्या गोष्टीची हकीकत लिहिणें किंवा लोकांत साधारणतः ज्या विषयावर सहस्रशः ऊहापोह झालेला ऐकण्यांत किंवा वाचण्यांत येतो त्यावर निरूपण करणें हें काम मोठ्याशा श्रमाचें आहे असें नाहीं. पण आमच्या पुस्तकांतील विषय व त्यांच्या निरूपणाचा प्रकार हीं दोन्ही वेगळीं. आमचे विषय प्रायः सर्व ग्रांथिक असून त्यांचें निरूपणहि ग्रंथकारांच्या पद्धतीस अनुसरूनच केलेलें असतें. म्हणजे कोणताहि विषय घेतला तरी त्याचें प्रथमतः स्वरूपवर्णन, नंतर त्याचे विभाग, मग एकेकावर क्रमशः निरूपण, शेवटीं उपसंहार, असा प्रकार असतो. शिवाय जागोजाग विषयाच्या विशदीकरणार्थ भरपूर टीपाहि

असतात. तेव्हां ही पद्धति अंमळ लक्षांत घेतली असतां इकडूनहि आमची तरफदारी थोडी होणारी आहे असें नाहीं. जे अशी अपेक्षा करतात कीं, वर्तमानपत्र जसें सकाळचें असलें तर सकाळीं, संध्याकाळचें असलें तर संध्याकाळीं, असें अगदीं ज्यावेळच्या त्या वेळेवर निघत असतें, त्याप्रमाणेंच मासिक पुस्तकानेंहि पहिली तारीख चुकूं देतां कामा नये. त्या विचाऱ्यांस मासिक पुस्तकांची योग्यता व स्वरूप हीं दोन्ही कळत नाहींत असें म्हटलें पाहिजे, 'निबंधमाला' व 'विविधज्ञानविस्तार' हीं मासिक पुस्तकें आणि 'प्रेक्षक' व 'विनोद' हीं वर्तमानपत्रें जो सारख्याच दरानें लेखील तो अंधेरनगरीचें राज्य करण्यासच योग्य म्हटला पाहिजे! विचारीं 'प्रेक्षके' इतक्यांतच किती बरें 'साखरागुंठित' होऊन बसलीं असतील? त्याप्रमाणेंच 'इनोदा'चेहि किती गठ्ठे आताराच्या कामीं पडून आपल्या प्रकाशकाची कीर्ति जगांत उधळतील हें कोण सांगेल? वर्तमानपत्रांचा आयुर्दार्य म्हटला म्हणजे सरासरी तो दिवस किंवा पराकाष्ठा म्हटली म्हणजे तो आठवडा; खुद्द 'टाईम्स' हि बाळंतिणीच्या खोलीच्या खिडकीला डकवलेला किंवा हिंगाजिऱ्याशीं सामील झालेला कोणी पाहिला नसेल? तर ज्या वर्तमानपत्राचें असें क्षणिक आयुष्य तीं कोणीकडे, आणि कधींकाळीं 'स्वकपोलकल्पित' शब्दांची योजना केली तिच्याबद्दल आज पृष्ठांचीं पृष्ठें वाद माजावा इतकी ज्यांतील लेखांची लिहिणारावर जोखीम राहते तीं मासिक पुस्तकें कोणीकडे? याप्रमाणेंच भाषापद्धतीचा वगैरेहि विचार करण्यासारखा आहे. मासिक पुस्तकांतून लेख प्रसिद्ध करायाचा तर तो लवकरच गत्राळांत दाखल होण्यासारखा नसल्यानें त्यांत शब्दांची मांडणी, वाक्यांची जुळणी, विषयाची टाकाटिकी वगैरे गोष्टीकडे किती लक्ष पुरवणें अवश्य असतें हेंहि कोणाहि समंजस मनुष्याच्या लक्षांत तेव्हांच येऊन चुकणारें आहे. सारांश, प्रस्तुत प्रसंगाच्या संबंधानें 'इसापनीतीं'तील 'कोल्ही व सिंहीण,' हीं मार्मिक गोष्ट आमच्या वाचकांनीं लक्षांत आणावी.

आतां आमच्या आक्षेपकांपैकीं कोणी कदाचित् म्हणतील कीं वरील मजकूर सर्व खरा आहे, पण विलायतेंतील मासिक पुस्तकें व त्रैमासिक पुस्तकें वेळच्या वेळेवर निघतात कीं नाहींत? मग त्याप्रमाणेंच एतद्देशीय पुस्तककारांनींहि कां व्यवस्था ठेवूं नये? या प्रश्नाचें उत्तर थोडक्यांत आहे. तें

हेंच कीं, आमचें हिंदुस्थान विलायत बनण्यास अद्याप बराच अवकाश आहे; तर तोंपर्यंत दम खाऊन मग वरील चुणचुणीत आक्षेप काढणारांनीं काढावे. जी इंग्रेजी भाषा आज कित्येक शतकें सहस्रावधी महान् महान् ग्रंथकारांनीं परिश्रम करून अतिशयित कमावून टाकली आहे, व जींत आतां हवा तो विचार, हवी ती कल्पना, हव्या तितक्या तऱ्हांनीं अनायासें व्यक्त करतां येते, त्या भाषेची गोष्ट कोणीकडे, आणि जी भाषा आजपर्यंत अडाणी लोकांची म्हणून जुन्या व नव्या पंडितांच्या अवहेलनेस पात्र झाली होती व जी ग्रंथकारांच्या उपयोगीं पडूं लागून कोठें वीस पंचवीस वर्षें झालीं न झालीं ती कोणीकडे? त्यांतून अलीकडील विद्वज्जनांची स्वभाषेवर भक्ति किती आहे म्हणाल, तर हींत मोठमोठे विचार व्यक्त करण्याचें मुळींच सामर्थ्य नाहीं, व ही गांवढळ लोकांच्याच उपयोगी, हेंच तिच्याविषयीं नुकतें नुकतें बहुमत ठरल्यासारखेंच होतें! तेव्हां नुसत्या भाषेच्याच संबंधानें विचार केला, तर सध्यांच्या इंग्रेजी व मराठी भाषेंत तफावत म्हटली म्हणजे आगगाडीच्या लोखंडी सडकेंत व डोंगराळ प्रदेशांतील चेचाड वाटेंत जितकी आढळेल तितकी होय. ग्रंथरचनेचें बाह्य स्वरूप जी भाषा तिची नुसती ही गोष्ट झाली. आतां अंतःस्वरूप जे विचार त्यांच्या संबंधानें पाहिलें असतां इकडूनहि इंग्लंड व हिंदुस्थान यांत थोडा फरक आहे असें नाहीं. तिकडे अगोदर पूर्वींचा जमलेला ग्रंथसंग्रह किती आहे याचा कोणी कधीं विचार केला आहे? तसें इकडे अद्याप काय आहे? नुसती ग्रंथरचनेचीं साधनेंच तिकडे किती आहेत बरें? कितीक प्रकारचे कोश, कितीक तऱ्हेचीं माहितीचीं पुस्तकें, पुस्तकालयें किती, सभा किती, पुस्तकांची किंमत किती स्वल्प! वरील सर्व गोष्टींचें इकडे आजच्या घटकेला तर सर्व प्रकारचें वैगुण्यच आहे.

तर याप्रमाणें प्रस्तुत पुस्तकाच्या अनियमितपणाच्या संबंधानें जें आमच्या वाचकांस कळवणें उचित होय तें कळवलें. तेव्हां प्रस्तुत प्रकरणीं आमचा एकंदर अभिप्राय असा आहे कीं, आमच्याकडून होईल तितकी जलदी आम्ही करीतच असतों, व पुस्तकाच्या नियमितपणापासून वाचकांस आणि विशेषतः पुस्तककारांस किती फायदा होण्यासारखा असतो हेंहि आम्ही पूर्णपणें समजतों; पण नियमितपणा

साधून जर विषयनिरूपण यथास्थितपणें होत नाहीं, किंवा एकादी टीप एकादें पुस्तक वेळेवर न मिळाल्यामुळें लिहायाची रहात आहे, तर आमच्या आक्षेपकांनीं कितीहि हाकाटी केली तरी तिजकडे आमचें बिलकुल लक्ष जाणार नाहीं.

सुदैवानें हल्लीं मागील अव्यवस्थेचीं कारणें सर्व नाहींशीं झालीं आहेत. आजपर्यंत आम्हांस भाड्याचा रथ आणून युद्धप्रसंग करण्याची जी पाळी येत असे, तीहि स्थिति जाऊन आतां आमचा स्वतःचा खासा रथ पूर्णपणें सज्ज होत आहे; व आजपर्यंत मार्गाची जी विषमता असे तीहि आतां बहुतेक वर सांगितल्याप्रमाणें नाहींशी झाल्यासारखीच आहे. तेव्हां यापुढील मार्गक्रमण सुखाचें होईल असा आजमास दिसत आहे. या उपर काय होईल तें पाहावें.

वर जें आम्ही आपल्या वाचकांस आश्वासन दिलें आहे. त्याच्या दृढीकरणार्थ कांहीं भ्रमांचा निरास करणेंहि येथें अवश्य वाटतें. हे भ्रम दोन तीन प्रकारचे आहेत. एक हा कीं, आमच्या लेखणीनें आजपर्यंत साठ सत्तर मजली मारल्या, तेव्हां साठसत्तरीच्या उमरींत जसें मनुष्य थकतें त्याप्रमाणेंच आमच्या घड्याळाचाहि कांटा आतां रेंगाळायाला लागला यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ही कल्पना वस्तुस्थितीशीं कितपत जमते आहे, याविषयीं बहुधा आमच्या कोणच्याहि समंजस वाचकांस कांहीं सांगावयास नको. नुसत्या दूरच्या दुरून ज्यांनीं कांही तरी कल्पना लढवाव्या त्यांचा हा वेडगळ तर्क दिसतो. अवघी सृष्टि व लोकव्यवहार हीं किती अपरंपार विषयांनीं भरलेलीं आहेत, इंग्रेजींत ज्ञानाचें केवढें थोरलें कोठार आहे, संस्कृतांतील व महाराष्ट्र भाषेंतील सामग्री तरी केवढी आहे, या सर्व गोष्टी जो मनांत आणील त्यांस वरील कल्पना किती कोती व मूर्खपणाची आहे हें तेव्हांच कळून येणारें आहे. आमची एकट्याचीच काय, पण आमच्याप्रमाणें सहस्रशः लेखण्या जरी आणखी चालू झाल्या, तरी शतकांचीं शतकें विषय खलास व्हावयाला नकोत असा अनंतपार सागर वर सांगितल्याप्रमाणें भरून राहिलेला आहे! या भूमंडळाला वेष्टून राहिलेला जो रत्नाकर त्यांतून आज हजारों वर्षें रत्नें काढण्याचा सपाटा चालू

असतांहि त्याचें रत्नाकरत्व जसें अद्याप अविच्छिन्नच आहे, किंवा इंद्राचें असंख्य हत्ती जरी प्रतिवर्षी त्यास शोषून साऱ्या जगाचा संताप जलासारानें दूर करतात तरी त्याच्या जलधित्वास जसा धक्का नाहीं त्याप्रमाणेंच आमच्या पूर्वजांचीं भांडारें आम्हीं कितीहि लुटलीं; व इंग्रेजांचा अर्थसंचय आटवून इकडील टांकसाळा कितीहि सुरूं केल्या, तरी वरील निधीचा कधीं तळ दिसूं लागण्याची पाळी येणार आहे ही कालत्रयींहि गोष्ट काढायाला नको ! त्यांतून महाराष्ट्रभाषा जीस कधीं नांगर शिवला नाहीं अशा नूतन भूमिकेप्रमाणें आहे. हिची नुकती कोठें मशागत व्हावयाला लागली असून पूर्वोक्त दोन महानद्यांच्या संबंधानेंहि कोठें नुकती अंतर्वेदी बनत चालली आहे. मग वरील महानद्यांच्या पाटावर आम्हीं उगाच एक लहानसा वाफा तयार करून त्यांतील फुलांची माळ आपल्या देशबंधूंस प्रतिमासीं अर्पण करीत असतां इतक्यांतच जेव्हां वरील जमीन सत्व सोडील की काय याविषयीं मंडळी साशंक व्हावयाला लागली तेव्हां तिची किती धन्य म्हणावी !

आमच्या पुस्तकाच्या संबंधानें पुष्कळांचे ठायीं दुसरा असा भ्रम दिसतो कीं, आम्हीं बहुधा महिनाभर सुस्त पडून उगीच कोठें चार दिवस लेखणीला श्रम देतों व एक अंक भरून टाकतों. वाग्देवीची आम्हांवर जर येवढी वहाल मर्जी असती तर मग आणखी काय पाहिजे होतें ! वाग्देवीची उपासना किती बिकट आहे, ती सन्मुख येऊन उभी ठाकेतोंपर्यंत किती आढेवेढे घ्यावे लागतात, आपल्या मनाजोगती ती समजणें हें अनेक प्रसंगीं किती दुरापास्त असतें, इत्यादि रहस्यांचें ज्ञान स्वानुभावाविना प्रायः अगम्यच होय. तेव्हां प्रस्तुत भ्रमाच्या निरासार्थ इतकेंच सांगतों कीं, एक टप्पा संपला कीं लागलींच आम्हांस दुसऱ्या टप्प्याला घोडीं जोडावीं लागतात, आणि याप्रमाणें आज सहा सात वर्षें क्रम चालला असतांहि कालाची मजल आमच्यापुढेंच आहे. गेल्या दशकांत कागदाला टाक लागल्याव्यतिरिक्त आमचे फारच थोडे दिवस गेले असतील !

आमच्या आक्षेपकांचा अलीकडे तिसरा असाहि मुद्दा निघत चालला आहे कीं, तुम्हीं इतकीं कामें सोसासोसानें अंगावर घेतां, मग हीं इतकीं निभणार तरी कशीं ? 'निबंधमाला' आहे, 'काव्येतिहाससंग्रह' आहे, 'चित्रशाळा' माहे, 'किताबखाना' आहे, 'न्यू इंग्लिश स्कूल' आहे, 'केसरी' आहे, 'मराठा' आहे, 'छापखाना' आहे,— हें आहे तरी काय ? इतकीं कामें कोठें बोललीं आहेत ? या आक्षेपावर काय उत्तर द्यावें, हें खरोखरच आम्हांस सुचत नाहीं. बहुकार्यव्यापृतत्व हा जर आमच्या देशबंधूंस येवढा अक्षम्य अपराध वाटत असला, तर मग आम्हीं आपल्या देशाची मोठीच आगळीक केली यांत संशय नाहीं. वरील महादोषांबद्दल प्रायश्चित्त करण्याचा आम्हांस एकच मार्ग दिसतो तो हा कीं, तज्जन्य पातक अधिकाधिक जोडीत जावें, म्हणजे पूर्वी सांचलेल्याचा ऱ्हास होत गेला तर कोण जाणें ! इतउत्तर याप्रमाणेंच प्रायश्चित्तविधि करण्याचा आमचा संकल्प आहे.

तर याप्रमाणें ही उद्योगपरंपरा आम्ही उपस्थित केली आहे. हिचें वरच्याइतकें दिग्दर्शन तूर्तच्या प्रसंगीं पुरें आहे; तिचा जसजसा विस्तार होईल तसतशी तिजविषयींची हकीकत आमच्या देशबंधूंस कळत जाईलच. यास्तव आतां सरतेशेवटीं एका गोष्टींविषयीं मात्र थोडासा उल्लेख करून वाचक मंडळींची रजा घेतों. ही गोष्ट येवढींच कीं, आम्ही हा जो नवा पसारा घातला आहे यापासून तूर्त जरी मोठासा फायदा दिसणार नाहीं तरी आजहि वरील बहुतेक उद्योग फलोन्मुख झाले आहेत, व लवकरच हे आमच्या पूर्वास्थितीचें आम्हांस स्मरणहि होऊं देणार नाहींत, अशी आम्हांस पुरती उमेद आहे. निदान सध्यांची इतकी तरी स्थिति आहे, कीं, आम्हीं मेहेरबानांच्या पायांस अंतरलों या गोष्टीचा आम्हांस अनुताप होण्यास यत्किंचितहि कारण उरलें नाहीं. राजसेवारूप खडतर जमिनीला स्वातंत्र्यदाहाचा संस्कार लावून व स्वतःस हीनत्व

आणणाऱ्या नानाविध श्रमांनीं तिची प्रसन्नता संपादण्याचा खटाटोप करूनहि जें पळतें पीक आमच्या पदरीं कधींहि पडलें नाहीं तेंच आतां स्वातंत्र्याचा अपहार न होतां व पहिल्यासारखी हमालीची दगदगाहि न पडतां हंगामाच्या वेळीं खुशाल आमच्या घरीं आपल्या पायांनीं चालून येत आहे. तर परम लाभप्रद व उन्नतिप्रद अशी जी ही आर्यभूमीची सेवा तिजकडे दिवसेंदिवस तिच्या बाळगोपाळांची मनोप्रवृत्ति होत जावो अशी 'सत्यकंल्पदात्या' प्रभूपाशीं उत्कंठापूर्वक प्रार्थना करून याच भारतवाक्यानंतर जवनिकेंत अंतर्धान पावतो !

• • •

REFBK-0010856

# संदर्भ आणि टीपा

( १ ) प्रस्तुत संग्रहांत एकूण २२ लेख आहेत. त्यांपैकीं पहिले तीन– ' प्रवास ' ' कविता ' व ' समुद्र ' हे कै. खं. भि. बेलसरे यांनीं संपादन केलेल्या ' विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या किरकोळ लेखांचा संग्रह भाग पहिला ' या पुस्तकांतून उध्दृत केले असून ' परभाषेंतील शब्दांची योजना व ' नाटकें करावीं कीं करूं नयेत ? ' हे दोन लेख दुसऱ्या भागांतून घेतले आहेत.

( २ ) पहिले चार लेख मूळ ' शालापत्रक ' मासिकांत ' निबंधमाले '-पूर्वीं प्रसिद्ध झाले होते. त्यावेळीं शास्त्रीबुवा ' शालापत्रक ' मासिकाचें संपादन करीत असत. ' कालिदासाच्या कांहीं कृतींचें रसग्रहण ' हा लेख ' संस्कृत कविपंचकां'तून घेतला असला तरी तो प्रारंभीं ' शालापत्रकां'तच आला होता.

( ३ ) ' परभाषेंतील शब्दांची योजना ' व ' नाटकें करावीं कीं करूं नयेत ? ' हे लेख ' केसरी ' साप्ताहिकांत अनुक्रमें ता. २ ऑगस्ट १८८१ व ता. ६ डिसेंबर १८८१ या अंकांत प्रसिद्ध झाले होते. पुढें ' किरकोळ लेखसंग्रहां'त ते समाविष्ट करण्यांत आले.

( ४ ) बाकीचे १६ लेख चित्रशाळेच्या निबंधमालेंतून पुढीलप्रमाणें घेतले आहेत. ' शकुन ' [ लोकभ्रम–'–निबंधमाला अंक १४ ]; गर्व [ अंक १६ ]; टीकाकार कसा असावा ? [ ' ग्रंथां'वर टीका '–अंक १५ ]; संस्कृत विद्येची उपयुक्तता [ लोकहितवादी–अंक ७० ]; संपत्तीचा उपभोग [ अंक ५ ]; मोरोपंतांचें कवित्व [ मोरोपंतांची कविता—अंक ५९ ]; महाराष्ट्र देशाचा इतिहास [ काव्येतिहाससंग्रह—अंक ४९ ]; इतिहासाचा उपयोग [ इतिहास–अंक ६ ]; मराठी भाषेची सांप्रतची स्थिति [ अंक १ ]; आमच्या देशाची स्थिति [ अंक ७७ ]; आमची दैन्यावस्था व तिच्यावर उपाय [ ' आमच्या देशाची स्थिति '–अंक ८३ ]; वेदांचें प्राचीनत्व [ ' वेदार्थयत्न '–अंक ३१ ]; डॉ. जॉन्सन्च्या चारित्रापासून घ्यावयाचा बोध [ डॉ. जॉन्सन् '–अंक ४० ]; वक्तृत्वाची उपपत्ति [ 'वक्तृत्व '–अंक १८ ]; आमच्या देशाचे आक्षेपक [ ' लोकहितवादी '–अंक ६५ ]; शास्त्रीबुवांचें आत्मकथन [ निबंधमाला वर्ष सहावें–अंक ७२ ]